
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. ७५५

# डॉ. बेंजामिन फ्रँकलिन



REFBK-0008900

# बेंजामिन फ्रॅंकलिन

मूळ इंग्रजी चरित्राचा मराठी अनुवाद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
२७०८६ वि. ५
अनुक्रमांक ७५५
मराठी ग्रंथ संग्रहालय
८९००
स्था. क्र.

मूळ लेखक

**रॉजर बर्लिंगेम**

अनुवादक, मुद्रक व प्रकाशक

**शंकर रामचंद्र दाते**

यशवंत छापखाना, २००/३ सदाशिव पेठ, पुणें २

REFBK-0008900

दि. १४-१०-५६) **काळ प्रकाशन** ( किंमत २ रु.

# निवेदन

**डॉ. बेंजामिन फ्रँकलिन** याचा जन्म अमेरिकन वसाहतींत १७०६ सालीं झाला. यंदा त्यांस २५० वर्षें होत असून त्यानिमित्त अमेरिकेंत सर्वत्र व जगभरही त्याचा स्मृतिदिन साजरा करण्यांत आला. त्याचें शालेय शिक्षण बेताचेंच झालें होतें. घरच्या गरिबीमुळें वयाच्या बाराव्या वर्षींच त्यानें छापखान्यांत कंपॉझिटर म्हणून काम करण्यास सुरुवात केली. पुढें स्वतंत्रपणें वाचन वाढवून तो वृत्तपत्रांतून लिहूं लागला. विनोदी व टीकात्मक लेख लिहून त्यानें अमेरिकन जनतेंत विनोदबुद्धि व वाचनाची अभिरुचि निर्माण केली.

त्यानें छापखाना काढला, वर्तमानपत्र चालविलें, पंचांग प्रसिद्ध केलें, पोस्टखात्याची व्यवस्था लावली, स्टोव्हपासून विजेपर्यंत विविध प्रकारचें शास्त्रीय संशोधन केलें, त्यासाठीं प्रयोगशाळा उभारली, विद्यापीठाचा पाया घातला, व अमेरिकन वसाहतींना एकात्म बनवून जीवनाचें तत्त्वज्ञान पुरविलें.

त्यानें अमेरिकन वसाहतींच्या वतीनें प्रथम इंग्लंडांत वकिली केली व पुढें अमेरिकन स्वातंत्र्याच्या चळवळीचा पुरस्कार केला, व शेवटीं संघराज्याची घटनाही तयार केली. आणि नंतर अमेरिकेसाठीं फ्रान्समध्यें जाऊन वकिली केली.

त्यानें अमेरिकन स्वातंत्र्याच्या उदयकाळीं केलेली कामगिरी बहुविध प्रकारची असून भारताच्या नवोदित स्वातंत्र्यकाळांत येथील जनतेला ती उद्‌बोधक व मार्गदर्शक वाटेल. म्हणून रॉजर बर्लिगेम यांनीं लिहिलेल्या बेंजामिन फ्रँकलिन याच्या सुंदर चरित्राचा हा मराठी अनुवाद प्रसिद्ध करण्यांत येत आहे,


**—प्रकाशक**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक २७०८५ वि: चारित्र
८५५५ नों: दि: ३०-११-५६

# बेंजामिन फ्रँकलिन

## १ — जन्म

सकाळपासून पॅरिस शहराच्या रस्त्यांतून लोकांची गर्दी लोटे. आज तो येणार आहे असें लोक आपापसांत बोलत, तर दुपारच्या वेळीं, तो गुप्त मार्गानें आधींच आला आहे अशा वातम्या उठत. पाठोपाठ सायंकाळीं बातमी येई कीं, अजून तो नान्त (Nantes) येथेंच आहे. तो अटलांटिक महासागराच्या प्रवासाच्या दगदगीमुळें शिणला असून विश्रांति घेत आहे. उद्यां तो खास येईल.



असें नेहमीं चाले. सन १७७६ अखेरच्या त्या दिवसांत पॅरिस शहर गुलहौशी लोकांनीं नटलेलें असे. त्याचप्रमाणें दुःखांत व दारिद्र्यांत खितपत पडलेल्या लोकांनींही तें भरून गेलेलें असे. व्हेर्सायच्या त्या भव्य राजवाड्यांत रुबाबदार पोषाख केलेले, नटलेले, सुगंधित स्त्रीपुरुष घाईगर्दीनें धावत पळत असलेले दिसत राजाची कोणावर मेहेरनजर जडली आहे व कोणावर खप्पा

मर्जी झाली आहे याच्या गुप्त वार्ता त्यांच्यांत चालत. शर्यतींत व जुगारींत राणी अतोनात पैसा खर्च करीत असे. गरीब, इतर शेतकरी आणि पोटार्थी लोकांकडून पिळून काढलेल्या पैशावर ही चैन चाले. राजा सोळावा लुई स्वभावानें गरीब होता. तो लोकांपासून दूर राही व दिवसभर आपले खेळ खेळण्यांत दंग असे.

तरी पण राजवाड्यांत, तसेंच दारूच्या गुत्त्यांत आणि बाजारपेठेंत जिकडे तिकडे तो येणार याची वार्ता पसरली होती. त्यानें आकाशांतील वीज हिसकून आणून पकडून ठेवली आहे आणि जुलमी सत्ताधाऱ्यांचा राजदंडही हिसकावून घेतला आहे, तो स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता असून समुद्रापलीकडे एक स्वतंत्र राष्ट्र उदयास येत असल्याची वार्ता सांगण्यासाठीं येत आहे, असें त्याच्याबद्दल लोकांत विलक्षण कुतूहल होतें.

तो फ्रान्सला येण्यापूर्वींच एक संशोधक व क्रांतिकारक, शास्त्रज्ञ म्हणून त्याची कीर्ति पसरली होती. 'अँवर' घासलें असतां बाहेर पडणाऱ्या विजेच्या ठिणग्या आणि आकाशांतील वीज एकच, हा शोध त्यानें लावला होता, व म्हणून लोकांत त्याच्याबद्दल विलक्षण कुतूहल होतें. त्याच्या या संशोधनानें आणि प्रत्यक्ष प्रयोगानें साऱ्या युरोप खंडांतील जाणत्या लोकांत मोठी खळबळ उडून गेली होती. सामान्य लोकांना व खेडुतांना तर, तो आकाशांतील वीज निर्धास्तपणें पकडून ती जमिनींत सोडून देतो याचें फार कौतुक व नवल वाटे ! वीज ही देवांचा रोष नसून ती एक सामान्य व नैसर्गिक सृष्टिचमत्कार आहे हें त्यानें आपल्या प्रयोगांनीं सिद्ध करून दाखविलें होतें. कांहीं लोक तर म्हणत कीं, त्यानें आकाशांतील थोडीशी वीज पकडून बाटलींत भरून ठेवली आहे !

तो यावयाचा, या निमित्तानें पॅरिसमधील पुस्तकांच्या दुकानांतून त्याचे लेख, त्याचीं पुस्तकें, त्यांचीं फ्रेंच भाषेंतील भाषांतरें विक्रीसाठीं ठेवण्यांत आलीं होतीं. जाणते पंडित त्याच्या उष्णता व प्रकाश यांच्या प्रयोगांची व त्याच्या विजेच्या यंत्रांसंबंधानें चर्चा करीत, तर सामान्य माणसें त्याच्या रिचर्डच्या पंचांगावर व त्यांतील म्हणींवर खूष असत. एकाच माणसाच्या डोक्यांत एवढें ज्ञान व त्याच्या वागण्यांत इतका साधेपणा असावा याचें यांना मोठें कौतुक वाटे !

फ्रेंच दरबारनें पिळून काढल्यामुळें आश्रयाकरतां लोकांनीं ज्याच्याकडे धाव घेतली त्या खेडवळ रूसोप्रमाणेंच त्याची राहणी साधी आहे; तसाच तो शास्त्रज्ञ लावाइए याच्याप्रमाणें महाकल्पकही आहे; आयझॅक न्यूटनप्रमाणें तो शास्त्रवेत्ता आहे, तसाच व्हॉल्टेअरप्रमाणें तो खंदा लेखकही आहे. हे सर्वच उत्कट गुण एका माणसांत आढळावेत याचें लोकांना विशेष कुतूहल वाटे.

या काळांत फ्रान्समध्यें लोकक्षोभ धुमसत होता. तो एक दिवस बॅस्टील तुरुंगाचीं दारें फोडणार होता. 'माझ्यामागें प्रलय '(After me, the deluge) हे शेवटच्या लुईच्या तोंडचे म्हणून समजले जाणारे शब्द लोकांच्या तोंडीं खेळत होते.

लोक अशा मन:स्थितींत असतांना स्वातंत्र्याचा हा नवा उद्गाता येत होता, व म्हणून लोक त्याची मार्गप्रतीक्षा करीत होते. तो कशाकरतां बरें येत आहे ? तो काय आणणार आहे ?

सुमारें पांच महिन्यांपूर्वी, अमेरिकेंत जंगलाच्या सीमेवरील तेरा इंग्लिश वसाहतींनीं स्वातंत्र्याची घोषणा केली होती. जगांतील'सर्व माणसें सारख्याच दर्जाचीं आहेत व सुखी जीवन व स्वातंत्र्य यांचा सर्वांनाच सारखा हक्क असून तो कोणी हिरावून घेऊं शकणार नाहीं, अशी त्यांची घोषणा होती. मग व्होल्टेअर तरी हेंच सांगत नव्हता काय ? अशाच प्रकारची घोषणा करण्याची फ्रेंच लोकांनाही आवश्यकता नाहीं काय ? आतां वसाहतींतून हा जो प्रेषित येत आहे तो, "आपण स्वतंत्र राज्यें असून आतां एक झालेलों आहोंत," असें सांगून त्यांच्या स्वातंत्रसंरक्षणासाठीं राजाजवळ मदत मागणार आहे काय ? आणि राजा तरी त्याला काय उत्तर देईल ? या लोकसत्तावाद्याचें, अडाणी जनतेच्या नेत्याचें राजा कसें स्वागत करील ? वेगवेगळे लोक आपल्या प्रवृत्तीनुसार मनाशीं अशा प्रकारचे प्रश्न करीत होते. पण राजा कांहीं करो; लोक त्याचें स्वागत करण्याला, त्याला पैसा पुरविण्याला, जरूर तर त्यांच्या स्वातंत्र्यासाठीं स्वत:चें रक्त सांडण्यालाही तयार होते.

लोकांत अशा प्रकारच्या भावना वाढत होत्या. ते ज्याची वाट पाहात होते तो डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत अखेर येऊन पोहोंचला.

विद्यापीठाच्या रस्त्यावर त्याची गाडी लोकांना दिसली, तेव्हां ते तिच्या मागोमाग धावत गेले. ती तिसरे प्रहरची वेळ होती. त्याची गाडी जाऊं लागली तेव्हां लोक त्याच्याकडे मोठ्या आदरानें व कुतूहलानें पाहूं लागले. गाडींत एक वृद्ध गृहस्थ, त्याच्या शेजारीं एका बाजूस सोळा वर्षांचा एक तरुण मुलगा, व दुसऱ्या बाजूस सात वर्षांचा एक छोटा मुलगा असे बसलेले होते. लोक जवळ आले. एका स्त्रीनें तर त्याच्या कोटाला स्पर्शही केला.

तो पॅरिसला आल्याची वार्ता सर्व पॅरिसभर पसरली. शास्त्रज्ञांच्या प्रयोगशाळांमधील व वेधशाळांमधील लोकांना ती तेव्हांच समजली. खुद्द राजवाड्यांत राणीपर्यंत तो आल्याची वार्ता गेली, तेव्हां ती ऐकण्याकरतां तिनेंही आपलें खेळणें क्षणभर थांबविलें. व्यापारी लोकांच्या कचेऱ्यांपासून व बाजारपेठांपासून तर शांत निवांत अशा चर्चपर्यंत व बागांतून मुलें संभाळणाऱ्या दायांपर्यंत सर्वत्र तो आल्याची वार्ता पसरली.

तो आला होता. त्यानें साधा काळा कोट घातला होता. त्यावर कसलीही कलाकुसर केलेली नव्हती किंवा रेशीम चढविलेलें नव्हतें. डोक्याला त्यानें 'तीन टोकां'ची हॅट घातली नव्हती तर साधी लोकरीची टोपी घातली होती. टोपीखालीं डोक्यावर, पावडर टाकलेला आणि फितीनें बांधलेला केसांचा टोप नव्हता. त्याचे केस विरळ आणि भुरकट पांढरे झालेले व थोडे विसकटलेले होते. त्याची टोपी डोळ्यापर्यंत कपाळावर खालीं आलेली होती. डोळ्यावर जाड काळा चष्मा होता. लोकांनीं त्याचें स्वागत केलें तेव्हां त्यानें स्मित केलें, परंतु चेहऱ्यावर भाव प्रकट होऊं दिला नाहीं. त्याची मुद्रा शांत होती. भोंवतालच्या अनिश्चित व गोंधळलेल्या वातावरणांत त्याच्या चेहऱ्यावरील निश्चयी भाव उठून दिसत होता. त्याचें वर्णनही चोहोंकडे केलें गेलें. लोक विचारीत तो कोणी क्वेकर पंथी आहे काय? नाहीं. मग कोणी प्यूरिटन, नीतिवादी तर नाहीं? कठोर अशा कॉल्व्हिनिस्ट मताचा प्रचार करणारा प्रॉटेस्टंट तर नाहीं? तो ह्यांपैकीं कोणीही नव्हता. तो स्वतंत्र विचार करणारा, बुद्धिवादी युगाचा प्रवर्तक होता. त्याचा कोणताही पंथ असा नव्हता. लोक एकमेकांना प्रश्न विचारीत व अशीं उत्तरें देत!

नंतर कांहीं वेळानें आणखी एक प्रश्न करण्यांत आला. या त्याच्या साधेपणाच्या व विनयशीलतेच्या मागें कांहीं जगद्विषयक विशेष ज्ञान, कांहीं

विशेष चतुरस्रता, सूक्ष्म दृष्टि, असें कांहीं आहे काय कीं ज्या योगें, ज्या पाताळ-यंत्री मुत्सद्द्यांच्या तो भेटी घेणार आहे त्या सर्वांना तो पुरून उरेल ? पॅरिसमध्यें शेकडों ब्रिटिश गुप्त हेर गल्लीबोळांतूनही पसरलेले होते आणि त्यांची नजर प्रत्येक अमेरिकनावर असे. हे हिकमती हेर विलायतेला कांहीं तरी बातमी पाठवितील, व त्यायोगें अमेरिकेंत लेक्झिंग्टन व बंकरहिल येथें ब्रिटिश सैनिकांना माती चारण्याऱ्या स्वातंत्र्यवादी बंडखोरांना फ्रान्समधून मिळणारी मदत बंद होईल ! या सर्वांना पुरून उरेल इतकें व्यवहारचातुर्य त्याच्या-जवळ असेल काय ?

जे लोक त्याला जवळून पाहूं शकले, ज्यांनीं त्याच्या डोळयांतील चमक प्रत्यक्ष पाहिली त्यांना असें वाटलें कीं इतकें व्यहारचातुर्य त्याच्या ठिकाणीं आहे. आणि जे प्रत्यक्ष त्याला पुढें भेटले, व त्याच्याशीं युद्धाच्या व तहाच्या गोष्टी बोलले, त्यांना तर त्याचा प्रत्ययही आला.

लौकरच हिवाळा सुरू झाला. फ्रेंच समाजांतील प्रत्येक कोनाकोपऱ्यांतून या श्रेष्ठ पुरुषाबद्दल आदराची भावना व्यक्त होऊं लागली. दुकानांतून त्याचीं चित्रें विक्रीसाठीं ठेवलीं जाऊं लागलीं. त्याचे पुतळे, अर्धपुतळे, छोटीं चित्रें घरांघरांतून दिसूं लागलीं. त्याचा उघडा मुखवटा किंवा फर टोपी घातलेला चेहरा तपकिरीच्या डब्यांवर, बिल्लयांवर, अंगठ्यांवर, नक्षीकामांत कोरला जाऊं लागला.

लोकांच्या या आदरभावाचा त्यानें मोकळ्या मनानें स्वीकार केला. लोकांची त्याला पाहण्यासाठीं व भेटण्यासाठीं गर्दी होऊं लागली, तेव्हां त्याला पॅरिसच्या उपनगरांतील पॅसी येथील एका सरदाराच्या बंगल्यांत आश्रय घ्यावा लागला. चाहत्या मंडळीपासूनही त्रास होऊं नये म्हणून त्याला जपावें लागे. त्याला पुष्कळ काम करावयाचें होतें, आणि त्या वेळच्या समजुती-प्रमाणें तो आतां वयातीत झाला होता.

अशा तऱ्हेनें वयाच्या ७१ व्या वर्षी जीवनाच्या एका नव्या दालनांत तो प्रवेश करीत होता. जगांत यापूर्वी कधींही घडून आली नसेल एवढी क्रांति या सत्तर वर्षांच्या कालांत घडून आली होती. या ७० वर्षांपूर्वी, बॉस्टन येथें मेणबत्त्या तयार करणाऱ्या जोझाया फ्रँकलिन ह्या नांवाच्या माणसाच्या, पोरावाळांनीं गजबजून गेलेल्या घरीं एका गुटगुटीत मुलाचा जन्म झाला, तोंच बेंजामिन होय.

## २ – बालपण

बेंजामिन ऊर्फ बेन याचा जन्म मॅसॅचूझेट्स् चे वसाहतींतील बॉस्टन या मुख्य शहरीं १७ जानेवारी १७०६ या दिवशीं झाला. त्या काळच्या परिस्थितीची आज आपणांला कल्पनाही करतां येणार नाहीं. उत्तर अमेरिकेच्या अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर ज्या वसाहती निर्माण झाल्या होत्या त्यांत धार्मिक असहिष्णुतेचें केन्द्र म्हणून या वसाहतींची सुमारें शतकभर ख्याति होती. पाखंड माजविल्याबद्दल इंग्लंडमध्यें झालेल्या छळामुळें पळून आलेले प्यूरिटन लोक येथें वसाहत करून राहिले होते; पण येथें आल्यावर, अमेरिकेंत जे त्यांच्या मताचे नव्हते, त्यांचा त्यांनीं असाच छळ करण्याचें सत्र सुरू केलें! ईश्वरप्रणीत म्हणून जीं तत्त्वें ते मानीत, तीं, विशेषतः त्यांचा तपशील, अमान्य केल्याबद्दल त्यांनीं अॅन हचिन्सन, जान व्हील राईट, रॉजर वुइल्यम्स यांसारख्यांना हद्दपार केलें होतें. आणि बेंजामिन फ्रँकलिन याच्या जन्माआधींच्या बारावर्षांपूर्वी त्यांनीं जादूटोणा केल्याच्या आरोपावरून १९ दुर्दैवी लोकांना आवेशाच्या भरांत फांसावर चढविलें होतें व कित्येकांना तुरुंगांत टाकलें होतें.

तथापि न्यू इंग्लंडमधील या धार्मिकतेचा किंवा धर्मशाहीचा कणा १७०६ च्या सुमारास मोडला. चर्च ऑफ इंग्लंड आणि तत्सम चर्चेस यांना येथें पूर्वी बंदी होती; पण तशा संस्थांना आतां बॉस्टनमध्यें नांदूं दिलें जाऊं लागलें होतें. पाखंडपणाबद्दल ज्यांना पूर्वी फांसावर चढविण्यांत आलें होतें, अशा क्वेकर पंथांतल्या लोकांनासुद्धां १७१० मध्यें लेव्हेरेट आळींत सभागृह करण्याला परवानगी देण्यांत आली होती. तथापि असें असलें तरी सगळ्याच लोकांच्या मनांतील पीळ अद्याप उलगडला नव्हता. लोकांमधील धार्मिक समजुती, अंधश्रद्धा, खुळेपणा कायमच होता. लोकांत अनाचार माजला आहे म्हणून त्यांना शिव्याशाप देणारे पुष्कळ असत. कोपऱ्याकोपऱ्यावर सैतान उभा आहे असें लोक मानीत. लोक दुराचारी झाले म्हणून त्यांना शासन करण्याकरतां देव वादळें निर्माण करतो व प्लेग पाठवतो असें ते समजत. औषधासाठीं झाडपाल्याचा व जळवांचा उपयोग करण्यांत येत असे. स्वच्छता राखण्याची आज जीं सर्वसामान्य साधनें उपलब्ध आहेत त्यांची त्या काळीं कल्पनाही नव्हती. गटारें रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उघडीं असत. पाणी पुरवठा विहिरींच्या साहाय्यानें होत असे. रस्त्यांची

झाडलोट, त्यावर सार्वजनिक दिवाबत्तीची सोय, आगीपासून बचावाची सार्वजनिक व्यवस्था, पोलिस संरक्षण, हें कांहीं नव्हतें. संकट आलें तर लोकांना शस्त्रें घेऊन येण्यासाठीं बोलावण्याकरतां म्हणून पहारेकरी तेवढे असत.

न्यू इंग्लंडच्या बाहेरच्या जगांतील बातमी, तिकडून जहाजें आलीं म्हणजे त्यांच्याबरोबर सावकाश येई. कॅरिबियन समुद्रांतील बेटांतील साखर कारखान्यांतून काकवी येई व व्हर्जिनिया व कॅरोलायना येथून जहाजांतून तंबाखू येत असे. न्यूयार्ककडल्या जहाजांतून येणारांकडून चांचेगिरीच्या व वेगवेगळ्या भाषा बोलणारांसंबंधींच्या गोष्टी समजत. खुद्द न्यूयार्क प्रदेश परका समजला जात असे. फिलाडेल्फियाकडील जहाजांची ये जा बरीच असे. हें शहर सर्वांत मोठें होतें. तेथें क्वेकर लोकांनीं आपलें बस्तान चांगलेंच बसविलें असल्याच्या बातम्या येत. उत्तरेकडून जीं जहाजें येत त्यांच्याबरोबर फ्रेंच व इंडियन लोकांपासूनचें भय सारखें वाढत असल्याच्या वार्ता येत. इंग्लंडहून बऱ्याच दिवसांचा व धोक्याचा प्रवास संपवून जहाजें येत, त्यांबरोबर येणाऱ्या बातम्यांवरून मात्र त्या जुन्या जगांत नव्या युगाची पहाट होत असल्याचें वर्तमान समजे. नव्यानें वसाहतीसाठीं येणारे हें सांगत; पण न्यू इंग्लंडमध्यें अज्ञानांधकार कायमच होता.

अमेरिकेंत या निरनिराळ्या वसाहतींत व प्रांतांत बरेंच अन्तर असे. तें केवळ भौगोलिकच होतें असें नाहीं; तर विचार, रीतरिवाज, राज्यपद्धति, संस्कृति, व वागण्याची सर्वसामान्य चालरीत, व नैतिक दृष्टिकोण यांतही बरेंच अन्तर असे. त्या सर्वांना एकत्र बांधून ठेवणारा बारीकसा धागा म्हणजे त्या सर्वांचा ब्रिटिश राजसत्तेशीं असलेला संबंध. बॉस्टनपासून बॉल्टिमोरपर्यन्त जाण्यास १७०६ मध्यें इतका काळ लागे कीं तेवढ्यांत आज पृथ्वीप्रदक्षिणा होऊं शकते. त्या काळांत खुष्कीवरूनही दळणवळण फार अवघड होतें; आणि कांहीं ऋतूंत तर तें अशक्यच असे. किनारा सोडून इतर भागांत रस्ते नव्हते. देशाच्या अन्तर्भागांतला प्रवास नद्यांच्या साहाय्यानें किंवा पायरस्त्यानें घोड्यावरून करावा लागे. १७०७ पर्यन्त पोस्टाची सोय खाजगी असे. आणि तीही इतकी थोडी होती कीं, मॅसॅचूझेट्स आणि व्हर्जिनिया यांच्या दरम्यान वर्षांत शंभरही पत्रें जात येत नसत. पश्चिमेकडील सरहद्द विशेषतः न्यू इंग्लंडच्या किनाऱ्यापासून फार दूर नव्हती. आणि त्यापलीकडे

अमर्याद अरण्यें होतीं. तेथें जंगली श्वापदें व इंडियन लोक राहात. मॅसॅ-चूझेटस्‌मधील पश्चिम भागांतील शेती जेमतेम पोटापुरतें देई. शेतकऱ्याच्या कुटुंबाला लागणाऱ्या सर्व जीवनोपयोगी वस्तू शेतावर पिकविण्यांत किंवा घरीं तयार करण्यांत येत असत.

अठराव्या शतकाच्या प्रारंभींच्या काळांत येथील लोकांचें जीवन अति-शय रुक्ष व कंटाळवाणें असावें असें दिसतें. जीवनांतील नित्याच्या कार्यक्रमांत बदल किंवा करमणूक करणारे प्रसंग क्वचितच घडत. नाटकांना त्या काळांत बंदीच असे. संघटित असे खेळ नव्हते. शब्बाथ मोडणारे, भुरट्या चोऱ्या करणारे, दारूबाज, आणि व्यभिचारी अशांना जेव्हां बंदींत ठेवण्यांत येई किंवा खोड्यांत अडकविण्यांत येई, तेव्हां तें पहाणें, हा एक लक्ष वेधणारा आणि कुतूहल निर्माण करणारा प्रकार असे. जे शिकलेले होते ते धार्मिक ग्रंथांतील प्रश्नांवर व प्रवचनांवर चर्चा करीत. ज्यांना वाचतां येत असे त्यांना सुद्धां बायबल किंवा पिलग्रिम्स् प्रोग्रेस या ग्रंथाची एकादी प्रत एकाकडून दुसऱ्याकडे फिरत फिरत अशी कधीं मिळाली तर ती, एवढेंच वाङ्मय उपलब्ध असे. १७०४ सालीं बॉस्टन न्यूज लेटर हें वृत्तपत्र सुरू झालें. तोंपर्यन्त कोणत्याही वसाहतींत नियमित प्रसिद्ध होणारें वर्तमानपत्र नव्हतें.

या भोंवतालच्या कंटाळवाण्या वातावरणाचा बेंजामिनच्या मनावर वाढत्या वयाबरोबर अतिशय परिणाम झाला. जात्या तो खेळकर होता. लहानपणीं समजूं लागल्यापासून प्रत्येक गोष्टींत त्याची चौकसबुद्धि दिसूं लागली होती. अज्ञानामुळें किंवा निषेध्य म्हणून ज्या गोष्टी त्याच्यापासून दूर ठेव-ण्यांत आलेल्या होत्या, त्यांच्या बाबतींत तो 'असें कां' म्हणून विचारी, त्यांची चिकित्सा करी, आणि त्या बाबतींत इतरांचा वेडगळपणा पाहून हसे. त्याला असहिष्णु वृत्तीचा लहानपणापासूनच तिटकारा होता. मनावरील दडपण, आणि खोपटींवजा घरें असलेल्या त्या गांवांतील कोंडमारा करणारें जीवन त्याला असह्य वाटे. समुद्राच्या पलीकडे एक वेगळेंच जग आहे, तें तेजस्वी आहे, मन उत्फुल्ल करणारें आहे, व बहुरंगी आहे,पण याची मेंढ्यांच्या चरबीच्या मेणवत्या ओतणाऱ्या आपल्या बापाला, व खंडीभर भावंडांना कांहींही कल्पना नाहीं हेंही त्याला माहीत होतें. त्याच्या भावंडांपैकीं फक्त एकाला —बेंजामिनचा सावत्र भाऊ जोझाया नांवाचाच होता, त्याला — त्याची कल्पना होती.

आणि म्हणून तें जग स्वतः पाहण्यासाठीं एक दिवस तो जहाजावर बसून पळून गेला होता; पण त्याच्या या कृत्याबद्दल फ्रँकलिन कुटुंबांत कधीं बोलणें निघत नसे.

मेणबत्त्या ओतण्याचा त्यांचा उद्योग फार कंटाळवाणा होता. त्यांतील चरबीची घाण फार येई. त्यामुळें संधि मिळाली कीं बेन समुद्रकांठीं जाऊन जहाजांची ये-जा पाहात बसे. बंदराबाहेर नांगरून पडलेलीं व पश्चिमच्या वाऱ्याची वाट पाहात असलेलीं मोठमोठीं जहाजें तेथें त्याला दिसत. बापाची त्याच्यावर नजर असे. आपला एक मुलगा असाच निघून गेला, तो प्रसंग पुन्हा येऊं नये म्हणून तो दक्ष होता. या सर्वांत धाकटया मुलाचें त्याला कौतुक वाटे व भयही वाटे. बेनला बोलतां येऊं लागण्यापूर्वींच वाचतां येऊं लागलें होतें. पुस्तकांचें त्याला वेड असे, त्याप्रमाणें सागरावरील खाऱ्या हवेचेंही त्यास फार आकर्षण असे. निसर्गांतील उष्णतेचे व थंडीचे चमत्कार, झाडी, कृमिकीटकांची हालचाल या गोष्टींत त्याचें मन रमून जाई. त्यामुळें मेणबत्त्या ओतण्याकडे त्याचें नेहमींच दुर्लक्ष होत असे.

बेनला धर्मोपदेशक करण्यासंबंधाचा विचार जोझायानें एकदां बोलून पाहिला. वाचन व चिंतन करणारांचें तेंच खरें स्वाभाविक क्षेत्र असतें. पण बेंजामिननें चर्चमधलीं प्रवचनें ऐकलीं होतीं. जग धुंडाळावें असें त्याच्या मनांत येई. चर्चमधील जीवन त्याला खुजें व वेडगळपणाचें वाटे. हा वेळेचा केवळ दुरुपयोग आहे असें तो म्हणूं लागला, तेव्हां तर फ्रँकलिन कुटुंबाला धक्काच बसला. हें कुटुंब ओल्ड साऊथ चर्चचें अभिमानी होतें.

आपल्याच कुटुंबांतला धाकटा मुलगा नास्तिक निघतो कीं काय अशी शंकाही बोलली गेली. पण बेनवर बापाचें प्रेम होतें. त्यानें बेनला क्षमा केली. बेंजामिन याच नांवाचा बेनचा एक चुलता होता. त्याचाही तो फार लाडका असे. त्याच्या हें तेव्हांच लक्षांत आलें कीं या मुलाला धर्मोपदेशक करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. अशा परिस्थितींत समुद्राच्या खाऱ्या वाऱ्यापेक्षांही अधिक आकर्षक अशा दुसऱ्याच एका वासानें बेनचें लक्ष आकृष्ट केलें.

एकादा मुलगा असा असतो कीं त्याचें लक्ष त्या वासानें वेधलें गेलें म्हणजे त्याला त्याचें आकर्षण जन्मभर राहतें. त्यांतूनच कांहींना लिहिण्याचा, प्रकाशनाचा, जाहिरातीचा व्यवसाय आवडूं लागतो. कांहीं ग्रंथालयें, किंवा

वृत्तपत्रें यांकडे वळतात. बेंजमिननें हळूहळू या सर्वच क्षेत्रांत पदार्पण केलें. त्याचा एक भाऊ जेम्स यानें एक छोटा छापखाना सुरू केला होता. त्यांत बेंजामिनचा प्रवेश झाला. व त्यांतूनच तो पुढें लेखक व प्रकाशक म्हणून प्रसिद्धीस आला. मुद्रणाच्या शाईच्या वासानें त्याला आकर्षित केलें होतें.

या काळांत छापखाना ही एक नवलाईची गोष्ट होती. वसाहतींतील इतर शहरांच्या मानानें बॉस्टन हें शहर सुशिक्षित समजलें जात असे. बॉस्टन शेजारींच चार्लस् नदीच्या पलीकडे केंब्रिज नांवाचें एक खेडें होतें. (त्याचें पूर्वीचें नांव न्यू टाउन होतें.) तिथें जॉन हॉवर्ड या एका तरुण इंग्रज माणसाच्या ग्रंथसंग्रहालयांतून जवळव एका कॉलेजची वाढ होत होती; तथापि असें असलें तरी बॉस्टनमध्यें छापखान्यांची विशेष गरज होती असें मात्र नाहीं. येथें दोन छापखाने होतेच. जेम्स फ्रँकलिनचा एक छापखाना होता. दुसऱ्यांत 'न्यूज लेटर' हें वर्तमानपत्र छापलें जात असे. जेम्सही गॅझेट नांवाचें एक वृत्तपत्र छापीत असे. अमेरिकन वसाहतींतील सात आठ हजार वस्तीच्या गांवांत दोन वर्तमानपत्रें चालणें म्हणजे ती विशेषच गोष्ट होती.

लौकरच जेम्स आपल्या धाकट्या भावाकडे संशयी दृष्टीनें पाहूं लागला. कदाचित् त्याला त्याचें भयही वाटत असावें. उपरोधिक लिहिण्याची शैली या मुलांत दिसूं लागलेली होती. लहानपणींच त्याला प्रौढपण आलेलें होतें. कोणत्याही पदार्थांतून किंवा प्रसंगांतून विनोद निर्माण करणारा हा मुलगा आपल्या भावाच्या गंभीर वागण्याची चेष्टा करी. कधीं कधीं ती मर्यादेबाहेरही जात असेल. मग जेम्सचा राग अनावर झाला म्हणजे तो त्याला खरपूस ठोक देई. या खोड्यांमुळें जेम्सला बेन नकोसा झाला. पण केवळ बापाच्या आग्रहामुळें त्याला ठेवून घेणें जेम्सला भाग पडलें. कारण छापखाना आणि तिथले खिळे वगैरे पाहतांच बेनची कळी खुलली होती, व म्हणूनच बापानें जेम्सजवळ उमेदवारी करण्यासाठीं त्याला ठेवलें होतें.

अशा रीतीनें वयाच्या बाराव्या वर्षीच बेंजामिन फ्रँकलिन याच्या व्यावसायिक जीवनास सुरवात झाली. मुद्रण हेंच पुढेंही त्याच्या जीवनाचें केन्द्र राहिलें. छापखान्यांतील टाईप जुळणीचें जुळाऱ्याचें व छापनिसाचें काम तो तेव्हांच शिकला व त्यांत तरबेजही झाला. दुसरे कामगार येऊन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक 27086 वि: चरित्र
क्रमांक 8855 नों: दि: 30-7-56

कामाला सुरवात करतात न करतात, तेवढ्या वेळपर्यंत बेनचें काम पुरें झालेलें असे. त्यामुळें त्याला रिकामा वेळ पुष्कळ मिळे. या वेळेचा उपयोग त्यानें स्वतःच्या शिक्षणाकडे केला. त्याचें पद्धतशीर शालेय शिक्षण फारसें झालेलें नव्हतें. पण आतां रात्रीच्या वेळीं जें कांहीं वाचावयास मिळे तें तो वाचून काढी. छापखान्याच्या व्यवसायांत असल्यामुळें त्याला पुस्तकें उपलब्ध होऊं शकत. पुस्तक विक्रेत्यांच्या दुकानांतील उमेदवार मुलांबरोबर त्याची मैत्री जमली होती. त्यांच्याकडून त्याला रात्रीच्या वेळीं वाचावयास गुपचूपपणें पुस्तकें मिळत व तोही तीं पुस्तकें जशींच्या तशीं कोऱ्यासारखीं लगेच परत करी. कांहीं वेळां आज आणलेलें पुस्तक उद्यां परत करावयाचें असे, व अशा वेळीं आपण रात्र रात्र जागून पुस्तकें वाचून काढीत असूं असें त्यानें म्हटलें आहे. या काळांत त्यानें जॉन बन्यन याचे ग्रंथ वाचून काढले. त्याचप्रमाणें प्लूटार्कनें लिहिलेलीं 'चरित्रें', रिचर्ड बर्टन याचा 'ऐतिहासिक लेखसंग्रह' इत्यादि पुस्तकें त्यानें वाचलीं. तसेंच धार्मिक विषयांवरीलही कित्येक पुस्तकें आपण वाचून काढल्याचें तो सांगतो. धर्मविषयाचा कंटाळा असला तरी आपल्याला ज्ञानाची तहान लागली होती असें त्यानें म्हटलें आहे. आतां तो लिहूंही लागला होता. त्यानें आरंभीं केलेल्या कविता अगदींच रद्दी होत्या. त्या त्यानें छापल्या व गांवांत चार ठिकाणीं जाऊन त्या विकल्याही. पण आपण कवि नाहीं. हें त्याला लौकरच आढळून आलें. तो गद्यलेखनाकडे वळला.

जेम्सबरोबर झालेल्या कराराप्रमाणें जेम्सकडे बेन फक्त जेवीत असे. त्याशिवाय त्याला वेगळा पगार नव्हता. बेन २१ वर्षांचा होईपर्यंत बेननें जेम्सकडे जेवणावारी काम करावें व जेम्सनें त्याला फक्त शेवटच्या वर्षांत पगार द्यावा असें ठरलें होतें. पण बेननें हरतऱ्हा करून चार पैसे मिळविले व त्यांतून पुस्तकें विकत घेतलीं. पुस्तक वाचून झालें म्हणजे तें विकून टाकावें व नवें घ्यावें असा त्याचा क्रम चाले. बालवयांतच त्याची बुद्धि प्रगल्भ झाली होती. योग्यायोग्य काय हें त्याला कळूं लागलें होतें व टाकाऊ गोष्टीबद्दल त्याच्यांत तिटकारा निर्माण झाला होता. त्या काळांत मुलें लहान वयांतच प्रौढ होत. पण तशाही स्थितींत त्याच्या ठिकाणीं दिसूं लागलेला पोक्तपणा विशेषच होता.

त्याची इच्छाशक्ति जशी प्रबळ होती, त्याचप्रमाणें त्याचें शरीरही दणकट होतें. तो पहाटेच्या पूर्वीच उठे. वाढत्या वयाच्या मुलांना जेवढी झोंप लागते त्याच्या निम्मी त्याला पुरत असे. उठल्यावर तो बंदरावर जाई व तेथें समुद्रांत मैलभरपर्यंत पुढें जाऊन पोहोत असे. पोहतांना तो वेगवेगळ्या प्रकारचे हात मारण्यास शिकला. कमींत कमी शक्ति खर्चून जास्तींत जास्त काय करतां येईल हें पाहाण्याकडे त्याचें लक्ष असे. पोहण्यांतील कौशल्य व सफाई संपादन करावी, गति वाढवावी, व पुष्कळ वेळपर्यंत पाण्यांत राहता यावें यासाठीं त्यानें प्रयत्न केले. पोहून झाल्यावर तो थोडी न्याहारी करी व नंतर दुकानांत गेल्यावर तेथेंच दुपारचें जेवण घेई. भाकरी व थोडें तोंडी लावणें असलें म्हणजे त्याला पुरत असे. खाऊन झाल्यावर तो दोन घोट फक्त पाणी पिई. त्याचे इतर सहकारी कामगार मांसाशन करण्यांत व दारू पिण्यांत दंग असत, तर या वेळेचा उपयोग बेन अभ्यासाकडे करीत असे. तरतरीत बुद्धि व दांडगी ग्रहणशक्ति यांमुळें बेनची चांगलीच प्रगति झाली होती. मिताहार व मितपान यानें हे गुण निर्माण होतात, असें त्याचें मत होतें.

तो सोळा वर्षांचा असतांना शाकाहारी भोजनाविषयीं एक पुस्तक त्याच्या वाचनांत आलें व त्याचा त्याच्यावर परिणाम होऊन तो शाकाहारी बनला. तो जेम्सकडे जेवीत असे. त्याच्या या शाकाहाराच्या आग्रहामुळें जेम्सच्या घरीं गैरसोय होऊं लागली व तऱ्हेवाईकपणाबद्दल त्याच्यावर टीकाही होऊं लागली. तेव्हां त्यानें आपल्या भावाला सांगितलें कीं, "माझ्या जेवण्यासाठीं तुला येणाऱ्या खर्चाच्या निम्मी रक्कम तूं मला रोख देशील तर माझ्या जेवणाची मी स्वतंत्र व्यवस्था करीन." जेम्स ह्या गोष्टीला तावडतोब तयार झाला. जेम्सकडून जेवढे पैसे मिळत त्याच्याही निम्म्या रकमेंत बेन आपलें जेवण भागवी व उरलेले पैसे पुस्तकें घेण्यावर खर्च करी.

वाढत्या वयाबरोबर बेंजामिनच्या स्वभावांतील एक द्वंद्व अधिकाधिक स्पष्ट होऊं लागलें होतें; व तें आयुष्यभर तसेंच राहिलें. वैयक्तिक जीवनांत त्याची रहाणी कडक व नियमबद्ध होती. ज्या वयांत तरुण माणसें खूप खाण्याचा हव्यास धरतात, त्या वयांत त्यानें आपला आहार असा ठरवून टाकला कीं त्याचें लोकांना आश्चर्य वाटावें. त्याच्या वाचनाचे विषय कथा कादंबऱ्या नसून, नीतिशास्त्र किंवा तत्त्वज्ञान असे गंभीर असत. त्याचे सहकारी

गुत्त्यांत बसून मजा करीत; पण त्याचा त्याला तिटकारा असे. तो दारू न पितां पाणी पिई. त्या युगांत ही संवय फारच भयंकर समजली जात असे. धर्माविषयीं त्यानें बारकाईनें विचार केला होता. विश्वरचनेविषयींचे त्याचे विचार परिणत झाले होते. हें सर्व पाहिलें म्हणजे त्याचें श्रेष्ठत्व ध्यानांत येतें. त्याचे दोस्त त्याला शिष्ट समजत असले तर त्यांत आश्चर्य नाहीं. अमेरिकेंतील बालमनापुढें त्याचें हेंच चित्र पिढ्यान्‌पिढ्या ठेवण्यांत आलें आहे.

पण त्याचबरोबर त्याच्या स्वभावांतील आणखीही एक वैशिष्ट्य दिसून येतें. स्वतंत्र व प्रगल्भ विचारांबरोबरच त्याच्यांत खोडकर व विनोदी वृत्तिही जागृत झालेली होती. ही वृत्ति त्याच्यांत कोठून आली हें सांगणें कठीण आहे. फ्रँकलिन कुटुंबाचा पूर्वेतिहास पाहिला तर खूप मुलेंबाळें असलेल्या एका गरीब शांतस्वभावी इंग्रज शेतकऱ्याचें तें घराणें असल्याचें आढळून येतें. मागच्या पांच पिढ्यांतील प्रत्येक पिढींत सगळ्यांत धाकट्या मुलाचा सर्वांत धाकटा मुलगा बेन होता. या कुटुंबाचा तेथें लोहारीचा व्यवसाय होता. जोझायानें १६८०साली बायको व तीन मुलें बरोबर घेऊन इंग्लंडहून बॉस्टनला प्रयाण केलें. तेथें सातव्या बाळंतपणांत त्याची बायको वारली. त्यानंतर त्यानें पीटर फॉलगर याची मुलगी अबाया हिच्याशीं लग्न केलें. बेन हा तिचा आठवा मुलगा. दूध रस्त्यावरील आपल्या घरीं आपलें पान तेरावें असे अशी आठवण बेननें सांगितली आहे.

सारांश, हे लोक व्यवसाय करून पोट भरणारे होते. खोडसाळपणाची वृत्ति त्यांच्यांत कोठें आढळत नाहीं. पण बेनमध्यें ती उत्कटत्वानें दिसूं लागली, व तिनें बॉस्टनमधील वातावरण बेचैन करून टाकलें. त्याच्यांतील ही वृत्ति इतकी बोचक झाली होती कीं तो बंडखोर बनला. गांवांतील बडे समजले जाणारे लोक गंभीर चेहेरे करून एकीकडे धार्मिक प्रवचनें तासन्‌तास ऐकत, आणि तेच लोक, दुसरीकडे दारू पिऊन झिंगून गुत्त्यांतून बाहेर पडत किंवा वेश्यांबरोबर खलाशी धिंगाणा घालीत तें मोठ्या कौतुकानें पाहात. हा दांभिकपणा सहन न होऊन त्याच्यांतील उपरोध वृत्ति शिगेस पोचली.

बेन पंधरा वर्षांचा असतांनाच ही ढोंगबाजी त्याच्या लक्षांत येऊन चुकली होती. बॉस्टनच्या लोकांनीं ती आतां बाहेर काढली पाहिजे व उपहास्य

ठरविली पाहिजे असें त्याला वाटूं लागलें. त्यानें निरीक्षण पुष्कळ केलें होतें. कॉलेज विद्यार्थ्यांबरोबर त्यानें चर्चा केल्या होत्या व त्यांच्या शिक्षणाचा दर्जा पारखून टाकला होता. रात्रीच्या चांदण्यांत गल्ल्याकुच्यांतून चालणारे चहाटळ प्रेमचाळे त्यानें पाहिले होते. चोरटा व्यापार कसा चालतो व त्याजवर कशी नफेबाजी चालते याची त्यानें माहिती करून घेतली होती. आंतून चाललेले हे सर्व प्रकार, व वरून स्वीकारलेला संभावितपणाचा आव पाहून त्याला मोठा विस्मय वाटे. एकदां हा ढोंगबाजीचा बुडबुडा फुटला म्हणजे लोकांचीही उपहास वृत्ति जागृत होईल याची त्याला खात्री होती. हा बुडबुडा फोडण्याचें सामर्थ्य तो जुळवीत असलेल्या त्याच्या हातांतील टाईपांत होतें.

बेनच्या मनानें या लोकांची खोडकी जिरविण्याचें घेतलें. त्यानें ज्या गोष्टी केल्या त्यामुळें बॉस्टनमध्यें मोठीच खळबळ उडून गेली. त्याचा परिणाम म्हणून त्याचा भाऊ जेम्स याला तुरुंगाची कोठडी पाहण्याची पाळी आली, व वयाच्या सोळाव्या वर्षी बेन मुद्रक, प्रकाशक, व लोकांच्या दृष्टीनें न्यू इंग्लंडमधील सर्वांत महत्त्वाच्या वर्तमानपत्राचा मालकही बनला ! एरवीं हें प्रकरण केव्हांच विसरलें गेलें असतें. पण बेंजामिनशीं त्याचा संबंध आल्यामुळें त्याला महत्त्व आलें. अमेरिकनांच्या रुक्ष, कंटाळवाण्या व नीरस जीवनांत फ्रँकलिनच्या या वेळच्या हास्यविनोदाच्या रूपानें केवढी मौलिक भर घातली हें त्या काळच्या कागदपत्रांवरून चांगलें दिसून येतें.

---

## ३ – वृत्तपत्रव्यवसायास सुरुवात

त्या काळांत मुद्रकाला विशेष महत्त्व होतें. पुष्कळदां तो प्रकाशक व संपादकही असे. जेम्स फ्रँकलिन यानें १७२१ मध्यें न्यू इंग्लंड कुरँट नांवाचें पत्र सुरू केलें. तेव्हां बहुतेक सर्व कामें तोच करी. बातमी गोळा करणें, वृत्तपत्रीय पद्धतीनें ती संपादन करणें, छापणें हें सर्व तो करी. बेंजामिनचें वय या वेळीं १५ वर्षांचें होतें. तो छापखान्यांत एक शिकाऊ उमेदवार म्हणून होता. जेम्सचे मदतनीस कंपोझ करणें, यंत्रावर छापणें व वर्तमान-पत्राचे अंक वाटणें इत्यादि कामें करीत. हें वर्तमानपत्र म्हणजे पाठपोठ

छापलेला एक ताव असे व तें आठवड्यांतून एकदां निघे. दुसरें कांहींच वाचावयास नसल्यानें बॉस्टनचे लोक बारीक टाइपांतलें हें पत्र घेत असत.

जहाजांच्या जाण्यायेण्याच्या संबंधाची बातमी या पत्रांत दिलेली असे. त्याशिवाय लंडनमध्यें कित्येक महिन्यांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या लेखांतील एकादा उतारा, वाचकाचें एकादें पत्र, तें जेम्सच्या एकाद्या मित्राचेंच असावयाचे, याशिवाय त्यांत फारसें वाचनीय असें कांहीं नसे. त्यामुळें पत्र अगदीं बेचव वाटे. ही गोष्ट बेनच्या लक्षांत येऊन चुकली होती. अर्थात् बॉस्टनमधील इतर वर्तमानपत्रांचा दर्जा याहून अधिक चांगला नव्हताच. अशा परि-स्थितींत आपलें तिसरें पत्र, त्यांत चुरचुरीतपणा नसेल तर कसें यशस्वी होईल, याचा विचार या पंधरा वर्षांच्या वयाच्या मुलाच्या मनांत घोळूं लागला.

शब्दरूपानें आपले विचार व्यक्त करण्याची बेनची बौद्धिक तयारी या वेळपर्यंत बरीच झालेली होती. प्रत्येक गोष्ट पद्धतशीर रीतीनें करण्याच्या संवयीनुसार त्यानें लिहिण्याचा अभ्यास केला होता. विलायतेंत प्रसिद्ध होणाऱ्या स्पेक्टेटर वृत्तपत्राचें एक बांधीव पुस्तक एकदां त्याच्या हातीं आलें. तें त्यानें मोठ्या आवडीनें पुन्हा पुन्हां वाचून काढलें. लिहिण्याची ही पद्धति आपण उचलावी असें त्यानें मनाशीं ठरविलें. ॲडिसनच्या शैलीनें त्यानें आपल्या स्वतःच्या विषयांवर निबंध लिहून पाहिले व लिहून झाल्यावर स्पेक्टेटरमधील लेखाबरोबर आपल्या लिखाणाची स्वतःच तुलना करून त्यानें आपल्या लिहिण्यांतील दोष दुरुस्त केले. आपलें शब्दभांडार फार तुटपुंजें असल्याचें लवकरच त्याला आढळून आलें. तें भरून काढण्यासाठीं त्यानें एक नामी युक्ति शोधून काढली. थोड्या वेळांत जास्तींत जास्त परिणामकारक उपाय किंवा युक्त्या शोधून काढणें हें त्याचें वैशिष्ट्य होतें. कविता करतांना यमक जुळविण्याकरतां नवे शब्द हुडकावे लागतात याचा त्याला पूर्वीं अनुभव आला होता. म्हणून त्यानें एक युक्ति केली. तो आपल्या निबंधांचें पद्यांत रूपांतर करून पाही व त्यांचें पुन्हां गद्यांत रूपांतर करी. या अभ्यासानें त्याच्या शब्दसंपत्तींत पुष्कळच भर पडली.

अशा रीतीनें केलेले कांहीं प्रयत्न त्यानें आपल्या चहात्या, व पढीक मित्र-मंडळींना दाखविले व पुढें कुरँटकरतां कांहीं लेखन करण्याचेंही योजिलें.

उघड रीतीनें तसें करतां येणार नाहीं हें त्याला ठाऊक होतें. आपलें लिखाण कितीहि चांगलें असलें तरी शिकाऊ उमेदवार मुलाचें हें लिखाण म्हणून आपला थोरला भाऊ त्याकडे तिरस्कारानें बघेल, एवढेंच नव्हे तर आपल्याला मारही देईल हें तो जाणून होता. पण लिहिण्याची ओढ जाईना. तेव्हां बेननें आपल्या अक्षराचें वळण बदललें, एक टोपण नांव धारण केलें आणि छापखान्यांतले सर्व लोक निघून गेल्यावर एका रात्रीं दाराच्या फटींतून त्यानें आपलें लिखाण हळूच आंत सरकवलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपले सहकारी तो कागद घेऊन काय करतात व शेवटीं त्या लिखाणाचें काय होतें याकडे, आपली जिज्ञासा दाबून पण उत्सुकतेनें, तो पाहूं लागला. त्याच्या वाङ्मयीन जीवनाला अशा रीतीनें वयाच्या सोळाव्या वर्षीं सुरवात झाली. या वेळची आठवण सांगतांना तो लिहितो —

> त्या सहकाऱ्यांनीं तो कागद वाचला व माझ्यासमोरच त्यावर चर्चा केली. त्यांना तो लेख पसंत पडला. तें पाहून माझ्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. या लेखाचा लेखक कोण असावा यासंबंधांत त्यांच्यांत तर्क वितर्क सुरू झाले. त्यांना जीं नांवें सुचलीं तीं मोठमोठ्या पंडितांची आणि प्रतिष्ठितांची होतीं.

यामुळें बेनला उत्तेजन मिळालें. त्यानें लेखामागून लेख लिहिण्याला सुरवात केली. आज त्या लेखाला तसें कांहींच महत्त्व नाहीं. बेंजामिन फ्रँकलिन याचे ते लेख म्हणून त्यांना काय तें महत्त्व. त्यांची रचना बरीच कृत्रिम आणि कंटाळवाणी असे. तथापि त्यांतही एक प्रकारच्या विनोदाच्या छटा उमटलेल्या आहेत, त्या आजही लोकांना आवडतील. सन १७२२ सालच्या उन्हाळ्यांत ‘ सायलेन्स डू गुड ’ या नांवाखालीं तो पत्रें लिहूं लागला. लेखक कोणी आपद्ग्रस्त बाई आहे असें त्यानें पहिल्याच पत्रांत लिहून ठेवलें. लेखक बाई म्हटल्यानंतर ही बाई कोण असावी हें शोधून काढणें लोकांना अधिकच कठीण झालें. त्यामुळें बॉस्टनमधील लोकांवर कडक उपरोधिक टीका करण्यांत त्याच्या लेखणीला धारही चढूं लागली. कुरंटच्या एकाआड एक अंकांत हीं पत्रें प्रसिद्ध होऊं लागलीं व त्यांचा परिणामही दिसूं लागला.

एका पत्रांत प्रणयाराधनेचें वर्णन करतांना तो म्हणतो : माणूस जेव्हां प्रथमच प्रेमाचे चाळे करूं लागतो तेव्हां तो अतिशय बावळट व हास्यास्पद

दिसूं लागतो. एका पत्रांत त्यानें तत्कालीन काव्याची टिंगल केली होती. दुसऱ्या एका पत्रांत स्त्रीशिक्षणाची महती गाण्यांत आली होती आणि तें एका अर्थी योग्यहि होतें. कारण त्या काळांत स्त्रियांना अगदीं सामान्य लिहिण्यावाचण्यापलीकडे आणि नित्याच्या गृहकृत्यापलीकडे कांहीं शिकविलें जात नसे. स्त्रिया विधवा झाल्या असतां त्यांना दारिद्र्यांत दिवस कंठावे लागूं नयेत ह्यासाठीं त्यानें एक योजना शोधून काढली होती, ती एका पत्रांत देण्यांत आली होती. पण या सर्व पत्रांचा रोख तत्कालीन परिस्थितीवर उपरोधिक भाषेंत कडक टीका करण्याचा असे. केंब्रिज व बॉस्टनमधील लोकांचे कान उपटावेत व पाद्री लोकांचा व हार्वर्ड कॉलेजांतील बुद्धाचार्यांचा उपहास करून त्यांच्यावर कोरडे ओढावेत यावर त्यांत भर असे.

हीं पत्रें प्रसिद्ध होऊं लागल्यावर त्यांचा खरा लेखक कोण हें बेननें आपल्या भावाला सांगून टाकलें. तें त्यानें कां व कसें सांगितलें हें माहीत नाहीं. बहुधा पत्रांच्या लोकप्रियतेच्या फुशारकींत बेननें स्वतःच जेम्सला हें सांगितलें असावें असें दिसतें. या पत्रांना लोकांकडून वेगवेगळ्या ठिकाणांहून उत्तरेंही येऊं लागलीं. कुरँटचा खपहि वाढला. अमेरिकन वृत्तपत्र व्यवसायांत विनोद व करमणूक या पत्रांच्या द्वारा प्रथमच लोकांपुढें आली. प्युरिटन लोकांच्या सतत गंभीर स्वरूप धारण करणाऱ्या चेहेऱ्यांवर हास्याच्या छटा उमटविण्याचें कार्य यांनीं साधलें, व ढोंगी लोकांच्या जीवनावर कोरडे ओढण्याची हौसही बेननें भागवून घेतली.

बेनच्या लिखाणाला लोकप्रियता लाभली हें जेम्सलाही नाकारतां आलें नाहीं. तथापि एवढ्यानें या उमेदवार पोराला चढून जाऊं देतां कामा नये असें त्यानें ठरविलें. जेम्स त्याला अधूनमधून शासन करी तेव्हां बेन अस्वस्थ होई व जेम्सच्या हेतूबद्दल साशंक बने. तथापि भांडणें झालीं तर बाप मध्यें पडून तीं मिटवीं, आणि जेव्हां आणीबाणीची वेळ आली, तेव्हां जेम्स बेंजामिनशीं खऱ्या बंधुप्रेमानें वागला व त्याच्यासाठीं त्यानें पदराला खारही लावून घेतला.

त्या काळांत बॉस्टनमध्यें आपण आज समजतों त्या प्रकारचें मुद्रणस्वातंत्र्य ही चीजच नव्हती. त्यासाठीं फ्रँकलिनला जन्मभर झगडावें लागलें.

लहानपणीं आलेल्या अनुभवानें त्याची ईर्ष्या पुढें वाढत गेली असावी. जेव्हां या पत्रांना फारच धार चढली, तेव्हां जेम्सला अटक करून तुरुंगांत टाकण्यांत आलें. या पत्रांचा लेखक कोण हें सांगण्याचें जेम्सनें नाकारलें. बेनलाही कोर्टापुढें खेचण्यांत आलें होतें, पण त्यानेंही भावाप्रमाणेंच उत्तरें दिलीं व लेखकाचें नांव गुप्त राखलें.

शेवटीं कोर्टानें हुकूम केला कीं, जेम्सनें कुरँट पत्र बंद करावें. त्या बरोबर कुरँटच्या शेवटच्या अंकांत कुरँट पत्र आपण बंद करीत असून यापुढें बेंजामिन फ्रँकलिन तें छापून प्रसिद्ध करणार आहे अशी सूचना जेम्सनें छापली. एका नवशिक्याला पुढें घालून हा लपवालपवीचा प्रकार जेम्स करीत आहे असें वाटूं नये म्हणून त्यानें बेनच्या उमेदवारीचें करारपत्र जाहीरपणें त्याला परत करून टाकलें. पण त्याबरोबरच खाजगी रीतीनें त्यानें बेनकडून एक करार लिहून घेतला. यामुळें जगाच्या दृष्टीनें बेंजामिन फ्रँकलिन हा स्वतंत्र नागरिक म्हणून पुढें आला खरा; पण वस्तुतः त्याच्या पूर्वीच्या परिस्थितींत कांहींच फरक पडला नाहीं.

मात्र या घटनेमुळें बेंजामिनला एक मोठी संधि मिळाली व तिचा त्यानें पुरेपूर उपयोगही करून घेतला. आतां तो स्वतःच्या नांवानें लिहूं व छापूं लागला होता. त्यामुळें त्याची लोकप्रियताही वाढली होती. पुढें जेम्स तुरुंगांतून सुटून आल्यावर त्याचा व बेंजामिनचा खटका उडूं लागला आणि छापखान्याच्या व वर्तमानपत्राच्या मालकीबाबतचे गुप्त व उघड करार यांतून वाद होण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं. तेव्हां बेंजामिननें आपण होऊन बाजूस सरण्याचें ठरविलें आणि आपला तो निश्चय त्यानें भावाला सांगून टाकला.

पण बेननें आपल्याला सोडून जावें हें जेम्सला पसंत नव्हतें. बॉस्टनमधील दुसऱ्या छापखान्यांनीं बेनला ठेवून घेऊं नये म्हणून त्यानें त्यांना सांगून ठेविलें; आणि ठेवून न घेण्याचें त्यांच्याकडून वचनही मिळविलें. पण बेनचा निश्चय ठरला होता, व म्हणून त्यानें बॉस्टनच सोडण्याचें ठरविलें. कुरँटचा खरा चालक कोण हें आतां बॉस्टनच्या सत्ताधाऱ्यांना कळून चुकलें होतें व म्हणून त्यांना बेन नकोसा झाला होता. गांवांतले धार्मिक लोकही त्याच्याकडे नास्तिक, पाखंडी म्हणून बोट दाखवूं लागले होते. एकंदरींतच

बॉस्टनमध्यें राहणें त्याला असह्य झालें होतें, म्हणून त्यानें आपला स्नेही जॉन कॉलिन्स याच्या साहाय्यानें गुप्तपणें बॉस्टन सोडून न्यूयॉर्कला जाण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें तो न्यूयॉर्कला गेला, पण तेथें त्याला कांहीं काम मिळू शकलें नाहीं. बॉस्टनच्या मानानें तिथलें सांस्कृतिक जीवन फारच मागासलेलें होतें. तेथें एकही वर्तमानपत्र नव्हतें, तेथें फक्त एक छापखाना वुइल्यम ब्रॅडफर्ड नांवाच्या गृहस्थाचा होता, पण त्याला बेनची जरूरी नव्हती. तथापि त्यानें बेनची सहानुभूतीनें पूसतपास केली; व त्याला फिलाडेल्फिया येथें जाण्यास सुचविलें. तेथें त्याचा मुलगा अॅण्ड्र्यू ब्रॅडफर्ड एक छापखाना चालवीत होता. बेनला त्या छापखान्यांत काम मिळण्यासारखें होतें.

फिलाडेल्फिया हें न्यूयॉर्कपासून पुष्कळ दूर होतें व रस्ताही सरळ नव्हता. तेथें जाऊन पोचण्यास बेनला पांच दिवस लागले. कपडे मळलेले, पोटांत भूक लागलेली, गांवांत कोणी ओळखीचें नाहीं, यामुळें बेनला घरची सारखी आठवण होऊं लागली. रस्त्यानें जाणारे येणारे लोक त्याच्याकडे संशयित मुद्रेनें पाहात व हा कोणी तरी पळून आलेला मुलगा असावा असा तर्क करीत !

भटकतां भटकतां तो क्वेकर लोकांच्या सभास्थानीं गेला. लोकांची तेथें प्रार्थना चालू असतां त्याला तेथेंच झोप लागली. कांहीं वेळानें जवळच एक खाणावळ होती, तेथें तो गेला व पुन्हा झोपला तो पुरे बारा तास. श्रमाचा थकवा गेल्यावर तो जागा झाला व नंतर ब्रॅडफर्ड याच्या छापखान्याकडे गेला. त्यानें बेनचें स्वागत केलें व त्याला प्रथम जेवू घातलें. त्याच्याजवळ बेनला देण्याजोगें काम नव्हतें. म्हणून त्यानें वुइल्यम कायमर याच्या छापखान्यांत त्याची सोय लावून दिली. बेनचें काम पहातांच कायमरच्या तावडतोब लक्षांत आलें कीं फिलाडेल्फियांतील कोणत्याही कामगारापेक्षां बेन अधिक वरचढ असून त्याला छापखान्याच्या व्यवसायाची चांगलीच माहिती आहे. कायमरला बेनचें काम पसंत पडलें. त्यानें त्याला काम देऊन पगार चालू केला. पण लौकरच जेम्सप्रमाणेंच त्यालाही बेनबद्दल हेवा वाटूं लागला. थोड्याच दिवसांत बेनच्याभोंवतीं मित्रांचें टोळकें जमलें, त्याबद्दलही कायमरला मत्सर वाटूं लागला आणि इकडे आपल्या मालकाला छापखान्याच्या धंद्यांतलें कांहीं कळत नाहीं असें बेन म्हणू

लागला. त्यामुळें त्याच्यावर मालकाची खप्पा मर्जी झाली. त्यांच्यांत वारंवार खटके उडूं लागले. तथापि बेनची उपयुक्तता लक्षांत घेऊन कायमरनें त्याला संभाळून घेतलें. त्यानेंच बेनची रीड नांवाच्या एका गृहस्थाकडे राहाण्याची सोय लावून दिली. तेथें त्याची मुलगी डिबोरा नांवाची होती, तिचें बेनवर प्रेम जडलें व बेनलाही स्वतंत्रपणें पैसे मिळवून स्वतःच्या कमाईवर जगण्याचें भाग्य लाभलें.

फिलाडेल्फिया व बॉस्टन यांत फार अंतर होतें. येथें पाद्री लोकांचें वर्चस्व नव्हतें. चर्चची हुकुमशाही नव्हती. नास्तिक म्हणून कोणाचा छळ होत नव्हता. सहिष्णु वृत्तीचे, शांत स्वभावाचे, साध्या राहणीचे, दांभिक नसलेले, पवित्रपणाचें ढोंग न करणारे, व यशस्वी रीतीनें उद्योगधंदा करणारे लोक तेथें होते. त्यामुळें साऱ्या गांवाचें रूपच वेगळें बनलें होतें. न्यू इंग्लंडमधील ढोंगी वातावरणाच्या तुलनेनें येथील वातावरण फ्रँकलिनला फारच पसंत पडलें व त्याला हळूहळू बॉस्टनचा विसर पडला.

पण बॉस्टनला मात्र बेंजामिनचा विसर पडला नाहीं. त्याचा एक मेहुणा होम्स् याचें एक जहाज होतें.त्यानें बेनचा पत्ता काढला व त्याच्या निघून जाण्यानें घरची मंडळी खिन्न झाली असून त्याची सारखी आठवण काढीत असल्याचें त्याला सांगितलें व बॉस्टनला परतण्यासही सुचविलें. त्यावर बेंजामिननें त्याला तपशिलवार व व्यवस्थित उत्तर पाठविलें. आपण घर कां सोडलें, व बॉस्टनपेक्षां फिलाडेल्फिया येथें आपली स्थिति कशी सुधारली याचीही माहिती त्यानें त्यांत दिली होती. होम्सला हें पत्र मिळालें त्या वेळीं पेन्सिल्व्हेनियाचा गव्हर्नर सर वुइल्यम कीथ तेथेंच होता. त्याला होल्म्सनें तें पत्र दाखविलें. तें पत्र वाचून कीथचेंही बेनबद्दल चांगलें मत झालें.

कांहीं दिवसांनंतर गव्हर्नर कीथ कायमरच्या छापखान्यांत गेला. गव्हर्नर आपल्या येथें आला यामुळें कायमरची खूपच धावपळ उडाली! त्याला भेटण्यासाठीं तो जिन्यावरून धावतच खालीं गेला. पण आपण त्याला भेटण्यासाठीं आलों नसून बेंजामिनला भेटण्यासाठीं आलों असल्याचें गव्हर्नरनें सांगितलें, त्याबरोबर कायमरला तो आपला अपमान झालासें वाटलें. त्याचा चेहरा लालबुंद झाला. कीथनें बेंजामिनला आपल्याबरोबर घेतलें व त्याला घेऊन तो एका मदिरागृहांत गेला. तेथें त्यांच्यांत बरेंच

बोलणें झालें. कीथनें त्याला स्वतंत्र छापखाना काढण्याची सूचना केली व पेन्सिल्व्हेनियाचें सरकारी काम त्याला देऊं केलें. पण छापखान्याला भांडवल कोठून आणावयाचें! कीथनें त्याला बॉस्टनला जाऊन बापाजवळ भांडवल मागावें म्हणून सुचविलें, व त्यासाठीं बेंजामिनचा बाप जोझाया याला कीथनें स्वतः एक पत्रही दिलें.

बापाचें मन वळवण्यांत आपल्याला कितपत यश येईल ह्याबद्दल बेनला शंका होती. पण त्याच्या आशांना पालवी फुटली होती. तें पत्र घेऊन तो बॉस्टनला बापाकडे गेला. गव्हर्नर कीथनें बेंजामिनबद्दल आपुलकी व्यक्त केली ह्याचें बापाला समाधान वाटलें. पण बेनला भांडवल द्यायला त्यानें नकार दिला. एवढी मोठी जबाबदारी पेलण्याजोगें बेनचें वय नाहीं असें बापाचें म्हणणें पडलें. अवघ्या १८ वर्षांच्या मुलाच्या हातीं एवढें भांडवल देण्यास सांगणारा गव्हर्नरही पोरबुद्धीचाच दिसतो असें बाप म्हणाला. बेनला बापाचा राग आला व वाईटही वाटलें. लगेच तो फिलाडेल्फियाला परत गेला. आपल्याला भांडवल मिळूं शकलें नाहीं हें त्यानें गव्हर्नर कीथला सांगितलें. तेव्हा गव्हर्नर म्हणाला, "ठीक आहे, बाप तुला भांडवल देत नसला तर मी देतों. तुला सवड झाली म्हणजे तूं मला तें परत कर. पण येथें एक चांगला मुद्रक मला पाहिजे आहे."

यानंतर बेन गव्हर्नर कीथ याच्याकडे वारंवार जाऊं लागला. पुढें असें ठरलें कीं, बेननें लंडनला जावें व जरूर तीं छापयंत्रें व टाईप विकत घ्यावेत; आणि त्यासाठीं आवश्यक तीं शिफारसपत्रें गव्हर्नरानें त्याला द्यावीत. आणि रकमेची तरतूद करावी. त्याप्रमाणें फ्रँकलिननें बोट ठरविली व जाण्याचें नक्की केलें, व गव्हर्नराच्या पत्रांची तो वाट पाहात राहिला. बोट सुटण्याचा दिवस उजाडला तरी गव्हर्नराकडून पत्रें आलीं नाहींत. तेव्हां फ्रँकलिन गव्हर्नराकडे गेला. तेथें त्याच्या सेक्रेटरीनें त्याला सांगितलें कीं, "गव्हर्नरसाहेब या वेळीं फार कामांत आहेत, पण जहाज सुटण्यापूर्वी जरूर तीं पत्रें बोटीवर दाखल होतील." त्याप्रमाणें बेन निघाला व जहाजही सुटलें, पण पत्राचें काय? गव्हर्नरकडील पत्रें टपालाच्या थैलींत खास असावींत; पण मुक्कामाला पोचण्यापूर्वी थैली फोडतां येणार नाहीं, असें बोटीवरील कप्तानानें बेनला सांगितलें.

सन १७२४ च्या नाताळाच्या आधल्या दिवशीं बोट लंडनला जाऊन पोंचली. तेथें टपालाची थैली फोडण्यांत आली, तेव्हां तींत गव्हर्नरचीं पत्रें आढळलीं नाहींत. बेंजामिन फ्रँकलिनच्या नांवाचें गव्हर्नरचें एकही पत्र त्यांत नव्हतें. या सर्व घटनांवर बेनचा विश्वास बसेना. तो अतिशय अस्वस्थ झाला. कोठेंतरी चूक झाली असावी, शेवटच्या क्षणाला कोठेंतरी घोटाळा झाला असावा, पत्रें खात्रीनें येतील, असें तो बोटीवर ओळख झालेल्या एका मित्राला म्हणाला. त्यावर तो मित्र उत्तरला, "कीथचा स्वभाव मला माहीत आहे. त्यानें तुझ्याकरतां शिफारसपत्रें दिलीं असण्याचा मुळींच संभव नाहीं, व त्याच्या स्वभावाची माहिती असणारा कोणीही मनुष्य त्याच्यावर विश्वास ठेवणार नाहीं. ज्याला स्वत:ला पत नाहीं, तो दुसऱ्याला काय जामीन राहणार?" अशा रीतीनें लंडनसारख्या मोठ्या, अपरिचित शहरांत अठरा वर्षांचा बेंजामिन फ्रँकलिन एकटा सांपडला. जवळ पैसा नाहीं, कोणाची ओळख नाहीं, जहाजावर चारदोन लोक ओळखीचे झाले होते पण त्यांचे व्यवसाय वेगळे, काय करावें तें बेनला सुचेना. अखेर, फिलाडेल्फिया येथें असतांनाच जेम्स राल्फ नांवाच्या एक तरुण कवीची आणि त्याची ओळख झालेली होती, तोही जहाजावर असाच उद्योगाशिवाय होता. त्या दोघांनीं आतां बरोबर जाऊन कोठें कांहीं जमतें का तें पाहण्याचें ठरविलें.

---

## ४ – इंग्लंडमधील अनुभव

बेंजामिन हा मनाचा हळवा होता. त्याचे नालायक मित्र त्याच्या या स्वभावाचा गैरफायदा घेत. स्नेह्यानें पैसे मागितले म्हणजे नाहीं म्हणणें त्याच्या जिवावर येई. केवळ ओळख म्हणूनही ते त्याच्याजवळ पैसे मागत व तो देई. लंडनला आल्यावर बेंजामिनला छापखान्यांत तावडतोब नोकरी मिळाली व पैसेही बरे मिळूं लागले. पण राल्फचें काय ? तो कवि होता. पण कवीला मिळणार काय ? त्यानें नाटकगृहांत, वृत्तपत्रकचेरींत नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. ते दोघेही एकत्र राहात होते. त्यामुळें राल्फला मदत करण्याची फ्रँकलिनवर पाळी आली.

लंडन येथें सांस्कृतिक कार्याचा व्याप पुष्कळ मोठा होता व त्यामुळें छापखान्यांना कामही पुष्कळ होतें. बेननें टाईप जुळण्यास सुरवात केली. त्याबरोबरच त्याचें कौशल्य दिसून आलें. पामर याच्या प्रसिद्ध छापखान्यांत त्याला नोकरी मिळाली. एक पुस्तक छापण्याचें काम त्याच्याकडे देण्यांत आलें. या काळांत बेंजामिन व राल्फ एकत्रच राहात व दोघांचा खर्च बेन करी. त्यांनीं चैनींतही बराच पैसा खर्च केला. नाटकें पहाण्यांत व करमणुकीच्या इतर प्रकारांतही पुष्कळ पैसे उधळले. दोघांचेंही एकच प्रेमपात्र होतें. पुढें त्यावरून त्यांच्यांत भांडण होऊं लागलें. थोड्याच दिवसांत राल्फला एका खेडेगांवांत शाळामास्तरची नोकरी मिळाली तेव्हां तो तिकडे निघून गेला. ह्या प्रकारावरून असें दिसतें कीं, तरुण वयांत माणसाला ज्या गोष्टींचें आकर्षण वाटतें त्यांचें बेनलाही वाटलें, आणि कांहीं काळ तरी तो आपली प्यूरिटन शिस्त विसरला. आपल्या आत्मवृत्तांत त्यानें यासंबंधीं मुग्धताच स्वीकारली आहे आणि इतर कुठूनही अधिक तपशील मिळत नाहीं. पण एकंदरींत हें "प्रकरण" त्याच्या आयुष्यांत केवळ एक "प्रकरण" च ठरलें एवढें मात्र खरें.

लंडनमध्यें असतांना तेथील वातावरणाचा बेनवर चांगलाच प्रभाव पडला. वाङ्मयक्षेत्रांत स्विफ्ट, पोप, गे, डिफो यांचा मोठा नांवलौकिक होता. राजकारणांत वॉलपोल लांचखाऊ, पण कर्तबगार म्हणून प्रसिद्ध होता. दरबारी मंडळींत स्टॅनहोप (लॉर्ड चेस्टरफील्ड) चें नांव पुढें येऊं लागलें होतें. पण त्या सर्वांपेक्षां अधिक, इंग्लंडांतच नव्हे तर सर्व जगभर, सर ऐझाक न्यूटनचा बोलबाला विशेष होता. शास्त्रीय संशोधनांत त्यानें मिळविलेली कीर्ति सर्वत्र पसरलेली होती. त्याची बेंजामिनच्या मनावर फार मोठी छाप पडली. वीस वर्षांचा हा मुलगा आपल्या बुद्धीच्या बळावर विश्वाचें कोडें उलगडण्याचा प्रयत्न करूं लागला होता.

राल्फ त्याला सोडून गेल्यामुळें त्याच्यावरचें ओझें कमी झालें. त्याला चार पैसेही अधिक मिळूं लागले होते, त्यामुळें त्याला पुस्तकें विकत घेणें शक्य होऊं लागलें. त्यानें तत्त्वज्ञानविषयक एक पत्रक लिहिलें व सुटीच्या वेळांत तें छापून घेतलें. त्याकडे छापखान्याचा मालक पामर याचें लक्ष गेलें. सदर छापखान्यांत वुइल्यम वोलॅस्टन नांवाच्या एका माणसाचें एक

पुस्तक छापलें गेलें होतें. त्या पुस्तकाला उत्तर म्हणून बेननें हें पत्रक तयार केलें होतें. उत्तर म्हणून तें बरोबर नव्हतें, व पुढें बेनलाही त्याची लाज वाटली; पण त्यायोगें छापखान्याच्या मालकावर त्याची छाप पडली व त्यामुळेंच बेंजामिनची विद्वान् मंडळींशीं ओळख होऊन ते त्याला आपल्या बरोबरीच्या लोकांत गणूं लागले.

या मंडळींत सर हॅन्स स्लोन हा एक मातबर मनुष्य होता. त्याचा व बेंजामिनचा परिचय वाढला. अमेरिकेहून येतांना बेंजामिननें कांहीं अभिनव वस्तु आणल्या होत्या. अशा वस्तूंचा संग्रह करण्याचा स्लोनला छंद होता. बेननें आणलेल्यांत इंग्लंडमध्यें अपरिचित असणाऱ्या कांहीं वस्तु होत्या. त्या स्लोनला फारच आवडल्या. त्यांत अॅजबेस्टसची एक पिशवी होती. (अॅजबेस्टस त्यावेळीं इंग्लंडमध्यें कुणाला माहीत नव्हतें.) एक अॅजबेस्टसचा दगड होता आणि एक विशेष प्रकारचें लाकूड होतें. त्या वस्तू त्यानें चांगली किंमत देऊन बेंजामिनपासून विकत घेतल्या.

थोड्या दिवसांनंतर बेननें पामरचा छापखाना सोडून वॉट्स्च्या त्याहून मोठ्या छापखान्यांत नोकरी धरली. तेथें त्यानें आपले कांहीं आरोग्यविषयक नियम चालू केले. व त्यांचा पुढें इतर नोकरांनाही फायदा झाला. या छापखान्यांत त्यानें प्रेसमनची नोकरी धरली. तो जरी कसलेला कंपॉझिटर होता तरी त्याला व्यायामाची जरुरी वाटत असल्यानें व त्या काळांत छाप-काम अंगमेहनतीचें असल्यानें व्यायामासाठीं म्हणून तें काम त्यानें पतकरलें. फ्रँकलिन ताकदवान होता पण आपली ताकद टिकविण्यासाठीं त्यानें योजिलेले उपाय वॉट्सच्या छापखान्यांतल्या थंड प्रकृतीच्या इंग्लिश कामगारांना फारच नवलाचे वाटले. बेंजामिन आपल्या आत्मचरित्रांत त्यासंबंधीं म्हणतो :

> या छापखान्यांत सुमारें ५० कामगार होते. मी फक्त तेवढा पाणी पीत असे. इतर कामगार पक्के दारूबाज होते. ते कडक बियर पीत. प्रसंगीं मी जिन्यावरून वर जातांना किंवा खालीं उतरतांना टाइपाचा मोठा फॉर्म एकेका हातांत एक एक नेत असे, तर इतरांना दोन्ही हातांनीं एकच फॉर्म नेतां-आणतां येई. हा केवळ पाणी पिऊन राहणारा अमेरिकन दारू मुळींच पीत नाहीं आणि तरी देखील आम्हां बिअर पिणाऱ्यांपेक्षां त्याच्या अंगांत जास्त ताकद कशी याचें

त्यांना नेहमीं आश्चर्य वाटे. छापकामांतील माझा जोडीदार सकाळीं न्याहारीपूर्वीं एक ग्लास, नंतर न्याहारीबरोबर एक ग्लास, मध्यें जेवणापूर्वीं एक ग्लास, आणि नंतर सहाच्या सुमारास एक ग्लास, आणि संध्याकाळीं काम संपल्यावर पुन्हा एक ग्लास अशी बिअर पिई. मी त्याला पुष्कळ समजावून सांगितलें कीं, बिअरपासून मिळणारी ताकद, ती तयार करण्यासाठीं पाण्यांत जेवढें जव किंवा त्याचें पीठ मिसळलें असेल त्या प्रमाणांत राहणार व म्हणून एका आण्यांत मिळणाऱ्या पावांत त्यापेक्षां अधिक पीठ असल्यानें तूं जर पाव खाऊन वर पाणी पिशील तर तुझी ताकद वाढेल. पण त्यानें बिअर सोडली नाहीं. त्या नशा आणणाऱ्या बिअरबद्दल त्याला दर शनिवारीं चार पांच शिलिंग द्यावे लागत, मला हा कांहीं खर्च नव्हता."

समुद्रापलीकडील अपरिचित वसाहतींतून येणाऱ्या या मुलाचा हा युक्तिवाद हेकेखोर, हट्टी व दारूला चटावलेल्या ब्रिटिश कामगारांना कसा पटणार! शेकडों वर्षांच्या सवयीनें पक्की बनलेली राहणी बदलण्याचा विचार त्यांना मानवेना. जुन्या व स्थिर झालेल्या समाजाची व नव्या व अस्थिर समाजाची प्रवृत्ति यांतील हा फरक तेव्हांच ध्यानांत येतो. अमेरिकेंतील जीवन प्रयोगावस्थेंतच असल्यानें बदल करून पाहण्यास तिथले लोक सहजीं तयार होत; तसें येथें नव्हतें. खुद्द अमेरिकेंत देखील असा युक्तिवाद पटण्यास फार अवकाश होता.

छापकाम करून ताकद वाढविल्यावर कांहीं दिवसांनीं बेंजामिन परत कम्पोझकडे वळला. येथें त्याला बौद्धिक दृष्टया थोडे वरच्या पातळीवरचे लोक भेटले. पण प्रेसमन बिअर पीत त्याचप्रमाणें कंपॉझिटरही पीत. तूं बिअर पी किंवा पाणी पी, पण बिअरच्या बिलांतील हिस्सा तूं दिला पाहिजे असा ते त्याला आग्रह करूं लागले. आरंभीं बेंजामिननें त्यांस नकार दिला, तेव्हां इतरांनीं त्याला वाळींत टाकलें; व ते त्याच्या बारीक सारीक खोडयाही करूं लागले. त्यानें जुळविलेलीं पानें ते फिरवूं लागले, मजकूर मोडून टाईपाची भेसळ करूं लागले. जे कोणी इतरांना सोडून आपला सवता सुभा उभा करतात त्यांच्या कामाला भूतबाधा होते असें ते त्याला म्हणूं लागले. पाण्यांत राहून

माशांशीं वैर करून चालणार नाहीं हें ओळखून बेंजामिननें खिलाडूपणानें बिअरच्या बिलांत भागीदार होण्याचें मान्य केलें. लहानपणापासूनच तो तडजोडीनें वागण्याच्या स्वभावाचा होता. प्यूरिटनांच्याप्रमाणें कांहीं झालें तरी आपला आग्रह सोडावयाचा नाहीं अशी त्याची ताठर वृत्ति नव्हती.

अशा प्रकारच्या त्याच्या अनुभवाच्या अनेक गोष्टी आहेत. सर्वांत गमतीची म्हणजे त्यानें शाकाहार सोडल्या वेळची गोष्ट. एकदां तो बॉस्टनहून फिलाडेल्फियाला जात असतां बोटीवर कॉड मासे पकडण्याची चढाओढ सुरू झाली, व इतर सर्व त्यांत सामील झाले. पकडलेले मासे जेव्हां तळले तेव्हां त्यांच्या वासानें बेनच्याही तोंडाला पाणी सुटलें. तो म्हणतो :

> " मांसाहार न करण्याचा माझा नियम खरा; पण तळलेले मासे पाहून माझ्या तोंडाला पाणी सुटलें हेंही तितकेंच खरें. तत्त्व व खाण्याचा मोह यांत झगडा सुरू झाला. पुढें मासे चिरले तेव्हां त्यांच्या पोटांत छोटे मासे आढळले. ते पाहून मी मनाशीं म्हणालों 'बेटचांनो; जर तुम्ही एकमेकांना खातां, तर मी तुम्हांला कां खाऊं नये? ' असें म्हणून मी त्या माशांवर यथेच्छ ताव मारला. मधून मधून मी शाकाहार घेई; पण बोटीवर पुष्कळ वेळां इतरांबरोबरच जेवण करी."

वॉट्स्‌च्या छापखान्यांतील कंपोझ खात्यांतील कामगारांच्या मागणीला बेननें मान दिला त्याबरोबर तेथील वातावरण बदललें. आतां तो कामगारांना आवडूं लागला; आणि त्यांच्यावर बेनच्या विचारांची छापही अधिक पडूं लागली. विशेष ताकदीचीं कामें कंपॉझिटरांना करावीं लागत नसल्यामुळें कडक बिअर घेण्याची आपल्याला आवश्यकता नाहीं एवढें त्यांनीं मान्य केलें, आणि शेजारच्या एका दुकानांतून कांजी व लोणीभाकरी बिअरच्या पेल्याच्या किंमतींत मिळूं शकत असल्यानें ती घेण्याला त्यांनीं सुरवात केली.

लोकांना त्याचा उपरोधिक विनोद व तो व्यक्त करण्याची संयमपूर्ण शैली आवडत असे. रागानें भडकून जाण्याच्या वाईट खोडीचे दुष्परिणाम बॉस्टन येथें असतांनाच त्याच्या अनुभवाला आले होते आणि तेव्हांपासूनच तो संयम राखूं लागला होता. आपल्यापेक्षां कमी बुद्धीच्या माणसाबरोबर वाद

करून त्यांत त्याचा पराभव करणें हें त्याच्या बालवयांतच प्रगल्भ झालेल्या बुद्धीला सहज शक्य होतें; पण त्यामुळें बोलण्यांत कटुता येते आणि जेथें सहज मैत्री शक्य असते तेथें शत्रुत्व निर्माण होतें हें त्यानें ओळखलें होतें. म्हणून त्यानें मोठ्या विनयशीलपणें मतभेद व्यक्त करण्याची स्वतःला संवय लावून घेतली. वादाच्या प्रसंगीं आपलें वेगळें मत स्पष्टपणें न मांडता तिपक्षाच्या मुद्द्यांवर प्रतिप्रश्न निर्माण करून तो त्यांना त्यावर आपले विचार मांडायला लावी. आणि स्वतःचें म्हणणें कितीही योग्य असलें तरी तें सिद्धान्तरूपानें मांडण्याचें टाळी. या योगानें तो ज्यांच्या बरोबर काम करी व संभाषण करी, त्यांना तो सहजच प्रिय होत गेला. रागाच्या भरांत दुसऱ्याकडून एरवी जी माहिती काढणें कठिण, ती या पद्धतीनें सुलभ होऊं शकली.

वागण्याच्या या पद्धतीमुळें तो कामगारांत प्रिय झाला. एवढेंच नाहीं, तर मालकालाही तो आवडूं लागला. सोमवारींही सकाळीं त्याचें नियमित येणें, कधींही गैरहजर न राहणें, कंपोझिगच्या किचकट कामांतीलही त्याची विशेष गति, इत्यादींमुळें त्याला जादा पैसेही मिळूं लागले.

लंडनमध्यें एक वर्ष काढल्यावर, तो जरी आपल्या कामांत निरलस होता, तरी इतर गोष्टींकडे त्याचें लक्ष वेधलें जाऊं लागलें. तारुण्यसुलभ प्रवृत्तीमुळें कित्येक वेळां त्याचें कामाकडे दुर्लक्ष होई. तथापि त्याची बुद्धि सर्वगामी असल्यामुळें त्याला सर्व कांहीं येई व तेंही उत्तम प्रकारें करतां येई. त्यामुळें इतर व्यवसायाकडेही त्याचें लक्ष वेधलें, आणि इतर क्षेत्रांतल्या लोकांचें त्याच्याकडे लक्ष गेलें.

उदाहरणार्थ, वायगेट नांवाच्या माणसाला त्यानें पोहोण्याला शिकविलें. नदींत पोहतांना बेन ज्या सफाईनें हात मारी, डुबी घेई, व इतर कौशल्य दाखवी त्यानें वायगेट अगदीं मोहित होऊन गेला. आपण पोहोणें शिकविण्याचाच व्यवसाय करावा, म्हणजे पैसेही अधिक मिळतील व युरोपांत प्रवासही करतां येईल असें एक वेळ बेनलाही वाटूं लागलें. त्याचा दुसरा एक मित्र डेनहॅम हा फिलाडेल्फिया येथीलच राहणारा होता. तो लंडनला कांहीं उद्योगानिमित्त आला होता, त्यानें फ्रँकलिनला आपल्याबरोबर धंद्यांत येण्यास सुचविलें आणि अखेर फ्रँकलिन त्यास तयारही झाला. त्याला तसेंच कारणही होतें.

इंग्लंडमध्यें दीड वर्ष काढल्यानंतर बेंजामिनलाही घरची सारखी आठवण होऊं लागली होती. इंग्लंडमध्यें कामापेक्षां कामगारांची संख्या अधिक आणि त्यांच्यांत एक प्रकारचा जातिभेदही दृढ होता. अशा स्थितींत त्याच्यासारख्या बाहेरून आलेल्याला छापखान्याच्या व्यवसायांत अधिक प्रगति करतां येईल असें त्याला दिसेना. आपल्याच मायदेशांत जावें व व्यवसायाची संधि साधावी असें त्याच्या मनानें घेतलें, व घरीं परतण्याची मिळेल ती संधि घेण्याची तो वाट पाहूं लागला. डेनहॅमची सूचनाही बरी होती. त्याचा धंदाही भरभराटींत होता. त्यानें विलायतेंत बराच माल खरेदी केला होता. आपल्या गांवीं एक दुकान काढावयाचें व तेथून वेस्ट इंडीजमध्यें माल पुरवावयाचा असा त्याचा विचार होता. बेंजामिनची त्या कामगिरीवर योजना करण्याचेंही त्यानें आश्वासन दिलें. हें सर्व घडून आलें असतें, पण बेंजामिन फ्रँकलिन याच्या नशिबांत वेगळयाच घटना लिहिलेल्या होत्या!

ते इंग्लंडहून २३ जुलै १७२६ रोजीं अमेरिकेकडे निघाले. बेंजामिनचें वय या वेळीं २१ वर्षांचेंच होतें. विलायतेंतील दीड वर्षाच्या कालावधींत त्यानें नकळत कित्येक गोष्टी उचलल्या होत्या. पुढें अमेरिकेंत सुधारणा घडवून आणण्याच्या कामीं त्यानें त्यांचा उपयोग केला. विलायतेंत त्यानें एक मोठें शहर पाहिलें होतें, तेथील फरसबंदी रस्ते, रस्त्यावरील रात्रीची दिवाबत्ती, पोलिस संरक्षण, आगीपासून बचावाची सोय, स्वच्छतेची व्यवस्था इत्यादि गोष्टी त्यानें पाहिल्या होत्या. फार मोठ्या सुशिक्षित जगाच्या वातावरणांत तो वावरला होता. प्युरिटन किंवा क्वेकर यांच्याहून वेगळें तत्त्वज्ञान सांगणारे व विचार मांडणारे लोक त्याला भेटले होते. धर्माच्या बुद्धिप्रधान मांडणीला तेथें मान्यता मिळत असल्याचें त्याच्या अनुभवास आलें होतें. न्यूटनची प्रत्यक्ष भेट घ्यावी अशी त्याची फार इच्छा होती. त्याला ती साध्य झाली नाहीं. तथापि न्यूटननें शास्त्रीय ज्ञानाचा जो झगझगीत प्रकाश फैलावला होता, त्याचे संस्कार त्याच्या मनावर उमटल्यावांचून राहिले नाहींत. थोडक्यांत म्हणजे जेथें लोक अभ्यास करीत आहेत, कांहीं नवें निर्माण करीत आहेत, वायाही घालवीत आहेत, किंवा चुकाही करीत आहेत, पण हें सारें जेथें खूप मोठ्या प्रमाणावर चालू आहे, जेथें रीतरिवाज व मर्यादशील वागणूक आढळून येते, तशीच जेथें डामडौलाची राहणीही दिसून येते, जेथें विनयशील

संभाषणें चालतात, तसेंच जेथें कपटी कटही चालू असतात, अशा विविध प्रकारांनीं नटलेल्या एका विशाल जगताचा, कीं ज्याचा मागमूसही अमेरिकन वसाहतींत त्याला दिसत नव्हता, त्याचा त्याला या काळांत अनुभव येऊन चुकला होता.

या प्रवासांत त्यानें एक रोजनिशी लिहिली ती उपलब्ध आहे. तिचें स्वरूप त्याच्या आत्मचरित्राहून अगदीं वेगळें दिसून येतें. प्रौढपणीं आठवून लिहिलेल्या अंधुक आठवणींत न आढळणारा ताजेपणा त्यांत दिसून येतो. तथापि त्यांत जो वैचारिक भाग आहे तो फारसा महत्त्वाचा नाहीं किंवा त्यांत त्याच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीपलीकडे वैशिष्टचही दिसून येत नाहीं. रोजनिशीपैकीं दुसऱ्या एका भागांत त्यानें आपल्या भावी आयुष्याची रूपरेषा आंखून ठेवली होती. तो भाग हरवला, तो त्यानें पुन्हां लिहून काढला. तो मात्र उपलब्ध आहे.

बेंजामिन फिलाडेल्फियांत परत आला तेव्हां त्याला आढळून आलें कीं जी डेबोरा रीड त्याच्यावर प्रेम करीत होती, तिनें त्याला सोडून दिलें असून ज्याच्यावर तिचें प्रेम नव्हतें अशा एका माणसाबरोबर तिचें लग्न झालें आहे. लंडनच्या मुक्कामांत तो स्वतः डेबोराला जवळ जवळ विसरला होता हेंही आपण विसरतां कामा नये. त्याच्या गैरहजेरींत कायमरचा धंदाही भरभराटींत चाललेला त्याला आढळून आला. परत आल्यावर त्यानें डेनहॅमच्या दुकानांत काम करण्यास सुरवात केली. त्यानें त्या व्यवसायाचा अभ्यास केला, हिशोबाची पद्धति समजावून घेतली, व थोडयाच काळांत विक्री कामांत त्यानें कौशल्य संपादन केलें. पुढें मोठेपणीं विविध प्रकारच्या उद्योगांत त्यानें जो भाग घेतला, त्याची या वेळीं त्याजकडून त्याच्या नशिबानें जणूं पूर्व तयारीच करवून घेतली असें दिसत होतें. पण आतां तो व्यापारांत शिरणार असें दिसूं लागलें न लागलें तोंच दैवाचा फासा फिरला व त्याची इच्छा नसतांनाही त्याला एका वेगळयाच उद्योगांत पडावें लागलें!

## ५– जुंटो क्लब

डेनहॅमचे दुकान सरासरी पांच महिने चांगलें चाललें. फ्रॅंकलिनचा बाप शोभेल इतकें डेनहॅमचें वय होतें. त्यानें फ्रॅंकलिनला चांगलें वागविलें आणि पुष्कळ

गोष्टी शिकवल्या. पुढें हिवाळयांत तो आजारी पडला. आणि याच वेळीं बेंजामिनही जिवावरच्या दुखण्यांत सांपडला. प्ल्युरसीच्या आजारानें तो अगदीं वेजार झाला व आतां आपण मरून जावें असें त्याच्या मनानें घेतलें पुढें मी बरा होत चाललों पण त्याचेंच मला वाईट वाटूं लागलें असें त्यानें लिहून ठेवलें आहे. कारण आणखी जगणें म्हणजे जें काम आतां त्याला मनापासून नकोसें झालें होतें तेंच करण्याचा त्याच्यावर प्रसंग होता. पुढें डेनहॅम मरण पावला आणि त्याच्या वारसदारांनीं त्याचें दुकान आपल्या ताब्यांत घेतलें. नव्या व्यवस्थेत फ्रँकलिनला स्थान नव्हतें.

त्यामुळें फ्रँकलिनवर पुन्हा आपल्या पूर्व व्यवसायाकडे वळण्याची पाळी आली; व त्यांतूनच तो पुढें मोठा झाला. छपाईच्या कामाचा जुना मोह दूर सारण्याचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला; परंतु परिस्थिति त्याला पुन्हा तिकडेच खेंचीत होती. त्याचा जुना मालक कायमर यानें त्याला परत येण्यास उत्तेजन दिलें. व्यापाऱ्यांकडे कारकुनी करण्यास बेंजामिन तयार होता. पण त्यांनीं त्याला फारच कमी पगार देऊं केला, त्यामुळें तो पुन्हा कायमरकडे नोकरीस राहिला.

पण त्या दोघांनाही आपलें एकमेकांशीं जमणें शक्य नाहीं हें लौकरच दिसून आलें. त्यांचे स्वभाव अगदींच परस्परविरुद्ध होते. कायमर फ्रँकलिनला अजून पोरसवदा, दुय्यम दर्जाचाच समजत होता; तर फ्रॅंकलिननें ती मर्यादा केव्हांच ओलांडली होती. तथापि त्यानें एक वर्ष कसेंबसें तेथेंच काढलें. त्यांतूनच त्याच्या भावी उदयाचा मार्ग मोकळा करणाऱ्या घटना घडून आल्या. न्यूजर्सी प्रांताकरतां कागदी चलन छापण्याचें काम त्याला मिळालें; तसेंच कायमरचा एक ह्यू मेरेडिथ नांवाचा शेतकरी नोकर होता, त्याच्याबरोबर बेंजामिनचा स्नेह वाढला व त्याला त्यानें मुद्रणाची कला शिकविली. मेरेडिथचें वय तिशीच्या घरांत होतें. खेडूत कामाची त्याला सवय होती. तो प्रामाणिक, समजूतदार व ढोबळमार्गी होता; त्याला वाचनाचीही थोडी फार आवड होती, पण त्याला दारू पिण्याचें मोठें व्यसन होतें. तथापि त्याच्या इतर गुणांवर लुब्ध झाल्यामुळें बेंजामिनची व त्याची मैत्री जडली व त्याच्या-करतां बेंजामिननें कांहीं पैसाही खर्च केला. मेरेडिथपेक्षां बेंजामिन वयानें लहान होता, पण त्याचा तो शिक्षक बनला; व मेरेडिथलाही त्याच्याबद्दल विशेष

आदर वाटूं लागला. बेंजामिनच्या सहवासामुळें मेरेडिथचें दारूचें व्यसनही कांहीं अंशीं कमी झालें. पुढें त्या दोघांनीं मिळून भागीदारींत स्वतंत्र उद्योग सुरू करण्याचें ठरविलें.

फिलाडेल्फियांत स्वतंत्र छापखाना घालणें म्हणजे एक साहसच होतें. छपाईचीं यंत्रें आणि टाईप विलायतेहून विकत आणणें अवश्य होतें. कारण अमेरिकेंत कांहींच तयार होत नव्हतें. तसेंच जागाही भाड्यानें घेणें जरूर होतें. फ्रँकलिनला पगार जरी बरा मिळत होता, तरी त्याच्याजवळ शिल्लक नव्हती. खर्च भागून जें कांहीं मागें राही तें मित्रांसाठीं केलेलीं कर्जें फेडण्यांत निघून जाई. मात्र एकदां पहिल्या अडचणींचा टप्पा ओलांडला, की पुढें आपल्याला बरे दिवस येतील याचा त्याला विश्वास होता. तो नेहमींच पुढचा विचार करीत असे.

कायमरच्या छापखान्यांत कागदी चलन छापण्याचें काम त्याच्याकडे आलें, तेव्हां त्याची सरकारांतील वजनदार मंडळीबरोबर ओळख झाली. न्यू जर्सीमधील अधिकारी व विधिमंडळाचे सदस्य यांना त्याचें काम पसंत पडलें होतें. त्यांच्यापैकीं एक चाणाक्ष वरिष्ठ अधिकारी आयझॅक डेकाव त्याला म्हणाला, "तूं लौकरच या व्यवसायांत आपल्या मालकाला मागें टाकशील आणि फिलाडेल्फियांत नशीब काढशील असें मला दिसतें." फ्रँकलिनलाही हें दिसत होतें. एकदां आपला स्वतःचा छापखाना झाला म्हणजे न्यू जर्सी व पेनसिल्व्हेनिया या दोन्ही ठिकाणची सरकारी कामांची मक्तेदारी आपल्याला मिळल याची त्याला खात्री होती. मग कामाची कसली अडचणच नव्हती.

या वेळीं मेरेडिथचा बाप त्याला मदत करण्याला पुढें आला. आपल्या मुलाचीं व्यसनें त्याला माहीत होतीं. पण फ्रँकलिनचें त्याच्यावर किती वजन होतें याचीही त्याला चांगली कल्पना होती. मुलगा सुधारण्याच्या दृष्टीनें तें तसेंच राहावें असेंही त्याला वाटत होतें. त्याच्यापाशीं पैसाही होता. फ्रँकलिनची गरज ओळखून त्यानें दोघांना भागीदारींत छापखाना काढण्याला भांडवल दिलें. त्यांतून त्यांनीं छापखान्याचें सामान विकत घेतलें, व बाजाराजवळ भाड्यानें जागा घेऊन स्वतंत्र छापखाना थाटला. पण एव्हांना त्यांच्याजवळचा पैसा सगळा संपून गेला होता. अशा स्थितींत पहिल्याच

आठवड्यांत त्याच्या मित्रानें आणलेल्या एका गिऱ्हाइकानें भवानी केली. हे पहिले पांच शिलिंग, त्याची पहिली स्वतंत्र धंद्यांतील मिळकत, तो कधीं विसरला नाहीं. अशा रीतीनें सन १७२८ सालीं वयाच्या २२ व्या वर्षीं फ्रँकलिनच्या स्वतंत्र धंद्यास सुरवात झाली.

एकदां उद्योगधंद्यांत पडल्यावर फ्रँकलिनचा सारा वेळ त्यांतच जात असेल व इतर कांहीं करण्याला त्याला फुरसत मिळणें शक्य नसेल असें कोणाला वाटेल. पण तसें झालें नाहीं. विलायतेहून परत आल्यावर पहिल्याच वर्षांत फ्रँकलिननें एक क्लब सुरू केला. त्यांत त्याचें मन रमलें आणि त्याचा व त्याच्या मित्रांचा उत्साह वाढत गेला. अमेरिकन नागरिक जीवनांत सुधारणा घडवून आणण्याचें व समाजाची सर्वसामान्य स्थिति सुधारण्याचें तें एक विचारकेंद्र बनलें. तो जन्मला त्या काळांतल्या व तो निधन पावला त्या काळांतल्या सामाजिक परिस्थितींत जें महदंतर पडलेलें दिसून आलें त्याला फ्रँकलिननें प्रचलित केलेलें हें विचारकेंद्र बऱ्याच अंशांनीं कारणीभूत ठरलें.

सन १७२७ मध्यें फिलाडेल्फियाची वस्ती दहा हजारापेक्षां अधिक होती. वुइल्यम पेन यानें त्याची मोठ्या काळजीपूर्वक आंखणी केलेली होती. बॉस्टनमधील रस्ते वाकडेतिकडे होते, तर फिलाडेल्फियाची रचना सरळ काटकोनांत रस्ते आंखून करण्यांत आली होती. त्यामुळें विटांचीं घरें व त्यावरील छपरें रस्त्यांच्या कडेला रांगेंत नीटनेटकीं दिसत. रस्ते मोठे होते. बाजारपेठेंतील रस्ता तर शंभर फूट रुंद होता.

डेलावेअर नदीच्या खोल पात्रांत मोठीं जहाजेंही धक्क्याला लागत. अठराव्या शतकाच्या दुसऱ्या दशकांत या नदींत जहाजांची वाहतूक पुष्कळ असे व त्यामुळें जहाजें बांधण्याचें केंद्र तिथें निर्माण झालें होतें. युरोपशीं व वेस्ट इंडीज बेटांशीं येथून व्यापार चाले. त्यामुळें व्यापाराची भरभराट होती. चैनीच्या अशा कित्येक विलायती व युरोपियन वस्तूंना येथें पुष्कळ गिऱ्हाईक मिळत असे.

न्यू इंग्लंडच्या किंवा दक्षिणेकडील वसाहतींच्या मानानें येथील समाजांत एकजिनसीपणा कमी होता. या वसाहतीचें क्वेकरपंथीय मालक घराणें धार्मिक स्वातंत्र्याचा कट्टा पुरस्कार करणारें असल्यानें युरोपांतील विविध

33 २२०८६ ८५५

ठिकाणांहून लोक येथें आले होते. [redacted], स्कॉच, आयरिश, जर्मन यांनीं शहरांत व भोवतालीं आपली वस्ती केली होती. छळांत सांपडलेल्या जर्मन लोकांना तर हें आश्रयस्थान झालें होतें. ते व स्विस लोक प्रथम येथें आले व नंतर येथून सरहद्दीकडे पसरले.

१७२० च्या सुमारास येथें सामाजिक दृष्टचा लोकशाही नांदत होती असें म्हणतां येणार नाहीं. पण वसाहत करण्यासाठीं म्हणून बाहेरून जे लोक येथें आले होते ते जेथून आले होते तेथल्यापेक्षां येथें अधिक प्रमाणांत लोकशाही होती एवढें खरें. इथले श्रीमंत व सुखवस्तु लोक हे व्यापारी व कारागीर ह्यांच्याकडे थोडचाशा तुच्छतेनेंच पाहात. त्यांच्या खालचा वर्ग म्हणजे बांधील नोकरचाकरांचा. युरोपमधून इकडे येऊं इच्छिणाऱ्या या लोकांची संख्या खूप मोठी होती. युरोपमधून इकडे येण्यासाठीं झालेल्या प्रवासखर्चाची फेड करण्यासाठीं त्यांना कोणाकडे तरी कांहीं ठराविक मुदतीसाठीं बांधून घेऊन काम करावें लागे. यांच्यापैकीं कांहीं तर अगदीं लहान मुलें असत. त्यांना इंग्लंडमधल्या मोठचा शहरांतून पळवून आणलेलें असे. पण बाकी बहुतेक अत्यंत गरीब स्थितींतले आणि मायदेशांतल्या जुलमाला कंटाळून पळून आलेले व पडेल तें काम व हवे ते कष्ट करण्याला तयार असे असत. या दुर्दैवी लोकांची 'बांधील' पणाची मुदत खुल्या बाजारांत विकत घेतली जात असे. ज्या श्रीमंत लोकांना कामकऱ्यांची गरज असे ते इकडे येणाऱ्या जहाजावर जात व मुदतबंदीनें बांधून आणलेल्या या कामगारांचा परस्पर सौदा करीत व त्यांना गुलामासारखें राबवीत. ह्या लोकांपेक्षांही खालच्या थरांत दक्षिणेंतल्या इतके नसले तरी न्यू इंग्लंडपेक्षां अधिक प्रमाणांत प्रत्यक्ष निग्रो गुलाम असत.

फ्रँकलिनचा हा क्लब मध्यमवर्गीयांचा होता. या वर्गातील लोकांत कारागिरांचाही समावेश असे. पण क्लबाचे सभासद वाङमय, शास्त्रें, तत्त्वज्ञान, राजकारण, धर्म इत्यादि विषयांचा परिचय असलेले व त्याबद्दल आस्था असलेले असत. एक खिडक्यांना तावदानें बसविणारा होता. पण तो मोठा गणिती असे. एक मोजणीदार होता, तो कवि होता. वाचनाचा नाद असलेला एक चांभारही होता. तिघे मुद्रक होते, पण ते फ्रँकलिनच्या

प्रेमामुळें सभासद झालेले होते. या क्लबांत एकंदर बारा माणसें होतीं. यांच्या गप्पागोष्टींत कधीं करमणूक होई, तर कधीं गंभीर विषयावर चर्चा चाले. हे सर्व लोक कष्ट करून पोट भरणारे असत. फुकट दवडण्यास त्यांना रिकामा वेळच नसे. या क्लबाचें नांव 'जुंटो' असें ठेवण्यांत आलें होतें.

या क्लबाचा उद्देश सर्व क्षेत्रांतल्या विषयांचा अभ्यास व चर्चा करणें हा असे; पण स्वतःची व समाजाची उन्नति घडवून आणण्याच्या दृष्टीनें हें सर्व होत असे. क्वेकर लोकांच्या या शहरांत, वसाहतींतील इतर शहरांपेक्षां जसे कांहीं फायदे होते, तशा कांहीं गैरसोयीही होत्या. येथील लोक सर्व ठिकाणांहून आलेले असल्यानें येथील समाजाचें स्वरूप एकजिनसी नसून सरमेसळ होतें. त्यांचें एकजीव रसायन होण्यास १७२७ पर्यंत सुरवात झाली नव्हती. जे ते गट आपले संस्कार टिकवून असत. जर्मन लोक वेगळे राहात. इतरांशीं ते मिसळत नसत. इंग्रजी शिकण्यालाही त्यांची तयारी नसे. क्वेकर व प्रेसबिटेरियन यांचें जमत नसे व कित्येक स्कॉच व आयरिश कुटुंबें आपसांतल्या भांडणांना कंटाळून आणखी पश्चिमेकडे जाऊं लागलीं होतीं. येथें धार्मिक छळ जरी होत नव्हता, तरी सर्वसामान्य गुन्ह्यांबद्दल दिल्या जाणाऱ्या शिक्षांचें स्वरूप क्रूरपणाचें होतें. बॉस्टनप्रमाणेंच येथेंही जीवनांत उत्साह वाटण्याजोगें कांहीं नव्हतें. प्युरिटन लोकांप्रमाणेंच क्वेकर लोकांचाही सार्वजनिक करमणुकीचे प्रकार, नाच, गाणें इत्यादींना विरोध असे. त्यामुळें त्या रुक्ष व नीरस वातावरणांत प्रसन्नता निर्माण करण्याकरतां फिलाडेल्फियाला फ्रँकलिन मनोवृत्तीच्या डझनभर विनोदी लोकांची खासच गरज होती.

या 'जुंटो' क्लबाचा सभासद होणारास एक शपथ घ्यावी लागे. त्यानें छातीवर हात ठेवून अशी प्रतिज्ञा करावयाची असे कीं, "कोणत्याही धर्माचा किंवा व्यवसायाचा मनुष्य असला तरी त्याच्यावर मी प्रेम करतों. केवळ एकाद्याचें अमुक एक मत आहे किंवा त्याचा कांहीं वेगळा उपासना-मार्ग आहे एवढ्या कारणासाठीं त्याच्या शरीराला, अब्रूला किंवा माल-मत्तेला धक्का लावला जातां कामां नये आणि सत्यावर सत्य म्हणूनच माझें प्रेम आहे." हा क्लब दर शुक्रवारीं सायंकाळीं भरत असे. आधल्या शुक्रवारीं मांडण्यांत येणाऱ्या विषयावर पुढच्या शुक्रवारपर्यंत प्रत्येकानें विचार करून

त्या बैठकींत आपले विचार मांडावेत अशी योजना असे. वैयक्तिक सभासदांच्या हितसंबंधांचाही त्यांत विचार होत असे. तशीच, सर्वसामान्य सामाजिक हितसंबंधाच्या व राजकीय प्रश्नांवरही चर्चा चाले. या "परस्पर उन्नतीकरतां स्थापन केलेल्या क्लबाचे" जे नियम फ्रँकलिननें तयार केलें होते त्यांत पुढील कांहीं प्रश्नांचा समावेश आहे :–

" सध्यांच्या परिस्थितींत या क्लबाला मनुष्यजातीच्या हिताच्या दृष्टीनें, आपल्या देशाच्या हिताच्या दृष्टीनें, आपल्या मित्रांच्यासाठीं किंवा आपल्या सभासदांसाठीं काय करतां येईल ?

"आपल्या देशांत सध्यां जे कायदे प्रचलित आहेत त्यांत कोणते दोष आहेत व त्यांत बदल घडवून आणण्याकरतां कायदेमंडळांत कोणत्या दुरुस्त्या सुचवाव्यात ? किंवा लोकहिताच्या दृष्टीनें कोणता नवा कायदा करण्याची आवश्यकता आहे ?

" लोकांच्या न्याय्य अशा स्वातंत्र्यावर अलीकडे कांहीं आक्रमण घडलें आहे काय ?

" तुमच्या अब्रूवर कोणी अलीकडे शिंतोडे उडविले आहेत काय ? व तसें असल्यास हा क्लब त्या बाबतींत काय करूं शकेल ?

" एकाद्या माणसाशीं तुम्हाला परिचय करून घ्यावयाचा आहे काय ? त्यासाठीं क्लबला किंवा एकाद्या सभासदाला काय करतां येईल ?

"तुमच्या चांगल्या उद्योगांत क्लब तुम्हांला कोणत्या प्रकारची मदत करूं शकेल ? "

क्लबाचे हे उद्देश पाहिले म्हणजे त्यांत वैयक्तिक व सामुदायिक हितसंबंधाचा सुंदर मिलाफ घडवून आणलेला दिसून येतो. राज्ययंत्रांत सुधारणा घडवून आणणें, मित्रमंडळ वाढविणें, व सभासदांच्या खासगी हितसंबंधांत इतरांचा उपयोग करून देणें असें त्याचें त्रिविध स्वरूप असून फ्रँकलिनच्या विचारांचें त्यांत वैशिष्टय दिसून येतें. खासगी प्रश्नांतूनच सार्वजनिक स्वरूपाचे प्रश्न निर्माण होत असतात. तुम्ही आपली सुधारणा केल्याशिवाय समाजाची सुधारणा करूं शकत नाहीं. वैयक्तिक आणि सामुदायिक हितसंबंध यांची गुंतागुंत कधीं तुटूं शकत नाहीं असें त्याचें मत होतें.

फ्रँकलिन अत्यंत व्यवहारी होता. केवळ तात्त्विक स्वरूपाचा विचार तो

सहसा करीत नसे किंवा मांडीत नसे. तो स्वातंत्र्याचा जेव्हां उल्लेख करतो तेव्हां तात्त्विक स्वरूपाचें स्वातंत्र्य एवढेंच त्याला अभिप्रेत नसून त्याचें व्यावहारिक स्वरूप त्यास अभिप्रेत असे. म्हणून तो स्वातंत्र्याचा 'स्वातंत्र्यें' असा अनेकवचनी उपयोग करतो. तो खरा व्यवहारवादाचा पुरस्कर्ता होता.

जुंटोच्या बैठकीस "तुम्ही अलीकडे कोणती सांगण्यासारखी गोष्ट ऐकली?" या प्रश्नानें बहुधा सुरवात होत असे. लगेच सर्वत्र हास्यविनोदाला रंग भरे आणि नंतर एक एक सभासद निरनिराळे प्रसंग सांगूं लागतांच त्यांतून हास्याचे फवारे उडत व सभासदांना अवसान चढे. साथ पसरावी त्याप्रमाणें या गोष्टी सभासद बाहेर लोकांना सांगत व हास्याचें व प्रसन्नतेचें वातावरण निर्माण होई. फिलाडेल्फिया शहराच्या अत्यंत नीरस वातावरणांत या क्लबानें प्रसन्नतेचें वातावरण निर्माण केलें. अशा प्रकारें जुंटो म्हणजे त्या शहराचें महत्त्वाचें केंद्र बनलें व त्याचा बेंजामिन फ्रँकलिन यालाही मधून मधून उपयोग होऊं लागला.

सन १७३० च्या सुमाराला वैयक्तिक लाभाच्या दृष्टीनें क्लबाचा फ्रँकलिनला चांगला उपयोग झाला. या वेळीं छापखान्याला आर्थिक अडचण उत्पन्न झाली होती. मेरेडिथला दारूच्या व्यसनानें पुरें घेरलें होतें. तो दारू पिऊन झिंगून रस्त्यावर पडलेला दिसला तेव्हां मेरेडिथसारख्याच्या बरोबर भागीदारी करण्याबद्दल फ्रँकलिनवर टीका होऊं लागली. त्याच्यावर कर्जाबद्दल कोर्टांत एक दावाही दाखल झाला; व एकदां असें वाटूं लागलें कीं हा धंदा मोडणार व येईल त्या किमतीला छापखाना विकण्याची पाळी येणार. अशा परिस्थितींत दोन सभासद पुढें आले आणि त्यांनीं मेरेडिथचा भागींतील हिस्सा विकत घेण्यापुरेशी व मेरेडिथच्या बापाचें कर्ज फेडण्यापुरेशी रक्कम फ्रँकलिनला देऊं केली. त्यामुळें फ्रँकलिन छापखान्याचा स्वतंत्र व संपूर्ण मालक बनला. त्यानंतर मेरेडिथही मार्गी लागला. शहरी राहणी व छापखान्याचा व्यवसाय आपला नव्हे हें ओळखून तो परत शेतीकडे वळला व त्यानें सुखानें आयुष्य घालविलें.

पुढच्या वर्षी फ्रँकलिननें एक नवी योजना हातीं घेतली. तिचा परिणाम आजही खूप मोठ्या प्रमाणांत अमेरिकेंत दिसून येत आहे. एका शुक्रवारच्या बैठकींत त्यानें अशी योजना मांडली कीं, प्रत्येकानें आपलीं पुस्तकें क्लबमध्यें

आणून एका स्वतंत्र खोलींत ठेवावींत म्हणजे क्लबाच्या सर्व सभासदांना त्या सर्वांचा उपयोग करतां येईल. क्लबांत ती योजना फारशी यशस्वी झाली नाहीं. परंतु त्यांतून सार्वजनिक ग्रंथालयांची योजना पुढें आली आणि वाढीस लागली, व आतां त्यांचा सर्वत्र प्रसार होत आहे. आज जगांत सर्वत्र मोफत सार्वजनिक ग्रंथालयांचा जो प्रसार झाला आहे, —आणि ज्यांत आज अमेरिका सर्वांच्या पुढें आहे,—त्याचें मूळही फ्रँकलिनच्या या योजनेंत असल्याचें दिसून येईल.

याच काळांत फ्रँकलिन यानें आणखी एक महत्त्वाचा उद्योग सुरू केला. बॉस्टन येथील वृत्तपत्रसृष्टींत तो एक 'पराक्रमी' बाळ ठरला होताच. स्वतःचें असें एकादें वर्तमानपत्र असावें; त्याचें प्रकाशन, संपादन, किंबहुना लेखनही आपणच करावें हा विचार त्याला कधींच सुटला नव्हता. त्या वेळीं फिलाडेल्फियांत फक्त एकच वर्तमानपत्र होतें. कायमरचा प्रतिस्पर्धी अँड्र्यू ब्रॅडफर्ड हा 'अमेरिकन वुईकली मरक्युरी' या नांवाचें साप्ताहिक प्रसिद्ध करीत असे. मेरेडिथशीं भागीदारी सुरू झाल्यापासूनच फ्रँकलिनच्या मनांत वर्तमानपत्र काढण्याचे विचार घोळूं लागले होते. पण तें प्रत्यक्ष सुरू करण्या-पूर्वीं त्यानें एक चूक केली. त्यानें आपली ही योजना एका मित्राला सांगितली. त्या मित्रानें ती गुप्त वार्ता लगेच कायमरच्या कानावर घातली. धंद्यांतील प्रतिस्पर्धी म्हणून कायमर फ्रँकलिनचा द्वेष करीतच असे. फ्रँकलिनला शह देण्याकरतां म्हणून कायमरनें घाईघाईनें एक वर्तमानपत्र काढलें. चऱ्हाट वळण्याच्या आपल्या पद्धतीनुसार त्यानें त्याचें जें लांबच लांब नांव ठेवलें, तें असें: " सर्व शास्त्रें व कला यांचा सर्वव्यापी शिक्षक आणि पेन्सिल्व्हेनिया गॅझेट " (The Universal Instructor in Arts and Sciences and Pensilvania Gazette). फ्रँकलिनही त्याला पुरून उरणारा होता. कायमरची योजना उधळून लावून तेंच पत्र आपल्या हातीं आणण्याची एक योजना त्यानें आंखली.

ब्रॅडफर्डचें 'मर्क्युरी' हें पत्र फारच बेंगरूळ होतें. त्यामुळें " युनिव्हर्सल इन्स्ट्रक्टर " सारख्या धांगडधिंग्या पत्रापुढेंही तें मागें पडूं लागलें. फ्रँकलीननें हें अचूक ओळखलें आणि या कामीं पुढाकार घ्यायचें ठरविलें. ब्रॅडफर्डच्या पत्रांत एक 'बिझीबॉडी' या टोपण नांवानें त्यानें नियमानें

एक रकानाभर मजकूर लिहिण्यास सुरवात केली. त्याची शैली 'डूगूड' पत्राप्रमाणेंच होती. पण त्यापेक्षां ती पुष्कळच प्रौढ, आणि संपन्न होती. चालू प्रश्नांवर त्यांतून विनोद व उपरोध, यांनीं युक्त अशी टीका येत असे. स्थानिक घडामोडींतल्या तऱ्हेवाईक कृत्यांचा आणि घटनांचा त्यांतून उपहास केला जाई व त्याच्या व्यावहारिक तत्त्वज्ञानाचें प्रतिपादन येई. त्यामुळें शहरांतल्या लोकांच्या रुक्ष व उदास जीवनांत ती एक मेजवानीच ठरली. बिझीबॉडीच्या पत्रांमुळें मर्क्युरीला यश आलें आणि कायमरच्या नालायकीमुळें त्याचें इन्स्ट्रक्टर बंद पडण्याची पाळी आली. तेव्हां फ्रँकलिन व मेरेडिथ यांनीं नाममात्र किंमत देऊन तें विकत घेतलें. आणि त्याचें मूळचें लांबलचक नांव बदलून पेन्सिल्व्हेनिया गॅझेट असें सुटसुटीत करून टाकलें. १७३० मध्यें जेव्हां फ्रँकलिन व मेरेडिथ यांची भागीदारी संपुष्टांत आली, तेव्हां फ्रँकलिननें तें स्वतःच्या कर्तबगारीनें फिलाडेल्फियाचें खरें खुरें वर्तमानपत्र या कीर्तीला चढविलें. या पत्रद्वारें त्यानें समाजाच्या ज्ञानांत व करमणुकींत मोठीच भर घातली.

या वेळीं त्याचें वय २४ वर्षांचें होतें. त्या काळांत जे गुण विशेष महत्त्वाचे म्हणून समजले जात ते सर्व त्याच्यामध्यें होते. उद्योग, चिकाटी काटकसर, प्रामाणिकपणा, निष्ठा, हे सर्व गुण त्याच्यांत उत्कटत्वानें होते. अर्थात् तो कांहीं कोणी साधु नव्हता, आणि हें त्यानें स्वतःच मान्य केलें आहे. तारुण्यसुलभ प्रवृत्ति त्याला नियंत्रित करतां न आल्यानें कांहीं वेळां त्याचें पाऊल वाकडें पडलें. तथापि नीट राहावयाचें तर विवाह करणेंच इष्ट आहे हें लक्षांत घेऊन त्यानें विवाह करण्याचें ठरविलें. तथापि यापूर्वी त्याच्या हातून घडलेल्या घटनांपैकीं एक घटना त्याच्या जीवनांत विशेष परिणामकारक ठरली आणि तिचें रहस्य दोन शतकें होऊन गेलीं तरी गूढच राहिलें आहे.

डेबोरा रीड आपल्या आईजवळ राहात असे. ती अनेक वस्तु तयार करून विकी. त्यांत खरजेवरील मलम हें एक लोकप्रिय झालेलें औषध होतें. त्याला सुवास चांगला होता; आणि तें लावल्यानें उवा नाहींशा होतात अशीही त्याची प्रसिद्धि होती. फ्रँकलिन प्रथम फिलाडेल्फियाला गेला तेव्हां तो यांच्या येथें राहात असे. तेथेंच त्याची व डेबोरा हिची ओळख झाली. तिचें

त्याच्यावर प्रेम बसलें होतें व तिच्याशीं विवाह करण्याचा त्याचाही विचार होता. पण तिच्या आईला बेंजामिन व आपली मुलगी दोघेही वयानें फार लहान आहेत असें वाटल्यामुळें हा विवाह झाला नाहीं. पुढें फ्रँकलिन लंडनला गेला व या विवाहाचा विचार त्यानें सोडून दिला. तो परत आल्यावर त्याची व डेबोरा हिची पुन्हा भेट झाली. परंतु स्वतःच्या वर्तनाबद्दल त्याचेंच मन त्याला खाऊं लागलें होतें. मध्यंतरींच्या काळांत आणखी एक घटना घडली होती. आपल्या आईच्या आग्रहावरून डेबोरानें रॉजर्स नांवाच्या एका इंग्रजाबरोबर लग्न केलें. लग्न करून दिलें म्हणजे मुलगी फ्रँकलिनवरील आपलें प्रेम विसरून जाईल अशी तिची समजूत असावी. पण हा विवाहसंबंध फार काळ टिकला नाहीं. रोजर्सचें एक लग्न पूर्वींच झालेलें असून त्याची प्रथम पत्नी विलायतेंत आहे अशी डेबोराला माहिती मिळाली. एवढें तरी खरें कीं, रॉजर्स तिला टाकून वेस्ट इंडीजकडे पळून गेला. त्यामुळें डेबोरा परत आईकडे आली. या सर्व प्रकारानंतर एक मोठी नाजूक आणि घोटाळ्याची परिस्थिति निर्माण झाली, तिचा उलगडा कोठेंही झालेला नाहीं. आत्मचरित्रांत फ्रँकलिन यानें या संबंधानें कांहीं उल्लेख केला आहे, पण तो अगदीं मोघम आहे. त्यानें आपल्या मुलासाठींच हें आत्मचरित्र लिहिलें असल्यामुळें या गोष्टीची हकीकत नमूद करणें त्याला संकोचाचें वाटलें असावें, हेंही शक्य आहे.

रॉजर्सचें लग्न मोडल्यावर थोड्याच दिवसांनीं फ्रँकलिन फिलाडेल्फियाला परत आलेला होता. आतां डेबोराच्या आईची इच्छा फ्रँकलिनला जांवई करून घेण्याची होती. या लग्नाला आपण पूर्वींच संमति दिली नाहीं तें चुकलें असेंही तिनें फ्रँकलिनजवळ सांगितलें, आणि जर त्याच्या हातून कांहीं गैरवर्तन घडलें असलें तर त्याचें पाप माझ्या माथीं असेंही ती म्हणूं लागली. तेव्हां फ्रँकलिननेंही डेबोराशीं विवाहबद्ध होण्याचें ठरविलें. या बाबतींत अडचणी कोणत्या व त्यांतून मार्ग कसा काढावयाचा या संबंधानेंही त्यांनीं विचार करून कांहीं योजना ठरविली. तो म्हणतो :—

> आमचे उभयतांचे प्रेमसंबंध पुन्हा जुळले. परंतु विवाह करण्याला बऱ्याच अडचणी होत्या. रॉजर्सचा विवाह बेकायदेशीर समजला गेला होता. कारण त्याची प्रथम पत्नी विलायतेंत जिवंत असल्याचें आम्ही

ऐकत होतों. परंतु तेथचें अंतर फार, त्यामुळें त्या गोष्टीची शहानिशा करतां येण्यासारखी नव्हती. तसेंच रोजर्स वारला असल्याचीही एक वार्ता होती; पण त्या संबंधांत निश्चित असा पुरावा उपलब्ध नव्हता. शिवाय त्यानें पुष्कळ कर्ज करून ठेविलेलें होतें, व त्याच्या वारसावर तें बंधनकारक होतें. म्हणून सध्यांची ही एकंदर परिस्थिति विचारांत घेऊन आम्ही विधिपूर्वक विवाहबद्ध न होतां पतिपत्नी म्हणून राहावयाचें ठरविलें व दि. १ सप्टेंबर १७३० रोजीं पत्नी म्हणून मी डेबोराचा स्वीकार केला.

हा विवाह धार्मिक किंवा कायदेशीर, कोणत्याच पद्धतीनें झाला नव्हता. तथापि अशा रीतीनें पत्नीचा स्वीकार करण्याला सामाजिक रूढीची मान्यता होती. पण ह्या प्रकरणांतली खरी भानगड पुढेंच आहे.

फ्रँकलिनचा मुलगा वुइल्यम याचा जन्म नक्की केव्हां झाला हें अद्याप अज्ञातच आहे. तो बेकायदेशीर संतति असल्याची सर्वसामान्य समजूत असल्याचें दिसून येतें. पण त्याला आपल्या नव्या संसारांत दाखल करून घेण्याचें औदार्य आणि क्षमाशीलत्व डेबोरानें दाखविलें हें विशेष समजलें गेलें. वुइल्यमचा जन्म १ सप्टेंबर नंतर फार थोड्या दिवसांनीं झाल्यामुळें त्यांचा तो विवाहोत्तरचा मुलगा होता असें म्हणतां येत नाहीं.

वुइल्यमची आई कोण हेंही अज्ञातच आहे. पुढें कालांतरानें बेंजामिन राजकारणांत पडला तेव्हां त्याच्या एका हितशत्रूनें एक पत्रक प्रसिद्ध केलें. त्यांत फ्रँकलिनचा बार्बरा नांवाच्या एका मोलकरणीशीं संबंध असल्याचा उल्लेख आहे. तथापि राजकीय प्रतिस्पर्ध्याचा दुष्ट बुद्धीनें सूड घेण्याकरितां ही कादंबरी रचली असावी, असाही त्याच्या कांहीं चरित्रकारांचा अभिप्राय आहे. बहुधा फ्रँकलिन व डेबोरा यांनीं विवाहित म्हणून एकत्र नांदण्यास सुरवात करण्यापूर्वीच्या संबंधापासून हा मुलगा झालेला असावा; व रॉजर्सच्या पत्नीनें काडीमोड न करतां दुसरा संबंध केला या सबबीवर रॉजर्सला तिच्याविरुद्ध कायदेशीर उपाय योजतां येऊं नये यासाठीं मुलाच्या बेकायदेशीरपणाचा धोका पतकरण्याचें त्यांनीं ठरविलें असावें असेंही या बाबतींत सांगण्यांत येतें. कांहीं असलें तरी वुइल्यम हा आपला मुलगा आहे असें त्यांनीं स्वीकारलें होतें यांत शंका नाहीं. रॉजर्स मृत झालेला असला तर

त्याच्या विधवा पत्नीनें फ्रँकलिनचें पत्नीपद स्वीकारण्यांत कांहींच गैर नव्हतें. त्याप्रमाणें ती बाजारपेठेंतील फ्रँकलिनच्या घरीं त्याची पत्नी म्हणून राहाण्यास गेली. तिची आईही त्यांच्याजवळ राहात असे. आपल्या या विवाहाच्या बाबतींत कांहीं नियमबाह्य किंवा अशास्त्र घडलें असलें तर तिकडे दुर्लक्ष करण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. त्यांच्या मित्रांनींही तीच वृत्ति स्वीकारली. डेबोरा फ्रँकलिन ही अतिशय स्वाभिमानी व तापट स्वभावाची स्त्री होती. तिनें वुइल्यमला आपला मुलगा म्हणून स्वीकारलें यावरून तो तिचाच मुलगा असावा हेंच अधिक सयुक्तिक दिसतें. तिला पाठवलेल्या पत्रांतही फ्रँकलिन वुइल्यमचा 'आपला (माझा नव्हे) मुलगा' म्हणून उल्लेख करतो. तसेंच मुलगी सारा हिला लिहिलेल्या पत्रांत तो तिचा 'भाऊ' म्हणून त्याचा उल्लेख करतो. आतां खरें काय तें त्यालाच माहीत; पण त्यानें वुइल्यमला आपला पुत्र व वारस मानलें, आणि तो आपल्या पित्याशीं आणि देशाशींही द्रोह करणारा ठरेपर्यंत बेंजामिननें त्याचा कायदेशीर वारसा अमान्य केला नव्हता.

डेबोराच्या संबंधानें म्हणावयाचें म्हणजे ती अतिशय पतिनिष्ठ होती. ती शिकलेली नव्हती आणि बेंजामिनच्या बौद्धिक उंचीची पातळी गांठण्याइतकी तिची पात्रताही नव्हती. विद्वान् लोकांच्या मेळाव्यांत ती बोलण्यांत भाग घेत नसे. पेन्सिल्व्हेनियाच्या प्रमुख मंडळींत फ्रँकलिनचा समावेश झाल्यानंतर त्याला जेव्हां मेजवानीचीं निमंत्रणें येत किंवा इतर सामाजिक समारंभांना त्याला जावें लागे, तेव्हां तो तिच्याशिवायच जात असे. फिलाडेल्फियाच्या वरिष्ठ मंडळींत डेबोराचा समावेश कधींच झाला नाहीं. पण याबद्दल तिनेंही विषाद मानला नाहीं. आपल्या थोर पतीची संसारांतील सहकारिणी, मदतनीस एवढीच भूमिका तिला पुरेशी होती. त्याच्या मोठेपणाची उंची तिला कधींच समजली नाहीं. घर सांभाळणें एवढेंच तिचें कार्यक्षेत्र होतें. नवरा दूर गेला, – कांहीं परदेशी कामगिरीवर त्याला एकेका वेळीं अनेक वर्षेंही बाहेर जावें लागे, – तरी तिची तक्रार नसे. जेव्हां पत्नी ही पतीच्या मालकीची मालमत्ता मानली जात असे, अशा त्या काळांतही तिची पतिनिष्ठा वाखाणण्यासारखी होती.

ज्या काळांत तारुण्यसुलभ प्रवृत्ति व सद्विचार यांचा बेंजामिनच्या

मनांत झगडा चालला होता, आणि म्हणून उच्छृंखलपणाला कावूत ठेवण्यासाठीं विवाहबद्ध होऊन घर करून राहाण्याचा त्यानें मनाशीं पक्का निश्चय केला, त्याच कालांत त्यानें नीति व धर्म यासंबंधानें आपले विचार निश्चित केले व आयुष्यभर ते त्याला मार्गदर्शक राहिले. सद्‌गुण कोणते व दुर्गुण कशाला म्हणावें याचें त्यानें जें पृथक्करण केलें व आपल्या दैनंदिन जीवनांत त्यांची तपासणी व नोंद करण्याकरतां त्यानें जी तपशीलवार पद्धति अवलंबिली त्याचा आदर्श आजही अमेरिकेंतील शालेय विद्यार्थ्यांपुढें ठेविला जातो. त्यावरून फ्रँकलिन हा कडक नीतिमान् असल्याचा भास होतो. पण त्याच्याच जीवनवृत्तान्तावरून त्याला मानवसुलभ दुर्बलतेनें किती ग्रासलें होतें तें दिसून येतें. तरुणपणीं आपल्या हातून केवढाले व किती वेळां प्रमाद घडून आले, याचें त्यानें मोठेपणीं मागें वळून कांहींशा विनोदानें जें वर्णन दिलें आहे त्यावरून तो सर्वसामान्य माणसांपैकींच व त्यांच्यासारखाच विकारवश होता असें दिसून येतें.

विचारांच्या वाढीबरोबर फ्रँकलिनच्या धर्मविषयक कल्पनांतही पुष्कळ बदल होत गेला. तो आपण पाहिला म्हणजे अमेरिकेंतील सर्वसामान्य वैचारिक घडण यथाकाल कशी प्रगत होत गेली तें दिसूत येतें. सतराव्या शतकांतील संकुचितपणा व असहिष्णुवृत्ति जाऊन नवा व्यापक धर्मविषयक विचार दृढमूल होण्यास केवळ त्याचेच विचार कारण झाले असें अर्थातच म्हणतां येणार नाहीं. तथापि एवढें खरें कीं, ईश्वरविषयक आणि विश्वविषयक विचारांना जें वेगळें वळण लागत गेलें त्यांत त्याचा फार मोठा भाग आहे. ही विचारसरणी त्याची स्वयंभू होती असें नाहीं. न्यूटनच्या युगांत शास्त्रीय ज्ञानाचा जो प्रसार झाला, त्याचा तो मुख्यत: परिणाम होता. फ्रँकलिन विलायतेंत असतांना त्याचे संस्कार त्याच्या मनावर झाले होते. ही नवी धर्मविषयक दृष्टि अध्यात्मनिष्ठ नसून बुद्धिनिष्ठ होती. ईश्वर सगुण आहे आणि मनुष्यमात्राचें ध्येय मोक्षप्राप्ति आहे हा ह्या नवीन धर्मकल्पनेचा पाया नसून विश्वाची सुंदर रचना, निसर्गनियमांचें परिपूर्ण व अचूक कार्य, विश्वाच्या या प्रचंड योजनेंत माणसाचें अत्यल्प स्थान, हा तिचा पाया होता. त्यामुळें धार्मिक स्वातंत्र्य वाढत चाललें तसा या विचाराचा अमेरिकेंत प्रसार झाला, व जुन्या धर्मकल्पनांबरोबर त्यालाही समाजांत

स्थान मिळालें. या सर्व धर्मविषयक कल्पनांच्या वैचारिक भट्टींतून आजची अमेरिकन जीवननिष्ठा निर्माण झाली आहे.

आपले वाडवडील व त्यांच्या वळणांतील लोक ज्या धर्मकल्पना उराशीं बाळगीत त्यांतील सत्याबद्दल फ्रँकलिन साशंक झाला होता. तो म्हणतो :

> "माझ्या आईबापांनीं मला धार्मिक संस्कार दिले व पवित्र वातावरणांत माझें संगोपन केलें. परन्तु मी पंधरा वर्षांचा झालों न झालों तोंच माझ्या मनांत शंकांनीं घर केलें. निरनिराळ्या ग्रंथांतून त्या संबंधानें वेगवेगळीं मतें मला आढळून आलीं. माझा साक्षात्कारावरील विश्वासच उडाला."

अठराव्या शतकाच्या प्रारंभींच्या काळांत बॉस्टनमध्यें असा संशय व्यक्त करणें म्हणजे महाभयंकर पाप समजलें जात असे. अशा प्रकारें साक्षात्कारासंबंधानें संशय प्रकट करणाऱ्याला तेव्हां लोक डीइस्ट (Deist) म्हणत. आणि न्यूइंग्लंडमधल्या सनातन्यांच्या दृष्टीनें डीइस्ट आणि नास्तिक एकच होते. आज आपल्याला हें माहीत आहे कीं डीइस्ट हें नास्तिक तर नव्हतेच; पण ते अज्ञेयवादीही नव्हते. ते सर्वश्रेष्ठ शक्तिमान् अशा एका ईश्वराचें अस्तित्व मानीत. आत्म्याचें अमरत्वही त्यांस मान्य असे. इहलोकांतील कर्मानुसार परलोकीं फलप्राप्ति होतें हें मत त्यांनीं स्वीकारलेलें होतें. पण मनुष्यरूपानें ईश्वर साक्षात् अवतरतो व अद्‌भुत गोष्टी करतो हें त्यांना मान्य नव्हतें. ईश्वरानें निसर्ग निर्माण केला असून त्याचे नियम तो कधींही मोडीत नाहीं व माणसाचें कर्तव्य त्या नियमांना अनुसरून वागण्याचें आहे असें ते मानीत. देववादी लोकांना बायबल हा ईश्वराचा शब्द वाटत नव्हता. व ख्रिस्त हा ईश्वराचा अवतार आहे हेंही त्यांना मान्य नव्हतें. असले विचार म्हणजे प्युरिटन लोक महत्पाप समजत.

परन्तु बेंजामिन लहान असल्यापासूनच हे सर्व विचार त्याला तर्कशुद्ध वाटत; व त्यांचा तो जों जों अधिक विचार करी व त्या विचारांना इतरांकडून जों जों अधिक विरोध होई तों तों त्याचा तो ग्रह अधिक दृढ होत जाई. तो म्हणतो :

> "देववादाचें खंडन करणारीं कांहीं पुस्तकें माझ्या हातीं पडलीं. तीं वाचल्यावर माझ्या मनावर नेमका उलटा परिणाम घडून आला.

देववाद्यांचा युक्तिवाद खोडून काढण्यासाठीं जीं प्रमाणें मांडण्यांत आलीं होतीं तीं अगदींच लंगडीं वाटून देववादच खरा आहे हें मला अधिक पटूं लागलें.

बालस्वभावानुसार तो दुसऱ्या टोंकापर्यन्त वाहवला. लंडनमध्यें असतांना त्यानें एक पत्रक काढलें त्यावद्दल त्याला पुढें वाईटही वाटलें. त्यांत त्यानें सद्‌गुण किंवा दुर्गुण अशी कांहीं चीज नसतेच असें म्हटलें होतें. जगांत चूक असें कांहीं नाहींच असेंही त्यांत त्यानें प्रतिपादन केलेलें होतें. "आपण केवढा मोठा विचार मांडला असें त्या वेळीं मला वाटलें, पण तें कांहीं तितकें बरोबर नव्हतें असें आतां वाटतें" असें त्यानें फिलाडेल्फियांत आल्यावर पुढें एके प्रसंगीं म्हटलें आहे. "माझ्या विचारसरणींत कोठें तरी चूक दडून राहिली आहे," असा संशयही त्यानें पुढें प्रकट केला आहे.

पाप अशी कांहीं वस्तु असूंच शकत नाहीं या विचारसरणीमुळेंच तारुण्याच्या काळांत आपल्या हातून अनीतिकारक गोष्टी घडल्या, निदान घडणें सोपें झालें असावें असेंही त्यानें म्हटलें आहे. स्वतंत्र विचारवादी कॉलिन्स, राल्फ, गव्हर्नर कीथ यांच्याही वर्तनाचें विश्लेपण करून तो पुढे म्हणतो कीं, "वरील विचार खरा आहे असें क्षणभर मानलें तरी तो उपयुक्त नाहीं."

याही ठिकाणीं फ्रँकलिनची व्यवहारी दृष्टि दिसून येते. जर एकादा विचार उपयुक्त नसला तर तो स्वीकारायचा तरी कशाला? इथून त्याच्या विचारविकासाच्या दुसऱ्या टप्प्याला आरंभ होतो. ईश्वरी साक्षात्कारानें धर्मज्ञान होतें ही कल्पना अजूनही त्याला अमान्यच होती. ईश्वराची आज्ञा म्हणून अमूक एक कृत्य पाप होय असेंही तो मानण्याला तयार नव्हता. पण त्याच्या विचारांत सूक्ष्म फरक पडत चालला होता. तो म्हणतो :

साक्षात्काराच्या कल्पनेला मी फारशी किंमत देत नाही. पण मला असें वाटतें कीं, अमूक एक गोष्ट करूं नये असें ग्रंथांत सांगितलें आहे म्हणून ती गोष्ट वाईट व अमूक एक गोष्ट करावी असें त्यांत आज्ञापिलें आहे म्हणून ती चांगली, हें जरी खरें नसलें, तरी जीं कर्मे आपल्याला निपिद्ध म्हणून सांगितलीं तीं, एकंदर सर्व परिस्थितीचा विचार करतां, स्वभावतःच आपल्याला अहितकारक म्हणून; व जीं विहित म्हणून सांगितलीं तीं स्वभावतःच हितकारक आहेत म्हणून सांगितलीं असणें शक्य आहे.

फ्रँकलिनच्या या विधानांत त्याच्या विचारसरणीचें सार आलें आहे असें म्हणतां येईल. त्याच्या विचारसरणीची बैठक व्यावहारिक होती व माणसाच्या कृत्यांची युक्तायुक्तता त्या कसावर पाहण्याचें त्याचें धोरण होतें. आजच्या अमेरिकनांवर याच विचारसरणीची छाप दिसून येते. मग त्यांच्या पैकीं कोणाचा कोणताही धर्मपंथ असो. कोणाचा प्राण घेऊं नये, चोरी करूं नये, खोटें बोलूं नये, लोभ धरूं नये, याचें कारण देवाची तशी आज्ञा आहे म्हणून नव्हे, तर तसें करणें स्वतःला व इतरांना अपायकारक आहे म्हणून. सर्वज्ञ ईश्वराला हें माहीत आहे कीं, असें केल्यास माणूस स्वतःचीच हानि करून घेईल; व म्हणूनच त्यानें माणसाला त्यांच्यापासून सावध राहायला सांगितलें.

हा विचार पक्का झाल्यावर फ्रँकलिननें तो पुढील शब्दांत मांडला :—

> "सत्य, प्रांजलपणा, व सचोटी यांची माणसांमाणसांमधील व्यवहारांत अत्यंत आवश्यकता आहे. जीवन सुखावह होण्यास त्याचें फार महत्त्व आहे आणि म्हणून हे गुण आपल्या वर्तनांत उतरावे यासाठीं मी कांहीं नियम केले ते अजूनही माझ्या रोजनिशींत टिपलेले आहेत. जन्मभर ते आचरणांत राहावेत असा त्यांत माझा हेतु आहे."

हे नियम विशेष महत्त्वाचे आहेत असें नाहीं. तथापि त्यामागील फ्रँकलिनचा हेतु व त्याचे विचार दिसून येतात व त्यायोगें त्याचा स्वभाव कळून येतो. केवळ कोरड्या तत्त्वज्ञानाकरतां म्हणून नव्हे, तर जीवन सुखावह होण्यासाठीं या नियमांची त्याला आवश्यकता वाटत होती आपण केलेल्या बऱ्यावाईट कृत्यांबद्दल ईश्वर आपणाला जाब विचारील किंवा मेल्यावर आपल्याला स्वर्ग मिळेल कीं नरक मिळेल इत्यादि विचार तो करीत नव्हता. जीवन सुखी झालें पाहिजे, येथें याच लोकीं तें सुखी झालें पाहिजे, यावर त्याचा सारा भर होता. शांतता, सुसंवाद, सदिच्छा या योगानेंच माणसांमाणसांमधील संबंध सुखावह होतात हें त्याला पटलेलें होतें. त्याच्या जीवनविषयक विचारांचा हाच प्रमुख पाया बनला. त्यानें पुढें ज्या राजकीय व मुत्सद्देगिरीच्या कामगिऱ्या पार पाडल्या त्यामागें हीच प्रवृत्ति प्रेरक होती. टॉमस जेफरसन यानें 'सुखाचा शोध' या मोजक्या शब्दांत ती व्यक्त केली आहे.

हें विचार कृतींत आणण्याकरतां त्यानें एक छोटें पुस्तक तयार केलें. पद्धतशीरपणा, कल्पकता, नीटनेटकेपणा आणि रेखीवपणा हे त्याचे विशेष गुण होते. म्हणून त्यानें प्रत्येक गोष्ट लिहून काढली. अशा छोटचा पुस्तका-शिवाय त्याचें चालण्यासारखेंच नव्हतें. लिहिण्यावर त्याचा विशेष भर असे. त्यानें लिहिलेले जमाखर्च सुद्धां रेखीवपणा व व्यवस्थितपणाचे आदर्श आहेत. पुढें मोठेपणीं त्यानें लहानपणची पोरकट गम्मत म्हणून या पुस्तकाचा विनोदानें उल्लेख केला असला – कारण त्यांत जागोजाग त्याच्या दोषांचे ठिपकेच पुष्कळ आहेत – तरी त्यांत स्वतःला सुधारण्याच्या त्याच्या प्रयत्नांची दिशा दिसून येते.

या पुस्तकांत प्रत्येक गुणाला एक एक पान देण्यांत आलें होतें, व त्या पानांची आठवड्यावारी विभागणी करण्यांत आली होती. मितपान, मौन, सुव्यवस्थितपणा, निश्चय, मितव्यय, उद्योग, प्रांजलपणा, त्यागबुद्धि, संयम, स्वच्छता, शांतता, शुद्ध वर्तन, आणि नम्रता अशा तेरा गुणांची त्यांत नोंद आहे. कोणताही नियम मोडला कीं त्या पानांत त्या आठवड्यांत एक काळा ठिपका उठवावयाचा अशी ही योजना होती. एकदम सर्व सद्‌गुणांचा भार पेलणार नाहीं हें लक्षांत घेऊन त्यानें ते क्रमानें एकामागून एक आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला. हें काम अधिक सोपें व्हावें म्हणून त्यानें मितपानापासून प्रारंभ केला. त्यानंतर मौन इ. गुण घेतले. " अशा रीतीनें तेरा आठवड्यांत हा सद्‌गुणसंवर्धक अभ्यासक्रम पार पडावा व एका वर्षांत चार वेळां हे पाठ अमलांत यावेत अशी ही योजना होती. माळी जसा बागेंतील सर्व काटेरी झुडपें किंवा तण एकदम उपटून टाकण्याच्या मागें न लागतां एक एक वाफा हातीं घेतो व तो साफ करून नंतर पुढच्याकडे जातो, त्याप्रमाणें मीही सद्‌गुणसंवर्धनांत प्रगति करीत जावें व काळचा ठिपक्यांचें प्रमाण कमी कमी होत जाऊन शेवटीं पान स्वच्छ असलेलें दिसून यावें अशी माझी योजना होती " असें त्यानें म्हटलें आहे.

तथापि पुस्तक तयार झालें तरी त्याच्या योजनेप्रमाणें पुढें सर्व गोष्टी झाल्याचें दिसत नाहीं. तसें झालें असतें तर बेंजामिन फ्रँकलिनचें आज आपणांस जें वास्तव दर्शन दिसतें तें दिसलें नसतें. दिवसांनुदिवस त्याच्या-मागें कामांचा इतका लकडा लागला कीं, या आपल्या छोटचा पुस्तकाचा

व त्यांतील कठोर नीतिनियमांचा त्याला विसर पडला. तथापि वर्तन सुधारण्यासाठीं त्यानें अशा प्रकारें नियमांची आंखणी केली, व ते पाळणें किती अवघड आहे याचाही अनुभव घेतला. जीवनांत येणाऱ्या अडचणींना तोंड देऊन वाट काढून पुढें जाण्यासाठीं नियमांना किती मुरड घालावी लागते याचीही त्याला त्यावरून प्रचीति आली. हा लवचीकपणा, जुळवून घेण्याची तयारी, दुसऱ्यांचे विचार समजून घेण्याची पात्रता, या गुणांमुळेंच फ्रँकलिनला मोठेंपण प्राप्त झालें आणि अमेरिकेंत प्रजासत्ताक शासन स्थापन करण्याची नाजूक कामगिरी करण्यांत त्याला पुढाकार घेतां आला.

विवाहानंतरच्या काळांत त्याला ज्या चळवळी तावडतोबीनें हातीं घ्याव्या लागल्या, त्यांच्या योगानें अमेरिकन लोकांचा मनःपिंड तयार होण्याला पुष्कळ मदत झाली. लोकमताला वळण लावण्यासाठीं त्याच्या वृत्तपत्राचा पुष्कळच उपयोग झाला. तथापि त्याचा प्रभाव प्रांताबाहेर फारसा नव्हता. पण फ्रँकलिनची दुसरी कामगिरी मात्र सर्वत्र पसरली व सर्व वसाहतींवर तिचे परिणामहि दिसून आले. क्रमानें ते जगभर पसरले व रुक्ष बनलेल्या जीवनांत त्यानें सर्वत्र प्रसन्नता निर्माण केली.

---

## ७ — पंचांग

सन १७३२ च्या सुमारास फ्रँकलिननें पंचांग प्रसिद्ध करण्यास सुरवात केली. पण तें नुसतें पंचांग नव्हतें. त्यांत अमेरिकन जीवनांत जें जें कांहीं त्याच्या दृष्टीनें यावयास हवें होतें त्या सर्वांचा समावेश असे. अमेरिकेंतील वातावरण अशा प्रकारच्या बदलास तयार झालेलें होतें. फ्रँकलिन अतिशय विनोदी होता. धार्मिक, सामाजिक, आर्थिक सर्व प्रकारच्या दडपणाखालीं लोकांचीं मनें जीं दडपून गेलेलीं होतीं, त्यांतून त्यांची सुटका करून त्यांना प्रत्येक गोष्टीचा स्वतंत्रपणें विचार करण्यास, व आपली बुद्धि चालविण्यास त्यानें प्रवृत्त केलें.

या काळांत अमेरिकन वसाहतींत वाचनाला फारसें साहित्य नसेच. मासिकांची त्या काळांत कल्पनाच नव्हती. वर्तमानपत्र घेतलें तर तेंही इतकें

लहान असे कीं, अगदीं सावकाश वाचणाराला सुद्धां अर्ध्या तासांत तें सहज संपूर्ण वाचून संपवितां येत असे; आणि हें वर्तमानपत्र सुद्धां आठवड्यांतून एकदां निघावयाचें ! मोठीं आणि भारी किंमतीचीं पुस्तकें हीं सामान्यतः धर्मविषयक असत आणि त्यांची भाषा व विषयांची मांडणी इतकी बोजड असे कीं, ज्यांना त्या काळांतील धर्मविषयक विचारसरणी परिचित असे त्यांनाच तीं समजूं शकत. त्यामुळें सामान्य लोकांना सहज समजेल, त्यांच्या घरगुती जीवनांत मार्गदर्शक ठरेल आणि त्यांची करमणूकही करील, असें साहित्य कुठें नसे. ती उणीव भरून काढण्याची कामगिरी बेंजामिनच्या पंचांगांनीं बजावली.

पंचांगें विलायतेंत बाराव्या शतकापासूनच प्रसिद्ध होऊं लागलीं होतीं. पण त्यांचें स्वरूप सामान्यतः तपशीलवार दिनदर्शकाप्रमाणें असे. पुढें सूर्य, चंद्र व इतर ग्रह यांच्या गतींचें सूक्ष्म ज्ञान जसजसें होत गेलें तसतसा त्यांचाहि त्यांत समावेश होऊं लागला व त्यांतून भविष्यहि अधिक तपशिलानें दिलें जाऊं लागलें. पुष्कळदां ग्रहनक्षत्रशास्त्र व भविष्यशास्त्र यांची गल्लत केली जाते व दोन्ही मिळून एकच अशी सामान्य लोकांची समजूत असते. या पंचांगांतून जें भविष्य दिलेलें असे त्यानें लोकांचें मन आकर्षित होई. या पंचांगांतून जमीन नांगरणें, बी पेरणें इत्यादि शुभ कार्यासाठीं मुहूर्त दिलेले असत. कांहीं वैद्यकीय उपचारही दिलेले असत. त्यानंतर त्यांत आणखी अनेक प्रकार अंतर्भूत झाले. पक्वान्नें कशीं करावींत, रोपांची वाढ होण्या-करतां कसें खुरपावें, भोवतालीं स्वच्छ कसें करावें, किरकोळ डागडुजी कशी करावी यासंबंधानेंही त्यांत माहिती दिलेली असे आणि अमेरिकेंत प्रसिद्ध होणाऱ्या पंचांगांत तर वेड्याविद्र्या श्लोकांचे पाठ व उपरोधिक पद्धतीनें लिहिलेले किंवा गम्मत म्हणून दिलेले टाकाऊ निबंधही दिले जात.

अमेरिकेंत प्रसिद्ध झालेलें पहिलें पंचांग फिलाडेलफियांतच प्रसिद्ध झालें असें दिसतें. १६८७ सालीं तें वुइल्यम ब्रॅडफर्ड यानें छापलें होतें. पुढें तो न्यूयॉर्कला गेला. हें पंचांग, डॅनियल लीड्स् नांवाचा एक इंग्रज गृहस्थ वसाहतीसाठीं अमेरिकेंत आलेला होता त्यानें तयार केलें होतें. लीड्स् यानें १६८८ सालीं यांत ज्या नव्या नव्या गोष्टी घातल्या त्या सर्वांचें स्वागत करण्याइतकी या शहरांतील रहिवाशांची तयारी नव्हती असें दिसतें. त्यांत

फिलाडेल्फियांतील क्वेकर संघटनेला न आवडणाऱ्या, मूर्खपणाच्या व त्यांना अवमानकारक वाटणाऱ्या कांहीं गोष्टी होत्या. त्यामुळें तें पंचांग बंद पाडण्यांत आलें.

पण पुढें १७३२ च्या सुमारास क्वेकर लोकांच्या महत्त्वाला उतरती कळा लागली म्हणा किंवा ते कमी आग्रही बनले म्हणा, पण त्या वेळीं एकट्या पेनसिल्व्हेनियांतच सात पंचांगें निघूं लागलीं होतीं आणि त्यांतच लीड्स्च्या मुलानें तयार केलेलेंही एक होतें. त्यांनीं सर्व बाजारपेठ भरून टाकली होती. त्यामुळें आणखी एकादें निघालें तर त्याला गिऱ्हाईक मिळेल कीं नाहीं याबद्दल संशय वाटण्यासारखी परिस्थिति होती.

पण फ्रँकलिनच्या हें लक्षांत आलें कीं, आपल्याला जें कांहीं करावयाचें आहे त्यासाठीं पंचांग हेंच साधन उपयुक्त ठरेल. लिहिण्याची हौस त्याला होती, पण ती साहित्यिक होण्याची नव्हती. त्याची हौस ही एका व्यवहारी माणसाची, स्वतःच्या डोक्यांत खेळणाऱ्या अनेक उपयुक्त कल्पना साकार करून त्यांचा सामान्य जनतेला उपयोग करून देण्याची होती. त्या काळीं लेखनाची 'शैली' म्हणून जी मानली जात असे ती त्याला आवडत नसे. सरळ, रोखठोक, स्पष्ट शब्दांत व सोप्या भाषेंत लिहिण्यांत तो तरबेज झालेला होता. ही सुद्धां कांहीं सामान्य गोष्ट नव्हती. बोजड, गुंतागुंतीची आणि कंटाळवाणी शैली त्या काळीं प्रचलित होती; त्यामुळें त्याची सरळ, स्पष्ट लेखनशैली क्रांतिकारक ठरली. बॉस्टनमध्यें असतांना त्याचे लेख लोकप्रिय झाले होते आणि त्या लेखनपद्धतींत फिलाडेल्फियाला आल्यावर सरावानें अधिक सफाईदारपणा आणि अनुभवानें अधिक प्रौढपणा आला होता. या लेखनपद्धतीची लोकांवर चांगली छाप पडत असल्याचेंही त्यानें पाहिलें होतें. १७३२ नंतरच्या दशकांत वर्तमानपत्र घेणें ही चैनीची गोष्ट होती. त्यामुळें त्याचा वाचकवर्ग मर्यादित, समाजांतल्या वरच्या थरांतला काय तो असे. अधिक लोकांशीं आपला संबंध यावा अशी फ्रँकलिनची इच्छा होती. आपले जीवनविषयक विचार, तसेच उद्योग, व्यवसाय, काटकसर, संपत्ति, धर्म, सुख, संसार इत्यादि जीवनाच्या सर्व अंगोपांगाविषयींचे विचार सामान्य जनांपर्यंत पोंचावेत ही त्याची इच्छा होती. त्याचबरोबर लोकांचें

मनोरंजनही व्हावें, केवळ फिलाडेल्फियांतील लोकांचेंच नव्हे तर दूर खेड्यांतून व रानांतून राहणाऱ्या शेतकऱ्यांचेंही मनोरंजन व्हावें,– कारण तेथें वर्तमानपत्र कधींच जाऊं शकत नसे,– व त्यांनीं स्वतंत्रपणें विचार करण्यास उद्युक्त व्हावें हा त्याचा उद्देश होता. तरच लोकांच्या कष्टाला विरंगुळा वाटेल व जीवनांत कांहीं सार आहे असें त्यांस दिसून येईल अशी त्याची समजूत होती, आणि त्याला पंचांग हेंच एकमेव साधन होतें.

असें पंचांग काढणें धाडस ठरेल व म्हणून त्यानें तो उद्योग करूं नये असें फ्रँकलिनच्या मित्रांनीं नेहमींप्रमाणें त्याला सुचविलें. पण फ्रँकलिनच्या पंचांग-विषयक तर कांहीं कल्पना होत्याच; पण त्याचा प्रसार करण्याच्याही कांहीं स्वतंत्र कल्पना होत्या. आजच्या काळांत ज्याला आपण प्रसिद्धि व जाहिरात म्हणतों तसा कांहीं प्रकार त्या काळांत कल्पनेंतही नव्हता. तथापि बेंजामिननें आपल्या पंचांगाची जाहिरात फारच अभिनव पद्धतीनें केली. पेन्सिल्व्हेनिया गॅझेटमध्यें त्यानें 'गरीब रिचर्डचें पंचांग' अशी जाहिरात प्रसिद्ध केली. लोकांचें लक्ष आकर्षित करून घेण्याकरतां विशेष प्रकारची शब्दरचना करण्याची आजकाल जी रूढ प्रथा आहे तिचा त्यानें त्या काळांत उपयोग करून घेतला. या पंचांगांत काय असेल यासंबंधानें पंचांगाच्या जाहिरातींत त्यानें पुढील अनेक गोष्टींचा उल्लेख केला आहे :

> या पंचांगांत सूर्यचंद्रांच्या गती, ग्रहणें, ताऱ्यांची भ्रमणें, हवामान, सूर्यचंद्रांचे उदयास्त, भरतीओहोटीच्या वेळा आणि त्याशिवाय विनोदी कविता, हास्यकारक चुटके, कोट्या, म्हणी, लेखकाचा उद्देश, आपला मित्र टायटन् लीड्स याच्या मृत्यूचें भविष्य, ब्रह्मचाऱ्याचे छंद, पाद्रीबोवांची दारू, भटाऱ्याची रोटी, थोरांच्या भेटी, नव्या पेहेरावाचा परिचय, प्रणयाराधनाच्या कथा, कॅथराईनचें प्रेम, वादळाचीं चिन्हें, मृत्यूचे पाश, पतिपत्नींचे संवाद इत्यादि इत्यादि.

सन १७३२ च्या काळांत फिलाडेल्फियांतील लोकांना या जाहिरातींतील प्रत्येक बाब गमतीची वाटली असली पाहिजे. त्यांत लैंगिक आकर्षण होतें, भविष्य होतें, विनोद होता. विशेषतः टायटन् लीड्स् याच्या मृत्यूच्या भविष्याच्या बातमीनें तर विशेष कुतूहल निर्माण केलें होतें.

डॅनियल लीड्स याचा मुलगा टायटन हा पंचांग प्रसिद्ध करतो हें अमेरिकेंत सर्वांच्या परिचयाचें होतें. त्याच्या पंचांगापुढें हें पंचांग टिकणार नाहीं म्हणून मित्रांनीं फ्रँकलिनला बजावलें होतें. पण फ्रँकलिननें पंचांग काढण्याचें ठरविलें. पंचांगलेखक म्हणून रिचर्ड सॉंडर्स असें नांव त्यानें प्रसिद्ध केलें. आपल्या प्रतिस्पर्ध्याला सुरवातीलाच दणका देण्याचें त्यानें योजिलें.

कांहीं वर्षांपूर्वीं विलायतेंत जॉनॅथन स्विफ्टनें त्या वेळच्या एका पंचांगकर्त्याविरुद्ध असेंच एक वादळ उठविलें होतें. छद्मी रीतीनें, व उपरोधिक पद्धतीनें लिहिण्यांत स्विफ्ट मोठा तरबेज होता. त्यानें लंडनच्या पार्ट्रिजच्या पंचांगाविरुद्ध एक पत्रक काढून त्यांत पार्ट्रिज हा अमूक तारखेस अमूक वेळीं मरणार आहे असें प्रसिद्ध करून टाकलें; व पुढें तो दिवस उगवला तेव्हां सदर भविष्याप्रमाणें तो मेला असेंही जाहीर केलें. तेव्हां लोकांना तें खरें वाटलें, व अनेक मित्रांनीं पार्ट्रिजच्या मृत्यूबद्दल दुखवटाही व्यक्त केला. तेव्हां मी जिवंत आहे असें त्याला सर्वांना कळवावें लागलें. हें सर्व प्रकरण विलायतेंत असतांना फ्रँकलिनला माहीत झालें असावें, पण याची अमेरिकेंतल्या लोकांना माहिती नसावी असें दिसतें. अमेरिकन लोकांच्या करमणुकींत भर घालील अशा विलायतेंत प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयाकडेही त्याचें बारीक लक्ष असे. तो स्वतःही कल्पक होताच. त्याला कोठें कांहीं आढळलें कीं तो तें उचली व त्याला नवा पेहेराव चढवून तें अधिक आकर्षक बनवी.

'गरीब' रिचर्डच्या पंचांगाचा पहिला अंक (१७३३ चा, पण तो१७३२ अखेरच्या सुमारासच प्रसिद्ध झाला होता.) पुष्कळ खपला. टायटन लीड्स् हा १७ आक्टोबर १७३३ या दिवशीं दुपारीं तीन वाजून एकोणतीस मिनिटांनीं मरेल असें भविष्य त्यांत छापलें होतें. पुष्कळ वाचकांनीं – ज्यांना फ्रँकलिनच्या छद्मी लिहिण्याचा परिचय होता, – त्यांनीं हा पंचांगलेखक दुसरा तिसरा कोणी नसून फ्रँकलिनच आहे व लीड्स्ची ही केवळ थट्टा आहे हें ओळखलें. पण यामुळें कुतूहल निर्माण होऊन पंचांगाचा खप खूप झाला. पंचांगाच्या तीन आवृत्त्या खपल्या व फ्रँकलिनचा उद्योग यशस्वी झाला. आपल्या संबंधीच्या भविष्यामुळें लीड्स फार रागावला व त्यानें आपल्या पुढच्या भविष्याच्या अंकांत फ्रँकलिनवर खूपच ताणून लिहिलें. हा वाद पुढें

कित्येक वर्षे चालला होता; आणि फ्रँकलिन नेहमीं म्हणे कीं आपली वादा-वादी लीड्सच्या भुताशीं चालली आहे.

हा गमतीचा प्रकार सोडला, तर या पंचांगांत विविध प्रकारची, उपयुक्त व महत्त्वाची माहिती पुष्कळ होती. त्यांतील ग्रहनक्षत्रविषयक माहिती बिनचूक असे. अन्यत्र जेथें जागा उरे, तेथें कविता, म्हणी, चुटके, सूक्ति, इत्यादींचा समावेश करण्यांत येई. प्रत्येक महिन्याच्या पानावर एक तरी कविता असेच. त्या सर्व त्याच्या नव्हत्या. तथापि त्या अर्थगर्भ व बोधप्रद असत. त्या काळीं लोकप्रिय असलेल्या वृत्तांत त्या असत व लोकांना त्या पाठ करणें सोपें जाई. त्यांतही म्हणी विशेष आकर्षक असत. अमेरिकन जीवनाचें स्वरूप त्यांत व्यक्त होत असे. त्या काळांत पुढील आशयाच्या म्हणी लोकांच्या तोंडीं बसल्या होत्या. उदा., पहा :—

जोंवरी अळशी झोपे, तोंवरि कष्ट करा नांगरीं।
मिळेल तुम्हां, धान्य पुरेसें खाउन विकण्या तरी ॥ किंवा,
डोळ्याचं पाणी वाळतं क्षणीं.

एकादी काल्पनिक व्यक्ति उभी करून व तिला कांहीं रंगरूप देऊन जिवंत बनवावी व तिच्या द्वारें बोलावें ही कला फ्रँकलिनला बालपणींच साधली होती व तिचें महत्त्वही त्याला पटलें होतें. बॉस्टन येथें आपला भाऊ जेम्स याच्या कुरँट पत्रांत त्यानें सायलेन्स डू गुड ह्या कल्पित बाईच्या नांवाखालीं लिखाण केलें होतें. रिचर्ड सॉंडर्स ही तिचीच पुरुष आवृत्ति होती. पण हळूं हळूं पंचांग वाचणारांना तो कोणी तरी हाडामांसाचा खराच माणूस आहे असें वाटूं लागलें व दर अंकांत त्याच्या पुढील हकीकतीची ते वाट पाहूं लागले. अलीकडे लेखक गोष्टींतून अशीं काल्पनिक पात्रें निर्माण करून त्या द्वारें आपले विचार मांडतात. फ्रँकलिननें यांत कांहीं नवीन केलें असें नाहीं. ही क्लृप्ति माणूस पूर्वीपासूनच योजीत आला आहे. पण त्यानें त्याला अमेरिकन पेहेराव दिला.

रिचर्ड सॉंडर्स हा अमेरिकन वसाहतींतील एक सामान्य माणूस होता. आपण मोठे पंडित आहों असें ढोंग त्यानें कधीं केलें नाहीं. किंवा आपले आचार विचार इतरांहून श्रेष्ठ दर्जाचे आहेत अशी प्रौढीही त्यानें कधीं मिरविली

नाहीं. तो पंचांग करीत असल्यानें आपल्याला ग्रहनक्षत्रांचें ज्ञान आहे हें म्हणणें त्याला भागच होतें. पण तारे पाहात राहणें हा एक आळशीपणांतला प्रकार आहे असें त्याचें म्हणणें असे. त्याचें वैशिष्ट्य हें कीं आपण गरीब आहों; व आपण पैशाकरतां हा उद्योग करतों असें म्हणण्यास त्याला लाज वाटत नसे.

पहिल्याच अंकांत वाचकांस निवेदन या सदरांत तो लिहितो :—

> मीं हें जें पंचांग लिहितों तें केवळ लोककल्याणासाठीं असें म्हणून मी तुमच्याकडून पाठ थोपटून घेऊं शकेन; पण उगाच खोटें लिहिण्यांत अर्थ नाहीं, आणि कोणी किती बाता मारल्या तरी त्यानें लोक फसून जातील असें समजण्यांतही अर्थ नाहीं. खरें असें आहे कीं, मी अतिशय गरीब आहे आणि माझी बायको – ती फार चांगली आहे पण ती अतिशय मानीही आहे,– जाडीभरडीं वस्त्रें नेसून काम करीत असतांना मी मात्र आकाशांत ताऱ्यांकडे पाहात वेळ वाया घालवावा हें तिला खपत नाहीं. एकदां तर तिनें माझीं सारीं पुस्तकें आणि करकर वाजणारीं यंत्रें जाळून टाकण्याचीही धमकी दिली. आपल्या कुटुंबाच्या फायद्यासाठीं मी माझ्या ज्ञानाचा उपयोग कांहीं तरी केला पाहिजे असें तिचें म्हणणें आहे, व त्यासाठींच मी हा उद्योग आरंभिला आहे. मुद्रकानें नफ्याचा मोठा हिस्सा मला द्यावयाचें कबूल केलें आहे, हेंही त्यांतल्या त्यांत बरें आहे.

आपलें जें कांहीं शिक्षण किंवा कौशल्य असेल त्याचा फायदेशीर रीतीनें व्यवहारांत उपयोग करतां आला पाहिजे, नाहीं तर तें एक ओझें ठरतें; हा जो कनिष्ठ मध्यमवर्गीय अमेरिकनांचा दृष्टिकोण, तो ह्यांत चांगला व्यक्त झाला आहे. तसेंच घरधनीण हीच घरांतील कर्ती करवती असून घर चालविण्याची जबाबदारी ती पेलते हेंही त्यांत दाखविलें आहे.

पुढच्या वर्षाच्या पंचांगांत तो म्हणतो :—

> मागल्या वर्षीं माझ्या पंचांगाच्या पुष्कळ प्रती तुम्हीं विकत घेतल्या त्यामुळें माझी परिस्थिति आतां बरीच सुखावह झाली आहे. आतां माझ्या बायकोनें घरांत चार भांडीं घेतलीं असून त्यांसाठीं तिला

शेजाऱ्यांच्या तोंडाकडे पाहावें लागत नाहीं. तसेंच आतां घरांत चार दाणे आले असून वस्त्रप्रावरणाचीही सोय झाली आहे. तिला अंगातलें गरम पोलकें घेतां आलें. आणि एक नवीन परकरही करतां आला. त्यामुळें माझ्या बायकोचा स्वभाव आतां शांत झाला आहे व मलाही गेल्या सबंध वर्षांत पूर्वी तीन चार वर्षांत मिळाली नव्हती इतक्या सुखानें झोप मिळू शकली.

आजच्या लोकप्रिय मासिकांतून वाचकांचेच विचार व्यक्त करणारीं पात्रें उभीं करण्यांत येतात, व त्यामुळें वाचतांना वाचकांना जणू ही व्यक्ति आपलेंच मनोगत बोलत आहे असें वाटतें. वाचकांशीं तादात्म्य घडवून आणणें ही आजच्या लेखकांची कला आहे. तें वाचलें म्हणजे वाचक उद्गारतो, " अगदीं आमच्यासारखें हें आहे." सॉंडर्सच्या तोंडीं घातलेले शब्द व वाक्यें लोकांच्या हृदयाला जाऊन भिडत व बायका नवऱ्यांना म्हणत कीं " मला गरम कपडे आणून द्या म्हणजे मी सुद्धां सॉंडर्सच्या बायकोप्रमाणेंच अगदीं शांत स्वभावाची दिसेन !"

फ्रँकलिननें कुटुंबांतील माणसांचें हृद्गत व्यक्त करणारी व त्यांना उपयुक्त वाटेल व पटेल अशी लेखनपद्धति स्वीकारली. ती "लेडीज होम जर्नल" सारख्या मासिकांतून आजतागायत रूढ असलेली दिसेल. आजच्या कित्येक मासिकांतून फ्रँकलिननें सुरू केलेलें हें वळण दिसून येतें.

हें पंचांग पंचवीस वर्षें चाललें. अमेरिकन वसाहतींतील लोकांचा जीवनविषयक दृष्टिकोण त्यावरून चांगला दिसून येतो. त्या वेळचे विचार आजच्या लोकांना ओबडधोबड वाटतील; पण अमेरिकन जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा उगम त्यांतूनच झालेला आढळून येईल.

उदा. सुरवातीलाच तो कांहीं म्हणी देतो :—

"आधीं राहायला घर, व चुलीला लाकडा, मग लग्नाचा विचार रोकडा."

" गरिबाजवळ गरजेपेक्षां कमी असतें, भिकाऱ्याजवळ कांहींच नसतें, श्रीमंताजवळ गरजेपेक्षां जास्त असतें, पण नेमकें हवें तितकें कुणाजवळच नसतें."

"लौकर निजे, लौकर उठे, तया ज्ञान, आरोग्य, संपत्ति भेटे."

हे मूळ विचार फ्रँकलिनचे नव्हत; पण त्यानें ते अमेरिकेंत आणले व रुजविले. " प्रेम करा, छडी मारा " ही त्याची म्हण अमेरिकन मुलांना शिस्त

27066 दि.
8455 नों. दि. 30.11.56
क्रमांक

लावण्याची तत्कालीन पद्धति व्यक्त करते. समाधानी वृत्ति निर्माण व्हावी यासाठीं त्याचे पुढील विचार पहा :—

"आयुष्यांत समाधान हवं असेल तर ज्याच्याजवळ आपल्यापेक्षां कमी असेल त्याकडे पाहा. अधिक असेल त्याकडे पाहूं नका." फ्रँकलिनचा भर विनयशीलपणावर विशेष असे. तो म्हणतो —

"श्रीमंतीची धुंदी वर्गीत बसते, तर
दारिद्र्याची लाज मागें उभी राहते."

गर्वाला आधीं सोबत समृद्धीची असते. नंतर दारिद्र्याची, आणि अखेर दुष्कीर्तीची.

कांहीं म्हणी त्यानें दुसरीकडून उचलल्या व बदलून घेतल्या; तर कांहीं त्यानें स्वतःच बनविल्या. त्याच्या म्हणी पहा :

"रिकामं पोतं, उभं राहात नसतं"
"कोल्हा झोपला, कोंबडीला मुकला"
"अनुभवाची शाळा महाग खरी,
पण मूर्खांना केवळ तीच बरी."
"वापरांतली किल्ली, राहते चांगली."
"तीनदां घर बदलावें लागणं आणि आग लागणं दोन्हीं सारखींच."

जसजसा काळ जाऊं लागला व फ्रँकलिन पोक्त होऊं लागला, तसतसा रिचर्डही आपल्या म्हणींचा रोख काटकसर, उद्योग व धनसंपादन याकडे वळवूं लागला. अमेरिकेची जों जों भरभराट होऊं लागली तों तों धन-संपादन करण्यावर अमेरिकनांचें लक्ष अधिकाधिक केंद्रित होऊं लागलें आणि त्यांचे नवे मार्गही खुले झाले. पूर्वी प्युरिटन लोकांचा श्रीमंतीला विरोध असे; पण तोही हळूहळू मावळला व कष्ट करून पैसा मिळविणें त्यांच्या दृष्टीनेंही मानाचें ठरलें. क्वेकर लोकही देवाला लक्ष्मीचा पाठीराखा मानूं लागले. गरीब रिचर्डच्या द्वारें फ्रँकलिननें लोकांना उद्योग व काटकसर यांची शिकवणूक दिली व "त्यायोगेंच तुम्हांला संपत्ति मिळवितां येईल व संपत्ति मिळवाल तरच तुम्ही सद्‌गुणी राहाल" असा उपदेश केला. दरिद्री माणसाला प्रामाणिकपणानें जगणें फार कठिण जातें हें त्यानें वारंवार बजावलें आहे. याच्या चरित्राच्या प्रस्तावनेंत फिलिप्स रसेल म्हणतो :

"अमेरिकेंतील त्या काळच्या सामाजिक जीवनांत या विचार-सरणीची फार गरज होती. अजून त्यांची सामाजिक बैठक पुरी जमली नव्हती. भोंवतीं घनदाट अरण्यें होतीं. पडीक जमीन पुष्कळ होती व राहण्याला घरेंही पुरेशीं नव्हतीं. किंबहुना समाज अद्याप स्थिर व्हावयाचा होता. त्यामुळें पुरुष, स्त्रिया, सर्वांनीं कष्ट करण्याची आवश्यकता होती. संपत्ति निर्माण करावयाची होती. पण तेवढेंच पुरेसें नव्हतें. धन साठविण्याची गरज होती व पैशामध्यें त्याचें रूपांतर करावयाचें होतें.

१७५७ च्या पंचांगांत रिचर्डच्या अर्थविषयक उपदेशाच्या त्या वेळपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व म्हणी एकत्र करून त्या एका लेखांत छापण्यांत आल्या. त्या सर्व जगभर पसरल्या. "संपत्तीचें साधन" या नांवानें हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें व त्याचा विलायतेंतही प्रसार झाला. या पुस्तकाच्या आतांपर्यंत चारशे आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या असून त्यांचीं पंधरा भाषांत (यांत चिनी भाषाही आहे) भाषांतरें झालीं आहेत.

या वेळपावेतों हें पंचांग अमेरिकेंतील तेराही वसाहतींतील कोनाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोचलें होतें. बायबलइतकाच त्याचा प्रसार झाला होता आणि घरोघर बायबल शेजारींच तें ठेवण्यांत येत असे. त्याच्या दरसाल सरासरीनें दहा हजार प्रती खपत. म्हणजे लोकसंख्येच्या प्रमाणांत तें शेकडा एक इतकें पडे.

ग्रामीण जनतेला गरीब रीचर्डची शिकवण मोठी प्रिय झाली होती. लोक मोठ्या उत्सुकतेनें ती वाचीत व पाठ करीत. मुलांच्या त्यावर उड्या पडत. तरुण जोडपीं त्यांतील कविता आवडीनें एकमेकांना वाचून दाखवींत. त्यांतलें सर्वच कांहीं पूर्वीच्या किंवा नंतरच्या काळाला उचित वाटण्यासारखें नव्हतें, तरी पण अमेरिकेंत अठराव्या शतकाच्या मध्यांत पूर्वीपेक्षां व नंतरच्या काळापेक्षांही अधिक प्रमाणांत सहिष्णु वृत्ति वाढलेली होती व विलायतेंत त्या काळीं जें वाङमय प्रसिद्ध होत होतें त्या मानानें फ्रॅंकलिनचें लिखाण पुष्कळच सौम्य आणि सोज्वळ होतें.

अमेरिकेंतील वसाहतींना एकजीव बनविण्याच्या कामीं फ्रॅंकलिनच्या या पंचांगाचा फार उपयोग झाला. मॅसॅचूझेट्स् व कॅरोलायना या वसाहतींतील हवामान आणि व्यवसाय यांत महदंतर असलें, किंवा न्यूयॉर्क व व्हर्जिनिया

यांच्या सामाजिक व राजकीय जीवनांनही खूपच फरक असला तरी गरीब रीचर्डबद्दलचें प्रेम आणि त्यांतल्या म्हणींबद्दलची आवड हीं सर्वत्र सारखींच होतीं. त्यावरून अमेरिकेंत स्वतःचें असें एक एकात्म सांस्कृतिक जीवन निर्माण होत होतें हें दिसून येतें. ह्या पंचांगामुळें सर्वत्र शिक्षणाला व साक्षरतेला उत्तेजन मिळालें यांत तर वादच नाहीं. सामान्य जनतेला शिक्षणाची ज्या काळीं अत्यंत गरज होती. त्याच काळीं फ्रँकलिननें तें त्यांना दिलें. त्या योगानें अमेरिकेंत लोकसत्ताक राज्यशासन सर्वमान्य होण्याला फार मदत झाली.

पण ज्या काळांत वाहतुकीचीं किंवा दळणवळणाचीं आजच्यासारखीं कोणतींच साधनें उपलब्ध नव्हतीं, त्या काळांत या पंचांगाचा फ्रँकलिननें प्रसार कसा केला असेल ? ह्या प्रश्नांचें उत्तरही फ्रँकलिननेंच आपल्या जीवनांतल्या एका महत्त्वाच्या कामगिरीच्या रूपानें दिलें आहे.

---

## ८ – टपालाची सोय

फ्रँकलिननें पुढें प्रांतांप्रांतांतून नियमित,कार्यक्षम व जलद दळणवळणाची जी योजना सिद्धीस नेली तिला त्याचें पेन्सिल्व्हेनिया गॅझेट व 'गरीब' रिचर्डचें पंचांग हीं प्रेरक ठरलीं. परंतु आपल्या पत्रांचा प्रसार घडवून आणण्यापेक्षां अधिक दूरवरचे विचार त्याच्या मनांत घोळत होते. अमेरिकन वसाहतींमध्यें एकात्म भावनेची अत्यंत आवश्यकता आहे हें लहानपणींच त्याच्या लक्षांत आलें होतें; किंबहुना या विचारानें त्याला घेरलें होतें म्हटलें तरी चालेल. या वसाहती ब्रिटिश साम्राज्याचा एक महत्त्वाचा व अभेद्य घटक आहेत, हा विचार मनांतून काढून टाकणें त्यास फार कठिण गेलें. इंग्लंडच्या एका मूर्ख राजानें अगदींच विचित्र धोरण अवलंबून भागच पाडलें तेव्हां त्यानें अमेरिकन प्रजासत्ताकाची कल्पना काढली. परंतु तरुणपणापासूनच्या त्याच्या सर्व कल्पना, योजना किंवा संघटनकार्य हीं पाहिलीं तर असें दिसून येतें कीं, इंग्लिश राजमुकुटाशीं नाममात्र बंधनानें बांधलेल्या, पण १७३० च्या सुमारास प्रत्यक्षांत स्वतंत्रपणें कारभार करणाऱ्या या वसाहतींमधला परस्पर दुजाभाव आणि त्यांच्यामधील अडथळे दूर करण्याकडेच त्याचा सारा रोख होता.

ह्या वसाहतींना इंग्लिश राजमुकुटाशीं बांधणारा निष्ठेचा तंतु किती क्षीण होता याची खरी कल्पना इंग्लंडच्या राजांना नव्हती किंवा वसाहत करण्यासाठीं आलेल्यांनाही नव्हती. कांहीं वसाहती इतर कांहींपेक्षां राजांना अधिक जवळच्या होत्या. वेगवेगळ्या वेळीं, वेगवेगळ्या राजांच्या कारकिर्दींत, वेगवेगळ्या रीतीनें व वेगवेगळ्या सनदांनीं या वसाहती निर्माण झालेल्या होत्या. त्यामुळें त्यांच्यांत मुळांतच पुष्कळ भेद होते. मॅसॅचूझेट्स हें स्वतःला कॉमनवेल्थ म्हणवी, तर व्हर्जिनियाला दुसऱ्या चार्लसनें केवळ डोमिनियनचा दर्जा दिलेला होता. पेन्सिल्व्हेनिया ही वुइल्यम पेन याची खाजगी मिळकत होती. ठिकठिकाणचा स्थानिक कारभारही सर्वत्र सारखा नव्हता. अंतर फार असल्यामुळें इंग्लंडच्या पार्लमेंटच्या कायद्याचा त्या सर्वांवर सारखा अंमल चालविणें अशक्य होतें; व वसाहती वसाहतींतही पुष्कळ अंतर असल्यानें त्याही एकमेकांना परकें मानीत व पुष्कळदां त्यांच्यांत वैरभावही असे. परस्परांबद्दल अविश्वास व मत्सर फार असे. आणि त्यांचे परस्परसंबंध येत ते किनाऱ्यावरील व्यापारावरून येत तेवढेच. तथापि असें असलें तरी त्या सर्वांमध्यें एक प्रकारची एकात्मता आहे हें फ्रँकलिननें ओळखलें होतें.

वयाच्या तिशीच्या सुमाराला त्याचा पांच प्रांतांशीं चांगला परिचय झालेला होता. त्यांचें स्वरूप वरून वेगवेगळें दिसत असलें तरी समान परिस्थितीमुळें त्यांच्यांत समानत्व निर्माण होत होतें हें त्यानें ओळखलें होतें. प्रत्येकाला जंगल तोडून आपला प्रांत निर्माण करण्याच्या कामीं कष्ट करावे लागत; व त्यामुळें लोकांमधील सर्वसामान्य विचारांचा प्रवाहच लोकशाहीचा होता. तथापि त्याला तसें व्यक्त स्वरूप आलेलें नव्हतें, आणि दक्षिणेकडे तर बागायती कामाची वाढ आणि गुलामगिरीची पद्धति, यांच्यामुळें धनिकांच्या हुकुमशाहीचीं बीजें तेथें रुजलीं जात होतीं. परंतु सीमेवरील प्रदेशांतील लोक समान आपत्ति आणि समान धोके यांच्यांतच वावरत असल्यामुळें कोणीच दुसऱ्याला कमी लेखून चालत नव्हतें. आणि या सर्वांपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या सर्वांची भाषा एक होती; आणि याच साधनाचा उपयोग करून भेदभाव बुजविण्याचा, व समानता व साधर्म्य वाढवून समाजांत एकात्मता निर्माण करण्याचा फ्रँकलिननें प्रयत्न केला.

परतु १७३० च्या काळांत एकभाषेचा वरील उद्दिष्टासाठीं उपयोग करणें फारच अवघड होतें. आज एका ठिकाणची वातमी, सूचना किंवा करमणुकीचे प्रकार दुसऱ्या ठिकाणीं आपण क्षणांत पोचवूं शकतों; परंतु अमेरिकन समाजाच्या त्या प्रभातकाळीं शब्दांचें दळणवळण किती सावकाश चालत असेल याची आज कल्पनाही करतां येणार नाहीं. समुद्रकाठानें जहाजांवरून एका ठिकाणची वातमी दुसऱ्या ठिकाणीं नेली जात असे. परंतु ती तेथें पोचेपर्यंत मध्यंतरीं किती तरी आठवडे लोटत. उत्तरेकडे अंतर्भागांत टपालस्वारांच्या साहाय्यानें टपालाचें दळणवळण चालू ठेवण्यांत येई. पण तें प्राय: मोठ्या व सरहद्दीवरील शहरांपुरतें मर्यादित असे. आणि तेंहि रस्त्यांच्या अभावामुळें, बर्फ, पाऊस आणि चिखल यांमुळें आणि तसेंच टपालस्वारांच्या लहरीमुळें जेमतेमच चालत असे. पेन्सिल्व्हेनियाच्या दक्षिणेकडे टपालाची सोयच नव्हती.

टपालाची ही जी कांहीं व्यवस्था होती ती इंग्लंडच्या रॉयल पोस्ट ऑफीसमार्फत केली जात असे. १७०७ सालीं वसाहतींतील टपालाचें सर्व काम इंग्लंडच्या सरकारनें आपल्याकडे घेतलें. तोंपर्यंत राजाच्या परवान्यावर खाजगी रीतीनें हा उद्योग लोक करीत. पण त्यांत परवानदारांना नुकसानीच येत असे. इंग्लंडच्या सरकारची कल्पना होती कीं हा उद्योग मोठ्या फायद्यांत चालेल व स्पॅनिश वारशाच्या युद्धाच्या खर्चालाही यांतून पैसा मिळेल. त्यामुळे विलायत सरकार हा कारभार स्वत:कडे घेण्यास तयार झालें तेव्हां आपले परवान्याचे हक्क सरकारला विकून टाकण्यास परवानेदार चटकन तयार झाले. पुढें सरकारलाही हा व्यवहार आंतबट्याचाच झाला. पोस्टाचे दर अधिक ठेवूनही (आणि बहुधा त्यामुळेंच) तो तसा झाला. वसाहतींतील लोकांना स्वत: जी टपालव्यवस्था नीट चालवितां आली नव्हती, ती इंग्लंडच्या सरकारनें स्वत:कडे घेतली तरी अखेर तिच्याकडे त्यांनीं पूर्ण दुर्लक्ष केलें. इंग्लंडच्या पोस्टमास्तर-जनरलनें वसाहतींकरतां एका डेप्युटी पोस्टमास्तरची नेमणूक केली, आणि त्यानें ठिकठिकाणीं स्थानिक पोस्टमास्तरांच्या नेमणुका केल्या. पण पोस्टाची सोय चांगली लावून देण्याची कोणीच कांहीं व्यवस्था केली नाहीं. फक्त ज्यांच्या हातांत तीं टपाल कामें आलीं होतीं त्यांना एक खाजगी धंदा मिळाला व तो ते खाजगी रीतीनें व स्वत:ला फायदेशीर होईल अशा पद्धतीनें जो काय करीत तो करीत !

तथापि या योजनेचा फायदा कांहीं लोकांना झाला ही गोष्ट मात्र खरी आहे. हे लोक म्हणजे वर्तमानपत्रांचे प्रकाशक होत. अॅन राणीच्या १७११ च्या कायद्यानें वसाहतींतील पोस्टाचे दर ठरवून दिले होते; पण त्यांत वर्तमानपत्रांचा समावेश नव्हता. वसाहतींत वर्तमानपत्रें आहेत याची इंग्लंडमधील अधिकाऱ्यांना बहुधा कल्पनाच नसावी. त्यामुळें पोस्टाचे स्थानिक अधिकारी वर्तमानपत्रांच्या बाबतींत आपल्याला हवें तें सोयीचें धोरण ठेवूं शकत. आणि ही सोय लक्षांत घेऊनच प्रकाशकांनीं पोस्टमास्तरांचीं कामें हौसेनें पतकरलीं. एकादा स्थानिक वर्तमानपत्राचा प्रकाशक एकाद्या शहराचा पोस्टमास्तर झाला, म्हणजे तो आपलें वर्तमानपत्र तावडतोब व फुकट पोचविण्याची व्यवस्था करूं शकत असे व इतरांची वर्तमानपत्रें उशीरां पोचवी, किंवा पोचविण्याचें नाकारीही. मुद्रक किंवा प्रकाशक हे समाजांतील बुद्धिमान् वर्गांतले असल्यानें त्यांना पोस्टाची स्थानिक स्वरूपाचीं कामें पोस्टमास्तरजनरलकडून सहज मिळूं शकत. हें काम फार थोडें असे; व त्यामुळें स्वतःच्या छापखान्याचा व्यवसाय संभाळून तें करणें त्यांना सहज शक्य होतें. फक्त अमेरिकेंतील डेप्यूटी पोस्टमास्तर जनरल यांजकडे त्यांना ठरल्यावेळीं हिशेब द्यावा लागत असे.

सन १७३१–४० ह्या दशकामध्यें वसाहतींतील पोस्टमास्तर जनरल सुप्रसिद्ध अलेक्झांडर स्पॉट्स्वूड हा होता. तो पूर्वीं व्हर्जिनियाचा गव्हर्नर होता. फिलाडेल्फियामधला स्थानिक पोस्टमास्तर 'मर्क्युरी' वर्तमानपत्राचा प्रकाशक अॅन्ड्र्यू ब्रॅडफर्ड हा होता. फ्रँकलिनचें 'गॅझेट' हें त्याचें प्रतिस्पर्धी वर्तमानपत्र होतें. ब्रॅडफर्ड स्वतःचें वर्तमानपत्र वर्गणीदारांना फुकट पोचवी. पण फ्रँकलिनचें 'गॅझेट' मात्र फुकट पोचविण्याचें त्यानें नाकारलें. पुढें तीन वर्षेपर्यंत आजारीपणाच्या खोट्या सबबीवर ब्रॅडफर्डनें स्पॉट्स्वूड याजकडे सहामाही हिशेब सादर केले नाहींत. तेव्हां १७३७ मध्यें स्पॉट्स्वूडही त्याला कंटाळला आणि त्यानें ब्रॅडफर्डला काढून टाकून त्याच्या जागीं फिलाडेल्फियाच्या 'पेन्सिल्व्हेनिया गॅझेट' या पत्राचा प्रकाशक बेंजामिन फ्रँकलिन याची नेमणूक केली.

आतां फ्रँकलिनला ब्रॅडफर्डवर सूड उगविण्याची संधि प्राप्त झाली होती. फ्रँकलिनच्या गॅझेटविरुद्ध कोपरखळ्या मारण्याचा ब्रॅडफर्डचा उद्योग

चाललाच होता. त्यामुळें त्याचें पत्र वाटण्याचें नाकारणें फ्रँकलिनला सहज शक्य होतें. परंतु फ्रँकलिन तत्त्वनिष्ठ होता. सर्व वर्तमानपत्रांना सारखेच हक्क असले पाहिजेत असें त्याचें मत होतें. म्हणून त्यानें आपल्या प्रतिस्पर्ध्यावर सूड घेण्याचें नाकारलें. आणखी दोन वर्षें गेलीं तरीही ब्रॅडफर्ड पोस्टमास्तर जनरलकडे आपला जुना हिशेब चुकता करूं शकला नाहीं. तेव्हां स्पॉट्स्वूड यानेंच, हिशेब चुकते होईपर्यंत ब्रॅडफर्डच्या वर्तमानपत्राचें टपाल फुकट वाटण्यास घेण्याला फ्रँकलिनला मनाई केली. त्यामुळें ब्रडफर्डचा उद्योग बसत चालला, व फ्रँकलिनला आपला खप व जाहिराती वाढविण्याला आपोआपच संधि प्राप्त झाली.

सन १७४० नंतरच्या काळांत फ्रँकलिनचा व्याप नुसता वाढलाच नाहीं तर तो इतर प्रांतांतूनही पसरला. त्यानें आपला एक सहकारी दक्षिण कॅरोलायनांत पाठवून चार्लसटन येथें आपल्या छापखान्याची व गॅझेटची शाखा सुरू केली. पुढें याच पद्धतीनें जमेकामधील किंग्जटन येथें, तसेंच डोमिनिका, न्यूयॉर्क, अँटिग आणि कनेक्टिकटमध्यें न्यू हॅवेन येथें छापखाना व वर्तमापनत्र यांच्या शाखा त्यानें सुरू केल्या. अशा रीतीनें आजच्या साखळीबंद वर्तमानपत्रांची परंपरा त्याच्यापासून सुरू झाली असें म्हणतां येईल. आजचा प्रकाशक तीं सर्व जशीं एकसूत्रानुसार चालवूं शकतो तशी अर्थातच त्याला त्या काळांत चालविणें शक्य नव्हतें. ज्या त्या ठिकाणच्या वर्तमानपत्रांच्या संपादनाचें काम स्थानिक माणूस स्वतःच्या जबाबदारीवर चालवी. फ्रँकलिननें छापखाना व साहित्य पुरविलें होतें; आणि पत्र चालविण्याच्यासंबंधींचें स्थूल धोरण आंखून दिलें होतें. या एकंदर व्यवहाराबद्दल नफ्यांतील कांहीं हिस्सा त्याला मिळे. या सर्व वर्तमानपत्रांतून 'गरीब' रिचर्डच्या पंचांगाची खूप जाहिरात केली जाई व या ठिकठिकाणच्या शाखांमार्फत त्याचें वाटपही सर्वत्र होई. अशा रीतीनें ब्रिटिश अमेरिकेंतील दूरदूर पसरलेल्या वसाहतींच्या राज्यसंघांत फ्रँकलिनचा व्यवसाय अनेक ठिकाणीं पोंचला. आजच्या अमेरिकन व्यवसायाचे धागेदोरे त्याच्या या योजनेंत आढळूत येतात.

फ्रँकलिनला मिळालेल्या वृत्तपत्रीय व्यवसायांतील यशापेक्षांही अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याच्या या योजनेचा अमेरिकन राष्ट्राची घडण

घडून येण्यास फार उपयोग झाला. या वर्तमानपत्रांतून केवळ स्थानिक स्वरूपाची बातमी येत नसे. उदाहरणार्थ, पेन्सिल्व्हेनिया गॅझेटमधून इतर ठिकाणांचीही बातमी येऊं लागली. ठिकठिकाणच्या बातम्या व मतें यांचें दळणवळण सुरू झालें. व त्यांतूनच पुढें स्वातंत्र्याच्या झगड्यासाठीं वसाहतींत ऐक्य निर्माण होणें शक्य झालें. पण ह्या कामांत अजून सर्वांत मोठी अडचण पोस्टाच्या वाहतुकींतील अव्यवस्था, दिरंगाई, व लाचखाऊपणा ही होती.

पहिली गोष्ट अशी कीं हा पोस्टखात्याचा कारभार आंतबटचाचा होता. इंग्लंडमधील पोस्टखात्याला वसाहतींतून एक पैसाही मिळत नव्हता. पोस्टमास्तरच्या कामाबद्दल मोबदला फार तुटपुंजा मिळे; त्यामुळें प्रकाशक सोडून—कारण त्यांना या व्यवस्थेचा स्वतःच्या वर्तमानपत्राच्या प्रसाराला उपयोग करून घेतां येई,— इतर कोणी जाणते लोक यांत पडत नसत. त्यांतून जे कोणी इतर हें काम करण्यास पुढें येत, ते लाच खाऊन किंवा सरकारी पैसे दडपून वापरण्याकरितां हा उद्योग पतकरीत. टपाल वाहातूक करणारे स्वार तर अतिशयच अप्रामाणिक असत. वाटेनें जातांना लहानसान, गांवांतून पत्रें घेऊन ते मिळतील ते पैसे आकारून तीं ग्राहकांना देत व स्वतःचा स्वतंत्र धंदा चालवीत. मोठ्या शहरांतून पोस्ट वाटपाचे दर ठरलेले होते तसे ते खेड्यांच्या बाबतींत ठरलेले नसत. त्यामुळें हे टपाली लोक हवे ते पैसे मागत व मिळेल त्यावर चरत, व खोटे हिशेब देत. त्यांच्यावर देखरेख करणेंही अशक्य होतें. बरें, टपाल्यांनाही दोष देणें सोपें नव्हतें. त्यांना पोस्टाकडून मोबदला फारच कमी मिळे. आणि वाईट रस्ते व खराब हवामान यांना तोंड देऊन काम करणें त्यांना भाग पडे. वाहतुकीचे रस्ते म्हणजे जंगलांतून जाणारे केवळ कच्चे रस्ते होते. गाडी जाऊं शकेल इतके सुद्धां ते नसत.

स्पॉट्सवूड, यानें अंतर्भागांतली टपाल वाहतूक सुधारण्यासाठीं कांहीं गोष्टी केल्या. पुढें तो १७४० सालीं वारला. त्याच्यामागून लिंच व नंतर बेंजर यांची नेमणूक झाली; पण त्यांनीं कांहीं प्रगति केली नाहीं. फ्रँकलिन टपालाच्या या अव्यवस्थेवर अतिशय नाराज होता. तो स्वतः फिलाडेल्फियाचें पोस्ट ऑफीस चालवीत असे. तें त्यानें उत्तम रीतीनें चालविलें होतें. पण

तो बाहेरगांवीं जें टपाल पाठवी तें या पद्धतीमुळें अडकून पडे व त्यावर त्याचा कांहीं इलाज चालत नसे. १७५१ मध्यें अमेरिकेंतील पोस्ट मास्तर जनरल बेंजर आजारी पडला व तो वांचण्याची शक्यता नाहीं असें दिसूं लागलें तेव्हां ती जागा मिळविण्यासाठीं बेंजामिननें प्रयत्न सुरू केले.

आपल्याला एखादी अधिकाराची जागा मिळावी म्हणून फ्रॅंकलिननें सबंध आयुष्यांत केलेला हा पहिला आणि एकमेव प्रयत्न. " कधीं मागूं नये, नि कधीं राजीनामा देऊं नये " हें त्याचें विचारसूत्र होतें. पण त्याला हा तेवढा अपवाद ठरला. हें पोस्टमास्तर जनरलचें काम मिळविण्यासाठीं त्यानें नुसता प्रयत्नच केला नाहीं तर आंतूनही सूत्रें हलविलीं. यावरून या कामाचें महत्त्व त्याला किती वाटत होतें हें दिसून येतें. त्याला ही जागा स्वतःच्या मोठेपणासाठीं नको होती. मुत्सद्दीपणाचें तें एक दूरदर्शी धोरण होतें. अमेरिकेंतील निरनिराळ्या प्रांतांतून एकात्मता निर्माण करण्यासाठीं या अधिकाराचा केवढा उपयोग होणार आहे हें त्यानें ओळखलें होतें.

१७५१ च्या सुमाराला फ्रॅंकलिनची मुत्सद्द्यांत गणना होऊं लागली होती. आपला छापखाना, वर्तमानपत्र व पोस्टऑफीस संभाळून त्यानें इतर अनेक उद्योगांत लक्ष घातलें होतें. त्यानें या काळांत विजेसंबंधानें जे प्रयोग केले त्यामुळें त्याची कीर्ति दिगंत पसरली होती. त्याचप्रमाणें त्यानें प्रांतांच्या राजकारणांतही भाग घेतला व फ्रेंच व इंडियन यांच्या विरुद्ध वसाहतींच्या संरक्षणासाठीं संघटना उभी केली. त्याच्या जीवनांतील एकाच कालखंडांतून हे विविध कार्यप्रवाह वाहात असले तरी त्यांचा पृथक्पणें विचार केला पाहिजे, इतक्या महत्त्वाचे ते आहेत असें त्याच्या चरित्रकारांनीं म्हटलें आहे. बेंजरच्या जागेसाठीं त्यानें इंग्लंडांत जो अर्ज केला त्याच्याशीं ह्या सर्व गोष्टींचा संबंध असा कीं, ज्या वेळीं त्यानें हा अर्ज केला, त्या वेळीं लंडनच्या लोकांचें त्याच्याकडे लक्ष जाण्याइतकें त्याला महत्त्व प्राप्त झालेलें होतें.

त्यानें अर्ज केला, त्याच वेळीं लंडनमधील आपला मित्र पीटर कॉलिन्सन यालाही एक पत्र पाठवलें आणि ही जागा आपल्याला मिळावी म्हणून खटपट करण्यास लिहिलें, आणि खर्चासाठीं त्याच्याकडे तीनशें पौंड पाठवून

दिले. नंतर आपल्या अर्जाच्या निर्णयाची वाट न पहातां च त्यानें संबंध टपालखात्याच्या पद्धतीची पाहणी सुरू केली.

फिलाडेल्फियांतील पोस्टाचें काम त्याच्याकडे चौदा वर्षें होतें. यांपैकीं शेवटच्या वर्षांत वसाहतींच्या पोस्ट खात्याचा नियंत्रक अधिकारी म्हणूनही त्यानें काम केलें होतें. त्या नात्यानें त्यानें १७५३ मध्यें उत्तरेकडील सर्व पोस्ट कचेऱ्या व रस्ते यांची पाहणी करण्यासाठीं दौराही काढला. हें काम दहा आठवडे चाललें. त्याच्या सूक्ष्म नजरेला कोठें काय चुकतें आहे हें तेव्हांच दिसून आलें. टपालस्वार ज्या ज्या रस्त्यांनीं जात त्या त्या रस्त्यांनीं तो गेल्यामुळें रस्ते कोठें कसे बदलले पाहिजेत व नद्यांचे उतार कसे टाळतां येतील हेंही त्याच्या लक्षांत आलें. पुढें ऑगस्टमध्यें त्याची वसाहतींतील पोस्ट मास्तर जनरल म्हणून नेमणूक झाली, त्या वेळपर्यंत सर्व कामाचा तपशील त्याच्या हाताशीं तयार होता.

डेप्यूटी पोस्टमास्तरच्या कामाची वाटणी फ्रँकलिन व वुइल्यम हंटर यांच्यांत करण्यांत आली होती. पण हंटर इतका आजारी होता कीं, कामाचा सर्व भार फ्रँकलिनवरच पडला. त्यानें आपल्या सुधारणांना ताबडतोब सुरवात केली. फिलाडेल्फिया व न्यू यॉर्क यांमध्यें आठवड्यांतून एकदांच टपालवाहतूक होत असे. त्या जागीं त्यानें ती आठवड्यांतून तीनदां केली. टपालस्वार टपाल थैल्या घेऊन सोमवारीं, बुधवारीं व शुक्रवारीं सकाळीं ८ ला निघत व दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं पांच वाजतां त्या मुक्कामावर पोचवीत. एकूण अवघ्या तेहतीस तासांत हें काम होई. दोन्ही शहरांतून सुटणारे स्वार निम्या अंतरावर एकमेकांना भेटत व आपआपल्या थैल्यांची आदलाबदल करून परत जात. सुमारें एक वर्षानंतर त्यानें नवे रस्ते बांधण्याच्या योजना आंखल्या. पोस्टाच्या उत्पन्नांतून रस्ते तयार करण्याचें काम होण्यासारखें नव्हतें. तेव्हां फ्रँकलिननें हे रस्ते करण्याबाबत कायदेमंडळाला विनंती केली. हे रस्ते केवळ पोस्टाच्या वाहतुकीसाठींच उपयोगी पडण्यासारखे होते असें नव्हे; तर लष्करी दृष्ट्याही त्यांची फार आवश्यकता होती हें त्यानें त्यांस पटवून दिलें, व ते तसे ठरलेही. यायोगे विंचेस्टर, यॉर्क व लँकॅस्टर हे भाग एकमेकांस जोडले गेले आणि त्यांवरून आठवड्याला टपालवहातूक सुरू झाली.

गांवांतल्या गांवांत टपाल पोचविण्याचीही त्यानें व्यवस्था केली. त्याचा दर एक पेनी असे. पत्रें आल्या दिवशीं जर तीं नेलीं गेलीं नाहींत तर त्यांचें वाटप दुसऱ्या दिवशीं एक पेनी घेऊन करण्यांत येईल असें त्यानें जाहीर केलें.

पत्र स्वीकारणारानें ही पेनी द्यावयाची असे.

वर्तमानपत्रांच्या प्रकाशकांमधील परस्पर-विरोध तोडण्यासाठीं आणि त्यांचें पोस्टखात्यावरचें वर्चस्व कमी करण्यासाठीं त्यानें असें ठरवून टाकलें कीं, कोणाचींही वर्तमानपत्रें फुकट नेलीं जाणार नाहींत. त्यासाठीं सर्वांना सारखाच दर पडेल.

त्याच्या या सर्व योजनांचें व्यापाऱ्यांनीं स्वागत केलें. कारण आतांपर्यंत टपाल वाहतुकींतील उशीरामुळें त्यांच्या मागण्या पडून राहात व निरोप पोचत नसत आणि त्यामुळें नुकसान होई. त्यामुळें ते टपाल व्यवस्थेला अगदीं कंटाळून गेले होते. वसाहती-वसाहतींत सुव्यवस्थित, जलद व निर्बंध व्यापार-व्यवहार चालण्यानेंच सर्व वसाहती एकमेकींशीं निगडित होणें शक्य होतें. आरंभींच्या कांहीं वर्षांत फ्रँकलिननें ज्या सुधारणा घडवून आणल्या त्या योगानें व्यापारधंद्याच्या वाढीसाठीं टपालाचा अधिकाधिक उपयोग केला जाऊं लागला. पण व्यापाऱ्यांना सगळ्यांत अधिक प्रोत्साहन जर कशामुळें मिळालें असेल तर फ्रँकलिनच्या कार्यक्षम, व व्यवहारी कारभारावर त्यांचा जो विश्वास होता त्यामुळें. त्यापूर्वींचे पोस्टमास्तर आळशी, दुर्लक्ष करणारे, व स्वत:च्या दुसऱ्या व्यवसायांत गुंतलेले असत. त्यामुळें फ्रँकलिनची कर्तबगारी फारच उठावदारपणें दिसून आली.

फ्रँकलिनची सर्वांत मोठी व महत्त्वाची सुधारणा म्हणजे हिशेब ठेवण्या-संबंधाची होय. त्यानें सर्व वसाहतींतून सर्वत्र एकसांची पद्धति निर्माण केली. यापूर्वी जो तो पोस्टमास्तर आपापल्या पद्धतीनुसार हिशेब ठेवी. त्यामुळें त्यांची नियतकालिक तपासणी व जुळणी करून विलायतेला निवेदन पाठवण्यास फार विलंब लागे. फ्रँकलिननें पूर्वींच्या सर्व गुंतागुंतीच्या व घोटाळ्याच्या पद्धति मोडून अतिशय सोपी पद्धत आखली. कोष्टकांचे ठराविक नमुने तयार करून ते त्यानें आखून छापून घेतले व त्यांतील तीं तीं कोष्टकें

व कोठे पोस्टमास्तरांनीं भरावेत व ते मध्यवर्ती पोस्ट कचेरीकडे पाठवावेत अशी योजना केली. त्यामुळें हिशेबाचें काम फार सोपें झालें. ज्या कामाला पूर्वीं आठवडे लागत तेथें आतां कांहीं तासांत तें काम पुरें होऊं लागलें, आणि स्थानिक पोस्टमास्तरांना किंवा टपालस्वारांनाही लबाडी करण्याला वाव मिळेनासा झाला.

फ्रँकलिननें या सर्व सुधारणा १७५३ ते १७५७ या काळांत घडवून आणल्या. त्यानें या कारभाराची घडी अशी सुरेख व सुयंत्र बसविली कीं १७५७ मध्यें तो पोस्टाचा कारभार आपल्या दुय्यमांच्यावर सोपवून विलायतेला निर्धास्तपणें जाऊं शकला.

तो विलायतेला गेला तेव्हां पोस्टखात्याला ९३८ पौंडांची तूट येत होती. त्याचा सहकारी हंटर याला व त्याला स्वत:ला सदर कामगिरीबद्दल नफ्यांतून ३०० पौंड सालिना मिळावयाचे होते ते कधींच मिळाले नव्हते. तथापि व्यवस्थित कारभाराचा पाया घातला गेला होता. शेवटच्या चार वर्षांत टपालाचें प्रमाण पुष्कळच वाढलें होतें आणि टपालव्यवस्था लोकप्रिय झाली होती. पुढील दोनच वर्षांत खर्च भागून शिल्लक उरूं लागली. १७७१ मध्यें फ्रँकलिन व हंटर यांनीं आपणांला मिळावयाचे सर्व पैसे काढून घेऊन नफा म्हणून पांचशे पौंड लंडन पोस्ट ऑफीसला पाठविले. त्यावर ' वसाहतींतून आलेली ह्या प्रकारची पहिलीच रक्कम ' असा तेथील पोस्ट कचेरीनें शेरा मारला. अशा रीतीनें वसाहतींत पोस्टखात्याचा कारभार सुरू झाल्यापासून त्रेपन्न वर्षांनीं प्रथमच तो नफेशीर रीतीनें चालू लागला होता.

या घटनेचा विलायतेंतील पोस्टखात्यावर विजेसारखा परिणाम घडून आला. त्यांनीं वसाहतींतील पोस्टखात्याच्या कारभाराकडे अधिक लक्ष देण्यास सुरवात केली व अमेरिकेंतील पोस्टमास्तरांना अधिक उत्तेजन दिलें. त्याचा परिणाम म्हणजे १७६२ मध्यें फ्रँकलिन जेव्हां परत फिलाडेल्फियाला आला तेव्हां ही टपालव्यवस्था अधिक कार्यक्षम करण्यास त्यास विशेष उत्साह वाटूं लागला. मध्यंतरींच्या काळांत हंटर वारला व त्याच्या जागीं जॉन फॉक्स क्रॉफ्ट या उत्साही माणसाची नेमणूक झाली. फ्रँकलिन परत आल्यावर त्या दोघांनीं मिळून सोळाशें मैलांचा प्रवास करून सर्व ठिकाणची तपशीलवार पाहाणी केली. १७६३ पर्यंत हें काम चाललें होतें.

उत्तरेकडील व दक्षिणेकडील प्रदेशांतील प्रत्येक पोस्ट, प्रत्येक रस्ता, नद्यांचे उतार किंवा बोटींच्या सोयी यांची त्यांनीं पाहणी केली आणि ठिकठिकाणच्या पोस्टमास्तरांची भेट घेऊन त्यांना उत्तेजन दिलें. १७६४ च्या जानेवारींत या सर्व पाहणीचा आढावा घेऊन त्यानें आपलें निवेदन पाठवलें. त्यांत आपल्या पुढील नव्या योजनाही त्यानें नमूद केल्या:—

न्यूयॉर्क व फिलाडेल्फिया यांच्यामधील टपाल वाहतुकीप्रमाणेंच बॉस्टन व न्यूयॉर्क यांमधील टपाल वाहतूकही कमी वेळांत करण्याची व त्यासाठीं रात्रंदिवस प्रवास चालू ठेवण्याची योजना सुरू करण्यांत आली.

फिलाडेल्फिया आणि न्यूयॉर्क या दोन गांवांतून आज पाठवलेलें टपाल दुसऱ्या गांवीं दुसऱ्या दिवशीं पोंचत असे व तिसऱ्या दिवशीं त्याचें उत्तर येत असे. पूर्वीं पत्र पोचण्याला एक आठवडा लागत असे. नवी योजना स्वीकारली तर, बॉस्टन व न्यूयॉर्क यांतील पत्राचें उत्तर येण्यास पूर्वीं दोन आठवडे लागत तेथें आतां चौथ्या दिवशीं उत्तर मिळूं लागलें असतें, आणि बॉस्टन आणि फिलाडेल्फिया यांमध्यें पत्रांची ये जा व्हायला तीन आठवडे लागत, ती सहा दिवसांत झाली असती. या टपालवाहतुकीच्या कामांत एक मोठी व अपरिहार्य अडचण अशी होती कीं, या काळांत लोकांचें फार मोठ्या प्रमाणावर स्थलांतर चालू होतें. स्थिर वसाहतींच्या गांवीं किंवा बंदरकांठच्या मोठ्या शहरीं ही अडचण नसे. परंतु वसाहतीसाठीं पश्चिमेकडे जाण्याचें, जमीन तयार करण्याचें, जंगलें तोडून तो प्रदेश वसाहतक्षम बनविण्याचें कार्य सतत चालू असल्यानें व नव्या वसाहती, नवीं गांवें उभारलीं जात असल्यानें दळणवळण स्वाभाविकच अस्थिर व प्राथमिक अवस्थेंत होतें. कांहीं कांहीं गांवें इतकीं दूर व इतकीं लहान असत कीं तेथें वारंवार टपाल पोचविणेंही शक्य नसे. त्या काळांत टपाल ज्याला द्यावयाचें त्याजकडून पोस्टेजचे पैसे घ्यावयाचे असत, पाठविणाराकडून नव्हे. या गांवांना जावयाचें म्हणजे नवे पायरस्ते पाडावे लागत. टपालस्वारांवर देखरेख करणेंही अशक्य असे. त्यामुळें सीमेवरील प्रदेशांत दिरंगाई, लांचलुचपत इत्यादि दोष निर्माण होत. हे टपाल वाहतूक करणारे बरोबर अनेक जिनसा बाळगून त्यांचा व्यापारही करीत, व त्यामुळेंही टपाल पोचविण्याच्या कमांत महिने लोटत.

तथापि वसाहतींची वाढ पूर्व किनाऱ्यावरच अधिक व स्थिर झालेली असल्यानें तेथील दळणवळण स्थिर पायावर उभें होतें आणि वसाहतींच्या ऐक्याच्या दृष्टीनें तें महत्त्वाचें होतें. या टपालानें निरनिराळीं राज्यें व त्यांचीं सरकारें जोडलीं गेलीं व त्यामुळें त्यांच्यांत व्यापार झपाट्यानें वाढला. त्याचबरोबर त्यांच्यांत एकात्म भावनेचीही वाढ झाली व मूळ देशाला संघटित विरोध करण्यासही ते सिद्ध झाले. १७६५ मध्यें स्टँप ॲक्ट पास करण्यांत आला तेव्हां असंतोष निर्माण होऊं लागला व फ्रँकलिनच्या पोस्टाच्या सोयीमुळें त्याचा सर्वत्र जोरानें प्रसार झाला.

हा कायदा झाला तेव्हां फ्रँकलिन वसाहतींचा प्रतिनिधि म्हणून इंग्लंडला गेलेला होता. सदर कायदा रद्द व्हावा म्हणून त्यानें वर्षभर प्रयत्न केले. ते वर्षभरानें यशस्वीही झाले. पण तोंपर्यंतच्या काळांत ब्रिटिश सरकारविरुद्ध वसाहती अगदीं खवळून उठल्या होत्या. पुढील दहा वर्षांत हा कडवटपणा वाढत गेला व तो कमी करून गोडी निर्माण करण्याचा इंग्रज राजानें कांहींही प्रयत्न केला नाहीं. राज्यसत्तेविरुद्ध निर्माण झालेला असंतोष सर्व राज्यांत पसरला व त्यांतून एकात्म अमेरिका बनविण्याचे फ्रँकलिनचे प्रयत्न साकार झाले. जर फ्रॅन्कलिननें पोस्टाच्या दळणवळणाची इतकी चांगली सोय केली नसती तर १७७५ च्या सुमारास अमेरिकन लोकांना आपल्यावरच्या समान आपत्तीची जाणीव झाली असती किंवा नाहीं, व त्यांचें संघटित बंड इतकें परिणामकारक ठरलें असतें कीं नाहीं याची शंकाच आहे.

आज मेन पासून जॉर्जियापर्यंत जो मोठा अमेरिकन रस्ता नं. १ जातो तो बराचसा त्या काळांत फ्रँकलिननें आंखलेल्या मार्गानेंच. आज ते रस्ते रुंद करण्यांत व डांबरी किंवा सिमेंटचे करण्यांत आले असले व नद्यांवर आणि नदीमुखांवर लोखंडी पूल उभारले असले तरी हे रस्ते त्या वेळेपासूनचे आहेत. यावरून त्याची त्या वेळची पाहणी किती बिनचूक होती हें दिसून येतें.

# ९ – इतर उद्योग

पोस्ट खात्याच्या या नव्या कारभारामुळें अमेरिकेंतील वसाहतींतून फ्रँकलिनचें वजन सर्वत्र पसरत चाललें होतें. त्यामुळें ब्रिटिश सरकारचेंही त्याच्याकडे लक्ष गेल्यावांचून राहिलें नाहीं. पण त्याबरोबरच स्वतःचें घर, फिलाडेल्फिया शहर व पेन्सिल्व्हेनिया प्रांत यांच्यासंबंधाचे त्याचे विचारही चालूच होते. घरचा कारभार सुरळीत चालत असल्यानें त्याला शहराच्या व प्रांताच्या कारभारांत लक्ष घालण्यास अडचण नव्हती. घरची सर्व जबाबदारी त्याची पत्नी डेबोरा हिनें संभाळलेली होती. तिला स्वतःची अशी महत्त्वकांक्षा नव्हती. घर सुखी व समाधानी ठेवावें व मुलांचें नीट संगोपन करावें यांत ती रममाण असे. तिच्या संबंधानें फारशी माहिती आज उपलब्ध नाहीं ही खरोखर खेदाची गोष्ट आहे. फ्रँकलिननेंही तिच्यासंबंधानें विशेष माहिती दिलेली नाहीं. तथापि त्याच्या लेखावरून नाहीं तरी त्याच्या वागण्यावरून तिचें महत्त्व लक्षांत येतें. इतर मुत्सद्द्यांच्या बायकांप्रमाणें शिष्ट समाजांत वावरणें तिला आवडत किंवा जमत असल्याचें दिसून येत नाहीं. आपल्या पतीच्या सार्वजनिक कार्यांत सहभागी होणें, मुत्सद्द्यांशीं बरोबरीच्या नात्यानें बोलणें चालणें किंवा मतें व्यक्त करणें इत्यादि आजच्या सुशिक्षित स्त्रियांची दृष्टि तिच्यांत नव्हती. फ्रँकलिनला सार्वजनिक कार्यासाठीं घरच्या सर्व जबाबदारींतून मुक्त ठेवणें इतकेंच तिचें कार्यक्षेत्र होतें.

पण गरीब रिचर्डच्या पंचांगांत मधून मधून तिचें अप्रत्यक्ष दर्शन घडतें, आपण तयार केलेल्या कांहीं म्हणी, विनोद किंवा चुटके फ्रँकलिन घरीं वाचून दाखवी. आपल्या बायकोला ते समजले व ती आणि मुलें त्यांवर पोट धरून हसली म्हणजे सामान्य खेडूत जनतेलाही तें समजेल असें तो धरून चाले. तिच्यामुळें फ्रँकलिनच्या लेखनांत प्रसन्नता, व घरगुती वातावरण निर्माण झालें होतें. ती नसती तर त्याच्या लेखांत इतके मार्दव येतें ना. डेबोरा ही त्याच्या संसारनौकेचा नांगर होती. तो बाहेर दौऱ्यावर असतांना त्याचें वाकडें पाऊल पडण्याची वेळ आली तरी तिच्या स्मृतीचा धागा त्याला त्यापासून परावृत्त करी. ती पतिनिष्ठ, समाधानी, निश्चयी व

उदार होती. आपल्या पतीसंबंधानें, घरासंबंधानें किंवा जीवनासंबंधानें तिचें मत काय होतें हें कधींच कोणास कळण्यासारखें नाहीं. तिनें लिहिलेलें फार थोडें आहे; व तिच्यासंबंधानें तत्कालीन लेखकांनीही लिहिलेलें फारच थोडें आहे.

फ्रँकलिननें तिला लिहिलेल्या पत्रांत 'प्रिय मुली' असा तिच्या संबंधानें उल्लेख केलेला आढळतो. तिच्या बौद्धिक वकूबाबद्दलही त्याची तक्रार नव्हती. बाहेरगांवीं असतांना लिहिलेल्या पत्रांतून त्यानें स्वतःची प्रकृति, व लंडनमधील पाऊस, वहातुकीची गैरसोय इत्यादि संबंधांत लिहिलें आहे. पण त्यांत राजकारण कधीं नसे. राजकरणाच्या ऐन आघाडीवर तो वावरत असतांनाही घरगुती पत्रांत त्यासंबंधींचा उल्लेख आढळत नाहीं. पण या सर्व धकाधकींत असतांनाही त्याला तिचा कधीं विसर पडला नाहीं.

त्यानें आपल्या जुंटो क्लबांत म्हणण्याकरतां एक पद तयार केलें होतें. त्यांत त्यानें जोन नांवाच्या बाईचें वर्णन केलें आहे. तें त्यानें तिच्यावरच रचलें होतें. त्यावरून तिच्या संबंधानें त्याचें मत दिसून येतें.

फिलाडेल्फियांतील तत्कालीन व्यापारी कुटुंबांचा विचार करतां फ्रँकलिन चांगला संपन्न होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि त्याची अतिशय काटकसरीची राहणी व निर्व्यसनीपणा यामुळें त्याच्या परिस्थितीची कांहीं काळ इतरांना कल्पना आली नाहीं. तो म्हणतो :

> "आमच्या घरांत रिकामा नोकर नाहीं. आमची जेवणाची भांडीं साधीं असत. त्यांत थाट नसे. सामानही अगदीं स्वस्तांतलें असे. पुष्कळ दिवसपर्यंत मी सकाळच्या न्याहारीला दूध भाकरी घेत असे. चहा घेतच नसे. माझी बशी साधी मातीची व चमचा टिनचा असे."

पण पुढच्याच वाक्यांत कांहींशा विनोदानें व भाग्योदयाबरोबर येणाऱ्या श्रीमंतीच्या डौलानें तो म्हणतो, "अतिशय साध्या राहाणीनें राहावें हेंच माझें धोरण होतें. पण परिस्थिति सुधारली कीं तुमचीं तत्त्वें बाजूस सारून सुखसाधनें घरांत कशीं शिरतात पहा. एके दिवशीं सकाळीं मी न्याहारीला बसलों तों माझ्यापुढें चिनी भांडें व त्यांत चांदीचा चमचा आला ! माझ्या बायकोनें मला कांहीं कळू न देतां त्या वस्तू माझ्याकरतां आणल्या होत्या. त्यासाठीं तिनें तेवीस शिलिंग खर्च केले. हा खर्च कशाकरतां केला म्हणून

मी विचारलें तेव्हां ती म्हणाली, तुमच्या बरोबरीच्या इतर लोकांप्रमाणें तुम्हांलाही असल्या वस्तू असल्या पाहिजेत असं मला वाटलं, म्हणून मीं त्या घेतल्या. आमच्या घरांत या पदार्थांनीं शिरकाव केल्यानंतर दिवस जसजसे बरे येत गेले, तसतशी त्यांत कित्येक पटींनीं वाढ झाली. आणि त्यांची किंमत शेकडों पौंडांपर्यंत गेली.

वस्तुस्थिति अशी होती कीं फिलाडेल्फियांतील शांततेच्या या काळांत फ्रँकलिन चांगला संपन्न झाला होता. तथापि श्रीमंतीचें प्रदर्शन करणें शक्य नव्हतें. कारण गरीब रिचर्डच्या पंचांगांतील गरिबीचें वर्णन त्याच्या आड येई. तो कागदाचे किंवा कचरणीचे व चिंध्यांचे गठ्ठे, कागद तयार करण्याकरतां हातगाडीवर टाकून रस्त्यानें ढकलीत घेऊन जात असे. कामकऱ्याच्या वेषांत वावरण्यांत त्याला मौज वाटे. पुढच्या पिढींत मात्र यांत पालट झाला होता. त्याचा मुलगा वुइल्यम बारा वर्षांचा असतांनाच त्यानें त्याच्यासाठीं एक घोडा घेतला व एक खाजगी शिक्षकही ठेवला.

१७३६ मध्यें त्याचा फ्रॅन्सिस नांवाचा एक चार वर्षांचा मुलगा देवीनें वारला. फ्रँकलिनचा तो सर्वांत अधिक लाडका होता. त्या वेळीं देवी टोचण्याची पद्धति नुकतीच सुरू झाली होती व लोकांत आरंभीं त्यासंबंधानें खूप गैरसमज असे व विरोधही असे. देवी टोचल्यामुळें मुलगा वारला अशी बातमी सगळीकडे पसरली. फ्रँकलिन देवी टोचाव्यात या मताचा होता, व त्याचा तो प्रचारही करी असे, म्हणून मुलाच्या मृत्यूनें लोकांत पसरलेला गैरसमज दूर करण्याकरतां त्यानें गॅझेटमध्यें लिहिलें कीं,

> "माझ्या मुलाला देवी टोचलेल्या नव्हत्या. इतरांना जशी देवीची लागण होते तशीच त्याला झाली. देवी टोचाव्यात असें माझें मत असल्यानें व तें मी माझ्या मित्राजवळ बोलून दाखवलें असल्यामुळें देवी टोचल्यामुळें मुलगा गेला अशी लोकवार्ता पसरली आहे परंतु ती खरी नाहीं. तो फार दिवस आजारी असल्यामुळें त्याला देवी टोचण्याचें लांबलें. तो बरा झाल्यावर त्याला देवी टोंचून घेण्याचाच माझा विचार होता."

पन्नास वर्षांनन्तर लिहिलेल्या आत्मचरित्रांत तो म्हणतो :

"मी त्या मुलाला वेळींच देवी टोचून घेण्यांत दुर्लक्ष केलें ही फार मोठी चूक झाली. जे आईबाप मुलांना देवी टोचून घेत नाहींत त्यांच्याकरतां मी हें सांगत आहे. या बाबतींत जे आईबाप हयगय करतील ते पस्तावतील. मृत्यु येणारच असला तर निदान धोक्याचा मार्ग तरी आपण पत्करूं नये."

छत्तीस वर्षांनन्तर आपल्या वहिणीला लिहिलेल्या एका पत्रांत तो म्हणतो: "नातवाला पाहून मला फ्रँकीची आठवण होते व ती झाली कीं मनांत चर्र होतें व दुःखाचा सुस्कारा बाहेर पडतो."

या वेळीं फ्रँकलिनचा छापखाना व घर एकत्रच होतें. त्यानें लग्न केल्या-नंतर एक दुकानही घातलें होतें. आरंभीं त्यांत स्टेशनरी माल असे. १७३० मध्यें त्यांत बरीच वाढ करण्यांत आली. व त्यांत दारू, तेलें, कॉफी, लोणी, मासे, नौकानयन यंत्रें, एवढेंच काय पण एक घोडाही होता. या वर्णनावरून तत्कालीन दुकानांची व अशा दुकानांत येणारें गिऱ्हाईक किती विविध प्रकारचें असूं शकेल याचीही कल्पना येईल. या दुकानामुळेंही समाजांतील विविध थरांतील लोकांशीं त्याचा परिचय झाला होता. पुढील काळांत त्याचे व्याप जसजसे वाढले त्याप्रमाणें दुकानाचा कारभार डेबोरा पाहूं लागली. १७३७ सालीं पोस्टमास्तर म्हणून त्याची नेमणूक झाली. तेव्हां तें पोस्ट ऑफिसही या दुकानांतील एका कोपऱ्यांतच थाटलें गेलें. आजही ग्रामीण भागांत अशीच स्थिति आहे.

याच सुमाराला पेन्सिल्व्हेनिया विधिमंडळाच्या कारकुनाची जागा त्यानें पत्करली. ज्या माणसानें पुढील काळांत आपल्या विशाल कल्पनांच्या जोरावर अमेरिकेचें एवढें भव्य चित्र रंगविलें, त्यानें इतकीं बारीकसारीक कामें कां पतकरलीं याचें कोणाला आश्चर्य वाटेल. पोस्टमास्तरच्या कामा-प्रमाणेंच हें कारकुनी कामदेखील खर्डेघाशीचेंच होतें. व अशा प्रकारच्या कामांचा फ्रँकलिनला लहानपणापासूनच तिटकारा होता. पण अशा बारीक बारीक गोष्टींतूनच मोठ्या गोष्टींचा उगम होत असतो. उदाहरणार्थ, टपा-लाच्या बारीकसारीक गोष्टी त्यानें स्वतः केल्या असल्यामुळें दळणवळणाच्या सातत्याची त्याला पुरी जाणीव झाली. त्याचप्रमाणें कायदेमंडळांतील कायदे करण्याचें काम दिवसानुदिवस पाहण्यानें त्याला त्यांतील दृष्टि प्राप्त झाली

व मुत्सद्देगिरींत तो मुरब्बी बनला. इतरांनीं इतर मार्गांचा अवलंब केलेला आढळतो. मूळ तात्त्विक विचारांवरून ते प्रत्यक्ष कार्याकडे वळले. तर फ्रँकलिन प्रत्यक्षावरून तात्त्विक सिद्धांताकडे वळला. अखेरपर्यंत त्यानें आपल्या कष्टानें घट्टे पडलेल्या हातांनींच काम केलें, पण केवळ असेंब्लीच्या कार्यक्रमांत त्याचें मन गुंतून राहणें शक्य नव्हतें. जेव्हां काम कंटाळवाणें होई तेंव्हा तो कोडीं सोडवीत बसे. कोष्टकें मांडावीं व त्यांत उभे आडवे आंकडे भरून सारख्या बेरजा आणाव्यात हा त्याचा उद्योग चाले. आरंभीं तो आठ घरी कोष्टक घेत असे. नंतर त्यानें तें सोळा घरांपर्यंत वाढवलें. जादू म्हणून तो ही गंमत इतरांना दाखवी.

हा प्रकार सोडला तर फ्रँकलिननें असेंब्लींत कारकून असतां वेळच्या आपल्या फारशा आठवणी नमूद केलेल्या नाहींत. मात्र या काळांत हळूहळू बरींच सार्वजनिक हिताचीं अशीं कार्ये घडलीं. उदाहरणार्थ,आग विजविण्याचें खातें, पोलीस खातें, शास्त्रीय सभा, व अभ्यासपीठ, या सर्व उपक्रमांत त्याचा भाग होता. त्याशिवाय त्याचें संशोधनात्मक प्रयोग चालू होते. व लष्करांतही त्यानें भाग घेतला होता. अशा कार्यांत त्याचीं सुमारें वीस वर्षें गेलीं.

नीट बस्तान बसल्यावर १७३३ मध्यें आपल्या नातलगांना भेटण्याकरतां तो बॉस्टनला गेला. तेव्हां त्या शहरांत किती तरी सुधारणा झाली असल्याचें त्यास दिसून आलें. तसेंच कांहीं नागरी सुखसोयींच्या बाबतींत तर तें फिलाडेल्फियाच्याही पुढें गेलेलें त्याला आढळलें. विशेषतः लोकांच्या मदतीवर उभारलेली आग विजविणारी कंपनी आणि रखवालदारी किंवा पोलिस संरक्षण या गोष्टी त्याला विशेष आढळल्या.

त्या काळांत अमेरिकन शहरांत आगीचा उपद्रव फार होत असे. तेव्हां घरें लाकडी फळ्यांचीं आणि छपरांचीं असत. काड्याच्या पेट्या नसल्या-मुळें विस्तव एका खोलींतून दुसऱ्या खोलींत न्यावा लागे. धुराडी स्वच्छ करण्याची पद्धत नव्हती. त्यामुळें आगी फार लागत. व त्या विझविण्याच्या विशेष सोयी नसल्यामुळें त्या चटकन पसरत व हाहाःकार उडे. हातानें चालवावयाचे पंप असत. त्यांतून पाण्याची बारीक धार वर उडे. बादल्या बादल्याची रांग लावून लोक पाणी पुरवठा करीत. पण आग लागल्या वेळीं

हें सर्व करण्याला पुरेशीं माणसें असलीं तरच तें शक्य होई. आग कांहीं सांगून लागत नाहीं. त्यामुळें त्यासाठीं स्वतंत्र व तयार माणसें असल्याशिवाय या साधनांचाही पुरेसा उपयोग होत नसे. या बाबतींत बॉस्टननें केलेल्या व्यवस्थेसंबंधानें एका बातमीदाराचें पत्र म्हणून त्यानें गॅझेटमध्यें पुढील आशयाचें पत्र प्रसिद्ध केलें.

> प्रत्येक आग विझविण्याच्या बंबाची एक संस्था आहे. तिचें काम कोठेंही आग लागली कीं धावून जाणें हें आहे. कामांची वांटणी केलेली असून कांहींच्या हातीं आकडयाच्या काठ्या दिलेल्या असतात व कांहींच्याजवळ कुऱ्हाडी असतात. हें सर्व सामान बंबाजवळ सतत ठेवलेलें असतें. आगीची वर्दी मिळतांच त्यांनीं धावून जावयाचें असतें. याबद्दल त्यांना करांत कांहीं सूट दिली जाते. आगीच्या वेळीं अधिकाऱ्यांच्या हाताखालीं त्यांनीं काम करावयाचें असतें. त्यांच्याजवळ पांच फूट लांबीचा तांबडा रंग दिलेला व टोकास पितळी फाळ बसविलेला भाला असतो. आगीच्या वेळीं त्यांचा हुकूम मानलाच पाहिजे, न मानणारास ४० शिलिंग दंड किंवा दहा दिवसांची कैद अशी शिक्षा ठेविली आहे. हे अधिकारी व एंजिनचे लोक यांची दर तिमाहीला बैठक भरते व आग विझविण्याच्या कामीं आलेल्या अनुभवांची उजळणी व नवीन सुधारणांचा खल करण्यांत येतो. अशा रीतीनें कोणत्याही प्रसंगीं कसें एकजुटीनें काम करावें याचा त्यांना अनुभव आहे.

नेहमीप्रमाणें हा प्रश्न जुंटो क्लबांत विचारासाठीं घेण्यांत आला, व तेथें झालेल्या चर्चेतून एक 'युनियन फायर कंपनी' म्हणजे आग विझविणारे संयुक्त मंडळ निर्माण करण्यांत आलें. पन्नास वर्षांनंतर लिहितांना फ्रँकलिननें म्हटलें आहे, "हें मंडळ अजून कार्यक्षम आहे. या धर्तीवर अनेक नवीन मंडळें निघालीं असून आग पसरण्यापूर्वींच ती विझविली जाते. इतकी सुंदर व्यवस्था अन्यत्र कोठेंही नसेल !"

पण पोलीस दल स्थापन होण्यास मात्र वेळ लागला. शहराच्या रखवालीचें काम स्वयंसेवकी स्वरूपाचें होतें. आळीपाळीनें प्रत्येकानें हें काम स्वत: किंवा आपला बदली देऊन करावयाचें असे. पुढें लोकांवरच हें काम

सोपवलें जाऊं लागलें. हे लोक दारू पिऊन तर्र होत व त्या निशेंत ते जो धांगडधिंगा घालीत तो चोरांच्या उपद्रवापेक्षांही भयंकर वाटं लागला. फ्रँकलिननें हाही प्रश्न क्लवांत काढला. पण त्या काळांत लांचखाऊ-पणा इतका वाढला होता कीं नोकरीपेशाचें पोलीस दळ उभें करण्यास कित्येक वर्षें लागलीं. फ्रँकलिननें आपल्या छापखान्याचा व वर्तमानपत्राचा व्याप इतका वाढवला होता कीं १७४८ च्या सुमाराला त्याच्या कायमच्या उत्पन्नाची त्यांतून सोय झाली. आपलें काम पुष्कळसें कमी करून तें आपल्या सहकारी मंडळीवर अधिकाधिक प्रमाणांत तो सोपवीत गेला. त्यामुळें तात्त्विक विचारांत व करमणुकींत वेळ खर्च करण्यास सवड सांपडेल असें आतां त्यास वाटूं लागलें.

तथापि त्याला आयुष्यभर सवड अशी लाभलीच नाहीं. त्यानें डेव्हिड हॉल याजवर छापखान्याच्या कामाची जबाबदारी सोपविली व त्यांतून रिकामा होतांच त्यानें दुसरीं डझनभर कामें आपल्यामागें लावून घेतलीं. पेन्सिल्व्हेनिया येथें घर करून राहिल्यापासून अनेक योजना त्याच्या मनांत घोळत होत्या. त्यांचा विचार तो करूं लागला. त्या सोप्या नव्हत्या. किंबहुना अधिक तापदायकही होत्या. परंतु जेवढा भार घेणें शक्य होतें तेवढा त्यांचा भार त्यानें उचलला.

छापखान्याच्या उद्योगांतून निवृत्त झाल्याबरोबर त्यानें अभ्यासमंडळ स्थापन केलें व त्यांतूनच पुढें पेन्सिल्व्हेनिया विद्यापीठ निर्माण झालें. अमेरिकन तरुणांना काय शिकवावें यासंबंधानें त्याच्या कांहीं निश्चित कल्पना झालेल्या होत्या. त्या सर्वस्वी त्याच्या स्वतःच्या होत्या असें नाहीं. पण जेथून जेथून त्याला जें जें चांगलें उचलतां आलें तें तें त्यानें "गरीब रिचर्ड"च्या म्हणीप्रमाणें उचललें. त्यांतून योजना निर्माण केली व ती कृतींत आणण्याच्या उद्योगास तो लागला. नुसती कल्पना, कल्पना ह्या स्वरूपांत तो राहूं देत नसे. तिला तो प्रत्यक्ष रूप चढवी. कोणतीही कल्पना असो, ती प्रत्यक्षांत येऊं शकत नसेल तर त्यांत अर्थ नाहीं असें त्याचें मत होतें.

त्या काळीं शिक्षण म्हणजे ग्रीक आणि लॅटिन भाषा व साहित्य ह्यांचेंच शिक्षण प्रामुख्यानें समजलें जात असे. मुलाला लॅटिन व ग्रीक भाषेचें ज्ञान आल्याशिवाय त्याला सुशिक्षित समजलें जात नसे. त्याला

आपले विचार आपल्या मातृभाषेंतून व्यक्त करतां येतात कीं नाहीं किंवा मातृभाषेंतील वाङ्मय त्यानें किती आत्मसात् केलें आहे याचा त्या वेळीं विचारच नसे. किंबहुना इंग्लंड अमेरिकेंतील कित्येक विद्यालयांतील शिक्षणाचें माध्यम लॅटिन होतें.

फ्रँकलिनला हें सर्व नापसंत असे. विद्यमान जगांतील सर्व व्यवहार इंग्रजींतून करावा लागत असतांना ती टाकून जुन्या मृत भाषांवर इतका भर देणें हें नवीन जगांत व नवीन काळाशीं सर्वस्वी विसंगत आहे असें त्याचें मत होतें. चर्चसारख्या ठिकाणीं काम करणाऱ्या लोकांना या जुन्या भाषांचें ज्ञान आवश्यक असावें हें ठीक आहे. पण इतर लोकांनीं केवळ पढीक शास्त्री पंडित बनावें असें त्याला वाटत नव्हतें. लोकांना इतर उद्योग आले पाहिजेत, व्यापार, उद्योगधंदे, कलाकुसरीचे व्यवसाय, शास्त्रज्ञान हें लोकांना शिकविलें पाहिजे असा त्याचा आग्रह होता. शिकणें म्हणजे पाद्री बनणें हें समीकरण तोडलें पाहिजे असें त्याचें म्हणणें होतें. जेथें धार्मिक शिक्षण दिलें जाणार नाहीं असें एकादें विद्यालय असावें असें त्यास वाटे. अशा ठिकाणीं कोणतेंही धर्मशिक्षण नसावें, व सर्व मतपंथांच्या लोकांना वाव असावा असें त्यांचें मत होतें. १७४९ च्या काळांत सहिष्णु व उदार वृत्तीच्या म्हणून प्रसिद्ध असलेल्या पेन्सिल्व्हेनियामध्येंही हा विचार नवा होता. वरिष्ठ शिक्षणाची प्रत्येक शाळा या ना त्या चर्चच्या नियंत्रणाखालीं होती.

हे विचार त्याच्या मनांत दृढ झाले तेव्हां त्यानें "पेन्सिल्व्हेनियांतील तरुण मुलांच्या शिक्षणासंबंधाची योजना" या विषयासंबंधानें एक पत्रक लिहून काढलें व तें प्रसिद्ध केलें. त्याच्या व्यवहारप्रधान दृष्टिकोणाचा हा एक उत्कृष्ट नमुना होता, व त्याच्या विचारांचा सुगंध त्याच्या भाषेलाही लागला होता. तो म्हणतो :

> या विद्यार्थ्यांसाठीं नदीच्या जवळपास एक घर असावें. तेथें एक छोटीशी फुलबाग, फळबाग, कुरण व शेत असावें. मुलांचें जेवण एकत्र असावें. तें साधें, पथ्यकर व काटकसरीचें असावें. त्यांची प्रकृति सुदृढ व निकोप बनावी यासाठीं पळणें, उड्या मारणें, पोहणें व कुस्ती करणें यांचें त्यांस शिक्षण द्यावें.

निदान अमेरिकेंत तरी त्या काळांत व्यायाम-शिक्षण हा एकंदर कॉलेज-

ठा.. स्थळप्रत.
२९०६६ दि.
८५५ नों. दि. 30.11.56

शक्षणाचा भाग असावा ही कल्पनाच नवी होती. तळ टीपेंत तो म्हणतो कीं: पोहण्यांत एक प्रकारचें कौशल्य तर आहेच, परंतु प्रसंगीं जीव बचावण्यासही ती विद्या उपयोगी पडेल. आणि शिवाय उन्हाळ्यांत थंड पाण्याचें स्नान करण्यानें शरीराला फार फायदा होतो. त्यासाठीं वेगळ्या विवेचनाची गरज नाहीं.

> ज्या काळांत खिडक्या घट्ट बंद करून व दारें लावून लोक घरांत बसत असत, त्या काळांत थंड वाऱ्यांत उघडें बसणें प्रकृतीला हितावह असतें असें फ्रँकलिन प्रतिपादन करीत असे. तेव्हां वरच्यासारखी एकादी योजना त्यानें आखावी यांत नवल नाहीं. जॉन ॲडॅम्स यांना त्यानें एकदां सांगितलें कीं, रात्रीं निजण्याच्या खोलींत थंडगार वारा खेळूं दिला म्हणजे पडसें जातें.

शारीरिक शिक्षणासंबंधानें वरील विचार व्यक्त केल्यानंतर अभ्यास विषयासंबंधानें तो म्हणतो : " जें जें उपयुक्त असेल तें तें सर्व त्यांना शिकवावें, तसेंच जें संस्कारकारी असेल तेंही शिकवावें. पण विद्या म्हटली तर पुष्कळ व वेळ थोडा अशी परिस्थिति असल्यानें, पुढें कोण मुलें कोणकोणत्या व्यवसायांत शिरणार आहेत हें लक्षांत घेऊन त्यांना व्यवहारदृष्ट्या व संस्कारदृष्ट्या अत्यंत आवश्यक अशाच विषयांचें शिक्षण द्यावें. तिथें जे शिकतील त्यांना त्याचा आपआपल्या व्यवसायांत उपयोग झाला पाहिजे.

तो म्हणतो कीं, "त्यांना इंग्रजींत चांगलें, शुद्ध व संथपणें बोलतां आलें पाहिजे. अक्षर चांगलें पाहिजे. पत्रें, निबंध, संवाद, युक्तिवाद हें नेहमीं लिहून काढण्याची संवय पाहिजे. म्हणजे आपलें म्हणणें त्यांना स्पष्टपणें मांडतां येईल. नंतर इतिहास, गणित व शास्त्रें ज्यांना फ्रँकलिन तत्त्वज्ञान म्हणतो यांचें शिक्षणही त्यांना हवें." आज या गोष्टी आपणांला परिचित आहेत. परंतु १७४९ मध्यें त्या सर्वस्वी नवीन होत्या. तो म्हणतो : "व्यापार-कलांचा उगम, उद्योगधंद्यांचा विकास, उदीम, व्यापार केंद्रांचें स्थलांतर, इत्यादिकांचीं कारणें व सर्वांचा इतिहास विद्यार्थ्यांना मनोरंजक वाटेल व उपयुक्त ठरेल अशा रीतीनें शिकवावा. ह्या सर्वांमध्यें तो आपल्या काळाच्या एक शतक पुढें होता.

जुंटो क्लबांत या पत्रकांतील विचारांचें उत्साहानें स्वागत झालें व हें विद्यालय काढावें असें ठरलें. पैशाचा प्रश्न होता पण त्यासाठीं फ्रँकलिनला फार काळ वाट पाहावी लागली नाहीं. पैसा उभा करण्यांत तो तरबेज होता. सुरवातीपुरता पैसा उभा करण्यांत आला. एक जागा भाड्यानें घेतली व शिक्षक नेमण्यांत आले. थोड्याच काळांत विद्यालयांतील शिक्षक इतके लोकप्रिय झाले कीं, त्याची प्रगति अखंडित होत राहिली. फिलाडेल्फियांतील सर्वांत मोठी इमारत या शाळेनें घेतली, आपल्या प्रांतांतील सांस्कृतिक क्षेत्रांत या विद्यालयानें एक अगदीं नवा दृष्टिकोन आणलेला पाहण्याचें भाग्य त्याला लाभलें.

पेन्सिल्व्हेनिया विद्यापीठाचा इतिहासलेखक हॅरिस लिपिनकॉट यानें म्हटलें आहे कीं, अमेरिकन शिक्षणपद्धतींतील नवे विचार हे इतर ठिकाणांपेक्षां येथें शंभर वर्षें आधीं प्रगत झाले होते.

या काळांतील सर्वांत मोठी व दीर्घजीवी योजना म्हणजे ह्या विद्यालयाची होय. ती कार्यान्वित होत असतांनाच फ्रँकलिनचें लक्ष फ्रेंच व इंडियन लोकांनीं सीमेवर आक्रमण सुरू केलें होतें तिकडे खेचलें गेलें व कांहीं काळ हा चतुर माणूस जवळजवळ सैनिक बनला.

फ्रँकलिन लहान असतांना बॉस्टनमध्यें लढाईच्या गोष्टी लोकांच्या तोंडीं नेहमीं असत. क्रूर कत्तली, जाळपोळ, रक्तपात, रात्रीचे खुनी हल्ले, लोक पळवून नेणें इत्यादि प्रकार सतत चालत. वसाहतींच्या उत्तरेकडील प्रदेशांत न्यूफौंडलंड, केप ब्रेटन बेट, व सेंट लॉरेन्सपर्यंत या प्रदेशाच्या मालकीबद्दल ब्रिटिश व फ्रेंच यांच्यांत सतत झगडे चालत व त्यासाठीं दोन्ही राष्ट्रांत वारंवार लढाया होत. जवळच्या प्रदेशांत फ्रेंचांनीं इंडियन टोळीवाल्यांना आपल्यांत समाविष्ट करून — कारण त्यांचाही इंग्रजांविरुद्ध राग होताच— न्यू यॉर्क, मॅसॅचूझेट्स् यांच्या हद्दीपर्यंत हल्ले सुरू केले होते. त्यांचा प्रतिकार करण्याकरतां बॉस्टनमध्यें एक पथक उभारण्यात आलें होतें. या झगड्यांत कधीं जय, कधीं पराजय चालू असे. शेवटीं तह होई; पण तो कधींच फार काळ टिकत नसे.

पुढें फ्रँकलिन फिलाडेल्फियाला आला. तेथें शत्रूच्या हल्ल्याची तशी भीति नव्हती. तरुणपणीं युद्धाच्या वार्ता त्याच्या कानीं येत. क्वेकर लोकांना

युद्धाचा तिटकारा असे. न्यू इंग्लंड येथून फार दूर होतें. व जेथें नाविक युद्ध चाले तो प्रदेश तर आणखी दूर होता. सीमेवरील वातम्या फिलाडेल्फियाला येत; पण सीमेवर नेहमींच असुरक्षित वातावरण असे. कोणत्या वेळीं टोळीवाले धाड घालतील याचा नेम नसे. शांततेच्या काळांत भरभराट वाढल्यामुळें युद्धाविषयीं तिरस्कार वाढत गेला. त्यामुळें जेव्हां न्यू इंग्लंड किंवा ब्रिटन येथून शत्रूविरुद्ध उठावणी करण्याकरतां मदतीसाठीं मागणी येई तेव्हां पेन्सिल्व्हेनिया तिकडे दुर्लक्ष करी.

पण १७४० मध्यें फ्रँकलिनला न्यू इंग्लंडमधील पूर्वीच्या परिस्थितीची जाणीव झाली. या वेळीं फ्रान्स व इंग्लंड यांच्यांत युद्ध चालू होतें. ऑस्ट्रियन राज्याच्या वारसाबद्दल युरोपांत सुरू झालेल्या युद्धाचा हा एक भाग होता. फिलाडेल्फियांतील लोक स्वस्थ होते. अशा स्थितींत फ्रेंचांनीं दक्षिणेकडे कूच करून ओहायो नदी गांठली व त्यांनीं लगतच्या टोळीवाल्यांबरोबरही संधान बांधलें. फ्रेंच व रानटी टोळ्या यांची युति होऊन ते अगदीं जवळ येऊन ठेपले हें पाहतांच आतां स्वस्थ बसणें धोक्याचें ठरेल हें फ्रँकलिननें ओळखलें. १७४५ मध्यें फ्रेंचांनीं मिसिसिपीच्या कांठीं तळ दिला व पेन्सिल्व्हेनियाचा गव्हर्नर टॉमस यानें लोकसभेला—फ्रँकलिन तिचा क्लार्क होता– या आक्रमणाची वार्ता कळविली व फ्रेंचांनीं उठविलेल्या टोळ्यांची धाड पेन्सिल्व्हेनियाच्या पश्चिम भागावर केव्हां पडेल याचा नेम नाहीं असेंही कळविलें. न्यू यॉर्क व न्यू इंग्लंडच्या सीमेवर व समुद्रावरही उभय पक्षांत रणकंदन सुरू असल्याच्या वार्ता येत होत्या.

या सर्व गोष्टी पाहून सद्य:परिस्थितींत आपला प्रदेश असुरक्षित आहे हें फ्रँकलिनच्या तेव्हांच लक्षांत आलें. शत्रूचें बळ दिवसें दिवस वाढत चाललें आहे व त्यांच्या हल्ल्याला प्रतिकार करण्याचें आपल्याला मुळींच सामर्थ्य नाहीं हेंही त्यानें ओळखलें. त्याचीं कारणेंही त्याला माहीत होतीं. क्वेकर लोकांच्या विचारांची ठेवणच युद्धविरोधी होती. फिलाडेल्फियांतील श्रीमंत व्यापारी प्रतिकाराची तयारी करण्यास लागणारा पैसा देण्यास तयार होईनात. आमच्या बरोबरीनें क्वेकर लोक मदत देतील तरच आम्ही मदत देऊं असें ते म्हणूं लागले. शिवाय समुद्रमार्गें शत्रू आला तर त्याला वाटेंत पुष्कळ अडचणी आहेत व तिकडून आक्रमण होण्याची शक्यता फार कमी

अशीही त्यांची समजूत होती. शिवाय पूर्व-पश्चिम वाद होताच. धोक्याची भीति पश्चिम सरहद्दीला आहे. तेव्हां पश्चिम सीमेवरील लोकांनीं आपलें संरक्षण परस्पर करावें असें पूर्वेकडील लोक म्हणत तर धोका समुद्राच्या बाजूनें आहे व म्हणून फिलाडेल्फियानें आधींच आघाडी मारून शत्रूला नामोहरम करावें असें पश्चिमेकडील लोकांचें म्हणणें होतें. या सर्व परस्परांच्या वादांना कंटाळून फ्रँकलिननें एक पत्रक लिहून काढलें.

त्या पत्रकाचें नांव 'सत्यस्थिति' असें असून तें त्यानें मोठ्या आवेशपूर्ण व वक्तृत्वपूर्ण पद्धतीनें लिहिलें आहे. प्रचारतंत्राची त्याला जी उपजत देणगी होती, तिचा उपयोग करून त्यानें बायबलमधील एक कथा दृष्टान्तादाखल घेतली. लेश शहरांतले लोक बेसावध राहिल्यामुळें डॉनच्या लोकांनीं तें कसें बेचिराख केलें यासंबंधींच्या बायबलमधील कथेचा उपयोग करून फिलाडेल्फियाला व एकंदर प्रांतालाच केवढा धोका निर्माण झाला आहे तें त्यानें दाखवून दिलें. बेसावध, बेशिस्त व बेहत्यार अशा लेशमधल्या साठ हजार लोकांना सशस्त्र व सुसंघटित असे अवघे सहाशें लोक भारी ठरले, व त्यांनीं संगिनीच्या टोकानें लोकांना ठार मारून सबंध शहर बेचिराख करून टाकलें. त्यांना कोणी त्राता राहिला नाहीं. कारण त्यांचें रक्षण करणारे दूर होते. तरी पण अमेरिकेहून इंग्लंड जितकें दूर आहे तितकें तें दूर नव्हतें. पण ते कांहीं करूं शकले नाहींत. रक्षण करण्याची जबाबदारी ज्या इंग्लंडवर, तें शेकडोंशें मैल दूर आहे. आणि तरीही फिलाडेल्फियाचे लोक या सर्व परिस्थितीकडे कसे दुर्लक्ष करीत होते तें त्यानें दाखवून दिलें.

सगळीकडे शत्रूचे गुप्तहेर पसरले आहेत असें सांगून श्रीमंत व्यापाऱ्यांना उद्देशून तो म्हणतो : तुमचें असें म्हणणें आहे काय कीं, क्वेकर लोकांचा व्यापार चालावा म्हणून आम्ही आपला पैसा खर्च करावा ? त्यांच्या संरक्षणाकरतां आम्हीं कां धडपडावें ? आम्हीं कांहीं करणार नाहीं. तिकडे व्यापार तरो नाहीं तर बुडो व शहर जळो, आम्हांस त्याची पर्वा नाहीं."

अशा लोकांना त्यानें, बुडत्या जहाजावरील आपला एक वैरी जगेल म्हणून पाणी उपसून काढण्याला मदत करण्याचे नाकारणाऱ्या माणसांची उपमा दिली व तेही बुडतील व तुम्हीही तरणार नाहीं असें बजावलें.

'सत्यस्थिति' या पत्रकांत फ्रँकलिनची लोकशाही मन:प्रवृत्ति अतिशय उत्कटतेनें दिसून येते. पैसा व सत्ता पाठीशीं असणारे लोक आपत्ति येतांच पळून जातात आणि आपणा सामान्य माणसांना—शेतकरी, दुकानदार, व्यापारी इत्यादि लोकांना–मात्र हाल सोसावे लागतात, याबद्दल श्रीमंतांची त्यानें खरडपट्टी काढली आहे. या सर्वसामान्य मध्यमवर्गीय जनतेशीं मुद्रित शब्दाच्या द्वारें फ्रँकलिननें आपला संबंध जोडला होता. या 'सत्यस्थिति' पत्रकाचा परिणाम त्यामुळें चांगला घडून आला. त्याचें वर्तमानपत्र, त्याचें 'गरीब रिचर्ड' चें पंचांग, त्याचें लेखन यांनीं जनतेच्या मनाची किती पकड घेतली होती, हें यावरून दिसून आलें.

त्याच्यापूर्वी मध्यमवर्गीय लोकांचें छापील चालू वाङमयाकडे लक्ष नव्हतें. पण आतां छापून आलेल्या मजकुराकडे त्यांचें लक्ष खेचलें जाऊन ते तें प्रमाण मानूं लागले होते. लोकशाही विचारसरणीचा प्रसार करण्याचें एक प्रभावी साधन म्हणून फ्रँकलिननें मुद्रणाचा यशस्वी रीतीनें उपयोग केला. व त्याचाच पुढें अधिक उपयोग करून टॉम पेन यानें अमेरिकन लोकांचीं मनें क्रान्ति करण्यास उदचुक्त केलीं.

'सत्यस्थिति' या पत्रकांत फ्रँकलिननें योजिलेली भाषा उत्कृष्ट असून त्यानें केलेला युक्तिवाद एकाद्या वकिलाला शोभेसा आहे. तो म्हणतो :

> आमच्या पुढाऱ्यांतील आपापसांतील भांडणें, त्यांच्यांतील धर्मविषयक चुकीच्या समजुती, सत्तेची हाव, विलक्षण अहंकार, मत्सर व दीर्घद्वेष यांमुळें आम्हां सामान्य लोकांचें जीवित, आमचीं कुटुंबें व आमची मालमत्ता यांना सततचा धोका निर्माण झाला आहे. आणि त्यामुळें साहसी प्रवृत्तीच्या, क्रूर स्वभावाच्या, आमचीं बिंगें माहीत असलेल्या व आतांपर्यंत मिळालेल्या यशानें फुगून गेलेल्या शत्रूंचें चांगलेंच फावलें आहे. आमच्यांतील श्रेष्ठ पुढाऱ्यांनीं देशाचा नाश घडवून आणण्याची जणूं प्रतिज्ञाच केलेली दिसते. आमचा अत्यंत कट्टर शत्रू जो फ्रान्स, त्याला ते जणूं आमच्या नाशासाठीं आमंत्रणच देत आहेत ! अशा परिस्थितींत आम्ही कोणाला शरण जावें ! कोणाकडे मदत मागावी !

फ्रँकलिनच्या या पत्रकाचा तत्काळ परिणाम झाला. "फिलाडेल्फियांतील एक व्यापारी" अशी त्यावर सही होती. पण इतर धनिक व सुखवस्तु लोकही पुढें आले. पण बहुधा संतापानें लाल होऊन ! अखेर एक सैनिक दल निर्माण करण्यासाठीं मोठी स्वयंसेवक संघटना त्यांतून उभी झाली. शस्त्रें, दारूगोळा, तोफा व इतर साहित्य विकत घेण्याकरतां पैसा उभा करण्यांत आला. एक कंपनी काढण्यांत आली. अधिकाऱ्यांच्या नेमणुका झाल्या. बायकांनीं ध्वज शिवून दिले. त्यावर फ्रँकलिननें सुचविलेलीं चिन्हें भरलीं होतीं. १७४८ सालीं तह झाला, तोंपर्यंत या स्वयंसेवक दलांतील सैनिकांची संख्या दहा हजारांवर गेली होती. कित्येक क्वेकर लोकांनाही संरक्षणासाठीं प्रतिकार केला पाहिजे, त्यांत कांहीं अनैतिक नाहीं हें तत्त्व मान्य झालें व आपल्याला कोणी वाळीत टाकलें तरी हरकत नाहीं, पण फ्रँकलिनच्या या कार्याला विरोध करायचा नाहीं असें त्यांनीं ठरविलें.

ही सर्व संघटना उभी करण्यांत फ्रँकलिनचाच विशेष पुढाकार होता. त्यानें तोफखान्यासाठीं पैसे जमविले व एक किल्ला बांधण्यासाठीं एक लॉटरी काढली. तो स्वतः न्यू यॉर्कला गेला व तेथील गव्हर्नर क्लिंटन याला भेटून त्याजजवळ त्यानें कांहीं तोफा उसऱ्या मागितल्या. आरंभाला गव्हर्नरनें साफ नकार दिला. पण आपल्या कौन्सिलच्या सभासदांबरोबर जेवण चाललें असतांना दारू पिऊन खुशींत आल्यावर त्यानें सहा तोफा देण्याचें मान्य केलें. पुढें दारूचे आणखी कांहीं पेले झोकल्यावर त्यानें दहा तोफा देण्याची तयारी दर्शविली आणि शेवटीं प्रसन्न होऊन त्यानें गाड्यासुद्धां अठरा तोफा दिल्या. त्या उत्कृष्ट १८ पौन्डी तोफा होत्या.

फ्रँकलिनच्या या कामगिरीबद्दल फिलाडेल्फियाच्या पलटणीनें त्याला कर्नल हें पद देऊं केलें, पण त्यानें तें विनयपूर्वक नाकारलें व आपल्यापेक्षां अधिक लायक असलेल्या दुसऱ्या इसमास तो अधिकार द्यावा अशी त्यानें शिफारस केली. तथापि दुसऱ्या एका लढाईंत लष्करी अधिकारी म्हणून प्रत्यक्ष रणांगणावर काम करण्याचें त्याच्या नशिबीं होतें. व त्याला जरी तशी प्रत्यक्ष पदवी नव्हती, तरी त्याला "सेनापति" असें अभिधान लाभलें होतें.

१७४८ च्या ऑक्टोबरमध्यें इंग्लंड व फ्रान्स यांच्यांत एक्स ला शापेल येथें तह झाला. तथापि तो फार काळ टिकण्यासारखा नव्हता. विशेषतः

वसाहतींच्या बाबतींत घालण्यांत आलेल्या तहाच्या अटी अत्यंत असमाधानकारक होत्या. वसाहतींनीं लुइसबुर्ग जिंकून घेतलें होतें. तें फ्रेंचांना परत करण्याची त्यांत अट होती, ती त्यांना मुळींच पसंत नव्हती. शिवाय पुन्हा इंडियन लोक स्वारी करणार नाहींत व फ्रेंच त्यांना उत्तेजन देणार नाहींत अशी त्यांत हमी नव्हती. त्यामुळें जरी इंग्लंड व फ्रान्स यांच्यांत तह झाला तरी वसाहतींतील हल्ले थांबले नव्हते. ओहायो खोऱ्यांतील प्रदेशाच्या मालकीबद्दल तंटा उपस्थित झाला व १७५० च्या सुरवातीलाच लढचाला तोंड लागलें. त्यांपैकीं कांहीं लढायांत जॉर्ज वॉशिंग्टननें भाग घेतला व हा लढा पसरत पसरत १७५४ च्या सुमारास पेन्सिल्व्हेनियाच्या पश्चिम टोकापर्यंत जाऊन पोचला. तेव्हां फ्रँकलिननें पुन्हा वसाहतींच्या सामुदायिक संरक्षणासाठीं संघटित प्रयत्न करण्यास हांक दिली.

त्यानें संयुक्त संस्थानांच्या संघटित संरक्षणावर भर दिला. संयुक्त संस्थानें ही कल्पना त्यानें प्रथम काढली. हा शब्दप्रयोग त्यानें प्रथम केला असें बॅलझॅक यानें म्हटलें आहे. बॅलझॅकनें केलेली ही काव्यात्म अतिशयोक्ति आहे. पण जोंपर्यंत फ्रँकलिनची स्मृति जिवंत आहे, तोंपर्यंत ती त्याला चिकटलेली राहील. खरें असें आहे कीं, अमेरिकेंतील हीं संयुक्त संस्थानें हॉब्ज, लॉक, मॉंटेस्क्यू, जेफरसन इत्यादि राजकीय तत्त्वज्ञान्यांच्या विचारपरंपरेंतून निर्माण झालीं. तथापि १७५४ मध्यें फ्रँकलिननें खऱ्याखुऱ्या ऐक्याची योजना आखली व प्रातिनिधिक स्वरूपाच्या राज्यसत्तेचें तिला रूप दिलें हें कांहीं खोटें नाहीं. आपल्या या एकीकरणाच्या योजनेंतून संयुक्त संस्थानें निर्माण झाली असा दावा फ्रँकलिननें कधींच केला नाहीं. उलट पुढें पसतीस वर्षांनीं लिहितांना तो म्हणतो, "जर माझी योजना १७५४ मध्यें स्वीकारण्यांत आली असती तर राज्यक्रांति व स्वातंत्र्य एक शतकानें पुढें ढकललें गेलें असतें." महत्त्वाचा मुद्दा एवढाच कीं, सर्वांच्या सामुदायिक संरक्षणासाठीं, परस्परांबद्दल अविश्वास, मत्सर व शत्रुत्वही बाळगणाऱ्या निरनिराळ्या वसाहतींना त्यानें एका योजनेखालीं आणलें व त्यामुळें पुढें जेव्हां ब्रिटिश सत्तेविरुद्ध झगडा करण्याचा प्रसंग निर्माण झाला, तेव्हां फ्रँकलिनच्या या योजनेमुळें सर्व वसाहती एकसूत्र करण्याचें काम सुलभ झालें.

या योजनेचें निमित्त कारण असें घडलें कीं, ब्रिटिश व्यापार खात्यानें ॲल्बनी येथें एक परिषद बोलावली व फ्रेंच व त्यांचे दोस्त असलेल्या रानटी जमाती यांविरुद्ध झगडा करण्यासाठीं इंडियन टोळीवाल्यांचा कितपत उपयोग करतां येईल हें पाहण्याचा प्रयत्न केला. त्या निमित्तानें फ्रँकलिननें आपली योजना मांडली. इरॉकॉई टोळ्यांचा कांहीं काळ फ्रेंचांविरुद्ध इंग्रजांना मदत करण्याकडे कल झुकला होता. याचें कारण, फ्रेंचांशीं दोस्ती करणाऱ्या टोळ्यांशीं त्यांचें वाकडें आलें होतें. त्यांची ब्रिटिशांबरोबर झालेली मैत्री फारशी मनापासूनची नव्हती. कारण ब्रिटिशांच्या हातून त्यांचें फार नुकसान झालें होतें. पण आपण त्या लोकांना भरपूर दारू पुरविली तर त्यांची प्रत्यक्ष मदत न मिळाली तरी त्यांना तटस्थ ठेवतां येईल असें इंग्रजांना वाटत होतें.

या सात प्रांतांच्या परिषदेंत फ्रँकलिननें संघटनेची योजना मांडली व ती सभासदांना इतकी आकर्षक वाटली कीं इंडियन लोकांशीं बोलणीं करण्याकरतां जरी ते जमले होते तरी या योजनेच्या विचारानेंच त्यांना अधिक आकृष्ट केलें. समान शत्रूविरुद्ध संरक्षणासाठीं योजावयाचे इतके अनेक उपाय त्या योजनेंत नमूद केलेले होते कीं, तिचें सर्वांनीं मोठ्या उत्साहानें स्वागत केलें. खरें खुरें संघस्वरूप त्यांत दिसून येत होतें. प्रत्येक प्रांतानें आपली अंतर्गत स्वायत्तता राखावयाची, सार्वभौमत्व राखावयाचें व आपआपले कायदे व घटनाही स्वतंत्र राखावयाची. पण संघराज्याच्या कारभारासाठीं लागणारा पैसा व प्रतिनिधि मात्र सर्वांनीं द्यावयाचे. या संघराज्यानें शत्रूशीं मुकाबला करावयाचा व परदेशी सरकारांशीं संबंध ठेवावयाचा अशी ही योजना होती. राजानें या संघराज्याचा अध्यक्ष नेमावा, व प्रातिनिधिक कायदेमंडळानें सर्वांच्या संरक्षणासाठीं कायदे करावेत. पुढें जी प्रजासत्ताक राज्याची घटना तयार झाली तिच्याशीं या योजनेचें पुष्कळ सादृश्य आहे. मात्र सर्व प्रांतांतून ही योजना अमलांत यावयाची तर त्यासाठीं पार्लमेंटचा कायदा होणें अवश्य आहे हें परिषदेनें मान्य केलें.

ॲल्बनी येथें भरलेल्या परिषदेनें जरी ही योजना मान्य केली तरी ती अमलांत यावयाची तर तिला वसाहतींच्या विधिमंडळांची आधीं मान्यता

मिळणें जरूर होतें, व व्यापार खात्यानें राजाकडे तिची शिफारस करणें अवश्य होतें, पण या दोन्ही गोष्टी घडल्या नाहींत. वसाहतींच्या विधि-मंडळांनीं या योजनेचा स्वीकार केला नाहीं. कारण यांत राजाच्या सत्तेचें अधिक नियंत्रण आपण आपल्यावर ओढवून घेतों असें त्यांना वाटलें. तर उलट विलायतेंत ती लोकशाहीकडे अधिक वळलेली आहे म्हणून नापसंत ठरविण्यांत आली. दुसरा जॉर्ज, त्याचे मंत्री व एकंदर पार्लमेंट यांचा दृष्टिकोन लक्षांत घेतां त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें नाहीं. परंतु वसाहतींनींही ती योजना स्वीकारली नाहीं. त्यावरून अमेरिकेंत एकात्मतेची भावना रुजण्यास अद्याप अवकाश आहे हें स्पष्टपणें दिसून आलें. तसेंच परस्परद्वेष व मत्सर ह्यांच्या रूपानें १७५४ सालीं संघटनेच्या मार्गांत जो अडथळा उभा होता तो दूर होण्यासाठीं फ्रेंच व इंडियन लोकांच्या हल्ल्यांपेक्षांही अधिक भयानक अशा संकटाची आवश्यकता होती हेंही दिसून आलें. ओहायो खोऱ्यांतील आपत्ति एव्हांना अतिशय तीव्र झाली होती. व्हर्जिनिया आणि मेरीलँड येथील धाडसी लोकांनीं बांधलेला किल्ला फ्रेंचांनीं जिंकून घेतला व त्याची डागडुजी करून त्याला दुकीन असें नवें नांव दिलें. नेसेसिटी किल्ला सोडून देणें वॉशिंग्टनला भाग पडलें. शेवटीं व्हर्जिनियाच्या गव्हर्नरनें मदत पाठविण्याबद्दल इंग्लंडला विनंती केली. १७५५ मध्यें इंग्लंडहून मदत आली; पण तिचा पुढें पार धुव्वा उडाला.

जनरल एडवर्ड ब्रॅडॉक हा आपल्या दोन पलटणीनिशीं एप्रिलमध्यें व्हर्जि-नियाला येऊन पोहोंचला. व लौकरच त्यानें फ्रँकलिनची गांठ घेतली. एड-वर्ड ब्रॅडॉक हा शूर अधिकारी होता. परंतु त्याला जंगली लढाईची कांहीं माहिती नव्हती. तो स्वतःच्याच कर्तबगारीच्या घमेंडींत असे. त्याच्याशीं झालेलें एक संभाषण फ्रँकलिननें लिहून ठेवलें आहे. त्यावरून या लढाईच्या बाबतींत त्याच्या मनाची अवस्था किती भयावह होती हें दिसून येतें.

फोर्ट दुकीन काबीज करून नायगाराला जावें व तो घेऊन शक्य झालें तर तसेंच पुढें फ्रॉंटेनॅकही घ्यावें असें सेनापतीचें धोरण होतें. दुकीन किल्ला घेण्यास आपणांस फार तर तीन चार दिवस लागतील असा त्याचा अंदाज होता. व एकदां तो किल्ला हातीं पडला म्हणजे नायगाराचा रस्ता मोकळाच झाला असें त्याला वाटत होतें.

अशा रीतीनें कूच करण्यांत गोऱ्या सैनिकांवर केवढी आपत्ति कोसळण्याचा संभव आहे याची फ्रँकलिनला चांगली कल्पना होती. त्यानें ती सेनापतीजवळ सांगितली. पण फ्रँकलिननें दाखविलेल्या धोक्यांना त्यानें महत्त्व दिलें नाहीं.

फ्रँकलिन म्हणाला, " तुम्ही इतकें सैन्य घेऊन दुकीनपर्यंत जाऊन पोंचला तर तो किल्ला फारसा प्रयास न करतां हातीं पडेल हें खरें आहे; पण वाटेंत जंगलांतून जातांना दबा धरून बसलेल्या इंडियन लोकांच्या टोळ्या हल्ले करतील. सरावानें व अनुभवानें असे गनिमी हल्ले करण्यांत ते लोक फार पटाईत झालेले आहेत. ते तुमचें सैन्य कापून काढण्याचा फार संभव आहे. हा जंगलांतला आडवळणाचा पायरस्ता चार मैल लांब असून हे जंगली लोक तुमच्या रांगेवर मधून मधून हल्ले करून सैन्याची पांगापांग करूं शकतील व त्यामुळें सैन्याच्या सामर्थ्याला मोठा धोका निर्माण होण्याची भीति आहे. "

ब्रिटिश सेनापतीला फ्रँकलिन हा घरीं बसून लष्करी डावपेचांचा कागदावर आराखडा काढणारा वाटला. म्हणून तुच्छतापूर्वक हसून तो म्हणाला, " हे क्रूर जंगली लोक तुमच्या नवशिक्या अमेरिकन सैनिकांना मोठे भयंकर वाटणें शक्य आहे. परंतु राजाचें जें कवायती सैन्य आहे त्याच्यापुढें त्यांची कांहीं मात्रा चालावयाची नाहीं."

ब्रॅडॉकचें सैन्य जरी कसलेलें व कवायती होतें, तरी दुर्दैवानें त्याला फक्त खुल्या मैदानांतील शिस्तशीर लढाईचा सराव होता. त्याला या जंगलांतील अवघड प्रदेशांतील गनिमी हल्ल्यांना कसें तोंड द्यावयाचें याची कांहींच कल्पना नव्हती. आणि या भागांतल्या इंडियन टोळ्यांना तो हातचा मळ होता. शिवाय या भागांतून जातांना वसाहतवाल्यांचीं जेथें गांवें होतीं, तेथील लोक अतिशय गरीब असल्यानें वाटेंत रसद मिळण्याची शक्यता नव्हती. शिवाय या खेडवळ लोकांसमोर ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या ऐटीचें तो जें प्रदर्शन करी त्यामुळेंही सामान्य लोकांत या सैन्याबद्दल आपलेपणा व उत्साह निर्माण झाला नाहीं.

तो जेव्हां फ्रेडरिकटाऊनला जाऊन पोचला तेव्हां त्यानें जवळपासच्या शेतकऱ्यांजवळ आपल्या सामानाच्या वाहतुकीसाठीं दीडशें गाड्यांची

मागणी केली. पण त्याला जेमतेम पंचवीस गाड्या मिळाल्या. पण या वेळीं त्याजबरोबर फ्रँकलिन होता. त्यानें सेनापतीची समजूत काढली व त्याला हव्यात तेवढ्या गाड्या पेन्सिल्व्हेनियांतून देतों असें सांगितलें. या वेळीं त्यानें आपल्या आयुष्यांतली एक फार मोठी कामगिरी केली. तो लँकॅस्टर ( पेन्सिल्व्हेनिया ) येथें गेला व एक जाहिरात देऊन त्यानें एक गाडी व चार घोडे अशा १५० गाड्यांची मागणी केली. त्यासाठीं त्यानें कांहीं रक्कमही देऊं केली. दोन आठवड्यांत त्या सर्व गाड्या तो हजर करूं शकला. या कामासाठीं सेनापति ब्रॅडॉक यानें त्याजजवळ दिलेले पैसे अपुरे पडल्यानें त्यानें पदरची भर घालून बयाणाची रक्कम पुरी केली. नंतर त्यानें आपल्या खर्चानें घोड्यावरून हजार पौंड किमतीचें सामानही पाठविलें. त्यांतील कांहीं रक्कम त्याला मिळावयाची अखेर राहूनच गेली.

ही सर्व मदत घेऊन ब्रॅडॉक कूच करीत निघाला; पण या स्वारींत त्याला फार मोठें अपयश आलें. ही हकीकत आतां अमेरिकेंतल्या शाळकरी पोरांनाही ठाऊक आहे. किल्ले दुकीन येथें पोचण्यापूर्वी आठ मैलांवर असतांनाच त्याच्या सैन्यावर हल्ले होऊन त्याचे तुकडे तुकडे झाले. या हल्ल्यांत त्याचे ८९ पैकीं ६३ अधिकारी व निम्मे अधिक सैनिक मारले गेले व बाकीचे भीतीनें मागें परतले. त्यांना कर्नल वॉशिंग्टन देखील आवरूं शकला नाहीं. स्वतः ब्रॅडॉकही जखमी होऊन परतला.

ही मोननगाहेलाची लढाई ९ जुलै १७५५ ला झाली. फ्रेंचांच्या विजयानें इंडियन टोळ्यांना अधिकच चेव आला व त्यांनीं हिवाळ्यापूर्वी जोराचे हल्ले सुरू केले. अशा परिस्थितींत कांहीं तरी केलेंच पाहिजे असें सर्व जाणत्या लोकांना वाटत होतें. परंतु त्या वेळीं जें राजकारण चालू होतें त्यामुळें सरकार निष्क्रिय बनलें होतें. फिलाडेल्फियाचे प्रातिनिधिक विधिमंडळ व वुइल्यम पेन याचे विलायतेंत असणारे मुलगे — ते पेन्सिल्व्हेनिया संस्थानाचे मालक होते — यांच्यांत मोठा वाद चालू होता. सारांश अमेरिकन लोकशाही व वसाहतींवर हुकमत गाजविण्याची ब्रिटिशांची मनोवृत्ति यांच्यांतील हा झगडा होता. पेन्सिल्व्हेनियामधील आपल्या इस्टेटीवर कर बसविण्याचा तेथील लोकसभेला अधिकार नाहीं असें पेनच्या मुलांचें म्हणणें होतें. तर त्यावर कर बसविण्याचा आपला हक्क आहे असें

लोकसभा म्हणत होती. आम्हांला त्यांच्यावर कर बसवूं द्या, नाहीं तर पेनची इस्टेट राजाच्या नियंत्रणाखालीं तरी आणा असें लोकांचें म्हणणें होतें. या सर्व वादावादीमुळें संरक्षणासाठीं पैसा उभा करणें जमेना. आणि पश्चिम भागांतून संरक्षणासाठीं फिलाडेल्फियांत येणाऱ्या लोकांची तर रांग लागली. आपल्या गांवांचे व जमिनींचे शत्रूपासून संरक्षण करा असें ते सांगूं लागले.

फ्रँकलिनला हें वृत्त समजलें तेव्हां त्यानें त्या जर्मन वसाहतवाल्यांची भेट घेऊन त्यांचें सांत्वन केलें. परंतु एवढ्यानें भागण्यासारखें नव्हतें. तांतडीनें हालचाल करण्याची आवश्यकता होती. त्यानें राजकारण बाजूला ठेवून प्रथम एक सैन्य उभारण्याकरतां आणि त्यासाठीं साठ हजार पौंड खर्च करण्याकरतां असेंब्लीकडे मागणी केली, आणि जवळ जवळ सक्तीनें ती मंजूर करून घेतली. ऐन कडक हिवाळ्यांत तो स्वतः सहाशे सैनिकांना बरोबर घेऊन सीमेच्या संरक्षणार्थ निघाला.

या भागांतील वसाहतवाले जर्मनींतून आलेले होते. ते शांतताप्रिय असून स्वतःचें संरक्षण करण्याला असमर्थ होते. लष्करी डावपेचांची त्यांना कांहीं कल्पना नव्हती. परमेश्वर आपलें रक्षण करील या आशेवर ते स्वस्थ राहात. परंतु इंडियन टोळीवाल्यांनीं त्यांच्या बायकामुलांच्या टाळूवरचीं कातडीं सोलून नेलीं, कोठारें जाळून टाकलीं, व सर्वत्र दाणादाण करून सोडली, तरी त्यांचा तो परमेश्वर जागा झाला नाहीं. घोड्यावर स्वार होऊन घोडदळ, पायदळ व एक दोन तोफा बरोबर घेऊन चाललेल्या जनरल फ्रँकलिनला – त्याला ते सेनापति म्हणत – त्यांनीं पाहिलें तेव्हां या भोळसट शेतकऱ्यांना आपल्या संरक्षणासाठीं देवानेंच हा पराक्रमी दूत पाठविला आहे असें वाटलें असेल !

कांहीं मोक्याच्या ठिकाणीं, फ्रँकलिननें नवे मेढेकोट किल्ले बांधण्यास सुरवात केली. त्यासाठीं झाडें पाडून एक एक फूट जाडीचे आणि अठरा फूट लांबीचे सुमारें साडेतेराशें खांब प्रत्येक कोटासाठीं त्यांना घ्यावे लागले. झाडें तोडण्यास लागणारीं हत्यारें व अवजारें लोकांनीं पुरविलीं.

फ्रँकलिन म्हणतो : "आमच्याजवळ फक्त ७० कुऱ्हाडी होत्या; पण आम्ही तांतडीनें झाडें तोडण्यास सुरवात केली. आमचे लोक या कामांत वाकबगार होते. झाडें पटापट तोडलीं जात. किती वेळ लागतो हें एकदां मी पाहिलें.

दोन माणसांनीं सहा मिनिटांत चौदा इंच व्यासाचें झाड तोडून जमिनीवर पाडलें. त्याचे अठरा अठरा फुटांचे तीन खांब झाले. असें खांब सुतारांनीं जोडून गोल उभे केले. त्यांच्या आंतल्या बाजूनें फळ्यांचे उंचवटे उभे केले, व त्यावर उभे राहून, खांबांमधल्या फटींतून शत्रूवर गोळ्या सोडण्याची व्यवस्था केली. आम्ही एका मेढेकोटाच्या आंत उंचवट्यावर एक तोफही उभी केली व लगेच उडविली. हेतु हा कीं जवळपास कोणी इंडियन असले तर आमच्याजवळ हेंही शस्त्र आहे हें त्यांना समजावें. अशा रीतीनें एका आठवड्यांत आमचा किल्ला उभा झाला. पाऊस दिवसाआड पडत होता व पावसांत काम करणें अशक्य होतें तरी एका आठवड्यांत हें काम पुरें झालें.

फ्रँकलिननें ऐन थंडीच्या कडाक्यांत हें काम पार पाडलें. पन्नाशीचें वय, देह स्थूल झालेला, सुखवस्तु जीवनाची संवय लागलेली, असें असतांही त्यानें सतत कष्ट उपसले. त्यानें घरीं जीं पत्रें पाठविलीं, त्यांत तक्रारीचा एक शब्द नाहीं. हिवाळ्याची कडक थंडी, व निजेला धोंडा व भुकेला कोंडा अशी स्थिति असतांही, तें सर्व सोसून त्यानें मोठें लष्करी कौशल्य दाखविलें व स्वतःला लष्करी शिक्षण नसतांही सैन्याचें नेतृत्व केलें. या कामांत त्याच्याकडील मुख्य काम एंजिनिअरचें होतें; परंतु प्रत्यक्ष लढाईच्या कामांत सैन्यांतील लोकांमधील धैर्य टिकवून धरण्यांत व निराश झालेल्या सीमेवरील वसाहतवाल्या लोकांना धीर देण्यांत त्याचें विशेष कौशल्य दिसून आलें.

मे महिन्यांत फ्रँकलिन फिलाडेल्फियाला परतला. तों इंग्लंडनें फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारल्याचें जाहीर झालें. दोन वर्षेपर्यंत अमेरिकेंतील वसाहती सैन्य व ब्रिटिश सैन्य फ्रेंच आक्रमणाला तोंड देत व मार खात होतें. पुढें पिटचें मंत्रिमंडळ आल्यावर परिस्थिति पालटली. व पॅरिसचा तह होऊन सुप्रसिद्ध सप्तवार्षिक युद्ध संपलें आणि मिसिसिपीच्या पूर्वेकडील सर्व प्रदेश व त्यावरील सर्व हक्क फ्रान्सनें सोडून दिले.

या धकाधकीच्या रणांगणांत उतरण्यापूर्वीं फ्रँकलिन दुसऱ्याच एका संशोधनात्मक कार्यांत निमग्न झालेला होता. तो लष्करी शिपाई बनला असतांही त्याचें हें कार्य चालूंच होतें. तो आत्मचरित्रांत लिहितो : "आमची पलटण विजय मिळवून फिलाडेल्फियाला परत आली तेव्हां बरोबरचे सैनिक माझ्या घरापर्यंत आले व तेथें येऊन त्यांनीं बंदुकांच्या फैरी झाडून मला

सलामी दिली. तेव्हां माझ्या विजेच्या प्रयोगशाळेंतील बरेंच काचसामान फुटलें." या विजेच्या संशोधनानें, त्याचें नांव सर्वांच्या तोंडीं झालें. हें अतिशय नाजूक काम शांतपणें, चिकाटीनें व अतिशय मेहनतीनें त्यानें अनेक वर्षें चालविलें होतें.

---

## ११ – शास्त्रीय संशोधन

निसर्गाच्या रहस्यांचा शोध हा फ्रँकलिनचा फुरसतीच्या वेळचा एक मोठा उद्योग असे. याला अठराव्या शतकांत तत्त्वज्ञान असें म्हणत. आजच्यापेक्षां त्या काळांत तत्त्वज्ञानाच्या मूळ कल्पनेशीं शास्त्रकल्पनेचा अधिक मेळ होता. फ्रँकलिनच्या तरुणपणच्या काळांत निसर्गनियमांचें ज्ञान बेताचेंच असे. व तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत त्याप्रमाणें अंदाज पुष्कळ बांधण्यांत येत. या काळांत न्यूटननें पदार्थविज्ञानशास्त्राचा पाया घातला होता, तरीही अंदाजावरच एकंदर भर असे. फ्रँकलिनला देववाद (Deism) बुद्धीला पटणारा वाटे. पण भौतिक क्षेत्रांत मानवाला अज्ञात असणारें जग विशाल आहे व चालू धर्म-मतांनीं त्या जगाची व त्यांतील विविध घटनांची केलेली फोड भोळसट-पणाची व अंधश्रद्धेवर आधारलेली असल्यानें भयंकर आहे असें त्याचें मत होतें. ईश्वरानें निर्माण केलेल्या या जगतांत कांहीं एक योजनाबद्धता आहे, वादळें, उष्णता, ग्रहांच्या गति, चराचर सृष्टीची वाढ, वनस्पति व प्राणी यांचें जीवन या गोष्टी कांहीं ईश्वरी लहरीवर किंवा चमत्कारांवर अवलंबून नाहींत. या गोष्टींचा ठाव घ्यावा, हे निसर्ग नियम शोधून काढावेत, व सामान्य माणसाचें जीवन सुखी करण्यासाठीं त्यांचा उपयोग करावा ही त्याच्या मनाची ओढ होती.

त्या वेळच्या इतर शास्त्रज्ञांत व फ्रँकलिनमध्यें महत्त्वाचा फरक हाच होता. शास्त्रसंशोधनाचा माणसाला उपयोग झाला पाहिजे यावर त्याचा कटाक्ष होता. त्या वेळीं पुष्कळ शास्त्रज्ञ आपले शोध अगदीं एकीकडे राहून करीत आणि व्यवहाराचा त्यांना स्पर्शही होऊं देत नसत. स्कॉच भूगर्भशास्त्रज्ञ जेम्स हटन याच्याप्रमाणें शास्त्रांचें ज्ञान सामान्य माणसांच्या कक्षेबाहेरचें आहे असें त्याला मुळींच वाटत नसे. अशा प्रकारची विचारसरणी त्याला शिष्टपणाची वाटे. अगदीं सामान्य माणसालाही सर्व गोष्टी समजल्या

पाहिजेत व निसर्गनियमांचा उपयोग त्याला आपलें जीवन सुखावह करण्याच्या कामीं करतां आला पाहिजे तरच तें संशोधन व शास्त्रज्ञान असें तो म्हणे. ज्याचा प्रत्यक्षांत उपयोग नाहीं तें ज्ञान कवडीमोल होय असें त्याचें मत होतें.

फ्रँकलिन १७२६ मध्यें लंडनहून फिलाडेल्फियाकडे जावयाला निघाला. तेव्हां जातांना वाटेंतच सृष्टीच्या रहस्याचा शोध घेण्याकडे त्याच्या मनाची ओढ असल्याचें आपण मागें पाहिलेंच आहे. नंतर सहा वर्षांनीं तो जेव्हां पंचांगाच्या उद्योगांत पडला तेव्हां त्यानें या विषयाचा अधिक अभ्यास सुरू केला. ग्रहज्योतिष व फलज्योतिष यांची पूर्वीं गल्लत केली जात असे व इतर सर्व पंचांगें भविष्यानेंच भरलेलीं असत. फ्रँकलिननें ग्रहज्योतिष शास्त्राची वेगळी मांडणी केली. खगोलशास्त्राच्या आजच्या आपल्या ज्ञानाशीं त्याचे कांहीं अनुभव सर्वस्वी जुळते नाहींत हें खरें आहे, तथापि ग्रहनक्षत्रांवरून भविष्य वर्तविण्याच्या प्रसंगीं 'गरीब रिचर्ड' त्या विषयाची थट्टा करी. १७३९ च्या पंचांगांत 'खरें भविष्य' म्हणून त्यानें जें लिहिलें आहे त्यांतील एक सुप्रसिद्ध उतारा पुढें दिला आहे, त्यावरून त्याची कल्पना येईल. तो असा :—

> ग्रहणाच्या प्रथमदर्शनीं शनि वक्री आहे. त्यायोगें खेकडे आडवे चालूं लागतील. दोर वळणारे मागें मागें चालतील. बुधाच्या स्थितिगतीचाही परिणाम होईल. पेन्सिल्व्हेनियामधल्या एखाद्या माणसाला जेव्हां 'पँथर' (Panther) म्हणावयाचें असेल तेव्हां त्याला तो शब्द नीट उच्चारतां न येऊन तो 'पेंथर' (Painther) म्हणेल. एकादा न्यूयॉर्क-मधील माणूस This असा शब्द उच्चारूं पाहील तेव्हां त्याच्या तोंडांतून diss असा उच्चार बाहेर पडेल. आणि न्यू इंग्लंड आणि केप मे मधील लोक जेव्हां "Cow" शब्द उच्चारण्याचा प्रयत्न करतील तेव्हां त्यांच्या तोंडांतून "keow" असा शब्द बाहेर पडेल. त्यांच्या जिभेला ग्रहणामुळें जो मुळांत तिढा बसेल त्यानें त्यांना सरळ उच्चारच करतां येणार नाहीं. कित्येक ठिकाणीं जनावरें बोलूं लागतील आणि सत्ताविसांहून अधिक क्रियापदें नियम सोडून चालूं लागतील. आतां व्याकरणच मध्यें पडलें तर गोष्ट वेगळी!"

बेंजामिनच्या या प्रकारच्या विनोदी भविष्यकथनाचा परिणाम समाजाचा भविष्यावरील विश्वास कमी करण्यांत झाला. माणसाला वाटणाऱ्या कित्येक शंका व भीति ही मुळांत व्यर्थ आहे हें त्यानें मोठ्या गमतीदार रीतीनें लोकांच्या गळीं उतरविलें.

हवामानाचें भविष्य हें मात्र पंचांगाचें एक उपयुक्त व अवश्य अंग होतें. आणि त्यासाठीं फ्रँकलिननें हवामानशास्त्राचा अभ्यास सुरू केला. १७४३ मधील एका प्रसंगानें त्याचें निरीक्षण केवळ स्थानिक परिस्थितीपुरतेंच मर्यादित नसून तें व्यापक होतें हें दिसून आलें आहे. लंडनमधील शास्त्रज्ञ अलेक्झांडर स्मॉल याला १७ वर्षांनंतरच्या एका पत्रांत तो लिहितो :—

> "एका शुक्रवारीं रात्रीं ९ वाजतां फिलाडेल्फियांत चंद्रग्रहण लागावयाचें होतें; तें पहाण्याचें मीं ठरविलें होतें; परंतु सायंकाळीं सातपासूनच ईशान्येकडून वादळी वारे वाहूं लागून आकाशांत ढग जमले, त्यामुळें तें दिसूं शकलें नाहीं. तथापि बॉस्टनचें वर्तमानपत्र टपालानें आलें तेव्हां त्या भागांत घडून आलेल्या या वादळाच्या परिणामांचें वृत्त त्यांत आढळलेंच. पण बॉस्टन हें फिलाडेल्फियाच्या ईशान्येस चारशे मैल असूनही ग्रहणाचा प्रारंभकाल तेथें लोकांना दिसला त्यामुळें मी थोडासा गोंधळलों. कारण आमच्या येथें ग्रहणाच्या सुरवातीसच वादळ झाल्यानें ग्रहण मुळींच दिसूं शकलें नाहीं. माझी अशी समजूत होती कीं हें वादळ ईशान्येकडील असल्या-मुळें फिलाडेल्फियाच्या ईशान्येकडील भागांत तें सुरू झालें असलें पाहिजे."

ज्याला वादळांच्या संबंधानें कांहीं माहिती नाहीं त्याला असेंच वाटेल. फ्रँकलिनला ह्यासंबंधानें माहिती नव्हती व ज्या कोणाशीं त्यानें त्या संबंधांत विचारविनिमय केला त्यांनाही नव्हती. पण न उलगडलेलें कोडें फ्रँकलिनला स्वस्थ बसूं देत नसे. त्यानें बरीच माहिती गोळा केली व शेवटीं आपला निष्कर्ष काढला. त्यानें या संबंधांत बॉस्टनमधील आपल्या भावाला व इतर वसाहतींतील निरनिराळ्या मित्रांनाही लिहून माहिती मागविली. या वादळासंबंधानें त्यांजकडून जें लिहून आलें तें

एकमेकांशीं ताडून शेवटीं त्यानें असा निष्कर्ष काढला कीं, वादळाला ईशान्येकडे उशीरा सुरवात झाली. दर शंभर मैलांस एक तास उशीरा असें प्रमाण पडलें.

ह्या प्रत्यक्ष अनुभव हातीं आल्यावर वाऱ्याच्या उलट दिशेनें वादळ कसें पसरतें याचा तो विचार करूं लागला; व त्यानें त्याचें उत्तर शोधून काढलें. स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभवांशीं तुलना करून त्यानें इतर प्रश्नांचीं कोडीं सोडविलीं तसेंच येथेंही झालें. खोलींतील वाऱ्याची गति कशी असते ते त्यानें पाहिलें व त्याच न्यायानें वादळाचीही गति व दिशा ठरत असली पाहिजे असा त्यानें तर्क केला.

समजा एका बंद खोलींत वाहता वारा नाहीं. तेथें तुम्ही धुराडें पेटविलें तर काय होतें ? धुराड्यांतील हवा विरळ होईल व वर वर जाईल. त्या बरोबर त्या जागीं लगतची हवा येईल. त्या नंतर त्याच्या मागल्या भागांतली; असें मागें जात जात अगदीं शेवटीं दारालगतची हवा धुराड्याच्या दिशेनें जाऊं लागेल. व सर्व खोलींत त्या दिशेनें वारें वाहूं लागेल. याच न्यायानें मेक्सिकोच्या आखातांत जर उष्णता वाढून हवेचा दाब कमी झाला तर तेथली हवा वर जाईल व लगतची थंड वा जड हवा त्या दिशेनें सरकूं लागेल, मग आणखी उत्तरेकडील थंड वारे त्या दिशेनें धावूं लागतील आणि आपल्या येथील समुद्रकिनारा व डोंगर यांच्यामुळें त्या वाऱ्याला ईशान्येकडून गति मिळूं लागते.

ग्रहणाच्या प्रसंगानंतर कित्येक वर्षांनीं लिहिलेल्या ह्या पत्रांत सुद्धां त्याचा विनम्रभाव दिसून येतो. तो म्हणतो : " कदाचित् अधिक बारकाईनें निरीक्षण केल्यास यापेक्षांही अधिक चांगलें व अधिक बिनचूक उत्तर एकादा काढूं शकेल. "

निरनिराळ्या वसाहतींतील लोकांशीं पत्रव्यवहारानें दळणवळण वाढवून त्यानें जे अनुभव गोळा केले त्यांतून फ्रँकलिनला अमेरिकन फिलॉसॉफिकल सोसायटीची कल्पना सुचली. ती त्यानें १७४३ सालीं, – ज्या सालीं या वादळानें त्याला कोड्यांत टाकलें होतें–त्याच सालीं, पण तें वादळ प्रत्यक्ष होण्यापूर्वीं मांडली. त्याचें मूळही पत्रव्यवहार व अनुभवांचा पडताळा पाहण्याचा प्रयत्न यांतच सांपडेल.

तो म्हणे कीं, अमेरिकन लोकांनीं वनस्पतींचें निरीक्षण करून त्या संबंधांतील आपले अनुभव सतत एकमेकांना कळवावेत. शेती करण्याच्या पद्धति, जमिनीचा कस, धातु उत्खननांत आढळणाऱ्या फॉसिल्स (fossils) जनावरांची जोपासना, व इतर भौगोलिक ज्ञान यांच्या संबंधांत सतत दळणवळण ठेवलें पाहिजे. तसेंच नवीन गणितविषयक प्रमेयें, रासायनिक शोध, यांत्रिक संशोधन, भौगोलिक पाहाणी, व भूगर्भांतील वस्तूंचें संशोधन आणि असेंच निसर्गाचें ज्ञान प्राप्त करून देणारे इतर शास्त्रीय प्रयोग यांची देवाणघेवाण झाली पाहिजे. त्यायोगें माणसाचें निसर्गावर प्रभुत्व चालेल व जीवन सुखावह करणाऱ्या सोयी करतां येतील.

त्यानें काढलेल्या सोसायटीची मुख्य कचेरी अर्थातच् फिलाडेल्फिया येथें राहावयाची होती. तेथें राहणाऱ्यांत एक तरी डॉक्टर, एक वनस्पति शास्त्रज्ञ, एक गाणिती, एक रसायन शास्त्रज्ञ, एक यंत्रज्ञ, एक भूगोलाचा जाणता, व एक सर्वसामान्य शास्त्रज्ञ, व त्याशिवाय अध्यक्ष, खजिनदार, सेक्रेटरी इत्यादि अधिकारी असणें आवश्यक होतें. दुसरा अधिक लायक माणूस मिळेपर्यंत फ्रँकलिननें आपण होऊन स्वतःच सेक्रेटरीचें काम करण्याची तयारी दर्शविली स्थानिक सभासदांनीं महिन्यांतून एकदां जमावें व आधीच्या सभेनंतर बाहेरून आलेल्या सर्व पत्रव्यवहारावर चर्चा करावी असें ठरलें होतें.

या संबंधांतील पत्रव्यवहाराचा बटवडा पोस्टमास्तर जनरल यांनीं फुकट करावा अशी त्यांस विनंती करण्याचें ठरलें. तसेंच संस्थेचा खर्च भागविण्यासाठीं प्रत्येक सभासदानें कांहीं ठराविक वार्षिक वर्गणी द्यावी असेंही ठरलें.

ही संस्था काढण्यांत फ्रँकलिनचा हेतु, त्याच्या एका चरित्रकारानें म्हटल्याप्रमाणें, एक प्रकारचा आंतरप्रांतीय वादविवाद संघ काढण्याचा होता. फिलाडेल्फियांतील जुंटो हेंच त्याचें मूळ, पण त्यापेक्षां ही संस्था कितीतरी पटीनें अधिक महत्त्वाची ठरली. ती अमेरिकेंतील पहिली शास्त्रविषयक संस्था होय. यु रोपांतील सदृश संस्थांशीं जिची तुलना करतां येईल, व जिला त्यांच्याबरोबर शास्त्रीय विषयांवर चर्चा करावी असें वाटावें अशी ही एकच संस्था कित्येक वर्षें होती. फ्रँकलिननें म्हटल्याप्रमाणें, जीवनाच्या प्राथमिक गरजाच भागविण्याकडे ज्या काळांत लोकांचें सर्व लक्ष गुंतलें होतें असा हा

मोठा खस्ता खाण्याचा वसाहतींचा काळ होता. अशा वेळीं ही संस्था म्हणजे प्राथमिक अवस्थेंतील संस्कारशून्य भूमींत पसरलेल्या घनदाट अंधकारांत प्रकट झालेल्या तेजोवलयाच्या पहिल्या किरणाप्रमाणेंच भासली. १७४३ च्या सुमारास फ्रँकलिनच्या मतें कष्टाचा प्राथमिक काळ संपला होता. पण जर फ्रँकलिननें सुरवात केली नसती तर अमेरिकेंत शास्त्रीय ज्ञानाची आवड केव्हां निर्माण झाली असती हें सांगणें कठिण आहे.

या संस्थेच्या कार्याला चांगली गति येण्याला बराच काळ लागला. ही कल्पना लोकांच्या मनाची झटकन पकड घेईल इतकी परिचयाची नव्हती. पांडित्याच्या क्षेत्रापेक्षां कमी दर्जाच्या उद्योगांत सभासदांचा बराच वेळ गुंतलेला असे. तथापि हळू हळू सर्व राष्ट्रांतील मोठे मोठे विद्वान् पंडित व शास्त्रज्ञ या संस्थेचे सभासद झाले. आणि दोन शतकांहून अधिक काळपर्यंत यशस्वी कामगिरी बजावलेल्या या संस्थेचें ज्ञानप्रसाराचें मूळचें कार्य आजही तितक्याच यशस्वी रीतीनें चालू आहे.

इतर अनेक लाभदायी स्फूर्तीप्रमाणें शास्त्रीय संशोधन कार्याची स्फूर्तिही फ्रँकलिनला बॉस्टन येथेंच मिळाली. फिलाडेल्फिया येथें त्यानें आपलें घर केलें होतें. ती त्याची कार्यभूमि होती, व त्याचा उत्कर्षही तेथेंच झाला. त्यानें केलेली कामगिरीही तेथेंच घडून आली. पण त्यानें ज्या कल्पना काढल्या व पुढें वाढविल्या त्यांचें मूळ बहुधा दुसऱ्या ठिकाणींच असे. तो न्यू इंग्लंडला आपल्या नातेवाइकांना भेटण्यासाठीं व जुन्या ओळखी नव्या करून घेण्यासाठीं जाई. तेव्हां त्याला आपल्या रोजच्या कष्टमय जीवनांत थोडी विश्रांति मिळे. दैनंदिन कारभारांतून आपलें मन बाजूस काढून तें तो दुसरीकडे वळवूं शके. सन १७४६ मध्यें बॉस्टन येथें त्याची व डॉ. स्पेन्स यांची भेट झाली. हे डॉक्टर गोंधळ्या व चमत्कारिक स्वभावाचे असूनही त्यांनीं फ्रँकलिनच्या मनाचे दरवाजे खुले करून त्याच्यापुढें विश्वाचें एक भव्य दालन उभें केलें.

हे डॉ. स्पेन्स कोण? ते स्कॉटलंडहून आले यापलीकडे त्यांच्यासंबंधानें फ्रँकलिननें कांहीं अधिक माहिती दिलेली नाहीं. विजेच्या विविध निसर्गचमत्कारांच्या बाबतींत ते प्रयोग करीत; पण त्यांत बुद्धीची चमक आढळत

नसे. हे प्रयोग अर्धवटपणें करण्यांत येत आहेत हें फ्रँकलिननें तेव्हांच ताडलें. पण " हा विषयच आपल्याला सर्वस्वी नवा असल्यानें त्याचें आपणांस कौतुक वाटलें व आनंदही वाटला " असें त्यानें म्हटलें आहे.

सन १७४६ मध्यें तरी हा विषय लोकांना नवा व अस्पष्ट होता. शास्त्रज्ञांना दोन हजार वर्षांपासून हें माहीत होतें कीं, घर्षणानें अॅम्बरमध्यें आकर्षण उत्पन्न होतें. सतराव्या शतकांत कांचेंतही आकर्षणशक्ति असल्याचें शास्त्रज्ञांच्या अनुभवास आलें होतें. विजेच्या संबंधांत अनेकांनीं अनेक प्रयोग केले. पण फ्रँकलिनच्या काळापर्यंत जरी ठिणग्यांच्या काडया आणि नळया बनविण्यांत येऊं लागल्या होत्या तरी हें असें कां घडतें याची शास्त्रीय उपपत्ति लागली नव्हती.

अमेरिकेंत तरी डॉ. स्पेन्स येईपर्यंत विजेसंबंधाच्या प्रयोगाबाबत पूर्ण अज्ञान होतें. तसें नसतें तर हा विषय आपल्याला अगदींच अपरिचित आहे असें फ्रँकलिननें म्हटलें नसतें व डॉ. स्पेन्स यांच्या प्रयोगाबद्दल त्याला इतकें कुतूहलही वाटलें नसतें. डॉक्टर जेव्हां फिलाडेल्फिया येथें आले तेव्हां फ्रँकलिननें त्यांचें तें विजेचें प्रयोगसाहित्य विकत घेतलें. लंडन येथील एक क्वेकर पीटर कॉलिन्सन यांनीं एक विजेची नळी फिलाडेल्फिया येथील शास्त्रीय मंडळाला पाठविली, ती पाहून तर इंग्लंडांत विजेच्या संबंधांत पुष्कळच प्रगति झाली असल्याचें फ्रँकलिनला आढळून आलें. त्यानंतर त्याचा कॉलिन्सन यांजबरोबर पत्रव्यवहार सुरू झाला व त्यांत फ्रँकलिननें त्यांना आपले प्रयोग व शोध यांच्या संबंधाची माहिती कळविली. या पत्रांवरून त्याच्या मनाची शास्त्रसंशोधनाची ठेवण दिसून येते. शंका उपस्थित करून त्यांचें निरसन करीत करीत तो बरोबर निर्णयाला कसा येई हें यांत दिसून येतें. शास्त्रीय सिद्धांत सोप्या पण निश्चितार्थ भाषेंत मांडण्याचें त्याचें कौशल्यही या पत्रव्यवहारांत दिसून येतें. विजेची नळी पाठवल्याबद्दल आभाराचें पत्र लिहितांना १७४७ मार्च अखेरीस तो लिहितो :

> " या विषयाच्या अभ्यासांत माझें मन इतकें रंगून गेलें आहे कीं, यापूर्वीं कोणत्याच विषयांत तें इतकें रमलें नाहीं किंवा त्यांत माझा सर्व वेळ गेला नाहीं. मी एकटाच असलों म्हणजे प्रयोग करीत बसतों व माझ्या मित्रांना व परिचितांना ते पुन्हां करून दाखवितों. गेल्या कांहीं महिन्यांत दुसरें कांहीं करण्यास मला फुरसतच सांपडली नाहीं."

त्याचे हे प्रयोग पाहण्यास मित्रांची गर्दी लोटत असे. त्यासंबंधांत गुप्तता कांहींच नसे. तो जे शोध लावीत होता ते आपण लावले आहेत असें कोणी म्हणण्याचा संभवच नव्हता. फ्रँकलिनला एवढेंच वाटे कीं, आपण जें कांहीं लिहून ठेवीत आहों, तें कदाचित् अर्धकच्च्या स्वरूपाचें असेल, व त्याला आणखी पुराव्याची जरूर असेल. म्हणून आपलीं पत्रें दुसऱ्यांना दाखवूं नयेत असें त्यानें एका पत्रांत कॉलिन्सनला लिहिलें आहे. आपल्या मित्रांनाही असे प्रयोग करण्याचें स्वातंत्र्य लाभावें म्हणून त्यानें गांवच्या एका कांचवाल्याकडून नळ्या, कांड्या, बरण्या, इत्यादि तयार करवून घेतलें. फिलाडेल्फिया येथील कारागिरांकडूनच त्यानें विजेचीं यंत्रेंही तयार करून घेतलीं. तीं पाहिलीं म्हणजे ते कारगीर किती कुशल होते याची कल्पना येतें. या यंत्रांचा त्यानें वीज उत्पन्न करण्यासाठीं व कांच आणि इतर वस्तु घासण्याकरतां उपयोग केला.

पहिल्याच वर्षीं त्यानें वीज हा एकच प्रवाह आहे, दोन नव्हेत हा मूलभूत शोध लावला. वेगवेगळ्या परिस्थितींत या प्रवाहाच्या कार्यांत बदल होतो. त्याला त्यानें धन व ऋण हीं नांवें दिलीं. तींच आजही प्रचारांत आहेत. धन विद्युत्युक्त पदार्थ तशाच दुसऱ्या पदार्थाला दूर लोटतो. त्याचप्रमाणें ऋण विद्युत्युक्त पदार्थ तशाच दुसऱ्या पदार्थालाही दूर लोटतो. पण धन व ऋण प्रवाह जवळ आणले तर मात्र त्यांतून परस्पराकर्षण निर्माण होतें. याचें कारण एकांत विद्युत् प्रवाह अतिरिक्त असतो. तर दुसऱ्यांत तो कमी असल्यानें तो एक प्रकारें भुकेला असतो, म्हणून दुसऱ्याकडे आकर्षित होतो. दोघांचाही मिळून समपातळी निर्माण करण्याचा प्रयत्न असतो व ती निर्माण झाली म्हणजे दोन्हीही स्थिर होतात. याच पायावर विजेच्या कार्याची सर्व उभारणी झालेली आहे.

त्या वेळीं नुकत्याच पुढें आलेल्या लेडन जारच्या साहाय्यानें प्रयोग करून त्यानें दाखविलें कीं हा "प्रवाह" किंवा "अग्नि" पाण्यांत किंवा धातूंत रोखला जात नाहीं, तर प्रवाहप्रतिबंधक अशा कांचेंत रोखला जातो. त्यानें मग पुढें विजेची बॅटरी तयार केली आणि "बॅटरी" हें नांवही त्यानेंच रूढ केलें. त्यांतून पुढें जे प्रयोग झाले त्यांतून रेडियो लहरींचा शोध लागला.

सन १७४९ च्या उन्हाळ्यांत त्यानें आपल्या या प्रयोगाचा समारोप एका मोठ्या समारंभानें नदीकाठीं करण्याचें ठरविलें. कॉलिन्सनला लिहिलेल्या पत्रांत तो लिहितो :

"नदीच्या या तीरावरून त्या तीरावर पाण्यांतून विजेचा प्रवाह वापरून ठिणगी निर्माण करून दारूकाम उडवावयाचें, विजेच्या धक्क्यानें कोंबडी मारायची, ती विजेच्या शेगडीवर भाजावयाची, आणि इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड आणि जर्मनी यांमधील शास्त्रज्ञांचें, विजेनें भारलेल्या ग्लासांतून मद्य पिऊन शुभचिंतन करावयाचें व त्याच वेळीं विजेरीच्या साहाय्यानें तोफांचे बार काढावयाचे असा कार्यक्रम आखला आहे."

आज या सर्व गोष्टी लोकांच्या नित्याच्या परिचयाच्या झाल्या असून, एका काळीं या गोष्टी नवीन होत्या ही कल्पना सुद्धां कठीण होऊन बसली आहे. पण हें सर्व करीत असतांना "गंमत म्हणून हें ठीकच आहे; पण या प्रयोगांचा माणसाला उपयोग काय ?" तो कसा करतां येईल ? हा विचार फ्रँकलिनच्या मनांत सारखा घोळत असल्याचें दिसून येतें.

१७४९ च्या उन्हाळ्यांत फ्रँकलिनच्या घरांतले हे सर्व प्रयोग बंद पडले. पण त्याच वेळीं उष्णतेबरोबर वादळेंही सुरू झालीं व त्याकडे फ्रँकलिनचें लक्ष वेधलें. ढगांच्या गडगडाटासंबंधानें तो कॉलिन्सनला लिहितो, "या ढगांत विजेची शक्ति कांहीं प्रमाणांत असावी व तितकी विजेची शक्ति नसलेल्या ढगांबरोबर त्यांचा संबंध येतांच त्यांतून गडगडाट होत असावा व वीज चमकत असावी." आकाशांतील वीज व विजेच्या बॅटरींतील वीज मुळांत एकच शक्ति होत या फ्रँकलिनच्या शोधामुळें त्याची कीर्ति सर्वांत अधिक पसरली.

कॉलिन्सननें हीं पत्रें लंडनमधील रॉयल सोसायटीला दिलीं. तेव्हां फ्रँकलिनच्या या संशोधनाला ते हसले. पण फ्रान्समध्यें फ्रँकलिनच्या या संशोधनानें शास्त्रज्ञांचें लक्ष वेधून घेतलें व फ्रँकलिनच्या प्रयोगानुसार एका फ्रेंच शास्त्रज्ञानेंही तसाच प्रयोग करून आकाशांतील वीज व प्रयोग-शाळेंत निर्माण होणारी वीज एकच असल्याचा आपला अनुभव नमूद केला व त्यामुळें अमेरिकेंतल्या पेक्षांहि युरोपांत फ्रँकलिनची संशोधक या नात्यानें सर्वत्र कीर्ति पसरली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
१९ 29066 दि:
क्रमांक 6455 नों: दि: 30

असाच एक प्रयोग फ्रँकलिननें त्या उन्हाळयांत केला व आपल्या विचारांची खात्री करून घेतली. त्यानें एक साधा पतंग घेतला; त्याच्यावर एक टोकदार तार बांधली पतंगाच्या दोरीच्या दुसऱ्या टोकाला त्यानें रेशमी फीत बांधली व दोरी व फीत यांच्यामध्यें एक किल्ली बांधली. वादळ सुरू झालें तेव्हां त्यानें पतंग उडविला. बरोबर त्यानें आपल्या मुलास नेलें होतें. पतंग आकाशांत उंच गेल्यावर त्याची दोरी वादळांत भिजली. रेशमी फीत भिजूं नये म्हणून ती छपराखालीं धरण्यांत आली होती. विजेचा गडगडाट सुरू झाला तेव्हां फ्रँकलिननें किल्लींतून ठिणग्या काढून दाखविल्या.

या प्रयोगापासून प्रत्यक्ष फायदा असा कांहीं नव्हता. स्वतःच्या विचारांचें समाधान इतकेंच. तथापि त्यांतूनच त्यानें विद्युत् प्रवाहवाहक तार किंवा पट्टा शोधून काढला. परंतु विद्युत्वाहक तारेच्या शोधापेक्षांही विजेच्या स्वरूपासंबंधीचें त्याचें संशोधनच जगाच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचें व उपकारक ठरलें आहे. विद्युत्प्रवाहवाहक तारेमुळें अनेक लोकांचे प्राण वांचले असतील. पण विजेचें सत्यस्वरूप कळल्यामुळें वीज म्हणजे ईश्वरी ‘ कोप ’ नसून वाऱ्यापावसासारखीच ती एक सृष्ट घटना आहे हें माणसाला समजल्यामुळें त्याच्या विवेकशक्तीला चालना मिळाली व एका विशिष्ट भीतीपासून मानवाचें कायमचें संरक्षण झालें.

फ्रँकलिनचा दुसरा एक शोध म्हणजे उष्णतेसंबंधाचा होय. त्याचा पुढें व्यवहारांतही उपयोग करण्यांत आला. एकदां त्याच्या असें अनुभवास आलें कीं, एका विशिष्ट ठिकाणीं व क्षणीं वारा कितीही वाहात असतांही ताप नळींतील उष्णतामान कायमच राहिलें. वारा वाहाण्यामुळें त्याच्या शरीराला उष्णता कमी कमी भासत होती, पण तापनळींत ती कमी दिसत नव्हती. याचें कारण वाऱ्याच्या योगानें शरीरांतील पाण्याची वाफ अधिक लौकर होते व त्यामुळें शरीर अधिक लौकर थंड होतें. एकदां शंभर अंश उष्णतामान असतांना तो खोलींत बसला असतां घामाची वाफ होऊन गेल्यामुळें त्याला गारसें वाटूं लागलें. तेव्हां त्यानें तापनळींतील पाऱ्याच्या गोळ्यावर जर असेंच पाण्याची वाफ बसेलसें केलें तर पाराही उतरेल कीं काय याचा प्रयोग केला आणि तसें झाल्याचें त्याला आढळून आलें.

त्याचा आणखी एक प्रयोग म्हणजे निरनिराळ्या रंगांवर उष्णतेचे निरनिराळे परिणाम कसे घडून येतात तें पाहणें. त्यानें निरनिराळ्या रंगांचे सारख्या आकाराचे तुकडे घेतले व बर्फावर ठेवले. काळ्या कापडाखालचें बर्फ सर्वांत लवकर वितळलें व पांढऱ्या कापडाखालचें सर्वांत शेवटीं वितळलें. इतर रंगांच्या कापडाखालचें बर्फ वितळण्याचें प्रमाण या दोन टोकांत बसलें. यावरून त्यानें असा सिद्धान्त बांधला कीं, काळा रंग हा सर्वांत अधिक उष्णतावाहक असून पांढरा रंग हा सर्वांत कमी उष्णतावाहक आहे. या आधारावर उन्हाळ्यांत पांढरे कपडे वापरावेत व हिवाळ्यांत काळे कपडे वापरावेत असें फ्रँकलिन प्रतिपादन करूं लागला.

अशी कोणतीही शास्त्रशाखा नव्हती कीं जींत फ्रँकलिननें लक्ष घातलें नाहीं. त्यांत त्याला मिळालेलें यश प्रमाणांत कमीअधिक असेल. शरीरशास्त्र इंद्रियविज्ञानशास्त्र, वैद्यशास्त्र, इत्यादि शास्त्रांसंबंधानेंही त्यानें संशोधन केलें. रक्ताचा प्रवाह कसा चालतो व कातडीचीं छिद्रें कोणकोणतीं कार्यें करतात यावर त्यानें बरेंच संशोधन केलें. प्रकाशाचें पृथक्करण करून स्पंदन हें त्याचें मूळ होय असें त्यानें निदान केलें. सूर्याच्या किरणापासून फेकल्या गेलेल्या कणांतून प्रकाश मिळतो ही तत्कालीन समजूत होती. त्या काळांत या प्रकारचें विवेचन हें पाखंडीपणाचेंच लक्षण समजलें गेलें. आज आपण ज्याला व्हिटॅमिन म्हणतों तीं सूर्यप्रकाशांत आढळतात असें फ्रँकलिननें शोधून काढलें. त्यानें भूगर्भशास्त्राचा अभ्यास केला व भूगर्भांतील थर (Fossils) तपासून पाहिले. तसेंच मुंग्या, आपलें दळणवळण कसें चालू ठेवतात याचेंही त्यानें निरीक्षण केलें. त्यानें दलदलींतला गॅस शोधून काढला आणि आयुष्याच्या उत्तरकालीं, हवेंतून उडण्याच्या प्रयोगांकडेही आस्थापूर्वक लक्ष दिलें.

सन १७८२ च्या सुमाराला त्याला विमानाची कल्पना आली व हवेंतून युद्ध करणें शक्य आहे हा विचार त्यानें बोलून दाखविला. तो म्हणतो, "दहा हजार लोकांचें सैन्य ढगांतून एकदम एकाद्या ठिकाणीं खालीं उतरलें तर त्याला तोंड देतां येईल एवढें सैन्य कोणता राजा जवळ बाळगूं शकेल?"

या प्रत्येक संशोधनाचा व्यवहारांत कसा उपयोग करतां येईल इकडे त्याची दृष्टि असे. इतर संशोधक त्या चमत्कारांतच रमून जात; पण

फँकलिनचें मत असें होतें कीं, ज्या संशोधनानें माणसाचें आयुष्य अधिक सुखी, समृद्ध व सोयीचें होणार नाहीं अशा संशोधनाचा उपयोग काय ? अशा प्रकारची वैचारिक धारणा बाळगणारा तो एकटाच संशोधक होता. गरीब संशोधकांच्या संशोधनाचा फायदा इतर उपटतात ही अमेरिकन तक्रार त्याच्या बाबतींत लागू नव्हती. कारण त्याच्या सर्व संशोधनांची इतरांनीं नक्कल केली, चोरी केली. त्यानें कधींही व कशाचेंही पेटंट घेतलें नाहीं. त्याच्या या स्वभावाबद्दल कीव वाटणाऱ्या मित्रांना तो म्हणे, "माझें संशोधन माझ्या स्वतःकरतां नाहीं. तें साऱ्या मानव जातीकरतां आहे."

---

## १२ – संशोधनामागील भूमिका

फ्रँकलिननें जेव्हां उघडया तोंडाचा स्टोव्ह तयार केला तेव्हां त्याचें नांव सर्वतो मुखीं झालें. त्या संबंधानें काढलेल्या पत्रकांत फ्रँकलिननें त्याची तपशीलवार माहिती दिली आहे. आत्मचरित्रांत तो लिहतो :

> " या पत्रकाचा चांगला परिणाम झाला. गव्हर्नर टॉमस या स्टोव्हच्या रचनेवर इतका खूश झाला कीं त्यानें कांहीं वर्षांकरितां मला या संशोधनाचें पेटंट देण्याची तयारी दाखविली. पण मी पेटंट घेण्याचें नाकारलें. यासंबंधांत मला नेहमींच असें वाटत आलें आहे व मी माझें तें विचारसूत्र मानतों कीं, "इतरांच्या संशोधनाचे किती तरी फायदे आपण उपभोगतों, तर आपण आपल्या संशोधनाच्या फायद्यांचा लाभ इतरांना घेऊं देण्यास आनंदानें तयार झालें पाहिजे. आणि हा लाभ आपण त्यांना उदार मनानें व मोफत घेऊं दिला पाहिजे."

या विचारांच्या खालीं त्यानें रेघ मारली आहे. यावरून फ्रँकनलीचें हें मत किती निश्चयात्मक होतें हें यावरून दिसून येतें. त्याचें हें पत्रक वाचून एका इंग्रज माणसानें फ्रँकलिन स्टोव्ह बनविला व आपला शोध म्हणून त्यानें त्याचें पेटंटही घेतलें. पण त्याबद्दल फ्रँकलिननें त्याजविरुद्ध कधीं दावा केला नाहीं, किंवा पेटंट घेऊन त्या माणसानें चार पैसे कमावले म्हणून त्याच्या विरुद्ध कधीं तक्रारही केली नाहीं. अशा प्रकारें त्याच्या संशोधनाच्या

अनेकांनीं अनेक चोऱ्या केल्या; पण त्याबद्दल त्यानें वाद न करितां त्याकडे दुर्लक्षच केलें. संशोधनाच्या आनंदांतच त्याला समाधान होतें.

नुकतीच प्रगतीची वाट चालूं लागलेल्या अमेरिकेचा पहिलाच संशोधक अशा विचारांचा असावा हें तिचें सुदैवच समजलें पाहिजे. आपल्या संशोधनांपासून फायदा मिळविण्यासाठीं जर त्यानें मक्तेदारी निर्माण केली असती तर त्या त्या वस्तूंचें उत्पादन मर्यादित झालें असतें, त्यांचा प्रसारही मर्यादित झाला असता, आणि पर्यायानें अमेरिकेंत त्या योगानें ज्या वेगळ्या संस्कृतीची वाढ झाली ती लांबली असती. शास्त्रांचा अभ्यास व संशोधन या क्षेत्रांत फ्रँकलिननें जी कामगिरी बजावली व तिला जें स्पष्ट व असंदिग्ध भाषेंत व्यक्त स्वरूप प्राप्त करून दिलें, त्यामुळें इतर देशांचें लक्ष तिकडे वेधलें गेलें, व या नव्या संकृतीकडे मान्यतेच्या व आदराच्या वृद्धीनें ते पाहूं लागले.

तत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या माणसाच्या विलक्षण बुद्धिमत्तेचा आपण विचार करूं लागलों, म्हणजे प्रारंभींच्या वसाहतवाल्यांच्या संबंधानें पसरलेल्या कल्पना किती अवास्तव व चुकीच्या होत्या हें दिसून येतें. खरें म्हणजे, इंग्रज किंवा युरोपांतील इतर देशांतील लोक यांच्या मानानें ब्रिटिश वसाहतींतील लोक शास्त्रीय ज्ञानांत व यंत्रविद्येंत पुष्कळच मागासलेले होते; पण तत्कालीन परिस्थितींत तें अपरिहार्यच होतें. शास्त्रांचा अभ्यास व संशोधन करण्यास आधीं मानसिक स्वास्थ्य असावें लागतें. शांतपणें विचार करणें, प्रयोग करणें, चुका दुरुस्त करणें, पुन्हा प्रयोग करणें, यासाठीं पुष्कळ फुरसत अवश्य असते. पण वसाहतवाल्यांना हें स्वास्थ्यच नव्हतें. त्यांना निसर्गाशीं सतत झगडा करावा लागत होता. प्रथम लक्षावधि झाडें तोडावयाचीं, जंगल नाहीसें करून जमीन लागवडीखालीं आणावयाची, त्यासाठीं लाकडी नांगर, व इतर प्राथमिक अवस्थेंतील हत्यारांचा उपयोग करावयाचा, व एका बाजूला हें करीत असतां दुसऱ्या बाजूला कोणत्या वेळेला इंडियन लोकांचा हल्ला होईल याची सारखी धास्ती असावयाची, या सर्व गोष्टी शास्त्रीय अभ्यासाला किंवा संशोधनाला मुळींच पोषक नव्हत्या.

वसाहतीसाठीं लोक जेव्हां प्रथम आले तेव्हां येतांना त्यांनीं स्वतःला उपलब्ध असलेलें तांत्रिक ज्ञान व त्याचीं साधनें बरोबर आणलीं होतीं. या

भागांतील शेती कशी करावयाची याची माहिती त्यांनीं स्थानिक इंडियन लोकांपासूनही पुष्कळ घेतली. पण अमेरिकेंतील वसाहतवाले शेतीचें उत्पादन काढण्यांत अगदींच नालायक आहेत, त्यांना खतांची कांहींच माहिती नाहीं, नवीन नवीन पडीक जमिनींत धान्य पेरावें म्हणजे पीक येईल एवढेंच ते समजत, अशी युरोपांत सर्वत्र समजूत पसरली होती. घरें बांधणें, लोहारकाम, वाहतुकीचीं साधनें, दळणवणाचीं साधनें, पशुपालन, विणकाम इत्यादि सर्व बाबतींत जुन्या जगाचें नव्या वसाहतींत केवळ अनुकरण होत होतें. वसाहतींत कारखाने काढण्यास इंग्लंडनें एक प्रकारें विरोधच केला. अमेरिकेंत जे काय थोडे उद्योगधंदे सुरू झाले होते त्यांचीं यंत्रें वगैरे साधनेंही बाहेरूनच आणलीं जात.

फ्रँकलिननें छापखान्याचा व्यवसाय सुरू केला तेव्हां छापयंत्रें, टाईप व इतर सर्व साहित्य इंग्लंडहून येई. त्यानें आपली बुद्धि प्रथम या क्षेत्रांत चालविली, व टाईप पाडण्याच्या कांहीं पद्धती शोधून काढल्या. चलनी नोटा छापण्याकरतां त्यानें एक ‘ कॉपर - प्लेट ’ छापयंत्रही बनविलें. तथापि इतर ठिकाणच्या योजना पाहून या गोष्टी त्यानें बनविल्या होत्या.

त्याचें असें पहिलें संशोधन म्हणजे शेगडीचा स्टोव्ह होय. आज जुन्या वस्तूंच्या दुकानांतून ‘ फ्रँकलिन स्टोव्ह ’ म्हणून जो दाखवितात तो हा नव्हे. आज तो कोठेंही वापरांत नाहीं; पण १७४० मध्यें तो अतिशय उपयुक्त ठरला होता. डच व जर्मन बनावटीचे दोन ओबड धोबड स्टोव्हचे प्रकार सोडले तर दुसरा स्टोव्ह त्या काळीं नव्हता. ते नुसते शिळचा हवेंत ऊब उत्पन्न करीत. त्या काळीं उघडचा शेगडचांचा उपयोग सैंपाकासाठीं, उबेसाठीं आणि कित्येक घरांतून उजेडासाठींही केला जात असे. उघडचा शेगडीमुळें उष्णता उत्पन्न होई, व ती ताजीही राही पण त्यापैकीं पुष्कळशी धुराडचावाटें वर निघूनही जाई !

लहानपणीं बॉस्टन येथें असतांना संध्याकाळच्या वेळीं फ्रँकलिन शेगडी-जवळ बसत असे व तिच्या उजेडांत डोळे मिटू लागेपर्यंत वाचीत असे. या शेगडींत पुष्कळ गैरसोयी आहेत हें त्याला अनुभवानें दिसून आलें होतें. सर्व अंगभर एकदम ऊब येण्याची तींत सोय नव्हती. पुढच्या बाजूनें शेकावें तर मागचा भाग थंडीनें गारठून जावा व तोंड फिरवलें कीं पाठीला उष्णता लागे

पण तोंडाचा भाग गारठून जावा असा प्रकार होता. फ्रँकलिननें बनविलेल्या नवीन शेगडीच्या जाहिरातींत त्यानें या जुन्या वस्तुस्थितीचें वर्णन मोठें मार्मिकपणें दिलें आहे. तो म्हणतो :

> "थोडक्यांत म्हणजे थंडीमुळें होणाऱ्या आजारांमुळें, उदा., ताप, थंडीताप, प्ल्यूरसी, इत्यादींमुळें फार लोक मरतात; कारण हवा तापली कीं ती धुराड्यांतून वर जाते व वाऱ्याचा प्रवाह सुरू होऊन पुढच्या बाजूस शेक लागतो व मागच्या बाजूस थंडीनें गारठून जाण्याची पाळी येते."

फ्रँकलिननें जी नवीन शेकडी बनविली तिच्यांत धूर व उष्णता धुराड्यांतून वर निघून न जातां प्रथम ती एका लोखंडी पेटींतली हवा तापवी. या पेटीला खालून आंत वारें येण्याची सोय होती. या पेटींतील हवा प्रथम सर्व बाजूंनीं तापे व नंतर वरच्या बाजूच्या झडपांतून सर्व खोलीभर पसरे. ही शेगडी लोखंडाची असे. हवेची पेटी मध्यभागीं व विस्तवाशीं पाठीकडे असे. त्यामुळें सर्व खोलीभर उबदार हवा पसरे. ती तयार करणें सोपें असल्यामुळें ती खूपच लोकप्रिय झाली. आणि तिच्या योगानें उत्तरेकडील वसाहतींतील लोकांना हिंवाळ्याच्या दिवसांत उबदार खोल्यांतून राहाणें प्रथमच शक्य झालें. त्याचा अमेरिकन कुटुंबांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर फार परिणाम झाला.

या स्टोव्हच्या संशोधनांतून धुराड्यांतून जाणाऱ्या धुरासंबंधानें अभ्यास करण्याकडे त्याचें लक्ष वेधलें. इंग्लंड आणि अमेरिका ह्या दोन्ही देशांत धुराड्यांतून जाणारा धूर कसा काढावा हा मोठाच प्रश्न झाला होता. कांहीं दिवसांनीं त्यानें एक प्रबंध लिहिला. त्यांत धुराड्यांतून अतिरिक्त धूर जाण्याचीं नऊ कारणें त्यानें दिलीं, व तो नाहींसा करण्यासाठीं आकृत्या काढून योजना सुचविल्या.

फ्रँकलिनचें संशोधनकार्य नवनव्या क्षेत्रांत होत असल्यामुळें त्यासाठीं त्याला आपली स्वतःची प्रयोगशाळा स्वतंत्रपणेंच संशोधन करून बनवावी लागे. विजेरी आणि पतंग यांसारख्या मोठ्या कल्पक युक्त्यांचा उपयोग करून तो आपलें संशोधन लोकांना प्रत्यक्ष सिद्ध करून कसें दाखवी हें आपण मागें

पाहिलेंच आहे. त्याचें दुसरें संशोधन म्हणजे कालव्याचा एक नमुना होय. कॅनॉलची खोली व प्रवाह यांवर बोटीच्या गतीचें प्रमाण कसें अवलंबून असतें हें त्यानें दाखवून दिलें. पाण्याची खोली थोडी असली म्हणजे बोटीचा तळ व पाण्याचा तळ यांत फार अंतर न राहिल्यानें बोट वल्हविणें अवघड जातें व तिची गति मंदावते. हें त्याला नावाड्यांनीं इंग्लंडांत व हॉलंडमध्यें असतांना सांगितलें होतें. पण त्यांच्या सांगण्यावरून त्याची खात्री पटली नव्हती. त्यासाठीं त्यानें प्रयोग करून पाहिला. त्यानें चौदा फूट लांब, सहा इंच रुंद व सहा इंच खोल अशी एक डोणी तयार करविली व तेवढ्याच लांबी रुंदीची एक फळी त्यानें बनविली, व ती पाण्यांत हव्या तितक्या खोलीवर दाबतां येईल अशी योजना केली. या डोणींत एक छोटी होडी टाकून तिला त्यानें एक रेशमी दोरी बांधली व एका पुलीवरून ती नेऊन तिला खालीं वजन बांधलें. वजनामुळें होडी पाण्यांतून सरके. पाण्याची खोली वेळोवेळीं बदलून त्यानें हा प्रयोग करून पाहिला. फळीचा तळ व पाण्याचा तळ यांमधील अंतरानुसार या गतींत बराच फरक पडत असल्याचें त्याला दिसून आलें. या प्रयोगाच्या साहाय्यानें त्यानें कालवे इंजिनियरांच्या उपयोगासाठीं निरनिराळ्या प्रमाणांचें कोष्टक तयार करून दिलें.

विजेरी व विजेचीं इतर यंत्रें यांच्या साहाय्यानें तो अनेक चमत्कार करून दाखवी व स्वतःची व मित्रांची करमणूक करी. पण या प्रयोगांचा प्रत्यक्ष व्यवहारांत उपयोग होत नव्हता. तिला तो जादू म्हणे. हीच जादू पुढें प्रत्यक्ष व्यवहारांत कार्यान्वित व्हावयाची होती. असाच एक जादूचा राजा त्यानें बनविला होता. तो हातानें धरला व त्यावर सोन्याची मुकुटा-सारखी वस्तु ठेवली म्हणजे दुसरा कोणी तो त्याच्या डोक्यावरून काढून घेऊं लागला तर त्याला धक्का बसत असे. अशा धक्क्यानें कोंबडीसारखे प्राणी मेल्याचेंही त्यानें पाहिलें होतें. पण वर सोन्याचें नाणें नसलें तर धक्का बसत नसे. पण जेव्हां धक्का बसे तेव्हां त्याला इतरांचा स्पर्श झालेला असला तर त्या सर्वांना तो धक्का बसे. राजाविरुद्ध या लोकांनीं कट केला म्हणून त्यांना हा धक्का बसला असा विनोद तो करी. हा जादूचा राजा ही लहान मुलांची मोठी करमणूक होती. असे आणखीही त्यानें कांहीं जादूचे खेळ तयार केले होते. त्यांत विजेच्या साहाय्यानें फिरणारें एक कांचेचें चाकही होतें.

त्याचें सर्वांत प्रसिद्ध असलेलें संशोधन त्याच्या विजेच्या प्रयोगांतून निर्माण झालेलें आहे. त्या संशोधनाचा त्यानें प्रत्यक्ष व्यवहारांत उपयोग करून दाखविला. आकाशांत वीज चमकते ती पृथ्वीवर धन विद्युत् व ढगांत ऋण विद्युत् ( किंवा याच्या उलट ) यांचा संचार होऊन संयोग झाला म्हणजे चमकते किंवा वीज पडते " असें त्यास आढळून आलें होतें. व याच अनुभवाच्या आधारावर त्यानें विजेची तार बनवली होती. हे प्रयोग करतांना त्याच्या जिवाला धक्का लागला नाहीं हा केवळ नशिबाचाच योग!

या प्रयोगावरून असें दिसून आलें कीं प्रवाहक्षम नसलेल्या झाडावर वीज पडली तर त्याची फार मोडतोड होऊन जाते. पण ती एकाद्या धातूच्या तुकड्यावर पडली तर विजेचा प्रवाह त्यांत जाऊन तेथून तो निघून जातो व अन्यत्र त्याचा धक्का वसत नाहीं. धातूच्या टोकदार पदार्थाकडे वीज अधिक प्रमाणांत आकृष्ट होते हेंही त्याच्या अनुभवास आलें होतें. त्यानें १७५० च्या सुमारास इंग्लंडमधील आपला स्नेही कॉलिन्सन याला लिहिलें कीं, टोकांमध्यें असलेल्या या शक्तीचा उपयोग मनुष्याला घरें देवळें, जहाजें इत्यादींचें विजेपासून संरक्षण करण्याकडे कां होऊं नये ? सुईसारखीं टोकें असलेल्या धातूच्या सळया जर आपण इमारती वगैरेंच्या सर्वांत उंच टोकावर बसविल्या, व त्या गंजू नयेत म्हणून त्यावर सोन्याचा मुलामा केला, व या सळयांच्या दुसऱ्या टोकाला जमिनींत किंवा पाण्यांत जाऊन पोचेल अशी तार बांधली, तर ढगांतून बाहेर पडणारी वीज या टोकांकडे आकृष्ट होईल व त्यांतून निघून जाईल, व त्यामुळें भयंकर अपघात होण्याचें टळेल."

तीन वर्षांनीं प्रसिद्ध झालेल्या आपल्या पंचांगांत त्यानें असें प्रसिद्ध केलें कीं, "ईश्वर माणसांवर प्रसन्न झाला असून त्यानें विजेपासून व वादळापासून घरें व इमारती यांचें संरक्षण करण्याची युक्ति त्यांना दाखवून दिली आहे."

ही वीज सळई लागलीच कायमची व्यवहारांत आली. ह्या शोधामुळें ईश्वराची प्रसन्नता व्यक्त झाली आहे हें कित्येक धर्मश्रेष्ठ लोकांना खरें वाटेना. वादळें आणि वीज हीं ईश्वरी प्रकोपाचीं चिन्हें आहेत अशी त्यांची समजूत होती. ईश्वराच्या लीलांशीं खेळणें हें अत्यंत उद्धटपणाचें आहे असें ते मानीत. पण फ्रँकलिनच्या विज्ञानशाळेवर व इतर अनेक

इमारतींवर ह्या विद्युत् शलाका जेव्हां बसविण्यांत आल्या, तेव्हां, जाणत्या लोकांनीं दैवी देणगी म्हणून या शोधाचें स्वागतच केलें. १७६२ मध्यें डेव्हिड ह्यूम यास लिहिलेल्या पत्रांत फ्रँकलिननें म्हटलें आहे कीं, फिलाडेल्फियांत या सळयांचा आतां सर्वत्र सर्रास उपयोग केला जात आहे. " ह्या सळया लावलेल्या घरांवर विजेचा परिणाम झाल्याचीं तीनच उदाहरणें माझ्या नजरेला आलीं आहेत " असें तो म्हणतो.

फ्रान्समध्यें या विद्युत् शलाकेच्या शोधानें लोकांचें लक्ष विशेषच खेचलें. विजेसंबंधीच्या ज्या शास्त्रीय ज्ञानाच्या आधारावर तें बनविण्यांत आलें होतें, त्या मूळ शास्त्रीय ज्ञानापेक्षांही या शोधामुळें त्याची अधिक प्रसिद्धि झाली. ज्यांना शास्त्रीय ज्ञान समजण्यासारखें नव्हतें त्यांना या पदार्थाचा प्रत्यक्ष उपयोग दिसूं लागला त्यामुळें हें स्वाभाविक होतें.

यांतून इंग्लंडांत एक वाद निघाला. ही सळई टोकदार असावी कीं गोल माथ्याची असावी यावर वाद सुरू झाला. इंग्लंडांतील शास्त्रज्ञ गोल माथ्याची सळई अधिक पसंत करीत व वीज अधिक प्रमाणावर खेचण्याचें तिच्यांत सामर्थ्य आहे असें मानीत. पुढें अमेरिकन क्रांति सुरूं झाल्यानंतर या शास्त्रीय वादाला राजकीय स्वरूप आलें. अमेरिकन शास्त्रज्ञ टोकदार सळयांचे पुरस्कर्ते होते, तर इंग्रज शास्त्रज्ञ गोल माथ्याच्या सळयांचे पुरस्कर्ते होते. त्यामुळें तिसरा जॉर्ज राजा राजकारणांतल्या रागानें गोल माथ्यांच्या सळयांचा पुरस्कर्ता बनला. त्यानें क्यू राजवाड्यावर बसविलेली टोकदार सळई काढून टाकली व गोल माथ्याची बसविली. फ्रँकलिनचा एक मित्र सर जॉन प्रिंगल हा राजवैद्य होता. तो एक दिवस राजाला म्हणाला कीं, फ्रँकलिनचेंच म्हणणें बरोबर आहे. पण राजाला तें पटलें नाहीं. त्यावर प्रिंगल म्हणाला, राज्याच्या मेहेरबानीवर निसर्गाचे नियम बदल नसतात." त्याच्या या उद्गारामुळें राजाची त्यांच्यावर गैरमर्जी झाली व त्याला नोकरींतून बाहेर पडावें लागलें. आणि रॉयल सोसायटीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला !

प्रयोगाकरतां हवी असलेली वीज ढगांतून मिळविण्यासाठीं फ्रँकलिननें कांहीं प्रयोग केले. त्यामुळें त्याचें जीवितही धोक्यांत आलें होतें. विजेच्या

यंत्रांपेक्षां प्रत्यक्ष ढगांतूनच वीज मोठ्या प्रमाणावर मिळूं शकते असें त्यास दिसून आलें होतें. त्यानें आपल्या लीडन जारमध्यें ही वीज भरून घेण्याची युक्ति केली व वादळ चालू असतां घंटा वाजत राहील अशी योजना केली.

फ्रँकलिनचे संशोधनाचे विषय विविध होते. रस्त्यावर लावण्याचे दिवे, चष्मे, वाद्यें, शस्त्रक्रियेचीं उपकरणें, इत्यादि विषयांवर त्यानें प्रयोग केले. फ्रँकलिननें केलेल्या सूचनेवरून रस्त्यांत दिवे लावण्यासंबंधींचा ठराव फिलाडेल्फियानें पास केला; पण लंडनच्या पद्धतीचे गोल दिवे प्रथम लावण्यांत आले ते फ्रँकलिनला पसंत पडले नाहींत. आपलें म्हणणें नमूद करतांना त्यानें म्हटलें आहे कीं,

> " या दिव्यांना खालून हवा मिळत नाहीं. त्यामुळें धूर बाहेर न जातां तो आंतल्या आंत कोंडतो व प्रकाश अंधुक होतो. त्यामुळें काचा रोज पुसाव्या लागतात, व प्रकाश जो मिळावयास हवा तो मुळींच मिळत नाहीं. शिवाय कांचेला धक्का लागला तर ती फुटावयाची भीति. म्हणून मी अशी योजना सुचविली कीं कंदिलाच्या चार बाजूंना चार सपाट काचा बसवाव्यात व वर एक नळकांडें काढून धुराला वाट करून द्यावी. व खालच्या बाजूनें हवा आंत येण्यासाठीं फटी ठेवाव्यात. म्हणजे लंडनमधल्या काचाप्रमाणें आंत धूर कोंडून त्या काळ्या होणार नाहींत. शिवाय धक्का लागला तर एकच काच तेवढी जाईल, सर्वच नाहींशा होणार नाहींत. व फुटलेली दुरुस्तही करतां येईल.

पुढें हे फ्रँकलिन दिवे लावण्यांत आले व आजही फिलाडेल्फियांतील स्वातंत्र्यचौकांत त्याच्या प्रतिकृति स्मरणार्थ उभ्या आहेत.

याचप्रमाणें त्यानें काचेच्या पेल्यांच्या साहाय्यानें एक प्रकारचें जलतरंग वाद्य बनविलें. त्यानें दोन भिंगांचा चष्मा बनविला. तसेंच भावाच्या आजारीपणांत त्याच्या उपयोगासाठीं त्यानें एक कॅथेटर तयार केलें. अमेरिकेंत तसलें कॅथेटर हें पहिलेंच होतें. या संशोधनासंबंधानें व त्याच्या साहाय्यानें नवीन वस्तु बनवण्यासंबंधानें जॉन लायनिंग या आपल्या मित्राला १७५५ मध्यें लिहिलेल्या एका पत्रांत संशोधनासंबंधीं तो म्हणतो :

" कांहीं लोकांत संशोधकबुद्धीचा अभावच असतो. त्यामुळें इतरांमध्यें ती असूं शकते यावर त्यांचा विश्वासच बसत नाहीं. जो कोणी एकादी नवी

योजना मांडील किंवा वस्तु बनवील त्याला ते तोतया समजतात. आपल्या परिचयाचा अमूक तमूक माणूस, तो आपल्यासारखाच आहे असें समजून, तो अधिक काय करणार आहे असें ते म्हणूं लागतात. मत्सर व स्पर्धा यांच्यामुळें दुसऱ्यांच्या संशोधनाला ते किंमत देत नाहींत. व जेव्हां त्याला अन्यत्र सर्वमान्यता मिळूं लागते तेव्हां त्यांचा डौल असा असतो कीं तें सारें आपणच केलें आहे! त्यामुळें कित्येक मोठमोठ्या संशोधनांचें श्रेय या स्पर्धेंत झाकलें जातें. त्या संशोधनापासून फायदा होतोसा दिसूं लागला कीं, त्यावर जो तो आपला हक्क सांगूं लागतो व ती फायद्याची गोष्ट नाहीं असें दिसूं लागतांच संशोधक उपहासाचा व थट्टेचा विषय बनतो."

पण फ्रँकलिनला या समाजकंटकांचा उपद्रव भोवला नाहीं. त्यानें कधीं कशाचें पेटंट घेतलें नाहीं, व एवढें संशोधन करूनही त्याची वृत्ति विनयशील राहिली. त्यामुळें संशोधकांच्या नशिबीं येणाऱ्या आपत्तींपासून तो वांचला. संशोधकावर कोणत्या आपत्ती येतात याचें त्यानें वर्णन केलें असलें तरी त्याचा स्वभावच संशोधकाचा होता व त्यांत त्याचें मन रमत असे. मानवी संशोधनाच्या योगानें जग भविष्यकाळांत अधिक सुखी कसें करतां येईल याचे विचार वयाच्या ८३ व्या वर्षींही त्याच्या डोक्यांत घोळत असत. १७८८ मध्यें रेव्ह. जॉन लॅथरॉप यांस लिहिलेल्या एका पत्रांत त्यानें म्हटलें आहे कीं, " संशोधनामुळें जीवनाच्या विविध क्षेत्रांत, शास्त्रें, नीति, राजकारण, व सर्वसामान्य राहाणी यांच्यांत पुष्कळ सुधारणा झाली असून त्यासाठीं नवनवीं साधनें उपलब्ध होत आहेत. हें पाहिलें म्हणजे मी जर आणखीं दोन तीन शतकांनंतर जन्मास आलों असतों तर बरें झालें असतें असें मला कित्येकदां वाटतें. कारण पुष्कळ नवे शोध लागत आहेत आणि अधिक महत्त्वाचे असे त्या अवधींत लागतील. त्यांचा फायदा मला मिळेल हें तर खरेंच; पण शोध कशा प्रकारचे आहेत हेंही मला कळेल.

एका अर्थानें फ्रँकलिनची ही आकांक्षा पुरी झाली आहे. त्याच्या मनाची उंची पाहिली म्हणजे तो तिच्या मानानें फार आधींच्या काळांत जन्मास आला होता असें म्हणावें लागतें. त्यानें मांडलेले कांहीं शास्त्रीय सिद्धान्त दोन शतकांनंतर मान्यता पावले. आपल्याला तर तो विचारानें, प्रवृत्तीनें व भावप्रकटनाच्या दृष्टीनें अगदीं आपल्याच काळांतल्यासारखा वाटतो.

# १३ – पेनच्या वारसांबरोबर झगडा

आपले शास्त्रीय प्रयोग करण्यास फुरसत मिळावी म्हणून १७४८ सालीं फ्रँकलिन धंद्यांतून निवृत्त झाला; तथापि तें त्याचें स्वप्न अल्पकालीन ठरलें. इंडियन लोकांच्या बरोबर वाटाघाटी करण्यांत तो ओढला गेला आणि नंतर वसाहतीच्या संरक्षणाचीही कामगिरी त्याच्यावर येऊन पडली. त्यामुळें त्याचें हें स्वप्न विरून गेलें. आणि जरी शास्त्रीय संशोधनाची आवड व हौस त्यानें जन्मभर बाळगली तरी १७५४ पासून त्याचा व्यवसाय राजकारण आणि मुत्सद्देगिरी हाच झाला. जरी त्यानें आपला छापखान्याचा व्यवसाय सोडून दिला होता, तरी असेंब्लीचा क्लार्क म्हणून काम करण्याचें त्यानें चालूच ठेविलें होतें व त्यामुळेंच ही कामगिरी त्याच्यावर येऊन पडली. १७५० मध्यें तर प्रांतिक कारभारांत त्यानें इतकें मन घातलें कीं, त्याला त्या संस्थेचा सभासद निवडण्यांत आले. कायद्यांच्या कामांत तो गढून गेला. सार्वजनिक कामाची आपल्यावरील जबाबदारी वाढत असल्याबद्दल त्यानें तक्रार केली आहे; परंतु लौकरच त्यानें असेंब्लींत आपलें महत्त्व प्रस्थापित केलें. या वेळच्या कागदपत्रांवरून असें दिसतें कीं, त्या वेळीं चालू असलेल्या राजकीय वादांत तो रंगून गेला होता. आपल्या अंगीकृत कार्याची बाजू न्यायाची आहे यावर त्याचा पूर्ण विश्वास असल्यानें त्याला त्यांत आनंद आणि अभिमान वाटणें अपरिहार्य होतें.

हें कार्य म्हणजे लोकशाहीचें कार्य होय. जुन्या जगाशीं संबंध तोडून स्वतंत्र होण्याचें हें कार्य होतें. त्या वेळीं कोणाच्याही तें लक्षांत आलें नाहीं. पण याच कार्यासाठीं एक दिवस सर्व वसाहती लढणार होत्या. पेन्सिल्व्हेनियांत किंवा इतर कोठेंही १७५० मध्यें आपल्या आवडत्या इंग्लंडपासून फुटून वेगळें होण्याच्या शक्यतेचा विचारही कोणाच्या डोक्यांत आला नव्हता. तसा कोणी तर्क केला असता तर लोकांना त्या वेळीं धक्का बसला असता. तथापि पेन्सिल्व्हेनियांतील जनता – तिचे असेंब्लींतील लोकप्रतिनिधि – आणि त्या प्रांतावर आपली हुकमत गाजवूं पाहणारे इंग्रज अधिकारी यांच्यांत कित्येक वर्षें सतत धुसफूस चालू असे. वादाच्या बाबी स्थानिक व मर्यादित स्वरूपाच्या असत; परंतु त्या पाहिल्या, आणि त्या बाबतींत फ्रँकलिननें स्वीकारलेलें

कणखर धोरण लक्षांत घेतलें म्हणजे पुढील वादळाचीं तीं पूर्वचिन्हें होतीं हें कळून येतें.

येथील अधिकारी राजाचे प्रतिनिधि नव्हते तर ते वुइल्यम पेन याचे वारस होते. दुसऱ्या चार्लसनें १६८१ मध्यें वुइल्यम पेनच्या बापाकडून घेतलेल्या कर्जाच्या परत फेडींत पेनला हा मोठा भूप्रदेश मालकी हक्कानें देऊन टाकला. त्याला पेन्सिल्व्हेनिया असें नांव मुद्दाम दिलें. पेननें तेथें लगेच चांगला कारभार चालू केला व त्या प्रांतासाठीं सौम्य स्वरूपाचे कायदेही बनविले. इंग्लंडमध्यें छळ झाल्यामुळें इकडे येणाऱ्या क्वेकर लोकांसाठीं ही भूमि मुख्यत: राखून ठेवण्यांत आली होती. 'पेनचा एक पवित्र प्रयोग' म्हणून ही योजना समजली जात असे. लोकमतानुसार निवडून दिल्या जाणाऱ्या असेंब्लीला व कौन्सिलला पुष्कळ अधिकार दिलेले होते. तथापि या मिळकतीचे मालक जे पेन त्यांच्या प्रतिनिधींना अखेरचे निर्णायक अधिकार असत. माणसांच्या सद्भावनेवर उभारलेली पेन याची ही योजना फार दिवस टिकूं शकली नाहीं. पेन्सिल्व्हेनियांत अनिष्ट लोकांची आवक वाढली व १७०० सालानंतर तर सरकार कमीकमी लोकशाहीप्रवण बनूं लागलें. कायदे कडक झाले. गव्हर्नर लहरी बनूं लागले, आणि आर्थिक कायदे करतांना न्याय नाहींसा होऊं लागला. पुढें पेनच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसांकडे कारभार आला. तेव्हांपासून तर तो मध्यम स्थितींतल्या व्यापारी पेशाच्या लोकांना — ज्यांचा फ्रँकलिन प्रतिनिधि होता — तो असह्य होऊं लागला.

आतां लोकप्रतिनिधींचें कौन्सिल रद्दच करून टाकण्यांत आलें होतें. विधिमंडळाची फक्त एकच शाखा असेंब्ली तेवढी चालू होती. कौन्सिलच्या जागीं गव्हर्नरला सल्ला देणारें व त्याच्या नियंत्रणाखालीं चालणारें एक प्रिव्ही कौन्सिल निर्माण करण्यांत आलें होतें.

गव्हर्नर गैरहजर असला,— व तो वारंवार गैरहजर असे, — म्हणजे त्याची जागा हें कौंसिल घेई. गव्हर्नर व त्याचें हें कौंसिल हे मालकांची बाजू घेत, व असेंब्लीची सत्ता मर्यादित करण्याचा सतत प्रयत्न करीत. स्वत: मालक इंग्लंडांत राहात. ते पेन्सिल्व्हेनियांत राहात नसत. गव्हर्नरकडून त्यांना वसाहतींतील कारभारासंबंधीची काय ती माहिती मिळे व त्याजवरच ते तेथील कारभाराबाबत अवलंबून असत.

फ्रँकलिनची मालकांसंबंधानें जी समजूत झाली होती तिच्यापेक्षां ते पुष्कळ चांगले असल्याचें अलीकडे झालेल्या संशोधनावरून आढळून आलें आहे. त्यांना बरेंच कर्ज होतें, व कर्जवसुलीच्या बाबतींत त्यांना फार त्रास होत असे. लोक ठरलेलें देणें देत नसत आणि त्यांची अशी थोडी जमीन होती. पण फ्रँकलिनचा विरोध नालायक पिढीजात उमरावशाहीलाच होता. पेनला प्रथम दिलेल्या सनदांशीं व ब्रिटिश घटनेशीं विरोधी अशा रीतीनें वसाहत-वाल्यांवर बेलगामी सत्ता चालविण्यास त्याचा विरोध होता. फ्रँकलिन पिढीजात सत्ता फक्त एकच मानी, व ती म्हणजे राजाची. इंग्लंडच्या उमराव सभेसंबंधानें बोलतांना तो एकदां म्हणाला कीं गणिताचे पिढीजात प्रोफेसर असणें हें यापेक्षां अधिक बरें! निदान त्यांच्या हातून खोडसाळपणा होण्याचा संभव कमी!

१७५० च्या प्रारंभीं फ्रेंच व इंडियन यांच्या हल्ल्यांची भीति वाढत होती व पेन्सिल्व्हेनियांतील लोकांची त्या वेळचे मालक थॉमस व रिचर्ड पेन यांच्या विरुद्ध मुख्य तक्रार ते संरक्षणासाठीं पुरेसा पैसा उभा करूं देईनात ही होती. सगळ्या प्रांतांचें रक्षण करण्यासाठीं लागणारा सर्व पैसा त्यांनीं द्यावा अशी कोणाचीच अपेक्षा नव्हती. प्रांताच्या एकंदर उत्पन्नांतूनच तो पैसा उभा राहावयास हवा होता. पण मालकांच्या ज्या मोठ्या जमिनी होत्या त्यांवर ते कर बसवूं देण्यास तयार होईनात. या जमिनी वगळल्या तर इतरांकडून मिळणारा पैसा हा लष्कर व दारूगोळा यांच्या खर्चाला फारच तोकडा पडत होता. या सर्व धामधुमीच्या काळांत लोकसभेनें सर्व पवित्र प्रदेशांवर कर बसविण्याचे वेळोवेळीं ठराव केले. परंतु गव्हर्नर ते सर्व ठराव असंमत करून परत पाठवी. अखेर १७५६ मध्यें लोकसभेनें इंग्लंडला एक कमिशन पाठविण्याचें व मालकांच्या सूचनांवरून निर्माण झालेल्या तक्रारी दूर करून घेण्याचें ठरविलें. या कामावर बेंजामिन फ्रँकलिन व आयझॅक नॉरिस यांची नेमणूक झाली. पण प्रकृतीच्या कारणास्तव नॉरिसनें जाण्यास नकार दर्शविला. त्यामुळें ही सर्व कामगिरी एकट्या फ्रँकलिनवरच पडली.

या वेळीं फ्रँकलिन सर्व वसाहतींकरतां जॉइंट डेप्यूटी पोस्टमास्तर जनरल होता. त्या वेळेपर्यंत त्यानें विजेसंबंधाचे आपले विशेष महत्त्वाचे प्रयोग पूर्ण केले होते; व त्याबद्दल लंडनच्या रॉयल सोसायटीनें त्याला १७५३ सालीं कॉपली पदक बहाल केलें होतें; आणि इंग्लंडांत शिष्टाई करण्याच्या

कामगिरीवर त्याची नेमणूक झाली त्याच वर्षी त्याला रॉयल सोसायटीचें सभासद होण्याचाही बहुमान प्राप्त झाला होता. हारवर्ड, येल, व कॉलेज ऑफ वुइल्यम व मेरी यांनीं त्याला सन्मान्य पदव्याही दिल्या होत्या. प्रांताच्या हत्यारबंद सैन्यांत त्यानें क्वार्टर मास्टर व कर्नल म्हणून कामगिरीही बजावली होती. सारांश सुधारलेल्या म्हणून समजल्या जाणाऱ्या त्या वेळच्या जगतांत त्याची कीर्ति सर्वत्र पसरली होती. त्याचें वय या वेळीं ५१ वर्षांचें होतें.

तो जूलै १७५७ मध्यें लंडनला जाऊन पोचला. त्यानें आपला मुलगा वुइल्यम यासही बरोबर नेलें होतें. वुइल्यमचें वय या वेळीं २६ वर्षांचें होतें. क्रेव्हन रस्त्यावरील एका पथिकाश्रमांत तो जाऊन राहिला. तेथें त्यानें घालविलेला काळ हा त्याच्या आयुष्यांतील उत्तम काळ ठरला. त्यानें बरोबर आपल्या पत्नीस नेलें नव्हतें हें खरें; पण प्रवासाची दगदग नको म्हणून ती स्वतःच आली नव्हती. हजार कामें त्याच्या मागें असत, व अतिशय हौशी, संपन्न व रंगेल अशा समाजांत वारंवार जाण्याचा त्याला प्रसंग येई. त्यांतूनही त्याला आपल्या बायकोची गैरहजरी थोडी बहुत जाणवे. या काळांत त्यानें पत्नीला लिहिलेलीं पत्रें अतिशय प्रेमपूर्ण अशीं आहेत.

पेन्सिल्व्हेनियाचे मालकांबरोबर त्याच्या भेटी व बोलणीं फार लांबलीं व रेंगाळलीं. मध्यंतरीं मालकांच्या वतीनें बोलणाऱ्या उद्धट, उर्मट व विरोधी वृत्तीच्या लोकांशीं त्याचे खटकेही उडाले. पुढें पेनच्या या वकिलाबरोबर बोलण्यास फ्रँकलिननें नकार दिला व खुद्द मालकांपुढेंच आपली तक्रार मांडण्याचा आग्रह धरला. शेवटीं मालकांनीं त्याची भेट घेतली व उत्तर देण्याला वर्ष लावलें, आणि त्यांनीं जें उत्तर पाठविलें तें फ्रँकलिनला न पाठवितां परस्पर पेन्सिल्व्हेनियाच्या लोकसभेकडे पाठविलें.

टॉमस पेन याच्यासंबंधानें मत नमूद करतांना फ्रॅंकलिनची मूळची शांतवृत्ति ढळली आहे. त्यानें पेन संबंधानें कडक शब्दांत लिहिलें आहे. मालकाबरोबर झालेल्या एका भाषणाचा वृत्तान्त निवेदन करतांना तो म्हणतो:

"विजयाच्या हसऱ्या पण उर्मट मुद्रेनें, एकाद्या शर्यतीच्या घोड्यांवरील स्वारानें, गिऱ्हाइकानें फसवणुकीची तक्रार केली तर जसें बोलावें तशा आढ्यतेनें पेन बोलला. आजपर्यंत कोणाही माणसाबद्दल वाटला नाहीं इतका त्याच्याबद्दल मला तिटकारा वाटला. मला जें वाटलें तें शब्दानें लिहितां येत नाहीं.

हें एक प्रकरण सोडलें, व या काळांत तो एकदां बराच आजारी पडला तें सोडलें, तर त्याचा इंग्लंडांतील काळ फारच सुखाचा गेला. तो मार्गारेट स्टीव्हनसन या नांवाच्या एका विधवा स्त्रीच्या घरांत राहात असे; व तिच्याबद्दल त्याच्या मनांत गाढ स्नेहबुद्धि निर्माण झाली होती. तिची लहान मुलगी मेरी हिचा तर तो पालकच बनला. त्यानें तिला तत्त्वज्ञानाचे पाठ द्यायचें ठरवलें. पुढें तिचा आणि त्याचा जो पत्रव्यवहार झाला तो फ्रँकलिनच्या लेखनांतला उत्कृष्ट भाग आहे. त्याच्या आयुष्याच्या उत्तर कालांत स्त्रियांना त्याच्यासंबंधीं जें विलक्षण आकर्षण वाटूं लागलें होतें त्याचें स्वरूप या स्त्रियांशीं झालेल्या स्नेहसंबंधांत दिसून येतें. लंडनमध्यें असतांना मेरी स्टीव्हनसन व ऱ्होड आयलंड येथें असतांना कॅथेराईन रे यांच्याशीं त्याचा परिचय झाला तेव्हां त्यांच्या मनांत फ्रँकलिनच्या संबंधानें निर्माण झालेला पूज्यभाव जन्मभर राहिला व अशा पुरुषाचा नित्य सहवास घडावा अशी इच्छा त्याच्या समवयस्क स्त्रियांमध्यें निर्माण झाली.

ज्या मंडळींबरोबर त्याचा अनेक वर्षांपासून पत्रव्यवहार चालू होता, अशा लोकांशीं त्याच्या या वेळीं गाठीभेटी झाल्या. त्याचीं शास्त्रीय विषया-वरील पत्रें पीटर कॉलिन्सन यानें प्रसिद्ध केलीं होतींच. त्यानें फ्रँकलिनचें विशेष स्वागत केलें. तसेंच वुइल्यम स्ट्रॅहन यानेंही फ्रँकलिनचा विशेष गौरव केला. डेबोराला लिहिलेल्या एका पत्रांत स्ट्रॅहन लिहितो : ज्याच्याशीं माझें सर्व बाबतींत तंतोतंत जुळलें असा माणूस मी आतांपर्यंत पाहिला नव्हता. कोणी एका बाबतींत सारख्या मताचा असे, तर कोणी दुसऱ्या बाबतींत; पण फ्रँकलिनशीं मात्र माझें सर्वच बाबतींत तंतोतंत जुळलें. जॉन फॉदरजिल आणि जोसेफ प्रीस्टली यांनीं फ्रँकलिनच्या विजेच्या प्रयोगाचें अनुकरण केलें होतें; त्यांनीही फ्रँकलिनशीं मैत्री जोडली. वुइल्यम हाही आपल्या रुबाबदार वागणुकीमुळें लंडनमधील समाजांत अनेकांचा आवडता

झाला होता. बेंजामिनच्या या वेळच्या व्यवस्थित ठेवलेल्या जमाखर्चाच्या वह्यांवरून असें दिसतें कीं, त्याची या वेळची राहणी बरीच खर्चीक होती. त्यानें दोन नोकर ठेविले होते. एक भाड्याची गाडी घेतली होती, व एक गाडीवान ठेवला होता. हा सरंजाम सतत त्याच्या सेवेला हजर असे, इंग्लंडला आल्याबरोबरचें त्याचें शिंप्याचेंच बिल ४५ पौंडांचें झाल्याचें दिसून येतें. त्याशिवाय त्याच वर्षांत आणखी २८ पौंड १२ शिलिंग खर्ची पडले आहेत. डोक्यावरच्या केसांच्या टोपाला १०॥ पौंड पडल्याची नोंद आहे. त्याशिवाय बुटांचे आणि गुडघ्याचे चांदीचे बकल, तरवार, इत्यादींवर झालेला खर्च पाहिला म्हणजे त्याची साधी व काटकसरीची राहणी त्या वेळीं विस्मृतींत गडप झाली होती कीं काय असेंच वाटेल.

त्यानें आपल्या पत्नीला पाठविलेल्या पत्रांवरून, त्यानें इंग्लडहून घरीं अनेक वस्तु घेऊन पाठविल्या असें दिसतें. चिनी मातीचीं भांडीं, चांदीच्या प्लेटस् वगैरे, ब्लँकेटें, चादरी, खिडक्यांच्या पडद्यांचें कापड, पोशाखासाठीं कापड, काचसामान सॅलीसाठीं पुस्तकें अशा अनेक प्रकारच्या वस्तूंचा त्यांत उल्लेख आहे. तो ज्या कामासाठीं आला होता त्याला फार दिरंगाई लागल्यामुळें मध्यंतरीं तो हॉलंड आणि स्कॉटलंडलाही जाऊन आला. तसेंच केंब्रिजला जाऊन तेथेंही त्यानें आपले शास्त्रीय प्रयोग करून दाखविले. फ्रँकलिन कुटुंबाचें इंग्लंडमधील मूळ गांव जें एक्टन त्यालाही त्यानें भेट दिली. १७५९ मध्यें सेंट अँड्र्यूज विद्यापीठानें त्याला डॉक्टर ऑफ लॉज ही पदवी दिली व तीन वर्षांनीं ऑक्सफर्ड विद्यापीठानें त्याला डॉक्टर ऑफ सिव्हिल लॉज व त्याच्या मुलाला एम. ए. ही पदवी मोठ्या समारंभानें एकाच वेळीं अर्पण केली.

बेंजामिनच्या ज्या प्रकारच्या असमंजस कृत्यांतून वुइल्यमचा जन्म झाला होता, तेंच १७६० मध्यें वुइल्यमनें केलें. त्याला मुलगा झाला. त्याच्या आईचें नांव आजतागायत अज्ञात आहे. या मुलाचें नांव वुइल्यम टेंपल फ्रँकलिन असें ठेवण्यांत आलें. पुढें हा मुलगा मोठा झाल्यावर, त्याच्या आजोबानें जितक्या शांतपणें वुइल्यमचा स्वीकार केला होता, तितक्याच शांतपणें त्याचाही स्वीकार केला; व हा पोरगा शेवटीं आपल्या आजोबाचा लाडकाही झाला.

त्याची कामगिरी पुरी होण्यास पांच वर्षें लागलीं. प्रिव्ही कौंसिलपुढें पुष्कळ दिवस काम चाललें व मालकांबरोबरही खूप कडव्या झटापटी झाल्या. शेवटीं एका अटीवर पेन्सिल्व्हेनियांतील पेनच्या मालमत्तेवर कर वसविण्यास राजानें परवानगी दिली. अट अशी कीं, कराची आकारणी प्रामाणिकपणानें केली जाईल व राज्यांतील इतर मालमत्तेवरच्या करा-प्रमाणेंच ती असेल, याबद्दल स्वत: फ्रँकलिननें हमी द्यावी. अशा रीतीनें या वादावादींतील पहिली लढाई लोकसभेच्या बाजूनें फ्रँकलिननें जिंकली, व लंडनमधील अनेक मित्रांचा सद्‌गदित अंतःकरणानें व प्रेमपूर्ण निरोप घेऊन तो परत घरीं गेला.

तो फिलाडेल्फियाला पोचला तेव्हां पॅरिसचा तह होऊन सप्तवार्षिक युद्ध नुकतेंच समाप्त झालें होतें. पिटच्या मंत्रिमंडळाच्या कारकीर्दींत सेनापति वुल्फ यानें फ्रान्सचा धुव्वा उडविल्यामुळें संबंध कॅनडा व मिसिसिपी नदीच्या पश्चिमेकडील सर्व प्रदेश ब्रिटिश साम्राज्यांत समाविष्ट झाला होता. या विजयाचा फ्रँकलिनला फार आनंद झाला. या वेळीं तो ब्रिटनचा मोठा अभिमानी होता व तिसऱ्या जार्ज राजाबद्दल त्याची निष्ठा होती. त्याच्या राज्यारोहणानिमित्त १७६१ मध्यें त्यानें लिहिलें कीं, त्याचे गुण व आपल्या प्रजेला सुखी करण्याची त्याची प्रामाणिक इच्छा यामुळें त्याच्या राज्याला बळकटी व स्थैर्य प्राप्त होईल.

याच वर्षी फेब्रुवारींत त्याचा मुलगा वुइल्यम याची न्यू जर्सीचा गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली. तो लंडनमध्यें मागें राहिला होता, तो तिकडे गेला. पण पॅरिसच्या तहानें पेन्सिल्व्हेनियाला विशेष शांतता लाभली नाहीं. फ्रान्सनें तह करतांना जे इंडियन लोक फ्रेंचांच्या बाजूनें लढत होते, त्यांच्याशीं कांहीं विचारविनिमय केला नाहीं. त्यामुळें त्यांनीं पॅरिसच्या तहाला मान्यता दिली नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, पश्चिमेकडील हजार मैलांच्या सीमेवर जिकडे तिकडे दंगेधोपे उसळले. त्याची प्रतिक्रिया पेन्सिल्व्हेनियांतही घडून आली आणि मित्रत्वानें वागणाऱ्या अनेक इंडियन लोकांची दंगेखोर जमावानें कत्तलही केली. फ्रँकलिननें या अत्याचारांना विरोध केला. परंतु घाबरून गेलेल्या गव्हर्नरकडून त्याला पाठिंबा मिळाला नाहीं. एवढेंच नव्हे तर त्यानें या कत्तलींना उत्तेजन दिलें, व जो कोणी

इंडियन लोकांचीं मुंडकीं आणून देईल त्याला बक्षिसें जाहीर केलीं. त्यामुळें लोकांत दोन पक्ष पडले. एकानें गव्हर्नर व मालक यांची बाजू उचलली व दुसऱ्यानें लोकसभा व फ्रँकलिन यांना पाठिंबा दिला. खूप राजकीय वाद झाला व अनेक उखाळ्या पाखाळ्या काढण्यांत आल्या. त्यामुळें फ्रँकलिनची लोकसभेंतील जागा गेली. निवडणुकीच्या वेळीं फ्रँकलिनच्या एका शत्रूनें त्याचा मुलगा वुइल्यम याचा जन्म कसा झाला यासंबंधींचें एक पत्रक प्रसिद्ध केलें. त्यांत फ्रँकलिनच्या घरीं नोकरीला असलेल्या बार्बारा नांवाच्या एका मोलकरणीपासून वुइल्यम झाला व पुढें त्या बाईला मोठ्या दारिद्र्यांत व अपमानांत जन्म काढावा लागला असें म्हटलें होतें.

तथापि फ्रँकलिनचा पराभव झाला तरी लोकसभेंत त्याच्या बाजूला बहुमत होतें. आणि पेन याच्या दुबळ्या व धोकेबाज कारभाराबाबत दिवसेंदिवस कडवटपणा वाढत गेला. शेवटीं पेन्सिल्व्हेनिया ही खाजगी इस्टेट न ठेवतां ती एक वसाहत आहे असें राजानें जाहीर करावें यासाठीं राजाकडे एक शिष्टमंडळ पाठविण्याचें ठरलें आणि याही वेळीं ही कामगिरी फ्रँकलिनकडेच सोपविण्यांत आली. त्याप्रमाणें तो १७६४ मध्यें परत इंग्लंडला गेला.

इंग्लंडला जाण्यांत त्यालाही आनंद होता. ब्रिटिश साम्राज्याला नुकत्याच मिळालेल्या विजयानें तो मोठ्या खुशींत होता. तरुण राजाकडे मोठ्या विश्वासानें आणि निष्ठेनें तो पहात होता. पुन्हां इंग्लंडांतील जुने मित्र भेटतील याचाही त्याला आनंद होता. मात्र तो जरी दूरदर्शी होता तरी पुढील दहा वर्षांत त्याच्या मनांत व अंतःकरणांत जी विचारक्रांति झाली तिची चाहूल कांहीं त्याला त्या वेळीं लागली नाहीं.

---

## १४ – मुत्सद्दी

पेन्सिल्व्हेनियाची वसाहत खाजगींतून काढून सरकारी करण्यांत यावी यासंबंधाचा अर्ज अखेरपर्यंत वर पोचलाच नाहीं. फ्रँकलिन लंडनला पोचल्यावर त्याला दुसरेंच एक काम आधीं हातीं घ्यावें लागलें. पार्लमेंटनें वसाहतींवर कर बसविण्याचा कायदा करण्याचें योजिलें होतें व त्या कायद्याविरुद्ध पेन्सिल्व्हेनियाच्या लोकसभेनें निषेधपर खलिता पाठविला

होता. हा खलिता पार्लमेंटला सादर करण्यांत यावा अशीही फ्रँकलिनला सूचना करण्यांत आली होती. लंडनमध्यें असतांना या प्रकारच्या कायद्याला पार्लमेंटचे अनेक सभासद अनुकूल असल्याचें त्याला आढळून आलें. तो पास होणार हेंही ठरल्यासारखें होतें. म्हणून त्यानें पेन्सिल्व्हेनियाचें निषेधपत्र ताबडतोब सादर केलें व आपल्या म्हणण्याची त्याला पुष्टि जोडली. पण अशा प्रकारच्या अभूतपूर्व कृत्यामुळें ब्रिटन व त्याच्या उत्तर अमेरिकेंतील वसाहती यांच्या परस्परसंबंधांत क्रांतिकारक बदल घडून येईल असें खुद्द फ्रँकलिनला सुद्धां त्या वेळीं वाटलें नाहीं.

कायदा बनविण्याची तयारी वर्षभर चालू होती. १७६४ सालीं पंत-प्रधान जॉर्ज ग्रेनव्हिल यानें तो सुचविला होता, व अमेरिकेंतील आपल्या वसाहतींना त्या संबंधानें काय वाटतें या संबंधाची माहिती मिळवून कळविण्याबद्दल त्यांनीं सरकारच्या तेथील प्रतिनिधींना कळविलें होतें. या कायद्यांतील तरतुदी न पाहतां केवळ तात्त्विक भूमिकेवरूनच वसाहतींनीं त्याला आपला विरोध दर्शविला होता. आतां या कायद्यांतील तरतुदी जेव्हां फ्रँकलिननें पाहिल्या तेव्हां त्या अपेक्षेबाहेर कडक असल्याचें त्याला आढळून आलें.

या विधेयकांत सर्व कायदेशीर कागदपत्रांना सरकारी स्टँप लावण्याची तरतूद करण्यांत आली होती. इंग्रज सरकारच्या प्रतिनिधींकडून हे स्टँप घ्यावयाचे, व सर्व प्रकारचे कायदेशीर कागदपत्र, परवाने, नेमणुका, देणग्या, बिलें, वर्तमानपत्रें, जाहिराती, पंचांगें, दिनदर्शकें, किंबहुना खेळ-ण्याचे पत्ते व फासे या सर्वांना ते लावावयाचे अशी ही योजना होती.

यापूर्वीं कधींही पार्लमेंटनें वसाहतींवर कर बसविला नव्हता. वसाहतींत जो कर बसविला जाई तो त्या त्या भागांतील लोकसभांनीं मंजूर केलेला असे. जो काय कर बसवायचा तो त्यांच्या संमतीनेंच बसविला गेला पाहिजे हा इंग्रजांचा पूर्वापार प्रस्थापित झालेला हक्क होता. त्यामुळें प्रश्न असा निर्माण झाला कीं वसाहतींच्या रहिवाशांना इंग्रज समजावें कीं नाहीं ? वसाहतवाले स्वतःस इंग्रज समजत व इंग्रजांना सर्वत्र असणारें स्वातंत्र्य व हक्क वसाहतींतील इंग्रजांनाही असलेंच पाहिजेत असा त्यांचा दावा होता. त्यांनीं एका शतकाहून अधिक काळपर्यंत साम्राज्याचा विस्तार व संपन्नता

वाढविण्याच्या कामीं श्रम केले होते. अशी परिस्थिति असतांना मूळ देशांतील मुत्सद्द्यांनीं व कायदे करणारांनीं वसाहतींतील लोकांना परके, अंकित समजावयाचें ठरविलें कीं काय ?

पार्लमेंटच्या लोकसभेंत व मंत्रिमंडळांतही वसाहतींच्या संबंधांत ही परकेपणाची, त्या अंकित असल्याची भावना असल्याचें फ्रँकलिनला स्पष्टपणें दिसून आलें. याला कांहीं ठळक अपवाद होते. एडमंड बर्क, वुइल्यम पिट, लॉर्ड शेलबर्न व इतर कांहीं मंडळींना वसाहतींतील लोकांचा दृष्टिकोन समजला होता व त्याला त्यांचा पाठिंबाही होता. पण पिट आजारी होता. बर्कच्या हातीं सत्ता नव्हती, व कर बसवा म्हणून बहुमताची मागणी होती. नुकत्याच झालेल्या लढाईंत वसाहतींच्या संरक्षणासाठीं जो खर्च आला तो भागविण्यासाठीं वसाहतींनीं पैसा दिला पाहिजे असें त्यांचें म्हणणें होतें. शेवटीं १७६५ च्या मार्च महिन्यांत स्टँप अ‍ॅक्ट पास झाला. अगदीं कांहीं थोड्यांनीं फक्त आपलें विरोधी मत नोंदविलें

या घटनेचे परिणाम काय होणार आहेत याची फ्रँकलिनलाही पुरी कल्पना आली नाहीं. एक अटळ गोष्ट म्हणून ती त्यानें पतकरली. अमेरिकेंतील लोकांशीं विचारविनिमय करणें दूर अंतरामुळें त्यास शक्य नव्हतें. या कराची लाट परतविण्याची वेळही तो येण्यापूर्वीच निघून गेली होती. तो पोस्टमास्तरच्या अधिकारपदावर या वेळीं होता; म्हणून त्यानें आपल्या पेन्सिल्व्हेनिया प्रांतांत तिकीटें विकण्यासाठीं एका इसमाची नेमणूक केली, व वाटाघाटींच्या मार्गानें ह्या कायदा रद्द करून घेण्यासाठीं प्रयत्न करण्याचें ठरविलें.

या कराची बातमी १७६५ मध्यें अमेरिकेंत हळूहळू पसरली, आणि नंतर या कायद्याविरुद्ध अमेरिकेंतील लोकमत किती प्रक्षुब्ध झालें याची फ्रँकलिनला किंवा इंग्लंडांतील कोणालाही पुरेशी कल्पना येईतों उन्हाळा संपत आला. न्यू इंग्लंडपासून जॉर्जियापर्यंत सर्वत्र दंगे उसळले होते. लोकांनीं सरकारी स्टॅम्प विकत घेण्याचें तर नाकारलेंच, पण त्यांनीं ते हिसकून घेतले व जाळून टाकले. ते विकण्याचें काम करणारांना लोकांनीं ठोकून काढलें व त्यांचा छळ करण्यास सुरवात केली. बॉस्टनमधील ले. गव्हर्नरचें घर लोकांनीं उद्ध्वस्त केलें, कनेक्टिकटमध्यें स्टॅम्प विकणाराला मारण्यांत

आलें. पेन्सिल्व्हेनियांत स्टॅंप विकण्याकरितां फ्रँकलिननें जॉन ह्यूज याला नेमिलें होतें, त्याला ती नोकरी सोडून द्यावी लागली. द. कॅरोलायनामध्यें स्टॅम्प विकणारांना पळून जाऊन लपावें लागलें. न्यूयार्कमध्यें मोठाच दंगा झाला व लोकांनीं गव्हर्नरचा पुतळा करून जाळला. लोकमत इतकें भडकलें होतें कीं, या कायद्याकडे कानाडोळा केल्याचा त्यांनीं फ्रँकलिनवर देखील आरोप केला.

या योगानें अमेरिकेच्या इतिहासांत पहिल्या प्रथमच सर्व वसाहतींची एकजूट घडून आली. परस्परांमधील मत्सर, वैर व अविश्वास, सर्व एका रात्रींत नष्ट झालें. लोकांवरील संकट समान होतें व देशभक्तीची भावना केवळ एकाद्या वसाहतीपुरती मर्यादित न राहतां सबंध अमेरिकेबद्दलच एकात्म राष्ट्रीयभावना त्यांच्या ठिकाणीं जागृत झाली होती. ऑक्टोबरमध्यें न्यूयॉर्क येथें स्टॅंप ॲक्ट विरोधी कॉंग्रेसचें मोठें अधिवेशन भरविण्यांत आलें. त्याला सर्व वसाहतींनीं आपला पाठिंबा व्यक्त केला व आपले प्रतिनिधि पाठविले. या परिषदेंत राजाला, मंत्रिमंडळाला व पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांना निवेदन पाठविण्याचें ठरलें, आणि त्याचा मसुदाही तयार करण्यांत आला. त्यांत शब्द तोलून वापरले होते आणि भाषा संयमपूर्ण, पण निश्चयात्मक व असंदिग्ध अशी होती.

प्रतिनिधित्वाशिवाय कर बसविणें आपल्याला मान्य नाहीं या तत्त्वाचा अधिकृत निवेदनांत पुरस्कार करण्यांत आलेला होता. पण केवळ या तात्त्विक मुद्द्यावर भर देऊन भागणार नाहीं हें लंडनमधील वास्तव्याच्या काळांत फ्रँकलिनच्या ध्यानांत आलें होतें. पार्लमेंटचें सारें लक्ष काम साधण्याकडे होतें, तत्त्वाकडे नव्हतें. तेव्हां वसाहतींतून आलेल्या एका बातमीवर भर देण्याचें फ्रँकलिननें योजिलें. ती उपयोगी पडेल व व्यवहार्य ठरेल असेंही त्यास वाटलें. ब्रिटिश मालावर बहिष्कार घालण्यांत सर्व वसाहती एक होऊं लागल्या होत्या. आपल्याला लागणारें कापड वसाहतींतच काढावयाचें, आपली लोकर, कापूस, ताग आपला आपण उत्पन्न करावयाचा याला सुरवात झाली; हातसुताचें कापड वापरणें भूषणाचें झालें, व इंग्लंडच्या कापडावर बहिष्कार पडला. हें लक्षांत घेऊन लंडनच्या वर्तमानपत्रांतून फ्रँकलिननें प्रचार सुरू केला. या चळवळीमुळें अमेरिका स्वयंपूर्ण बनेल व लंडनच्या व्यापाऱ्यांचा वसाहतींतील

व्यापार बसेल असें तो सांगू लागला. अमेरिकेंतील लोकांनीं चहा सोडला, तेव्हां त्यांना तो बळजबरीनें पाजला पाहिजे असें म्हणणारांना उद्देशून त्यानें लिहिलें.

"अमेरिकेंत आतां जें सैन्य पाठविण्यांत येणार आहे तें लोकांच्या इच्छेविरुद्ध त्यांना एक थेंबभर तरी अधिक चहा पाजूं शकेल काय? एक माणूस घोडा पाण्यावर नेऊं शकेल, पण दहा आले तरी ते त्याला पाणी पिण्यास भाग पाडूं शकणार नाहींत."

दुसऱ्या एका पत्रांत अमेरिकेंतील लोक सकाळच्या न्याहारीच्या वेळीं चहाऐवजीं दुसरीं कोणतीं पेयें घेऊं लागले याचीही माहिती त्यानें प्रसिद्ध केली.

त्याचा हा प्रचार सुरू झाला, त्याच वेळेला लंडनमधील व्यापाऱ्यांनाही बहिष्काराचा चटका जाणवूं लागला होता. हिवाळ्यांत इंग्लंडहून अमेरिकेकडे फार मोठ्या प्रमाणांत मालाची उलाढाल होत असे. पण ती या वेळीं अजिबात बंद पडली होती. त्यामुळें उद्योगधंदे थांबले व हजारो लोक बेकार बनून रस्त्यांतून हिंडू लागले. काम बंद पडल्यामुळें बेकार झालेले कामगार पार्लमेंटच्या सभागृहासमोर निदर्शनें करूं लागले. नवीन वर्ष सुरू झालें त्या वेळेपर्यंत फ्रँकलिननें व्यापारी व्यवसायांतील लोकांशीं व लोकसभेंतल्या त्यांच्या वजनदार प्रतिनिधींशीं मैत्री जोडली होती.

जानेवारींत वुइल्यम पिट याचें ऐतिहासिक महत्त्वाचें भाषण पार्लमेंटांत झालें. या भाषणांत त्यानें स्टँप ॲक्टाचें वर्णन " दुर्दैवी, अन्याय्य व घटनाविरोधी " असें केलें व वसाहतींतील लोक इंग्रज आहेत या भूमिकेवरून त्यांच्या हक्काचा जोरदार पुरस्कार केला. फेब्रुवारींत, लोकसभागृहापुढें जबाब देण्यास फ्रँकलिनला पाचारण करण्यांत आलें. अमेरिकेच्या इतिहासांत पिटचें भाषण एक संस्मरणीय व सर्वमान्य वक्तव्य म्हणून नमूद आहे. पण त्या वेळच्या पार्लमेंटच्या सभासदांवर पिटच्या भाषणाचा परिणाम झाला नाहीं. त्या मानानें फ्रँकलिनची साक्ष लोकमताचा प्रवाह बदलण्यास अधिक उपयोगी पडली. ही साक्ष अतिशय मुत्सद्देगिरीची, व्यवहारी धोरणाची, योग्य वेळीं दिलेली, व आधीं ठरवून, योजून तयार केलेली अशी होती. कुशल मुत्सद्देगिरीचा तो एक नमुना होता.

आपल्याला कोणते प्रश्न विचारण्यांत येणार आहेत याची फ्रँकलिनला आधींच कल्पना होती. प्रश्न विचारणारांशीं त्याचें आधीं बोलणें झालेलें होतें. हे लोक व्यापारी लोकांचे मित्र झालेले होते. फ्रँकलिन कांहीं कमी अधिक बोलला तरी त्याकडे दुर्लक्ष करावयाचें असें आधींच त्यांच्यांत ठरलेंही होतें. कांहीं प्रश्न विरोधक विचारतील व त्यांना तेथल्या तेथें आयत्या वेळीं जबाब द्यावा लागेल हें स्पष्ट होतें. त्यासाठीं त्यानें खूप परिश्रमपूर्वक तयारी केली होती. कोणत्याही प्रश्नाला उत्तर देण्याची आतां त्याची सिद्धता होती.

आधीं ठरविलेलीं व आयत्या वेळीं त्यानें दिलेलीं उत्तरें पाहिलीं म्हणजे या कायद्याचा त्यानें किती कसून अभ्यास केला होता हें दिसून येतें. स्टँप वाटण्यांतील अडचणी, लोक दूर दूर पसरलेले, त्यांचें दारिद्र्य व त्यांचीं दुःखें, या कायद्याला अमेरिकेंत होणारा सार्वत्रिक विरोध, बहिष्काराची व्यापकता व तीव्रता, वसाहतींतील अमर्याद सुप्त सामर्थ्य, इंग्लंडांतून कांहींही न आणतां हवा तितका काळ स्वावलंबनानें राहूं शकण्याची शक्यता, व्यापार घटल्यामुळें इंग्लंडवर होणारा परिणाम, या सर्वांचीं त्यानें यथातथ्य कल्पना करून दिली व "सोन्याचीं अंडीं घालणारी ही कोंबडी आपण मारीत आहां" असें बजावलें.

शेवटीं १७६६ च्या मार्चमध्यें हा स्टँप अॅक्ट रद्द करण्यांत आला. एप्रिलमध्यें डेबोराला लिहिलेल्या पत्रांत फ्रँकलिन म्हणतो:—

> "अखेर स्टँप अॅक्ट रद्द झाला. तेव्हां आतां तुला एका नव्या गाऊनसाठीं कापड पाठविण्यास मी तयार आहें. यापूर्वीं पाठविलें असतें तर आपल्या शेजाऱ्यांपेक्षां अधिक चांगलें वस्त्र वापरणें तुला आवडलें नसतें. तूं स्वतःच कातलेल्या सुताच्या गाउनची गोष्ट वेगळी. ह्या दोन देशांतला व्यापार अजिबातच बंद पडला असता तर तूं स्वतः तयार केलेल्या लोकरीच्या व तागाच्या कापडाचा एक पोशाख मी घातला असता. त्याची मला सतत आठवण राहिली असती. त्याचा मला अपूर्व अभिमान वाटला असता. ह्या दोन देशांतील व्यापारव्यवहार कांहीं कारणानें पुन्हां बंद पडला तर माझ्यासाठीं पुन्हां तसाच पोशाख करून देणें तुला व तुझ्या लेकीला आवडेल हेंही मी जाणतों."

फ्रॅंकलिननें डेबोराला १४ वार उंची सॅटीन पाठविलें. बहिष्काराच्या काळांत वापराव्या लागणाऱ्या जाडयाभरडया कापडानंतर हें सॅटीन वापरणें डेबोराला फारच आवडलें असलें पाहिजे. तें आलें तेव्हां वसाहतींत स्टॅंप अॅक्ट रद्द झाल्याची बातमी येऊन पोंचली होती व लोक खुशींत होते. जिकडे तिकडे आनंदी आनंद व्यक्त होत होता. राजाबद्दल निष्ठेच्या शपथा घेतल्या जात होत्या. पण थोडक्याच काळांत, ही सर्व कृतज्ञता अनाठायी होत असल्याचें फ्रॅंकलिनला दिसून आलें.

स्टॅंप अॅक्ट रद्द करण्यांत आला खरा; पण वसाहतींतल्या रहिवाशांना आपण इंग्रज मानीत नाहीं हें दाखविणारा एक नवा कायदा पार्लमेंटनें पास केला. कोणत्याही परिस्थितींत वसाहतींवर प्रभावी हुकमत गाजविण्यासाठीं कायदे करण्याची व ते अंमलांत आणण्याची सत्ता राजा व पार्लमेंट यांना आहे, असें जाहीर करणारा डिक्लेरेटरी अॅक्ट पार्लमेंटनें पास केला. अमेरिकन प्रजासत्ताकाची प्रगति (ग्रोथ ऑफ दि अमेरिकन रिपब्लिक) या पुस्तकांत मॉरिसन व कॉमेजर हे म्हणतात :

> "पार्लमेंटची वसाहतींवर सार्वभौम हुकमत गाजवूं पाहणाऱ्या ह्या कायद्याची भाषा आयरिश डिक्लेरेटरी अॅक्ट १७१९ च्या प्रमाणेंच होती. आयर्लंडला जो दुय्यम दर्जा अनेक वर्षांपूर्वीपासून देण्यांत आलेला होता. तोच दुय्यम दर्जा अमेरिकन वसाहतींना देण्याचा ब्रिटिश सरकारचा इरादा त्यांत दिसून येत होता."

पुढच्याच वर्षीं 'टाउनशेंड कायदे' या नांवानें प्रसिद्ध असलेले कायदे झाले. अमेरिकन इतिहासाच्या प्राथमिक विद्यार्थ्यांनाही या जुलमी कायद्यांचा काय परिणाम घडून आला हें माहीत आहे. जबरदस्त आयात जकाती, अमेरिकन शहरांतून ब्रिटिश गणवेषधारी शिपायांना बंदोबस्तासाठीं ठेवणें, राज्यपाल व न्यायाधीश यांचे पगार वसाहतींच्या लोकसभांनीं मंजूर करण्याऐवजीं पार्लमेंटकडे ते सोपविणें, बॉस्टनची कत्तल, पत्रव्यवहाराच्या समित्या व मॅसॅचुझेट्स् व व्हर्जिनिया येथील देशभक्तांनीं केलेलीं प्रक्षोभक भाषणें या सर्वांमुळें इंग्लंड व अमेरिका यांतील अंतर वाढत चाललें. या काळांत बेंजामिन फ्रॅंकलिनच्या मनावर व हृदयावर झालेले संस्कार आपल्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचे आहेत.

ब्रिटिश साम्राज्याचीं शकलें होऊं नयेत या विचाराला तो पुष्कळ दिवस चिकटून होता. या साम्राज्याची राजधानी इंग्लंडहून अमेरिकेंत न्यावी या विचाराचाही त्यानें पुरस्कार केला. त्यानें राजा व पार्लमेंट यांच्यांत फरक करून राजाबद्दल आपली निष्ठा व्यक्त केली. हीच भूमिका अमेरिकेंतील बहुतेकांनीं त्या वेळीं घेतली होती. कांहीं तरी तडजोड घडवून आणण्याचें साधन उपलब्ध व्हावें म्हणून या अतिशय कठीण काळांतही त्यानें वारंवार प्रयत्न केले. आपण परत घरीं जावें असें त्यास पुनः पुन्हां वाटे. पण इंग्लंडांत राहूनच अमेरिकेला अधिक उपयोगी पडतां येण्यासारखे नवे नवे प्रसंग निर्माण झाले. पेन्सिल्व्हेनियाचा तर तो प्रतिनिधि होताच; त्याशिवाय न्यू जर्सी, जॉर्जिया यांनीं आणि सर्वांत कडव्या अशा मॅसॅचुझेट्स्नेंही त्याला आपलें मुखत्यारपत्र दिलें. मॅसॅचूझेट्स्मधील लोकांच्या विरोधाची भूमिका जेव्हां त्याच्या ध्यानांत आली, तेव्हां मात्र साम्राज्य एकत्र राखण्याच्या त्याच्या आशा मावळूं लागल्या. त्यानें १७७१ मध्यें लिहिलें आहे :–

> "पार्लमेंटनें कायदा करून अमेरिकेंतून आयात जकात वसूल करावयाची जी योजना सुरू केली तिनेंच या दोन देशांमधील एकात्म भाव नष्ट केला व वेगळेपणाचीं बीजें पेरलीं हें स्पष्ट दिसतें. जों जों लोकांत असंतोष वाढत जाईल, तों तों तो दडपून टाकण्याची सत्ताधाऱ्यांना आवश्यकता वाटूं लागेल. लोकांना दहशत बसविण्याकरतां कडक शिक्षा दिल्या जातील. लोकांचे हक्क नष्ट केले जातील. कायद्यांच्या अंमलासाठीं व लोकांना वाकविण्यासाठीं अधिक सामर्थ्याची गरज लागेल त्यामुळें खर्च बेसुमार वाढेल. मग तो भागविण्यासाठीं लोकांवर नवे कर लादण्यांत येतील. यामुळें ब्रिटिश राष्ट्र व सरकार यांच्याबद्दल तिरस्कार बुद्धि वाढेल, मग लढाई, होईल. त्याचा परिणाम अमेरिका इंग्लंडचें गुलाम तरी होईल किंवा इंग्लंडला वसाहतींना मुकावें तरी लागेल. अमेरिकेचें वाढतें बळ व महत्त्व लक्षांत घेतां दुसरा पर्यायच अधिक संभवनीय आहे."

सुमारें तीन वर्षांनीं ब्रिटिश सरकारशीं संबंध तोडण्याची वेळ आलीच. या काळांत तो वृत्तपत्रांतून पत्रें प्रसिद्ध करीत असे. त्यांची भाषा कधीं लाघवी असे तर कधीं ती तोडून टाकणारी असे. या काळांत त्यानें इंग्लंडांत

व युरोपांतही पुष्कळ ठिकाणीं प्रवास केला. त्यानें मधून मधून शास्त्रीय विषयांवरही लिहिलें. त्यानें मित्रांना व चहात्यांना – हें वर्तुळ खूपच मोठें होतें – वेळोवेळीं अनेक विषयांवर पत्रें लिहिलीं, त्यांपैकीं उत्तमोत्तम पत्रें याच काळांतील आहेत. युद्ध व अत्याचार त्याला मान्य नव्हते. १७६३ च्या डिसेंबरांत "बॉस्टन टी पार्टी" ची जी बातमी आली, तिचें त्यानें अत्याचारी व अन्यायी असें वर्णन केलें.

याच काळांत आणखी एका 'मॅसॅचूझेट्स् प्रकरणां'त तो गुंतला. हें प्रकरण गव्हर्नर हचिन्सन ह्याच्या पत्रासंबंधींचें आणि बरेंच घोटाळ्याचें होतें. मॅसॅचूझेट्स्चा गव्हर्नर हचिन्सन यानें लिहिलेलीं कांहीं पत्रें फ्रँकलिनच्या हातीं लागलीं. तीं त्याला एकानें आणून दिलीं व आपलें नांव गुप्त राखण्याबद्दल बजावलें आणि फ्रँकलिननें अखेरपर्यंत त्याचें नांव गुप्त ठेवलें. या पत्रावरील पत्ता तेवढा कापण्यांत आलेला होता. पार्लमेंटचे सभासद वुइल्यम व्हेटली यांना तीं लिहिलेलीं असावींत असा तर्क होता. व्हेटली हे या वेळीं वारले होते. बॉस्टनमधील दंगे मोडून काढण्यासाठीं इंग्लंडहून सैन्य पाठविण्याची त्या पत्रांत मागणी करण्यांत आली होती. तसेंच कांहीं कडक उपायही सुचविण्यांत आले होते. ज्यानें फ्रँकलिनला हीं पत्रें दिलीं त्यानें तीं छापलीं न जाण्याच्या अटीवर दिलीं होतीं. फ्रँकलिननें तीं बॉस्टनला पाठविलीं व तीं प्रसिद्ध न करण्याबद्दल बजावलें. पण त्याचा आदेश पाळला गेला नाहीं. बॉस्टनमध्य तीं छापलीं गेलीं आणि त्यांच्या छापील प्रती इंग्लंडास जेव्हां पोचल्या तेव्हां तेथें तावडतोब अस्वस्थ वातावरण निर्माण झालें.

या प्रकरणांत फ्रँकलिनचा जो भाग होता त्याबद्दल त्यानें कोठेंच वाच्यता केली नाहीं. तो स्वस्थ होता. जेव्हां दोन इंग्रज लोक हीं पत्रें पाठविल्याबद्दल एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करूं लागले आणि अखेर द्वंद्व युद्धाला उद्युक्त झाले; तेव्हां त्यानें ही आपत्ति टाळण्यासाठीं पुढें होऊन या प्रकरणाची सर्व जबाबदारी जाहीरपणें स्वतःवर घेतली. त्यांतून त्याच्या आयुष्यांतील एक अतिशय महत्त्वाचा प्रसंग निर्माण झाला व अमेरिकनांच्या दृष्टीनें इंग्रजांच्या हीन वृत्तीचें प्रदर्शन झालें.

गव्हर्नर हचिनसन याला काढून टाकण्यांत यावें अशी मागणी करणारा एक अर्ज सादर करण्याकरतां फ्रँकलिनकडे येऊन पोचला होता. प्रीव्ही कौंसिलपुढें त्याची सुनावणी व्हावयाची होती. अर्ज दाखल करण्यासाठीं त्याला कॉकपिट् थिएटरांत पाचारण करण्यांत आलें.

तो आला तेव्हां हचिनसनचीं पत्रें चोरल्याचा त्याच्यावर आरोप करण्यांत आला. सॉलिसिटर जनरल अलेक्झांडर वेडरवर्न हे सरकारी वकील होते. त्यांनीं आपल्या कुत्सित, छद्मी, व उपरोधिक पद्धतीनें फ्रँकलिनवर नाहीं नाहीं ते आरोप केले. ह्या प्रकरणाच्या सुनावणीचें काम पाहण्याकरतां लोकही पुष्कळ उपस्थित होते. वेडरवर्न यानें जेव्हां फ्रँकलिनचा उपहास सुरू केला तेव्हां न्यायाधीशही खो खो हसूं लागले. कांहीं जण मात्र स्वस्थ होते. या प्रसंगीं एडमंड वर्क, जेरेमी बेन्थॅम, जोसेफ प्रीस्टली, आणि फ्रँकलिनचे इतर बरेच मित्र उपस्थित होते.

> वेडरवर्न म्हणाला, या देशाच्या अब्रूसाठीं, युरोपच्या व मानव जातीच्या अब्रूसाठीं आपण या माणसाला दोषी ठरविलें पाहिजे. सभ्य समाजांत याला मानाचें स्थान राहिलें नाहीं. उजळ माथ्यानें तो आतां कोणत्या समाजांत जाऊं शकेल? लोक त्याच्याकडे संशयित नजरेनें पाहतील, व त्याला पाहून लोक आपले कागदपत्र गुंडाळून कपाटांत ठेवून देतील!

वेडरवर्नचा हा हल्ला सुमारें तासभर चालला होता. फ्रँकलिन अगदीं स्वस्थ व निर्विकार मुद्रेनें उभा होता. या प्रसंगाचें एका उपस्थितानें वर्णन करतांना म्हटलें आहे कीं, डॉक्टर फ्रँकलिन हा अगदीं ताठ उभाच्या उभा होता. त्यानें आपल्या चेहेऱ्यावर शांत मुद्रा धारण केली होती. वेडरबर्नचें भाषण चालू असतांही त्यांत किंचितही फरक पडला नाहीं.

या सर्व कुत्सित टीकेचा फ्रँकलिनच्या मित्रांना अतिशय राग आला. बर्क, शेलबर्न, आणि बेंथॅम यांनीं तिच्याबद्दल आपली नापसंती व्यक्त केली. प्रीव्ही कौन्सिलच्या सभासदांना जर थोडीशी दूरदृष्टि असती, तर त्यांनीं वक्त्याला आवरलें असतें. फ्रँकलिन हा प्रसंग विसरला नाहीं.

पुढच्याच आठवड्यांत पोस्टमास्तर जनरलच्या हुद्यावरून त्याला काढून टाकण्यांत आलें. अमेरिकेंतील पोस्ट खातें फ्रँकलिननें फायदेशीर खातें करून

दाखविलें असल्यामुळें फ्रँकलीनला काढून टाकणें या खात्याच्या सेक्रेटरीला मोठें कठीण वाटलें असावें, पण मंत्रिमंडळाच्या हुकमापुढें त्याचा नाइलाज झाला असावा.

उन्हाळ्यांत घरीं परत जाण्याचें फ्रँकलिननें ठरविलें. पण या वेळीं पार्लमेंटांत वसाहत-विरोधी नवी विधेयकें येऊं लागलीं होतीं. तीं पास होतात कीं काय हें पाहण्याकरतां तो कांहीं काळ थांबला. नंतर अमेरिकेंतील नव्या 'कॉंटिनेंटल कॉंग्रेस' संबंधाची काय बातमी येते याची वाट पाहात तो आणखी कांहीं दिवस राहिला. अशांत वर्ष गेलें. या काळांत अनेक मित्र त्याच्या बाजूला झाले होते. वेडरबर्नचें भाषण छापण्यांत आलें होतें. त्याची सर्वत्र इतकी छीथू झाली कीं, असें भाषण करूं दिल्याबद्दल प्रीव्ही कौन्सिलच्या सभासदांनाच त्याची लाज वाटली असें फ्रँकलिननें आपल्या एका पत्रांत म्हटलें आहे.

१७७४ च्या हिवाळ्यांत त्याची पत्नी डेबोरा मरण पावली. वर्षभर तो घरीं जाण्याचे बेत करीत होता. पत्नीला सोडून इंग्लंडला येऊन त्याला दहा वर्षें झालीं होतीं, व तिला भेटण्याची त्याला उत्कंठा लागली होती. पण त्यांची भेट होऊं शकली नाहीं.

पुढें १७७५ च्या मार्चमध्यें तो फिलाडेल्फियाला परत गेला. तो समुद्रावर असतांनाच मॅसॅचूझेट्स्मधील कॉंकॉर्ड, येथील दारूगोळा ताब्यांत घेण्याकरतां एक ब्रिटिश तुकडी गेली होती व वसाहतवाल्यांच्या घाईघाईनें जमा झालेल्या एका तुकडीनें तिला लेक्झिंग्टन येथें रोखून धरलें होतें.

## १५ – फ्रेंच दरबारीं वकील

जून १७७६ मध्यें कॉंटिनेन्टल कॉंग्रेसचें अधिवेशन झालें. त्या वेळीं बेंजामिन फ्रँकलिनचें वय ७० वर्षें पांच महिने होतें. ही परिषद फिलाडेल्फियाच्या राज्यगृहांत भरली होती. ती व्हर्जिनियाच्या प्रतिनिधींनीं मांडलेला अत्यंत महत्त्वाचा ठराव विचारांत घेण्याकरतां भरली होती. फ्रँकलिन परत आल्याबरोबर या कॉंग्रेसचा सभासद झाला होता व आरंभींच्या बंडाचें जंगी युद्धांत रूपांतर झालेलें त्यानें पाहिलें होतें. पेन्सिल्व्हेनियाच्या संरक्षण समितीचा तो एक सभासद असल्यानें त्यानें प्रांताच्या संरक्षणासाठीं आपलें

लष्करी एंजिनियरिंगचें ज्ञान व अनुभव उपयोगांत आणून योजना आखली. हिवाळ्यांत आणि वसंत ऋतूंत बर्फ पडत असतांनाही त्यानें मॉंट्रियलपर्यंतचा कष्टाचा प्रवास केला व अमेरिकेला तिच्या स्वातंत्र्ययुद्धांत मदत करण्यासाठीं फ्रेंच-कॅनेडियनांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. पूर्वीं हा प्रयत्न केला गेला होता; पण कॅनडांतील बेशिस्त अमेरिकन सैनिकांच्या गैरवर्तनामुळें फ्रेंच लोकांनीं ही मदत देण्याचें नाकारलें होतें.

फ्रँकलिनची मूळची प्रकृति खणखणीत होती. पत अनेक आघातांचा आतां तिच्यावर परिणाम झाला होता. त्याला अनेक वेळां संधिवाताचे झटके आले होते. इंग्लंडांत असतांना त्याला दोन वेळां मोठें दुखणें येऊन गेलें. त्याचें परिणाम तो आपल्या विनोदी बोलण्यानें झाकण्याचा प्रयत्न करी, पण ते त्याच्या चेहेऱ्यावर दिसल्यावांचून राहिले नाहींत. पत्नीच्या मृत्यूचेंही त्याला दुःख झालें होतें. त्याचा मुलगा वुइल्यम यानें ब्रिटिशांची बाजू घेतली, त्यापासून त्याला परावृत्त करण्याचे त्याचे प्रयत्नही विफल झाल्यामुळें त्याच्या दुःखांत भरच पडली. जूनमध्यें या सर्वांच्या परिणामामुळें फ्रँकलिनचें शरीर थकून गेलें आणि त्यामुळें कॉंग्रेसच्या सभांना नियमितपणें उपस्थित राहाणें त्याला जमेना. तथापि त्याचें मन पूर्वींसारखेंच तरतरीत होतें. आणि त्याच्या बुद्धीची धारही तीक्ष्ण होती. मॉंट्रियलहून परत आल्यावर बरें वाटतांच त्यानें कॉंटिनेंटल संस्थेच्या कामांत पुन्हां उत्साहानें लक्ष घालण्यास सुरवात केली.

वसाहतींतील लोकांच्या वृत्तींत पालट घडून येण्यास वर्ष लागलें. वॉशिंग्टनच्या सैन्याला मधून मधून जय व बऱ्याच वेळां पराजय खावे लागले, त्या काळांत देखील 'बऱ्याच लोकांनीं' राजासंबंधींची आपली निष्ठा दृढ ठेविली होती आणि इंग्लंडपासून वेगळें होण्याची कल्पना दूर सारली होती. पुढें हिवाळ्यांत टॉम पेन याचें "कॉमन सेन्स"(व्यवहारी धोरण) या नांवाचें एक जोरदार पत्रक प्रसिद्ध झालें. त्यांत राजावर हल्ला चढविण्यांत आला होता. एकंदरींतच राजे व त्यांची ईश्वरदत्त पवित्र परंपरा यांवर पेननें हल्ला चढविला होता. त्याचा लोकांवर परिणाम झाला आणि अमेरिकेंतील लोकमत बदललें. १७७६ च्या वसंत ऋतूंत कॉंटिनेंटल कॉंग्रेसनें लोकमताची नाडी ओळखून, आपण क्रांतिकारक धोरण स्वीकारलें तर त्यास लोकमताचा पाठिंबा मिळेल हें जाणलें. आणि मे महिन्यांतच व्हर्जिनियाच्या

प्रतिनिधींना एक ठराव तयार करण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणें ठराव तयार करण्यांत आला, व तो ७ जून रोजीं रिचर्ड हेन्री ली यानें मांडला व जॉन ॲडम्स यानें त्यास दुजोरा दिला. तो ठराव असा : "ही परिषद असा ठराव करते कीं, या संयुक्त वसाहती पूर्णपणें स्वतंत्र व सार्वभौम राज्यें आहेत, व तीं अशीं असलीं पाहिजेत असें घोषित करण्यांत येत आहे. ब्रिटिश राजमुकुटाशीं निष्ठा बाळगण्याचें बंधन त्यांजवर इत:पर राहाणार नाहीं. आणि त्यांच्यांत व ब्रिटिशांच्या राज्यांत असलेले सर्व संबंध तोडून टाकण्यांत येत आहेत व आले पाहिजेत."

दुसऱ्या परिच्छेदांतील तरतुदीचा फ्रँकलिनच्या पुढील जीवनावर विशेष परिणाम व्हावयाचा होता. ती तरतूद अशी :

"परदेशांशीं आपले परिणामकारक संबंध जोडण्याचें काम तातडीनें हातीं घेणें अत्यंत अगत्याचें आहे."

ठराव मांडण्यांत आल्यानंतर सुमारें महिन्यानें त्यावर मतें घेण्यांत आलीं. खुद्द काँग्रेसमध्येंच त्यावर मतभेद होते. कांहीं सभासदांचा अशा ठरावास तीव्र विरोध होता. म्हणून आपल्या ठरावाचा अर्थ बाहेरच्या जगाला विशद करून सांगण्याकरतां व आपण स्वतंत्र होण्याचें क्रांतिकारक पाऊल कां उचललें हें लोकांना पटवून देण्याकरतां एक निवेदन काढावें असें ठरलें व त्यासाठीं एक समिति नेमण्यांत आली. तींत थॉमस जेफरसन, जॉन ॲडॅम्स, बेंजामिन फ्रँकलिन, रॉजर शेरमन व रॉबर्ट लिव्हिंग्स्टन हे होते. निवेदनाचा मसुदा जेफरसन यांनीं तयार करावा असें लगेच सर्वानुमतें ठरलें. जेफरसन यानें जॉन लॉक ह्याच्या ग्रंथांचा सखोल अभ्यास केलेला होता व स्वातंत्र्य व निसर्गसिद्ध हक्क या प्रश्नांविषयीं त्यानें पुष्कळच विचार केला होता. जेफरसननें हें महत्त्वपूर्ण निवेदन तयार केलें आणि तें ॲडॅम्स व फ्रँकलिन यांना दाखविलें. त्यांत कांहीं शाब्दिक फेरफार करून त्यांनीं तें संमत केलें.

खूप वादविवाद झाल्यावर दि. २ जुलै रोजीं व्हर्जिनियाचा स्वातंत्र्याचा ठराव पास झाला, व दि. ४ रोजीं स्वातंत्र्याच्या घोषणेच्या मसुद्यास मान्यता मिळाली. सुमारें एक महिन्यानें खास पक्क्या टिकाऊ कागदावर लिहिलेल्या या घोषणेवर जेव्हां सर्व वसाहतींच्या प्रतिनिधींनीं सह्या केल्या,

आतां माझी प्रकृति सुधारत असून लौकरच मी पॅरिसला जाऊन कामाला सुरुवात करीन."

तो नान्त येथें विश्रांति घेत असतांनाच फ्रेंच लोक त्याचें स्वागत करण्याला उत्सुक आहेत, हें त्याला समजून चुकलें. त्याच्या सन्मानार्थ समारंभ व मेजवान्या ठरविण्यांत येत होत्या व ज्या घरांत तो राहात होता तेथें त्याला भेटण्यासाठीं येणारांची रात्रंदिवस गर्दी होत होती.

त्याच्यावर लोकांकडून स्तुतिसुमनांचा वर्षाव होत होता. तथापि पॅरिसला गेल्यावर थोड्याच अवधींत त्याच्या हें लक्षांत आलें कीं, अमेरिकन राज्यक्रांतीबद्दल फ्रेंच सरकारला तसा विश्वास वाटत नव्हता. सप्तवार्षिक युद्धांत झालेल्या पराभवाचें व त्यांत कॅनडाला मुकावें लागल्याचें शल्य फ्रेंचांना डाचत होतें, त्यामुळें स्वतःला तोशीस न लागतां ब्रिटिशांना झळ लागेल असें कोणतेंही कृत्य करण्याची त्यांची तयारी होती. पण १७७७ च्या प्रारंभींच्या दिवसांत अमेरिकेंतील शूर सैनिकांना माघार घ्यावी लागत होती व ते युद्ध हरणार असें वाटूं लागलें होतें; अशा स्थितींत त्यांना मदत करून ब्रिटिशांचें नवें वैर ओढवून घेण्याची फ्रेंचांची तयारी नव्हती. फ्रान्सचा राजा लुई याची आणखी एक अडचण होती. ती अशी कीं, अमेरिकेंतील जनतेचें युद्ध हें राजाविरुद्ध होतें व एका राजाविरुद्धच्या युद्धांत दुसऱ्या राजानेंच शत्रुपक्षाला मदत करावी हें लुईला पटेना. फ्रान्सचा परराष्ट्रमंत्री व्हेरजेन (Vergennes) याच्याबरोबर थोडीशीं बोलणीं झाल्यावर फ्रँकलिनच्या हें लक्षांत आलें कीं, या बाबतींत घाई करून कांहीं उपयोग नाहीं, जरा दमानेंच घेणें भाग आहे. म्हणून तो गुप्त रीतीनें कांहीं साधतें का हें पाहण्याच्या उद्योगास लागला. या कामीं अमेरिकेंतील उठावामुळें उत्तेजित झालेल्या एका फ्रेंच माणसानें या दिशेनें आधींच पावलें टाकलीं होतीं.

१७७५ मध्यें पियेर औगुस्तॉ कारों बोमार्शे यानें 'रोदरीग ओर्तालिझ कंपनी' या नांवाची एक नामधारी कंपनी स्थापन करून व्यापार सुरू केला होता. एका स्पॅनिश पेढीवाल्याच्या भांडवलावर ही कंपनी चालली असल्याचें सांगण्यांत येत होतें. पण तो पॅरिसमध्यें कधींच नसे. सगळा धंदा बोमार्शे हाच करी. त्यानें फ्रेंच व स्पॅनिश सरकारांकडून गुप्त रीतीनें वीस लाख फ्रॅंक्सचें भांडवल मिळविलें होतें व बोमार्शेचा व्यवहार जर उघडकीस

आला तर त्याचा आपला कांहीं संबंध नाहीं असें सांगून हात झटकून दोन्ही सरकारांनीं मोकळें व्हावयाचें असेंही गुप्तपणें ठरलें होतें. या भांडवलाच्या इतकेंच भांडवल त्यानें इतरांकडून गोळा केलें होतें आणि त्याच्या जोरावर दारूगोळा खरेदी करुन तो तो फ्रेंच वेस्ट इंडीजला पाठवी. तिथून तो अमेरिकन प्रतिनिधि घेऊन जात अशी ही योजना होती व बेंजामिनचा सहकारी सायलस डीन हा या उद्योगांत त्यांचा साहाय्यक होता.

ह्या काळांत फ्रँकलिन पॅसी येथें रहात असे. त्याचीं व्हेरजेनशीं बोलणीं चालूच होतीं. पॅरिसमध्यें ब्रिटिश हेरांचा सुळसुळाट आहे हें त्याला माहीत होतें. ते कोण कोठें होते हें जरी त्याला माहीत नव्हतें, तरी त्याची अपेक्षा अशी होती कीं, आपण जें काय करतों तें उघडपणें केलें म्हणजे त्यांच्यापासून आपणाला उपद्रव पोंचणार नाहीं. त्यानें एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे, " माझा निरोप्या ब्रिटिशांचा हेर आहे अशी माझी खात्री झाली – बहुधा तो असेलच. एरवीं तो चांगला असला तर त्याला मी नोकरीवरून काढणार नाहीं.

खरें असें होतें कीं, त्याचा निरोप्या कांहीं हेर नव्हता, पण एडवर्ड बँकरॉफ्ट नांवाचा त्याचा जो विश्वासू मदतनीस होता, आणि ज्याला फ्रँकलिन काय करी व काय लिही हें सर्व समजत असे तो मात्र ब्रिटिशांचा हेर होता. आणि तो फ्रँकलिनच्या सर्व पत्रव्यवहाराच्या नकला ब्रिटिश सरकारकडे पाठवी. फ्रँकलिनला या विश्वासघाताची कल्पना नव्हती. पण हेरांच्या संबंधानें फ्रँकलिनचें धोरणच अखेर उपयुक्त ठरलें. कारण बँकरॉफ्टच्या या कामगिरीचा फ्रँकलिनच्या कामगिरीवर कांहींही विपरीत परिणाम झाला नाहीं.

तो पॅरिसमध्यें आल्यापासून सुमारें एक वर्षानें परिस्थिति पालटली. या काळांत फ्रेंच जनता अमेरिकेंतील युद्धाच्या प्रगतीकडे मोठ्या उत्सुकतेनें पाहात होती.

अमेरिकनांना पराजय खावे लागल्याचें तिला दुःख होत असे व त्यांस जय मिळावा म्हणून ती प्रार्थना करीत असे. पण फ्रँकलिनच्या शांत चेहऱ्यावर कधींही व्यग्रतेची किंवा दुःखाची छटा दिसत नसे. एक दिवस एक फ्रेंच गृहस्थ फ्रँकलिनकडे आला असतांना म्हणाला :

" काय डॉक्टर, हाऊनें तुमचा फिलाडेल्फिया कावीज केला ! "

त्याबरोबर डॉ. फ्रँकलिन उत्तरला, " थोडें तुमचें चुकलें. फिलाडेल्फियानें हाऊला कावीज केलें आहे ! "

एका सुंदर स्त्रीबरोबर एकदां बुद्धिबळें खेळत असतां त्यानें राजाला मारून पटावरून उचललें. त्याबरोबर ती म्हणाली, " अहो डॉक्टर, राजाला काढून घेत नसतात असं ! " त्याबरोबर फ्रँकलिन म्हणाला, " आम्ही अमेरिकेंत घेतों. "

अखेर ऑक्टोबरमध्यें साराटोगा येथें ब्रिटिश सैन्याचा पुरा मोड झाला अशी बातमी आली तेव्हां फ्रेंच जनतेनें बेहोश होऊन आनंद व्यक्त केला. पॅरिसमधील सर्व मंदिरांतील घंटा वाजूं लागल्या व लोक रस्त्यांत आनंदानें नाचूं लागले. जणूं कांहीं फ्रेंच सैनिकांचाच जय झाला असें वाटावें ! सारांश लोकमत सर्वस्वी अनुकूल होतें. फ्रेंच जनता मनानें युद्धांत अमेरिकेच्या बाजूला होती. साराटोगाच्या विजयानें फ्रेंच सरकारही आतां मदतीस आलें.

दि. ४ डिसेंबरला साराटोगाला ब्रिटिशांचा पराभव झाल्याची बातमी पॅरिसला पोचली व ६ डिसेंबरला व्हेरजेन या फ्रेंच परराष्ट्र मंत्र्यानें अमेरिकन शिष्टमंडळाला दोस्तीच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं बोलावणें पाठविलें. त्याला फ्रँकलिननें आपल्या नातवाबरोबर दि. ८ ला उत्तर पाठवलें. फेब्रुवारींत तह झाला. हा तह व्यापार व दोस्ती यासंबंधीचा होता. या तहानें अमेरिकेच्या स्वतंत्र सार्वभौम राष्ट्राला फ्रान्सनें मान्यता दिली, ब्रिटिशांशीं लढण्यासाठीं मदत करण्याचें आश्वासन दिलें, व कोणीही वेगळा युद्धविरामाचा किंवा शांततेचा तह करावयाचा नाहीं असें आश्वासन दिलें. त्याशिवाय व्यापारविषयक अनेक तरतुदीही त्यांत होत्या.

या तहनाम्यावर सही करण्याकरतां फ्रँकलिन परराष्ट्र कचेरींत गेला, तेव्हां कॉकपिट थिएटरमध्यें वेडरबर्ननें त्याजवर कुत्सित आरोप केले त्या वेळीं त्यानें जो पोशाख केला होता तोच घातला. त्यांत थोडीशी सुडाची भावना होती असें त्यानें स्वतःच म्हटलें आहे.

आतां फ्रँकलिन नसता व दुसरा कोणी असता तर हा तह इतक्या लवकर घडून आला असता कीं नाहीं, तसेंच तह घडून आल्यानंतर या दोन राष्ट्रांतील परस्पर संबंध राहिले इतके परिणामकारक राहिले असते कीं नाहीं

हा सारा इतिहासाच्या ‘ जरतारी ’चा प्रश्न आहे. मात्र एक गोष्ट स्पष्ट आहे. ती ही कीं फ्रँकलिन तेथें जितका लोकप्रिय झाला तितका दुसरा कोणीही, नुसता अमेरिकनच नव्हे तर अन्य देशाचाही दुसरा कोणी तितका लोकप्रिय झाला नसता. फ्रान्समध्यें पाय ठेवल्यापासूनच फ्रँकलिननें तेथील वृत्तपत्रांतून प्रचार सुरू केला. अमेरिकेच्या मदतीसाठीं त्यानें सर्व प्रकारची साधनसामग्री जहाजें भरभरून पाठविली. पराभवामागून पराभव होत असतांही त्यानें फ्रेंचांचें नैतिक पाठबळ टिकवून धरलें. त्यानें वकील म्हणून,व्यापारी प्रतिनिधि म्हणून, सल्लागार म्हणून, नाविक खात्याचा न्यायाधीश म्हणून, पडलीं तीं सर्व कामें केलीं. तो एकच असा प्रतिनिधि होता कीं ज्याच्याशीं संबंध ठेवण्यास फ्रेंच परराष्ट्रीय मंत्र्याची तयारी असे.

त्याच्या या सर्व कामगिरींत त्याचे जे इतर सहकारी होते त्यांच्यापासून फार अडथळे आले. ऑर्थर ली याला त्याचा हेवा वाटे व त्याच्याबद्दल त्याला संशयही होता. तो फ्रँकलिनला पुष्कळदां रागानें बोले व त्याच्या कामांत अडथळाही करी. डीन बरोबरही जेव्हां त्याचें जमेना, तेव्हां एकजुटीनें काम करणें फ्रँकलिनला अधिकच कठिण झालें. पुढें १७७८ मध्यें कॉंग्रेसनें त्याला इतरांहून वरचढ असे अधिकार दिले तेव्हांच त्याच्या मागची ही कटकट मिटली.

युद्ध चालू असेतों तो फ्रान्समध्येंच होता. त्याला कामाचा ताण पुष्कळ पडे तरी पण तो मोठ्या सुखासमाधानांत राहात असे. पॅसीच्या आवारांतील दोन मोठे बंगले व पुष्कळशी जमीन या अमेरिकन वकिलातीसाठीं विनाभाडें देण्यांत आली होती. या जागेचा मालक लरे द शोमों हा अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता होता. या ठिकाणीं जवळ नोकर, सेक्रेटरी इत्यादि लवाजमा बाळगून फ्रँकलिन सुखानें राहिला होता. त्यांच्यामुळें त्याला भेटण्यासाठीं येणारांची जी रीघ लागे तिला मर्यादा पडे व अमेरिकेंत नोकरी मागण्यासाठीं येणारांपासूनही त्याचें संरक्षण होई. आपल्या धाकट्या नातवाला, बेचला त्यानें जवळच्या एका शाळेंत घातलें होतें व तेथेंच त्याच्या राहण्याजेवण्याची सोय केली होती. हा नातू दर रविवारीं आजोबांस भेटण्यास येत असे. थोरला नातू टेंपल हा चिटणीस म्हणून काम करी. इतर अमेरिकन मुत्सद्दी जॉन ॲडम्स वगैरे या घरांतच राहात, व त्या सर्वांचीं मुलें एकत्र खेळत.

पॅसी येथें फ्रँकलिननें एक छापखाना सुरू केला व तेथून त्यानें आपलें सर्व प्रचारवाङमय उत्तम रीतीनें छापून घेतलें. मित्रांनीं लिहिलेले कांहीं

लेखही त्यानें येथें छापले. त्याचप्रमाणें त्यानें कांहीं नवे शास्त्रीय प्रयोगही येथें केले व शोधही लावले. बाय फोकल चष्म्याची रचना त्यानें येथें केली. लौकिकवान् अशा स्त्रियांशीं त्याचा दीर्घ आणि निकट स्नेह जमला होता. आतां त्याची सत्तरी उलटून गेलेली होती तरी त्यानें दोन स्त्रियांशीं विवाह करण्याचें सूतजवाच केलें ! व्हॉल्टेअरबरोबर त्याचा चांगला परिचय झाला. त्याचप्रमाणें रॉयल अॅकॅडमी ऑफ सायन्सेस या संस्थेंतील अनेक विद्वान् शास्त्रज्ञ व लेखक यांच्याशीं त्याचा परिचय झाला आणि या संस्थेनें त्यास आपले सभासदही करून घेतलें.

यॉर्क टाऊन येथें १७८१ मध्यें कॉर्नवालिस याचा पूर्ण पराभव झाला तेव्हां ग्रेट ब्रिटन बरोबर तह घडवून आणण्याकरतां अटी ठरविण्याच्या कामासाठीं जॉन जे आणि जॉन अॅडम्स यांच्याबरोबर तो फ्रान्समध्येंच राहिला. पुढें त्यांच्यांत मतभेद झाले व अॅडॅम्सचें व त्याचें वाकडें आलें. १७८३ च्या सप्टेंबरमध्यें तहावर सह्या झाल्या, तेव्हां आपल्याला आतां परत बोलावण्यांत यावें अशी त्यानें कॉंग्रेसला विनंती केली. तथापि १७८५ च्या जुलैपर्यंत तो परत जाऊं शकला नाहीं. त्याचे दोघे नातू त्याच्याबरोबर होते तेही त्याच्याबरोबर अमेरिकेला परतले.

आतां त्याला ८० वें वर्ष लागलें होतें. तथापि याही वयांत त्याचा उत्साह कांहीं बाबतींत तरुणासारखाच असे. त्याची बुद्धि चौकस होती व त्याचा आशावाद दुर्दम्य होता. तो परत अमेरिकेस जाण्यास निघाला तेव्हां त्यानें बोटीवर असतांना "कांहीं सागरी अवलोकन" या नांवानें दोन लेख लिहिले. त्यांत जहाजासंबंधानें पुष्कळ नव्या सूचना केलेल्या आहेत. तसेंच त्यानें "धुराड्यांतील धुरांचीं कारणें व त्यावर उपाय" हेंही या प्रवासांतच लिहिलें. तो सप्टेंबरमध्यें परत आला, व लगेच त्यास पेन्सिल्व्हेनियाच्या कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष करण्यांत आलें. ज्या स्वतंत्र राष्ट्राला जन्म देण्याच्या कामीं त्यानें मोठी कामगिरी केली होती, तें नांदत असलेलें तो आतां पाहात होता. आपल्या आयुष्याच्या शेवटच्या काळांत, या नव्या राष्ट्राला घटना तयार करून मिळाल्याचेंही त्यानें पाहिलें. ती घटना आज दीडशें वर्षे तशीच चालू आहे.

# १६ – विद्वान् सर्वत्र पूज्यते

फ्रँकलिननें संघराज्याच्या घटनेचीं कलमें सन १७७६ मध्यें तयार केली होतीं, व त्यांना १७८१ मध्यें सर्व राज्यांनीं मान्यताही दिली होती; परंतु १७८७ मध्यें त्यांना असें दिसून आलें कीं राज्यकारभार नीट चालण्यास तीं पुरेशीं नाहींत. आतां समान संकटाची भीति उरली नव्हती. त्यामुळें निर-निराळ्या राज्यांत पुन्हां जुने मत्सर उमटले व त्यांच्यांतील अंतर वाढूं लागलें. त्यामुळें प्रबल केंद्रीय शासनाची, अधिक सुसंघटित व सामर्थ्यवान् केंद्रीय राज्याची आवश्यकता वाटूं लागली. त्यासाठीं १७८७ च्या मे महिन्यांत एक नवें संघराज्याचें अधिवेशन बोलावण्यांत आलें. ह्यासंबंधींचा विचारविनिमय करण्यासाठीं पूर्वीप्रमाणेंच फिलाडेल्फियाचें राज्यगृह निवडण्यांत आलें होतें.

फ्रँकलिन जरी नांवानें गव्हर्नर नव्हता, तरी प्रत्यक्षतः पेन्सिल्व्हेनियाचा तोच गव्हर्नर होता. त्याची कायदेशीर पदवी "सर्वोच्च कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष" अशी होती. त्यामुळें या परिषदेसाठीं आलेल्या सर्व प्रतिनिधींचें आगत स्वागत करण्याचें काम स्वाभाविकपणेंच त्याच्याकडे आलें होतें. पेन्सिल्व्हेनियाच्या प्रतिनिधिमंडळाचेंही नेतृत्व त्याच्याकडेच होतें. त्याचें वय या वेळीं ८० वर्षांचें होतें. तेव्हां वयपरत्वेंही हा अधिकार त्याजकडेच आलेला होता. त्यामुळें या परिषदेच्या अध्यक्षस्थानासाठीं व्हर्जिनियाच्या जॉर्ज वॉशिंग्टनचें नांव सुचविण्याची कामगिरी त्याच्याकडेच ओघानें आली.

या परिषदेच्या कामकाजाच्या वृत्तान्ताचीं टिपणें मेजर वुइल्यम पीअर्स नांवाच्या जॉर्जियाच्या एका मेहेनती प्रतिनिधीनें घेतलीं होतीं. त्यानें केलेलीं प्रतिनिधींचीं वर्णनें मोठीं खुमासदार व बोचक आहेत. फ्रँकलिनसंबंधानें तो लिहितो :

> फ्रँकलिन हा आजच्या काळांतील सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञ समजला जातो. निसर्गाचे सर्व नियम त्याला समजतात. आकाश त्याच्या आज्ञा मानतें व ढग त्याच्या काडींत आपली वीज बंदिस्त करूं देतात. पण राजकीय मुत्सद्दीपणा त्याच्या अंगीं किती आहे हें भावी पिढ्याच ठरवितील. सार्वजनिक सभांतून तो फारसा चमकला नाहीं हें खरें आहे. तो कांहीं वक्ता नाहीं. राजकारणांत तो आपलें लक्ष गुंतवून

ठेवतो असेंही नाहीं. तथापि तो फार असामान्य मनुष्य आहे यांत शंका नाहीं. तो जेव्हां गोष्टी सांगतो तेव्हां तो त्या इतक्या चटकदारपणें सांगतो कीं मीं अशा कोठें ऐकल्या नाहींत. सध्यां त्याचें वय ८२ वर्षांचें (तें ८१ वर्षांचें होतें. एक वर्षाची चूक झाली आहे.) आहे, आणि तरीही त्याच्या मनाचा उत्साह एकाद्या २५ वर्षांच्या तरुणासारखा आहे.

फ्रँकलिनबरोबर ज्यांनीं ज्यांनीं काम केलें त्या सर्वांनीं हें मान्य केलें आहे कीं, त्याच्यांत वक्तृत्व असें फारसें नव्हतें. आणि त्याचें भाषण फारच छोटें होई. या बाबतींत जेफरसननें त्याची वॉशिंग्टनशीं तुलना केली आहे. जेफरसन म्हणतो,

"क्रांतीपूर्वी व्हर्जिनियाच्या कायदेमंडळांत मी जॉर्ज वॉशिंग्टनबरोबर काम केलें व क्रांतिकाळांत कॉंग्रेसमध्यें डॉ. फ्रँकलिन याच्याबरोबर काम केलें. तथापि त्या दोघांनाही एका वेळीं दहा मिनिटांपेक्षां अधिक वेळ भाषण करतांना मी कधीं ऐकलें नाहीं व मुख्य मुद्द्यापलीकडे अन्य विषयाला त्यांनीं कधीं हात घातला नाहीं."

मुत्सद्दी या नात्यानें फ्रँकलिनच्या कामगिरीचें मूल्यमापन भावी पिढ्या करतील असें मेजर पीअर्स यानें म्हटलें तें योग्यच होतें. भावी पिढ्यांनीं तें केलें आहे.

१७८७ च्या उन्हाळ्यांत शक्य झालें तेवढ्या सर्व सभांना फ्रँकलिन उपस्थित राहिला. त्याचें सर्वांत मोठें भाषण म्हणजे राज्यकारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या वेतनाला त्यानें विरोध करतांना केलेलें होय. तो म्हणतो, कर्तबगार माणसांच्या मनाला दोन गोष्टींचें जबरदस्त आकर्षण असतें. एक सत्तेचें, आणि दुसरें पैशाचें." जेम्स मेडिसननें म्हटलें आहे कीं, "फ्रँकलिनचें हें भाषण लोकांनीं मोठ्या आदरानें ऐकून घेतलें. पण तें त्यांना पटलें व व्यवहार्य वाटलें म्हणून नव्हे, तर त्यांना फ्रँकलिनबद्दल आदर वाटत होता म्हणून."

कार्यकारी मंडळाला कायद्यांच्या बाहेर सत्ता देण्याच्या ठरावासही त्यानें विरोध केला. आपल्या भाषणांत व इतर वेळींही तो मधून मधून विनोद करी. स्कॉटलंडमध्यें न्यायाधीश कसे नेमले जात, वकिलांपैकींच जे

स्थळप्रत
१३९ अनुक्रम 855 29086 वि. नों. दि. 30.7.1956

सर्वोत्कृष्ट असत त्यांचीच इतर [illegible] निवड करीत व अशा रीतीनें आपल्या प्रतिस्पर्ध्यांना कसें दूर करीत याची त्यानें हकीकत सांगितली. सामान्य लोकांना नीतिभ्रष्ट करणाऱ्या कोणत्याही गोष्टीला त्याचा विरोध असे व तो तो स्पष्ट बोलून दाखवी. गरीबांना नाडून श्रीमंतांची भर करण्यास त्याचा सक्त विरोध होता. शेवटीं जेव्हां घटनेचा मसुदा अखेरच्या स्वरूपांत तयार झाला तेव्हां त्यावरील आपलें भाषण त्यानें तयार केलें व तें त्याच्या प्रतिनिधिमंडळापैकीं जेम्स वुइल्यम यानें वाचून दाखविलें. फ्रँकलिननें या भाषणांत म्हटलें आहे,

" या घटनेंत कित्येक भाग असे आहेत कीं, ते मला आज मान्य नाहींत. पण ते मला कधींच मान्य होणार नाहींत असेंही मी खात्रीनें सांगूं शकत नाहीं. मी पुष्कळ दिवस जगलों असून महत्त्वाच्या प्रश्नांवरही मतें बदलणें भाग पडल्याचीं उदाहरणें माझ्या आयुष्यांत घडून आलीं आहेत. ज्या गोष्टी एकदां मला योग्य व बरोबर वाटत होत्या त्याच पुढें तशा वाटेनाशा झाल्या. त्यामुळें जों जों मी वृद्ध होत आहे तों तों माझ्या मतांबद्दल माझी मलाच साशंकता वाटूं लागली आहे. "

कांहीं बाबतींत घटनेसंबंधीं त्याची तात्पुरती नापसंती होती. तरी इतक्या विविध प्रकारच्या लोकांच्या सभेनें इतकी सर्वांगपूर्ण घटना तयार केली याबद्दल त्यानें आश्चर्य व समाधान व्यक्त केलें आणि शेवटीं अशी इच्छा प्रदर्शित केली कीं,

"या परिषदेच्या ज्या ज्या कोणा सभासदाचें माझ्याप्रमाणेंच कांहीं वेगळें मत असेल त्यानें माझ्याप्रमाणेंच आपलेंही कांहीं चुकत असेल असें समजून आपलें मतैक्य घोषित करावें आणि या मसुद्याला आपली मान्यता द्यावी."

या उन्हाळ्यांत फ्रँकलिन आपली मुलगी सॅली बेच, तिचा नवरा व सहा मुलें यांच्याबरोबर एका विस्तीर्ण बंगल्यांत राहात होता. त्याचा तेथील ग्रंथसंग्रहही मोठा होता. त्यांत युरोपमधून त्यानें आणलेलीं कित्येक पुस्तकें होतीं. येथील ३० × १६ फुटांच्या दिवाणखान्यांत मोठें भोजनगृह होतें. तेथें एका वेळेला चोवीस लोक चांगल्या रीतीनें जेवूं शकत. त्याच्या

पेन्सिल्व्हेनिया कौंसिलच्या कांहीं बैठकाही येथेंच होत, व शास्त्रमंडळाला त्यानें येथेंच मेजवान्या दिल्या.

वरवर त्यानें आपल्या मुलाशींही जमवून घेतलें. १७८८ मध्यें त्यानें केलेल्या मृत्युपत्रांत नोव्हास्कोशियामधील आपली जमीन, कांहीं पुस्तकें व निबंध त्याला दिले आहेत. तथापि त्या ठिकाणीं त्यानें असा उल्लेख केला आहे कीं गेल्या युद्धांत तो माझ्या विरुद्ध वागला, तें त्याचें सार्वजनिक स्वरूपाचें दुष्कृत्य होतें, व म्हणून त्याला यापेक्षां अधिक मिळकत देण्याचें कारण नाहीं. त्यानंतर एका वर्षानें या मृत्युपत्राला जोडलेल्या एका पुस्तींत त्यानें जॉर्ज वाशिंग्टनला आपली हातांतील काठी देण्यांत यावी असें म्हटलें आहे. या काठीला सोन्याची मूठ बसविलेली होती. व तिच्यावर स्वातंत्र्याचें चिन्ह बसविलेलें होतें. ही कांठी जर राजदंड असती तर ती जॉर्ज वॉशिंग्टन याला शोभून दिसली असती असें त्यानें त्यांत म्हटलें आहे.

त्याच वर्षी त्याला मूत्रपिंडांतील खड्याचा विकार होऊन फार त्रास झाला. मधून मधून बरें वाटलें म्हणजे तो आत्मचरित्र लिहिण्याचें काम करी. १७८९ च्या जूनमध्यें एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत तो लिहितो,

> "अलीकडे या दुःखाच्या वेदना इतक्या तीव्र होतात कीं मला अफू घेणें भाग पडतें, व त्यामुळें दुःखाचा आवेग आणि अफूची गुंगी यांतच बहुतेक काळ निघून जातो आणि लिहिण्यास वेळच होत नाहीं."

तो जें लिही त्याच्या नकला त्याचा नातू बेंजामिन करीत असे. त्याची एक प्रत इंग्लंडला व एक फ्रान्सला पाठविण्यांत येत असे. तेथील मित्रांना पत्र लिहून आपला मनमोकळा अभिप्राय कळविण्याबद्दल किंवा त्यांत कांहीं दुरुस्ती हवी असल्यास तसें कळविण्याबद्दल त्यानें सांगितलें. पण त्यांच्याकडून त्याला उत्तरें मिळालीं नाहींत. व हें आत्मचरित्र १७५७ पर्यंतचेंच लिहून झालें.

आपलें मरण जवळ आलें हें त्याला एप्रिल १७९० मध्यें दिसूं लागलें. तरी अंथरुणाला तो खिळलेला असतांनाही त्याचे अनेक स्नेही त्याला भेटून जात तेव्हां त्यांच्याशीं तो पूर्वीप्रमाणेंच विनोद व गप्पागोष्टी करी. एक दिवस त्याचा एक मित्र डॉ. बेंजामिन रश नांवाचा त्याच्याकडे आला तेव्हां

तो उठून वसला व आपल्या मुलीला म्हणाला, " मी आतां मरणार आहे. तरी माझें अंथरूण व्यवस्थित तयार कर." १७ एप्रिल १७९० रोजीं वेंजामिनचें शांतपणें देहावसान झालें. त्या वेळीं त्याच्या बिछान्याशेजारीं टेंपल आणि वेंजामिन हे उपस्थित होते. १७९० मध्यें त्याच्या निधनाबद्दल सर्व जगभर दुखवटा व्यक्त करण्यांत आला. त्याच्या थोरवीबद्दल कृतज्ञतेची एक लाटच सर्वत्र उसळली. पॅरिसमध्यें मिराबो यानें, नॅशनल असेंब्लींत,तीन दिवसपर्यंत दुखवटा व्यक्त करण्यासंबंधींचा ठराव मांडला. तो मांडतांना मिराबो म्हणाला :

> "प्राचीन काळच्या लोकांनीं या श्रेष्ठ पुरुषाच्या निधनाबद्दल समाधि बांधल्या असल्या. त्यानें मानव जातीच्या हिताकरतां स्वर्ग आणि पृथ्वी दोन्हींचा वेध घेऊन आकाशांतील गडगडाट बंदिस्त केला, त्याचप्रमाणें जुलुमशहांनाही काबूंत आणलें. स्वतंत्र व जाणतें युरोप ह्या थोर गृहस्थाबद्दल कृतज्ञ आहे. शास्त्रें व स्वातंत्र्य यांची अखंड सेवा करणाऱ्या एका सर्वश्रेष्ठ पुरुषास आज जग आंचवलें आहे."

जगभर त्याच्या शास्त्रीय ज्ञानाबद्दल सर्वांनीं त्यास आदरांजलि वाहिल्या, व मानवी हक्कांबद्दल त्यानें जे प्रगत विचार प्रदर्शित केले त्याबद्दल त्याची स्तुति केली. युरोपांतील सर्व देशांतून त्याच्याबद्दल आदर व निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करण्यांत आला. पण त्याचे सगळयांत अधिक उपकार जर कुणावर असतील तर ते त्याच्या देशावर आहेत.

त्याच्याबद्दल देशाला इतका आदर वाटण्याचें कारण त्यानें स्वातंत्र्य संपादनाच्या कार्यांत मदत केली एवढेंच नाहीं; कारण या बाबतींत त्याच्या-पेक्षांही इतरांची कामगिरी मोठी आहे. त्याची सर्वांत मोठी कामगिरी जर कोणती असेल तर त्यानें देशाला अज्ञानांधकारांतून बाहेर काढलें ही होय. अठराव्या शतकांतील ८४ वर्षें त्यानें काढलीं. या काळांतील तो युग-पुरुष होऊन गेला. भ्रामक समजुतींनीं पछाडलेल्या व कष्टाच्या डोंगराखालीं दडपल्या गेलेल्या समाजाला त्यानें विवेकशक्ति दिली, वाणी दिली, विनोद दिला व सृष्टीकडे कसें पाहावें हें शिकविलें. अमेरिका ज्यांनीं स्थापिली त्या पूर्वजांपेक्षां फ्रँकलिन यानेंच अमेरिकेला आपली स्वतःची स्वतंत्र संस्कृति निर्माण करण्याचें सामर्थ्य प्रकट करून दिलें. आजही फ्रँकलिन यानें दिलेल्या

संस्कृतीचीच अमेरिकेंत जोपासना व वाढ होत आहे. त्याच्या थोरवीची संपूर्ण कल्पना आपणांला येण्याला कदाचित् आणखीही एकादें शतक जावें लागेल. पण आजही तो कार्यरूपानें आपल्यांत जिवंत आहे, आपल्याशीं मित्रत्वाच्या भावनेनें वागत आहे, आपल्याला सल्ला देत आहे, आपल्या आचारविचारांबद्दल पसंती–नापसंती दर्शवीत आहे, हंसत आहे, मार्गदर्शन करीत आहे. इतर कोणत्याही राष्ट्रपुरुषापेक्षां अधिक जवळचा, असा तो वाटत आहे.

---

मराठी ग्रं[illegible] ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 29066 वि: ५/[illegible]
क्रमांक ५५५ नों: दि: 30.11.55

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 6000

REFBK-0008900

पुढील प्रकाशन

# अमेरिकेची राजकारण पद्धति

आणि

# तिची प्रक्रिया